म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
स. नं. ५५२

३०६
काव्य

# सन्मणिमाला-कविता-संग्रह.

किमत १ रु.

नं ३०५
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
संग्रहालय क्रमांक ५५२
लेखक का. रा. धोंगडे
सन १८९५
पुस्तकाचें नांव सन्मणि माला कविता संग्रह

सं. काव्य.
८०२

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं०
ठाणे

॥ श्री पांडुरंग प्रसन्न ॥



(सर्व प्रकारचे हक्क मालकानें स्वाधीन ठेविले आहेत.)

हें पुस्तक

**काशिनाथ रावजी धोंगडे यांनी**

मुंबईंत—धी रिपन प्रिंटींग प्रेस कं० ली० मध्यें छापिलें.

**किंमत १ रु.**

# आमच्या पुस्तकांवर कित्येक विद्वान ग्रहस्थांचे अभिप्राय.

"सन्मणिमाला—कविता संग्रह" या नांवाचें मासिक पुस्तक आह्मांकडे येत असतें. दर महिन्याच्या अंकांत श्री नामदेव ज्ञानदेव, तुकाराम, इत्यादि साधूंचे आज पर्यंत छापून प्रसिद्ध न झालेले अभंग येत असतात व तसेंच जनाबाई, मुक्ताबाई, सेनान्हावी वगैरे साधूंचेही अभंग त्यामध्यें येतात. अभंग मूळच्या हस्त लिखित ग्रंथा प्रमाणेंच छापण्यांत यावेत. एकंदरींत पाहतां आपला उद्योग स्तुत्य आहे व लोकाश्रयास पात्र आहे कळावें.

(न्यायमूर्ति) **महादेव गोविंद रानडे.**
एम्. ए. एल् एल् बी.

१४-८-९५.

---

"सन्मणिमाला—कविता संग्रह" ह्या नांवाचें मासिक पुस्तक माझे पाहण्यांत आलें आहे. आजपर्यंत कोठें छापले नाहींत असे पुष्कळ अभंग प्रसिद्ध साधुसंतांचे ह्यांत संग्राहित आहेत. ह्या कृत्यापासून फार लोकोपयोग होणार आहे हें सांगावयास नकोच. मराठी भाषेंत जितकीं म्हणून कवनें आहेत, व विशेषतः प्रेमळ भगवद्भक्तांचीं, तीं सारीं छापून झाल्यास एक मोठा ज्ञानरसभांडार आपणांस मिळणार आहे. तेणेंकरून स्वधर्मावर विशेष प्रीति बसणार आहे व मोठमोठाल्या देशाचे फायदे होण्यास कारण होणार आहे. ह्मणून सदरील पुस्तक प्रसिद्ध करणारांचे मी फार अभिनंदन करितों व त्यांच्या ह्या सत्कृत्यास पुष्कळसा लोकाश्रय मिळो असें अन्तःकरणपूर्वक इच्छितों.

**प्रोफेसर श्रीधर गणेश जीन्सीवाले.** एम्. ए.
मुंबई—ठाकुरद्वार, ता० २० सप्टेंबर १८९५.

"सन्मणिमाला—कविता संग्रह" या पुस्तकाचे पहिले दोन अंक आपण पाठविले ते पोहोंचले. ते मी वाचले. आपण उद्योग आरंभिला आहे तो स्तुत्य व आश्रयास पात्र आहे. कारण संतांची कविता न छापलेली अशी पुष्कळ आहे. पारमार्थ दृष्टीनें ती अतिशय मोलवान आहे. सांप्रतच्या शिक्षण पद्धतीमुळें तिची हेळसांड होत आहे. तेव्हां तिला काळाच्या जबड्यांतून सोडविण्याचा आपण यत्न करीत आहां हें स्तुत्य आहे. पुढचे अंक मजकडे पाठवावे.

**रावसाहेब शिवराम शिताराम वागळे**

पेण, सब जड्ज.

पेण, ६-९-९८.

---

"सन्मणिमाला—कविता संग्रह" या नांवाच्या मासिक पुस्तकाचे अकरा अंक रा. रा. काशिनाथ रावजी धोंगडे यांनी मला कृपा करून दाखविले. या मासिक पुस्तकांत महाराष्ट्रांत जे साधु संत भगवद्भक्त अवतरले ह्यांचे आजपर्यंत प्रसिद्ध न झालेले कविता बद्ध ग्रंथ (अभंग, ओंव्या, पदं, खेळिये, इत्यादि) प्रसिद्ध केले आहेत. या अकरा अंकांत सुमारे तीस पसतीस साधु संतांच्या प्रेमळ कविता आहेत. उदाहरणार्थ—जनाबाई, मुक्ताबाई, मिराबाई, गोणाई, आणि राजाई; गोराकुंभार, सेना न्हावी इत्यादि. ह्यां कवनें फार प्रेमळ आणि चित्तवेधक आहेत. रा. रा. धोंगडे यांनीं हा मोठा स्तुत्य उद्योग सुरू केला आहे व या संबंधानें सर्व महाराष्ट्रियांनीं यांचें अभिनंदन केलें पाहिजे; आणि यांना चांगला आश्रय दिला पाहिजे.

**भालचंद्र कृष्ण भाटवडेकर**

एल्. एम्. आणि एस्.

व म्युनिसिपल कौन्सिलर.

मु० मुंबई. ता० १ १०—९८.

मुंबई,—ता० १४ अक्टोबर १८९९

"सन्मणिमाला—कविता संग्रह" मासिक पुस्तकाचे चार पांच अंक मी वाचून पाहिले. त्यांत आपल्या महाराष्ट्रांतील प्रसिद्ध संतमालिकेंतील कित्येक साधूंच्या दुर्मिळ अभंगाचा संग्रह केलेला आहे. हे अभंग प्रासादिक असल्यामुळें मनाची शुद्धि करणारे व भक्ति उत्पन्न करणारे आहेत. भाविकजनांनां ह्या पुस्तकाच्या वाचनानें क्षणभर तरी संतसमागमाचा लाभ झाल्यामारखा वाटल्यावांचून राहणार नाहीं एकंदरींत हें मासिक पुस्तक लोकांच्या आश्रयास पात्र आहे.

**सदाशिव वामन काणे** एल्. एम्. आणि एस्.

**प्रोफेसर राजाराम रामकृष्ण भागवत** यांनीं कृपा करून आह्मांस एक पत्र पाठविलें त्या पत्रांत लिहितात कीं,—

१३-चैत्र कृष्ण-१८१७. २२-एप्रील ९५.

रा. रा. काशिनाथ रावजी धोंगडे यांस,

पोष्य राजाराम रामकृष्ण भागवत याचे—

मा. न.—वि. वि. सहाही अंक आपण पाठवलेले पाहिले एक "मराठा है स्कूल" या शाळेच्या नांवावर आणि एक माझ्या नांवावर मिळून दोन पुस्तकें "मराठा है स्कूल"मध्यें टाकीत जाणें.

आपण प्रस्तावनेंत मराठी संतांची व्यास-वाल्मीकींशीं तुलना केली आहे ती ठीक आहे. ऋषींची योग्यता कमी नाहीं, कारण ते तपोऽग्नींतून तावून सुलाखून बाहेर पडलेले तरी त्यांची सरस्वती शूद्रांनीं किंवा स्त्रियांनीं ऐकतां कामा नये. आमच्या मराठी संतांची योग्यता ऋषींच्याहून उघड जास्त; कारण संतांची सरस्वती जो कोणी ऐकतो—मग तो शूद्र असो किंवा शूद्राच्याही पलीकडचा असो—तो पावन होतो. ऋषी होऊन गेले त्या काळीं तपाचें माहात्म्य होतें, भक्ति हा पदार्थच माहीत नव्हता, भक्तीचा मार्ग पहिल्यानें

खुला केला भगवद्गीतेनें. पूर्वीच्या युगांतली प्रजा पुनः कलींत एकदा तरी जन्म घेऊं इच्छिते; कारण भक्ती मुक्तीच्या ही वरची पडल्यामुळें तिचा स्वाद घेण्याची इच्छा उत्पन्न होणें साहजिक आहे. ह्मणून या कलियुगाचें माहात्म्य एकनाथस्वामी भागवताच्या अनुरोधानें इतर युगांच्याहून जास्त ठरवतात. "चोंटवीन लाळ ब्रह्मज्ञान्या हातीं। मुक्ता आत्मस्थिती सांडवीन" असें तुकोबा ह्मणतात तें खोटें नव्हे. "नलगे मुक्ती धन संपदा। संत संग देई सदा" हेंच मागणें भक्ताचें अमावयाचें ह्मणून भक्तीचा चिंतामणी हातीं देणाऱ्या कलियुगांतल्या संतांच्या सरस्वतीची मातब्बरी भक्तीचा चिंतामणी हातीं न देणाऱ्या पूर्वीच्या युगांतल्या ऋषींच्या सरस्वतीच्या मातब्बरीहून उघड जास्त. संतांची सरस्वती वेदाक्षराच्या वरची असतांही हे अभंग वेदमंत्राप्रमाणें "भलत्याच्या कानीं जाऊं देतां कामा नये" असें आपण ह्मणता आणि वेदमंत्रांशीं तुलना करून संतांच्या सरस्वतीची मातब्बरी कमी करता, हें काम मात्र मजसारख्याच्या समजुतीस उफराटें दिसतें. जर प्रामादिक अभंग कानीं पडले नाहींत, तर भलत्यांची चांगल्या मार्गाकडे प्रवृत्ती होणार कशी? जसा ख्रिस्त्यांचा आणि मुसलमानांचा धर्म वृद्धी करण्याकडे यत्न चाललेला असतो, तसाच संतमंडळीच्या सरस्वतीची मातब्बरी समजणारांनी केला पाहिजे.

* * * * *

भानुदास, सेनान्हावी, चोखा, असल्यांची सरस्वती आज उपलब्ध नसावी, असें कित्येकांस वाटत होतें. ही कित्येकांची समजूत घालवण्यास आपलें मासिक पुस्तक योग्य काळीं अवतरलेलें दिसतें. जी मदत मजसारख्यांकडून होण्याजोगी असेल, ती संकोच न बाळगतां सुचवावी; ह्मणजे शक्तीप्रमाणें करण्याच्या कामीं आळस होणार नाहीं, इतकें कळवलें, म्हणजे आपल्या मासिक पुस्तकाच्या किंमतीविषयीं आणखीं जास्त मत देण्याची जरूरी उरली नाहीं.

* * * * *

"सन्मणिमाला-कविता संग्रह" नामक मासिक पुस्तकाचे अकरा अंक मी पाहिले त्यांतील आजपर्यंत न छापलेले अभंग व इतर कविता भक्तिपर व ज्ञानपर असल्यामुळें वाचकांस सर्वथा प्रीय व उपयोगी होण्याचा संभव आहे. ह्या पुस्तकाचा उद्देश स्तुत्य असल्यामुळें लोकाश्रयास तें पात्र होईल अशी मी आशा करितों.

**डाक्तर मोरेश्वर गोपाळ देशमुख** बी ए. एम. डी.

मुंबई, ता० ३० सप्तंबर १८९५.

---

" सन्मणिमाला--कविता संग्रह " या मासिक पुस्तकाचे पहिले अकरा अंक वाचून पाहिले, त्या वरून तें लोकोपयोगी होईल असें वाटतें. आमच्या महाराष्ट्र संत मंडळीची प्रासादिक सरस्वती सांधी कोंधींत लोळत पडल्यामुळें तिची हल्लीं जी हेळसांड होत आहे ती अंशतः तरी कमी करण्याचा रा. धोंगडे यांचा प्रयत्न फार स्तुत्य आहे. तेणें करून उपलब्ध असलेल्या महाराष्ट्र ग्रंथ संग्रहांत चांगली भर पडून मराठी कवितेला उत्तेजन मिळेल इतकेंच नाहीं तर मागील भगवद्भक्तांच्या रसाळ वाणीच्या साहाय्यानें पुढील पिढीची आध्यात्मिक उन्नतिही सुकर होईल. प्रस्तुत मासिक पुस्तकांत पुष्कळ सुधारणा करण्या सारख्या आहेत. एका व्यक्तीचे अभंग एकत्र छापण्याची व्यवस्था पाहिजे. कवी विषयीं उपलब्ध माहिती प्रसिद्ध व्हावी व ठिकठिकाणीं अर्थदर्शक टिपाही पाहिजेत. उत्तरोत्तर लोकाश्रय मिळून वरील सुधारणा करण्यास संपादकांस उत्तेजन येईल अशी आशा आहे.

**महादेव राजाराम बोडस**

बी. ए. एल्. एल्. बी. (वकील हायकोर्ट.)

मुंबई, ता० ६ सप्तेंबर १८९५.

# अनुक्रमणिका.*


पृष्ठांक

प्रस्तावना.... .... .... ... .... १– ६
श्री ज्ञानेश्वराची सनद .... .... .... ३७– ४२
श्री ज्ञानदेव .... .... १७७–१९२, २२२–२३२
सोपान .... .... .... .... .... २३३–२३५
चांगदेव .... .... ....१४२–१४३, २३५–२४६
मुक्ताबाई.... ३१–३६, १०५–११०,
११५–११८, २५५–२५८
निवृत्तिराजकृत नमनस्तोत्र .... .... ९५
ज्ञानदेव ,, ,, .... .... .... ९६–१०२
सोपान ,, ,, .... .... .... १०२–१०३
चांगदेव ,, ,, .... .... .... १०३–१०४
वटेश्वर ,, ,, .... .... .... १०४
हैबती .... .... .... .... .... २३९
विसोबा खेचर .... .... .... .... १३७
श्री नामदेवकृत ज्ञानेश्वराचे आधीचे अभंग
(ज्ञानेश्वराची आदि).... .... .... ४२– ५४
श्री नामदेव कृत भारुड.... .... .... २१२–२१६
श्री निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ताबाई,
गोराकुंभार आणि नामदेव यांचे भेटीचे
अभंग.... .... .... .... .... १३–२२
नारायण.... .... .... .... .... १३९


---

* या पुस्तकाच्या १२ अंकांमध्यें ज्या ज्या साधूंचे अभंग दाखल झाले आहेत, ते प्रत्येक अंकीं निरनिराळे फुटकळ छापल्या कारणानें साधूंचें नांव आणि पृष्ठांक मिळून अनुक्रमणिका दिली आहे. एकाच ओळींत एक किंवा अधिक अंक आले आहेत ते निरनिराळ्या ठिकाणीं पृष्ठांकाप्रमाणें अभंग आहेत असें समजावें.

पृष्टांक.

विठा........ .... .... .... .... ७९–८०
गोणाई .... .... .... .... .... ८१–८६
राजाई .... .... .... .... .... ८७–८९
जनाबाई.... ....७–१२, १४४–१६१, १६९–१७६
गोराकुंभार.... .... .... ६३–६४, ११८–१२०
चोखामेळा.... .... .... .... .... ५४–६०
सावतामाळी.... .... .... .... .... ८२–९०
मिराबाई.... .... ....१३३–१३६, २१७–२२१
नरसी मेहेता .... .... .... .... १११–११४
शेखमहमद.... .... .... .... .... ६५–६६
सुरदास.... .... .... ....६६–७०, २६३–२६६
तुलसीदास.... .... .... .... .... ७१–७८
नरहरि सोनार .... ....२२१–२२२, २४७–२५४
कबीर .... .... .... .... .... १५८–१६२
सेना न्हावी.... .... .... २३–३०, १४०–१४२
भानुदास .... ६१–६३, १२१–१२२, १६३–१६४
बोधला .... .... .... .... .... २३१
जोगापरमानंद .... .... .... .... २३८–२३९
मुधोपंत .... .... .... .... .... २३७–२३८
मालोपंत .... .... .... .... .... २४०
श्री तुकारामकृत सार्थ अभंग .... .... १५२–१५६
कान्हा .... .... .... .... .... १२३–१३२
रामेश्वर भट्ट.... .... .... .... .... १३८
निळोबा .... .... .... ९१–९४, १९३–२०२
मध्वमुनिश्वर .... .... .... .... २४१–२४६
उद्धवचिद्घन .... .... .... .... १५९–१६२
मुद्गलस्वामी.... .... .... .... .... २०३–२११

# प्रस्तावना.

पुराणपुरुष, अलक्ष, अविनाश, पंढरीचा अधीश जो पांडुरंग त्यास सहस्त्र प्रणिपात असोत. श्रीपांडुरंगास भक्तवत्सल हें नांव यथार्थ मिळालें आहे. भक्तांस प्रसन्न होऊन अज्ञानमूढ लोकांचा उद्धार होण्यासाठीं भगवंतानें त्यांस मृत्युलोकीं पाठविलें. महाराष्ट्र प्रांतांत ते अवतरले. आणि त्यांनीं भीमातीरनिवासी, जो भक्तांसाठीं कमरेवर हात ठेऊन उभा राहिलेला श्री विठ्ठल त्याची कीर्ति प्रेमभरित होऊन गाइली. पूर्वकाळ जसें व्यास-वालिमकी यांणीं श्रीहरिचरित्र वर्णन करून आपलीं नांवें अजरामर केलीं, आणि शेकडों लोकांस सन्मार्गास लाविलें; त्याचप्रमाणें या भक्तांनीं अभंगवाणी गाऊन प्राकृत जनांचा उद्धार केला. परमार्थज्ञान, वैराग्य आणि हरिनामस्मरणमहिमा ह्यांनीं सांगून मुक्तिमार्ग सर्वांस सोपा करून ठेविला.

संतांनीं शेकडों भाविकांस तर उद्धरलेंच, पण 'सर्वांगीं सुवास परि तो उगला न राहे । सभोंवते तरुवर चंदन करिताचि जाये' ह्या प्रमाणें अज्ञानी, खळ अशा लोकांसही त्यांनीं आपल्यासारखें भक्त करून टाकिलें. शालीवाहन शकाच्या ११ व्या शतकापासून १७ व्या शतकापर्यंत हे भूमंडळावर अवतीर्ण झाले. पहिले मुकुंदराज होत. दुसरे प्रत्यक्ष विष्णु श्रीज्ञानेश्वर महाराज होत. पांडुरंगाचा अत्यंत लडिवाळ भक्त जो नामदेव आणि एकनाथ, रामदास, व श्रीतुकाराममहाराज इत्यादि भक्त यानंतर अवतरले. युगायुगीं परमेश्वर अवतार घेऊन साधूंचें पालन आणि दुष्टाचें शासन करीतच आहे.

१० अवतारांपैकीं चालू अवतारांत परमेश्वरानें आपल्या भक्तांकडून पालन आणि शासन करविलें.

परमेश्वर स्वतः गुणरहित आहे, तथापि भक्तांसाठीं तो सगुण झाला. भक्तांनीं आपल्या निःसीम भक्तीनें दगडाच्या देवास बोलता चालता केलें. एकनाथांनीं एके ठिकाणीं प्राकृत जनांस येणें प्रमाणें ह्मटलें आहे:—

सचेतनीं द्वेष अचेतनीं पूजा ।
भक्ती गरुडध्वजा कैंवि पावे ॥ १ ॥
व्यर्थ खटाटोप नाथिला पसारा ।
गोविंद गव्हारा कैंवि कळे ॥ २ ॥
हरिदासाचेनि गुणें शिळा दैवतपणें ।
त्या शिळा पूजोनि त्यांतें द्वेषी ॥ ३ ॥

लोक सजीव जे साधू त्यांचा द्वेष करितात, आणि निर्जीव दगडाची पूजा करितात. अशा बुद्धिनें कोठें गरुडध्वज पावत असतो ! दांभिक खटाटोप आणि पूजेचा पसारा माजविल्यानें गोविंद जाणतां येणार नाहीं. हरिदास—भक्त—ज्यांस अहार, निद्रा, विषय यांचें भानही नाहीं, इतके जे हरिचरणीं अनुरक्त झालेले—ज्यांनीं दगडांत देवपण आणिलें, त्यांचा द्वेष केल्यानें काय परमेश्वरप्राप्ती होईल ? ह्याच भक्तांनीं रामावतारीं वानर होऊन, अजिंक्य दशानन कैलासास पाठविला. कृष्णावतारी हेंच गोपाळ झाले. जेथें भक्त तेथें देव आहेच. भक्तांचें संकट श्रीहरीनें वेळोवेळीं निवारण केलें आहे. भक्त आणि देव दोन नाहींत. समुद्र आणि लाटा मिळून जसा समुद्रच, तसे भक्त ह्मणजे देव होत. अशीं भक्तांचीं स्थानें महाराष्ट्रांत सर्वत्र आहेत.

चालू युगांत योग, याग, व्रतें हीं यथाविधि व्हावयाचीं नाहींत हें जाणून भक्तांनीं, कोणी गुणानुवाद वर्णन करून,

कोणी सप्रेम कीर्तन करून, कोणी संतसेवा करून परमेश्वर प्राप्तीचा अगदीं सोपा मार्ग लोकांस दाखविला. बहुतकरून यांचा—

उत्तम व्यवहार करितां जाण । असत्य कदापि न बोले वचन ।
प्रारब्धबळें मिळेल धनधान्य । सत्कर्मी पूर्ण तें वेंची ॥ १ ॥
साधुसंत वैष्णवभक्त । तीर्थवासी ब्राह्मण अतीत ।
देखोनि आदरें गृहासि नेत । सप्रेम पूजित त्यालागुनि ॥ २ ॥
संसार धंदा करितां जाण । मुखें करितसे नामस्मरण ।
रात्रीं मेळवूनि भाविक जन । आनंदें कीर्तन करितसे ॥ ३ ॥

असा वर्तनक्रम असे.

श्रीकृष्णांनीं उद्धवास भागवत एकादश स्कंधांत जीं भक्तांची लक्षणें सांगितली आहेत, किंवा भगवद्गीतेंत १२ व्या अध्यायांत जो भक्तियोग सांगितला आहे, तदनुरुप संतांनीं अवतार घेतला. पूर्व अवतारांत जसा दुष्ट दैत्यांचा नाश झाला, तसा ह्या अवतारांत भक्तांनीं षड्रिपूंचा नाश केला. भक्त हे शांति, क्षमा, दया, सदाचरण, संतोष ह्यांचे मूर्तिमान् पुतळे होत. पंढरपूर हें भक्तांचें माहेरघर. विठोबा बाप, पुंडलीक भाऊ, आणि चंद्रभागा बहीण.

विश्वचक्र हें रहाट-गाडग्यासारखें आहे. सर्व वस्तु नाशवंत आहेत. जन्म आणि मृत्यु, किंवा उत्पत्ति आणि लय हीं सर्वांस आहेतच. मोठमोठे पृथ्वीपती आणि त्यांचीं रत्नखचित सिंहासनें नाहींशीं झालीं आहेत. प्रवृत्ति निवृत्तीला जिंकते, असा आपणास क्षणभर भास मात्र होतो. मोठे कारखानें, मोठीं राष्ट्रें, त्यांचें अधिपति, आणि त्यांचें वैभव हीं पाहून आपण लोभाविष्ट होऊं नये, हें चांगलें. परमेश्वरावर भार ठेऊन आपण आपला व्यवसाय करावा. लोभापेक्षां संतोषच श्रेष्ठ आहे. सदाचरणानें वागून आपला

संसार धंदा आटपल्यानंतर हरीचें स्मरण करावें. हरीवर भार ठेऊन ज्यांनीं मोठमोठे उद्योग हातीं धरले, त्यांचे ते सिद्धीस गेले आहेत. असाध्य कृत्य कोणतेंच नाहीं. जो निश्चय धरील त्याला सर्व कांहीं मिळेल. अशीं संतांचीं व-चनें आहेत.

हरिभजनाची इच्छा कशी होईल, आणि ती गोडी कशी लागेल ह्याची काळजी करावयास नको. महाराष्ट्र सा-धूनीं हे उपकार आह्मांवर करून ठेविले आहेत. सज्जनांच्या संगतीनें जीं जीं कार्यें होतात, तीं तीं त्यांनीं लिहून ठेव-लेल्या ग्रंथांनीं होण्यासारखीं आहेत. 'नर करणी करे तो नरका नारायण होवे' अशी उक्ति आहे, तेव्हां स्वतः नारायण होतां येतें, तर वैभव, संपत्ति इ. नाशवंतांची प्राप्ती होणें कठीण नाहीं. व्यवहारांत, प्रपंचांत त्रास आणि खेद हीं भरलेलीं असतात, नेहमीं दुःखाचेच प्रसंग. अंतःक-रणाला त्रास झाला असतां देवाची आठवण आपल्यास झाल्या-वांचून रहात नाहीं. तीच आठवण नित्य धरावी. 'जातां येतां, बसतां, उठतां, कार्य कारितां, देतां, घेतां, वदनीं व दतां, ग्रास गिळितां, घरीं, दारीं, शय्येवर लज्या त्यजून भगवच्चिंतन कर, असें पंडितांनीं सांगितलें आहे. भगवच्चिंतन करण्यास कोठेंच हरकत नाहीं. चोविस तासांत अर्धा तास वेळ सहज मिळेल. निदान हरिदिनीं एकाग्र लक्ष्य लावून एक तासभर भजन कीर्तन करण्यास किंवा ऐकण्यास हरकत नाहीं. सप्रेम भजन ह्मणजे काय, आणि तें कसें असलें पाहिजे, हें नाथानीं सांगितलें आहेः—

सात्विकाभरणें रोमासि दाटणें ।
स्वेदाचें जीवन येऊं लागे ॥ १ ॥

कांपे तो थरारी स्वरूप देखे नेत्रीं ।
अश्रु त्या भीतरीं वाहताती ॥ २ ॥

आनंद होय पोटीं स्तब्ध झाला कंठीं ।
मौन्य वाक्पुटीं धरुनि राहे ॥ ३ ॥

टाकि श्वासोच्छ्वास अश्रुभाव देखा ।
जिरवूनि एका स्वरूप होय ॥ ४ ॥

एका जनार्दनीं ऐसे अष्ट भाव ।
उत्पन्न होतां देव कृपा करी ॥ ५ ॥

तेव्हां वर सांगितल्याप्रमाणें या साधुमार्गाला लागून कोणासही हरिभजन करितां येईल. पण आश्चर्य हें कीं, संतांनीं दाखविलेला हा सोपा मार्ग न स्वीकारितां काल्पनिक सुखास भुलून लोक धक्के खात आहेत. कायिक, वाचिक, मानसिक शेकडो दोष मनुष्यांकडून नित्यशः घडत असातातच. आपण मोठा पराक्रम केला, अधिकार मिळविला, सर्व सुखें अनुकूळ असलीं, ह्मणजे आपण बहुधा कोणास जुमानीत नाहीं. पण सर्वांस वांकाविणार जो मृत्यू त्याचा तडाका एकाद्यावर आलेला जर आपण पाहिला, तर क्षणभर वैराग्य उत्पन्न होतें, पण त्याचें नांवच स्मशानवैराग्य ! ! साधूदृष्टीनें हा सर्व ईश्वराच्या घरचा खेळ आहे. मृत्यू म्हणजे जुनें वस्त्र टाकणें होय.

मृत्यूचें भय संतापाशीं नाहीं. तो त्यांचा खेळगडी आहे. स्मशानवैराग्याचे वेळीं संसार क्षणभंगुर दिसतो, कित्येक अविचारी खुळे संसार सोडून मुक्त झालों असें मानतात. संसारांत राहूनच ईश्वरदत्त देणगीचा सद्विनियोग करा; असें संतांचें सांगणें आहे. हा सद्विनियोग व्हावयास सद्विचार पाहिजे. हा विचार आणि हें ज्ञान संतांच्या ग्रंथांचा पाठ

केल्यानें होईल. स्तोत्रें वगैरे पाठ करण्याची जी अनुज्ञा तिचें कारण हेंच कीं, त्याचें पुष्कळ वाचन आणि अवलोकन व्हावें; जेणेंकरून अर्थज्ञान होईल. मुमुक्षूंनीं साधूंच्या अभंगवाणीशीं सहवास केल्यानें त्यांचे मनोरथ सिद्धीस जातील.

असो, या भक्तिमार्गाचें आम्हीं वर्णन करण्यापेक्षां ह्या पुस्तकांत येणारीं समर्थांचीं वचनें, जो लक्ष्यपूर्वक वाचील त्यांस त्याचें श्रेष्ठत्व समजून येईल. हल्लींच्या पोटार्थी मंडळीस आणि ऐहिक सुखाच्या भोक्त्यांस, सांप्रत धर्माची अनास्था होत आहे. इतकें जरी वाटेल आणि आस्था उत्पन्न होईल; तसेंच ज्या जगन्नियंत्यानें आपणांस उत्पन्न केलें त्याची थोडीशी आठवण जर पुस्तक वाचणारांस होईल; तरी आमच्या श्रमाचें सार्थक झालें असें आम्हीं मानूं. संतांच्या प्रसादानें अशी इच्छा वाचकांस उत्पन्न होवो.

---

☞ ज्या सद्गृहस्थांच्या संग्रहांत जुना हस्तलेख (प्रासादिक कवींच्या अभंगांचा संग्रह) असेल त्यांनीं आह्मांवर कृपा करून दिल्यास आह्मीं त्यांचे आभार मानून अनुपलब्ध लेख या पुस्तकद्वारें प्रसिद्ध करूं.

प्रकाशक.

# सन्मणिमाला-कविता संग्रह.



## जनाबाई.

१

अरे द्वारकेच्या राया । ज्ञान देरे नाम घ्याया ॥ १ ॥ मी तर मूढ तुझी दासी । ठाव देई चरणापाशीं ॥ २ ॥ तुझें रूप धरी करी । आतां न टाकावें दुरी ॥ ३ ॥ नकळे हरीची करणी । ह्मणे नामयाची जनी ॥ ४ ॥

२

धुणें घेउनियां कांखेसी । जनी चालली धुवायासी ॥ १ ॥ देव तातडीनें आले । धुणें घेऊनियां गेले ॥ २ ॥ कांरे धांवोनि आलासी । जारे आपुल्या राउळासी ॥ ३ ॥ चहूं हातें धुणें केलें । जनी ह्मणे बरवें झालें ॥ ४ ॥

३

कांरे उशीर लाविला । माझा विसर पडला ।। १ ।। तुजवरीं हा संसार । मोकलिलें घरदार ।। २ ।। तूं ये आपुल्या दासी । जनी ह्मणे विसंबेसी ।। ४ ।।

४

साळी कांडाया चालली । पुढें विठो उखळ झाडी ।। १ ।। पायीं पैंजण हातीं कडीं । कोंडा पाखडुनि काढी ।। २ ।। कांडण कांडितां घाम आला । तेणें पितांबर भिजला ।। ३ ।। प्रेम सुखाचें कांडण झालें । जनी भराभरां बोले ।। ३ ।।

५

नामयाचें ठेवणें दासीस लाधलें । धन्य सांपडलें विटेवर ।। १ ।। धन्य माझा जन्म धन्य माझा वंश । धन्य विष्णुदास स्वामी माझा ।। २ ।। काम धाम होतें विठोबाचे पायीं । निशिदिनीं पाही हरपलें ।। ३ ।। नामयाची जनी पालट पैं झाला । हृदयीं बिंबला पांडुरंग ।। ४ ।।

६

कोणे एके दिवशीं । विठो गेला सावत्यापासी ।। १ ।। खुरपें घेउनि हातीं । नित्य काम करी शेतीं ।। २ ।। सात पुरुष पाणी खोल । तिथें विठों केली ओल ।। ३ ।। बीज नव्हतें तेंही घरीं । तिथें विठो आणुन पेरी ।। ४ ।। जनी ह्मणे शारंगधरा । तेथें भक्ताचा मोहरा ।। ५ ।।

७

कोणे एके दिवशीं । पाणी नव्हतें विसाणासी ।। १ ।। देव धांवोनि आला । घे घे हिवसे उदक बोलला ।। २ ।। आपुल्या हातें विसाणीं । घाली जनीच्या डोइवर पाणी ।। ३ ।। जनी ह्मणे कृपा केली । मायबहिण भाऊन आली ।। ४ ।।

८

अरे पंढरिच्या राया । मी तर लागेन तुझ्या ॥ १ ॥ मजला तूं देइ बुद्धि । लावी आपुल्या छंदी ॥ २ ॥ ऐसें जनीनें म्हटलें । विठोबानें आयकिलें ॥ ३ ॥

९

हाटा जायाची तातडी । नामा होता पैलथडी ॥ १ ॥ जागे बेगीं आण त्यासी । नाहिंतरी जातो उपवासी ॥ २ ॥ जनी धांवत चालली । मार्गे विठ्ठल माऊली ॥ ३ ॥

१०

येई येई माझे आई । सखे साजणी विठाबाई ॥ १ ॥ कां गे उशीर लाविला । प्राण डोळियासी आला ॥ २ ॥ मी हो वत्स माझी गाई । न ये आतां करूं काई ॥ ३ ॥ विनवा माझी हरणी । चुकलें पाडस दासी जनी ॥ ४ ॥

११

जनी दळाया चालली । मार्गे विठाई माउली ॥ १ ॥ एका हातें घांस घाली । एका हातें जातें ओढी ॥ २ ॥ ऐसें दळण सरलें । दासी जनीनें भरलें ॥ ३ ॥

१२

हरीहर ब्रह्मादिक । नामें तारिले तिन्ही लोक ॥ १ ॥ ऐशी कथेची महिमा । झाली बोलायाची सीमा ॥ २ ॥ नामदेवाचें कीर्तनीं । ध्वजा आल्या स्वर्गाहुनी ॥ ३ ॥ जपें तपें लाजियलीं । तेथें शरणागतें आलीं ॥ ४ ॥ वेद श्रुति देति ग्वाही । ह्मणे जनी सांगूं काई ॥ ५ ॥

१३

येगा येगा विठाबाई । माझे पंढरीचे आई ॥ १ ॥ भीमा आणि चंद्रभागा । तुझे चरणीची गंगा ॥ २ ॥ इतुक्या स-

हित त्वां वा यावें । माझ्या रंगणीं नाचावें ॥ ३ ॥ माझा रंग तुझे गुणीं । ह्मणे नामयाची जनी ॥ ४ ॥

१४

कागा निष्ठुर झालासी । मुक्या बाळातें सांडिसी ॥ १ ॥ तुज वाचुनिया माथे । जीव माझा जाऊं पाहे ॥ २ ॥ प्राण धरिलासे कंठीं । जनी ह्मणे देई भेटी ॥ ४ ॥

१५

चिंतन चित्ताला । लावी मनाच्या मनाला ॥ १ ॥ उन्मनीच्या सुखा आंत । पाडूरंग भेटी देत ॥ २ ॥ कंवटाळीन भेटीसाठीं । जनी ह्मणे सांगो गोष्टी ॥ ३ ॥

१६

कैसा कीर्तनाचा रंग । वाद्यें मिळाली अनेग ॥ १ ॥ टाळ मृदंग गर्जती । वीणे मंजूळ वाजती ॥ २ ॥ कर्णे तुरे झल्लरी । कैशा गर्जताती भेरी ॥ ३ ॥ दिंडी पताकाची दाट । उभा वैष्णवाचा थाट ॥ ४ ॥ नाम टाळीचा गजर । तेणें दुमदुमिलें अंबर ॥ ५ ॥ ऐसा कीर्तनाचा छंद । दासी जनीसी आनंद ॥ ६ ॥

१७

बाप श्रोत्याचा राजा । कैशी उभविली ध्वजा ॥ १ ॥ एक झाला परिक्षिती । ऐसे पवाडे गर्जती ॥ २ ॥ भागवत रस । शुक वाटी सावकाश ॥ ३ ॥ ज्याची ऐकतां गर्जना । कंप काळाचिया मना ॥ ४ ॥ सात दिवस वृष्टी झाली । जनी ह्मणे मात झाली ॥ ५ ॥

१८

कीर्तनाचा रस । देवा ओगरी आह्मांस ॥ १ ॥ प्रेमाचा हा पान्हा । नित्य पाजी नारायणा ॥ २ ॥ संजिवनी नामापाशीं । तेचि सत्रावी आह्मांसी ॥ ३ ॥ देह आवडीचें भोजन । नामयाची जनी ह्मणे ॥ ४ ॥

रा.काव्य
४०२



१९

वक्ता प्रेमामृत खाणी । श्रोता श्रेष्ठ चूडामणी ॥ १ ॥ तेथें ओते ब्रह्मरस । फिकें होतसे पीयुष ॥ २ ॥ वक्त्या श्रोत्यामाजी देख । श्रोता वक्ता दोन्ही एक ॥ ३ ॥ देह कीर्तनाची ठेव । जनी भाकितसे कींव ॥ ४ ॥

२०

सण दिपवाळीचा आला । नामा राउळासी गेला ॥ १ ॥ हातीं धरुनि देवासी । चला आमुच्या घरासी ॥ २ ॥ ऐसें देवासी बोलिला । देव घरासि आणिला ॥ ३ ॥ जनाईनें उटणें केलें । दामाशेटीनें न्हाणिलें ॥ ४ ॥ पदर माथ्याचा काढिला । बाळ नंदाचा पुशिला ॥ ५ ॥ हातीं घेउनि पंचारती । चक्रपाणी ओंवाळिती ॥ ६ ॥ हातीं धरुनि नेला आंत । वाढी पंचामृत भात ॥ ७ ॥ आत्म सुखाचा ढेकर दिला । जनी ह्मणे विठ्ठल धाला ॥ ८ ॥ अवघे जेउनी ऊठले । दासी जनीनें विडे दिले ॥ ९ ॥

२१

विठु माझा लेकुरवाळा । संगे गोपाळांचा मेळा ॥ १ ॥ एकनाथ खांद्यावरी । कबीराचा हात धरी ॥ २ ॥ गोरा कुंभार कडेवरी । चोखा जीवाबरोबरी ॥ ३ ॥ विसोबा तो मांडीवरी । नामा करांगुळी धरी ॥ ४ ॥ पुढें चाले ज्ञानेश्वर । मागें मुक्ताई सुंदर ॥ ५ ॥ जनी ह्मणे बा गोपाळा । करी भक्ताचा सोहळा ॥ ६ ॥

२२

भक्त आवडती देवा । करूं धांवे त्याची सेवा ॥ १ ॥ ऐसा भक्ताचा अंकित । अंगें निवारी आघात ॥ २ ॥ हरीतसे श्रम । त्याचा वाहे योगक्षेम ॥ ३ ॥ धांव घालितो निर्वाणीं । ह्मणे नामयाची जनी ॥ ४ ॥

२३

माझा नामा मज देई । जीव देईन तुझे पायीं ॥ १ ॥ तुझ्या संगें जे लागले । तें त्वां जीतचि मारिले ॥ २ ॥ पुंडलीका भलविलें । तैसें माझें मूल केलें ॥ ३ ॥ परी तें न चाले आह्मासी । देई माझ्या नामयासी ॥ ४ ॥ विठो ह्मणे गोणाबाई । आपुला नामा घेउनि जाई ॥ ५ ॥ हातीं धरुनेया नेला । दासी जनाला आनंद झाला ॥ ६ ॥

२४

धरिला पंढरीचा चोर । गळा बांधोनीया दोर ॥ १ ॥ हृदय बंदीखाना केला । आंत विठ्ठल कोंडिला ॥ २ ॥ शब्दें केली जडाजुडी । विठ्ठल पायीं घातली बेडी ॥ ३ ॥ सोहं शब्दाचा मारा केला । विठ्ठल काकुलती आला ॥ ४ ॥ जनी ह्मणे बा विठ्ठला । जीवें न सोडी तुजला ॥ ५ ॥

२५

विवेकसागर । सखा माझा ज्ञानेश्वर ॥ १ ॥ मरोनीया जावें । बा माझ्याच्या पोटा यावें ॥ २ ॥ ऐसें करी गा माझ्या भावा । सख्या माझ्या ज्ञानदेवा ॥ ३ ॥ जाईन ओंवाळुनि । जन्मोजन्मीं ह्मणे जनी ॥ ४ ॥

२६

सखये साजणी । ज्ञानाबाई माय बहिणी ॥ १ ॥ मज पाडसाची माय । भक्तवत्साची तूं गाय ॥ २ ॥ कां गा उशीर लाविला । तुजविण शीण झाला ॥ ३ ॥ बैसले दळणीं । धांव घाली ह्मज जनी ॥ ४ ॥

२७

संवत्सर ग्राम जाण । तेथें नांदे हा सोपान ॥ १ ॥ पंचगंगा घडे स्नान । बा माझ्याच्या दर्शनें ॥ २ ॥ पंचगंगा भागिरथी । पंचारत्या घेउनी येती ॥ ३ ॥ जनी टाका ओंवाळुनि । माझ्या सोपानावरुनि ॥ ४ ॥

# भेटीचे अभंग.

## कथानक आणि अभंगांतील सारांश.

श्रीनिवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई आणि नामदेव यांची भेट झाली ते हे अभंग होत. हीं आळंदीकर भावंडें ह्मणजे केवळ परब्रह्म पुतळे. ब्रह्मा विष्णु महेश यांचे अवतार. नामदेव हा किती झाला. तरी भक्तच. तो प्रल्हाद, अंगद किंवा उद्धव यांचा अवतार. त्याचें निर्विकार अंतःकरण नव्हतें. विठोबा हेंच त्याचें सर्वस्व. इतरांची त्याचे पाशीं किंमत नसे. अभेद भाव त्याला नसल्यामुळें आळंदीकरांनीं जेव्हां वंदन केलें तेव्हां आपणही वंदन करावें, असें त्याला वाटेना. त्याचें असें अंतःकरण पाहून आदिमाया मुक्ताबाई इणें त्याची चेष्टा केली, आणि त्याला खूप चिडविलें. 'पंढरीचा प्रेमा' आपल्या घरीं आला असें पाहून श्रीनिवृत्ति, ज्ञानदेव आणि सोपान यांणीं नामदेवाचे पायावर डोई ठेविली. पण मुक्ताबाईनें ठेविली नाहीं. तिनें त्याला अहंकारी, आंधळा, अज्ञानी, नष्ट, खापर, गाढव, रानगुंज, कडु वृंदावन इ. नावें ठेविलीं. नामदेवाचे आंगीं अद्याप ताठा आहे. आपण याला चांगदेवाप्रमाणें भाजून काढूं; असें ती आपल्या भावास ह्मणाली. श्री निवृत्तिनें तिची समजूत केली कीं, बाई, आपल्या घरीं आलेल्या संताला आपण असें बोलून दुखवूं नये. ज्यानें पांडुरंग वेडा केला, तो काय सामान्य मनुष्य? मुक्ताईनें हें कबूल केलें, पण सांगितलें कीं, याचें अजून अधीरपण केलें नाहीं, याला ओळख पटली नाहीं, ह्मणून आला तसा जाऊं देणें बरोबर नाहीं. हें मडकें भाजून याचें आपण भांडें करूं. विठोबानें या आपल्या लडिवाळाला या साठींच इकडे पाठविलें असावें.

नंतर त्या तिघांनीं त्यांचा जुनाट ह्मातारा काका जो गोरा कुंभार त्यास बोलाविलें. आणि ते नामदेवाविषयीं खलबत करीत

बसलें. ते आपआपसांत बोलत त्याचा अर्थ नामदेवास कळेना आपल्या बद्दल कांहीं तरी चेष्टा चालली आहे, असें मात्र त्याला वाटलें. नंतर गोरोबा हातांत थापटणें घेऊन प्रत्येकाच्या डोक्यावर थापटीत चालले, आणि परिक्षा करूं लागले येतां येतां तें थापटणें नामदेवाच्या डोक्यावर येऊन बसलें. थापटणें मारताच नामदेवास अतीशय राग आला. त्याला वाटलें, या कृत्येनें मुक्ताबाईनें-हें प्रकर्ण बरेंच माजविलें. ही कैकाडी मंडळी मज गरिबाला खरोखरच आगींत घालून कच्चें मडकें ह्मणून भाजते कीं काय कोण जाणें? तो तेथून पाय काढावयाचा विचार करूं लागला मुक्ताबाईनें तें हेरलेंच ती आपल्या भाषेंत इतरांस ह्मणाली, हें मडकें गडबडत जाईल बरें! याला फुंकून शुद्ध करा! जीवत्व काढून याला शिवत्व करा!!

नामदेव त्या मंडळींत मग राहिला नाहीं. मागें पुढें पाहत पळत पळत तो देवळांत येऊन पोंचला. आणि विठोबापाशीं त्यानें आळंदीकरांबद्दल गाऱ्हाणें चालविलें. त्या रानटी लोकांच्या तडाक्यांतून मी नशीबानें वांचलों, नाहींतर त्यांनीं मला आगींत फेकून द्यावयाचा बेत केला होता असें देवास सांगितलें. नामदेव म्हणाला देवा कसली ही तुझी कपटी, अज्ञानी, आचरट, पोरकट भिकारी, ढोंगी, सात्विकशून्य संतमंडळी!! आणि मुक्ताबाई ती तर सनकाडीची कडीच! तिजपेक्षां विंचवाची नांगीही बरी!! मला त्यांचा आदरउपचार पुरे, त्याचे स्वाधीन तूं मला करूं नकोस.

विठोबानें नामदेवाचें गाऱ्हाणें ऐकून घेतलें. वरील सर्व मंडळीस बोलाविलें. सर्वांसी समजूत केली. या खेळाचें कारण नामदेवास सांगितलें. आणि गुरु करण्यासाठीं त्याला नागनाथाचे देवालयांत विसोबा खेचराकडे पाठवून दिलें.

१

उठिले निवृत्ति संताच्या दर्शना । पंढरीचा प्रेमा घरीं आला ॥ १ ॥ केली प्रदक्षिणा वंदीले चरण । जाहला अभिमान नामयासी ॥ २ ॥ देवाचे जवळी आह्मी निरंतर । यास अधिकार नमस्कारा ॥ ३ ॥ नित्य समागम हरीच्या जवळी । नामाची दिवाळी नामा ह्मणे ॥ ४ ॥ नामा ह्मणे काय वंदू याचे चरण । आंगें परब्रह्म जाण आह्मापाशीं ॥ ५ ॥

२

आला ज्ञानदेव वंदीले चरण । मस्तक ठेऊन नमस्कारी ॥ १ ॥ नामा ह्मणे आह्मा वडिलपणें नमस्कारा । ज्येष्ठ अधिकारा आह्मा आहे ॥ २ ॥ आह्मी देवापाशीं असतों सर्वकाळ । येउनी सकळ वंदिताती ॥ ३ ॥ वैष्णवाचे भार देवासी शरण । येताती जाण पंढरीसी ॥ ४ ॥ नामा ह्मणे आता पाहिली मंडळी । यासाठीं वनमाळी स्फुंदों रडे ॥ ५ ॥

३

आला तो सोपान वंदीयेले पाया । पांडुरंगा ठायीं मानीयेला ॥ १ ॥ रंजल्या गांजल्याचा घेता समाचार । संत माय थोर अनाथाची ॥ २ ॥ आमचे मायबाप भेटलेती आज । समाधान सहज आलिंगिता ॥ ३ ॥ नामा ह्मणें कळलें भाविकाचें प्रेम । देव केला श्रमी कोण्या गुणें ॥ ४ ॥

४

अखंडित जाहला देवाचा शेजार । कांरे अहंकार गेला नाहीं ॥ १ ॥ मान अपमान वाढविला ताठा । दिवस असतां दिवटा हातीं घेशीं ॥ २ ॥ परब्रह्मासंगें नित्य तुझा खेळ । आंधळ्यापरी डोळे कां बांधलेती ॥ ३ ॥ कल्पतरु तळीं इच्छिली ते गोष्टी । आज्ञानपण पोटीं राहिलें कीं ॥ ४ ॥ घरीं कामधेनू ताक मागूं जाये । ऐसा नष्ट पाहे जगा माजी

॥ ५ ॥ ह्मणे मुक्ताबाई जाईन दर्शना । आधीं अभिमाना दूर करणें ॥ ६ ॥

५

बोलोनीया यानें वाढविला डांगोरा । अंतरींचा कोरा गुरूवीण ॥ १ ॥ संताचा सन्मान न कळे यासी । राहून देवापाशीं काय केलें ॥ २ ॥ परिसा झांकण घातलें खापर । नाहीं झालें जाण बावनकशी ॥ ३ ॥ खरासी काय घालोनी शृंगार । अंतरींचे काळस्वर्ग गेलें नाहीं ॥४॥ ह्मणे मुक्ताबाई अभिमानें नेलें । सर्पासी पाजिलें विष जैसें ॥ ५ ॥

६

आमृत टाकोनि कांजिची आवडी । सज्जन झोंपडी काय त्याला ॥ १ ॥ खरासी अखंड गंगेचें हो स्नान । गेलें वांया जीवन व्यर्थ जिणे त्याचें ॥२॥ पोंवळ्याहून अधिक दिसे रानगुंज । शृंगाराचें काज विटंवना ॥ ३ ॥ आना परिस चोखट असे वृंदावन । चवी कडूपण हीण त्याचें ॥ ४ ॥ रंगाची बाहुली दिसती गोजिरी । वेगडाची परी नग त्याली ॥ ५ ॥ मुक्ताबाई ह्मणे पुरे तें दर्शन । गुरूवीण संतपण आहे कोर्डे ॥ ६ ॥

७

उसाचें शेजारी एरंडाची झाडें । नाहीं त्याचे पाडें गोडी त्याला ॥ १ ॥ कर्पूरासी झाला दीपाचा शेजार । कोणें गुणें हीर राहील त्यासी ॥ २ ॥ सागरींचें लवण टाकिलें नेऊन । कोणें गुणें खडेपण राहिल त्यासी ॥ ३ ॥ तैसा नामदेव विठोबाच्या संगें । कोणें गुणें दादा सांग कोरेपण ॥ ४ ॥ मुक्ताबाई ह्मणे चंदनाची झाडें । आहेत सर्व वेडे गुंडाळले ॥ ५ ॥

८

संत पाहूणे राजस मनाचे घरीं । पूजा करी मरो डोई फोडी ॥ १ ॥ करितो सन्मान अंगीं भरे ताठा । देवावीण

विकरंटा असोनि काय ॥ २ ॥ अहंता तीही सुखाडली चित्तीं। न साहे संगती सज्जनाची ॥ ३ ॥ पंढरीचें भूषण सांगतो जगासी । नाहीं तो मानसी तिळप्राय बोध ॥ ४ ॥ म्हणे मुक्ताबाई चांगदेवा वाणी । भजावें सज्जनीं नामयासी ॥ ५ ॥

९

चौदाशें वर्षे शरीर केलें जतन । बोधावीण शीण वाढविला ॥ १ ॥ नाहीं गुरूमंत्र नाहीं उपदेश । परमार्थासि दोष वाळियेला ॥ २ ॥ स्वहिताचें कारण पाडियेलें जेव्हां । आला शरण तेव्हां अळंकापुरी ॥ ४ ॥ गैनीनाथ गूज दिलें निवृत्तिला । निवृत्तिचा झाला ज्ञानदेव ॥ ४ ॥ ज्ञानदेवें बीज वांटिलें सज्जनीं । तें तुह्मीं आह्मीं जनीं संपादिलें ॥ ५ ॥ ह्मणे मुक्ताबाई तिहीं लोकीं ठसा । नामदेव ऐसा राहिला कीं ॥ ६ ॥

१०

निवृत्ति ह्मणे ऐसें बोलूं नये बाई । धन्य भाग्य होई संत घरा आले ॥ १ ॥ आपुलें स्वहित करावें आपण । संतासी शब्दानें दुखवूं नये ॥ २ ॥ धन्य तेचि नर राहती पंढरी । श्वान त्याचे घरीं होउनि रहावें ॥ ३ ॥ नामदेव सांग देवाचा केवढा । प्रेमें केला वेडा पांडुरंग ॥ ४ ॥ निवृत्ति ह्मणे यासी आहे तें पुरें । पायीं ठेवितां बरें डोई त्याच्या ॥ ५ ॥ ह्मणे मुक्ताबाई घालावें लोटांगण । आपणा दर्शन नलगे त्याचें ॥ ६ ॥

११

कुलालें कुंभ भाजल्याविण माती । न राहे संगती पाणीयाची ॥ १ ॥ मेणाची पुतळी करीं घेतां बरी । अग्नीचे शेजारी कैशी राहे ॥ २ ॥ ऐशा अधीरासी काय संतसंग । मृगजळीं तरंग कैसे रहाती ॥ ३ ॥ आजी हें नवल देखीयलें डोळां । पहाहो सोज्वळा दगड जैसा ॥ ४ ॥ ह्मणे मुक्ताबाई नाऊं देऊं नये ऐसा । भाजून सरसा करूं भांडें ॥ ५ ॥

१२

कुलालें आपलीं भाजावीं भाजनीं । ह्मणजे होय चक्रपाणी कृपावंत ॥ १ ॥ हरीसी वर्दळ लावितो निशिदिनीं । ह्मणोनि दिला धाडोनी तुह्मांपाशीं ॥ २ ॥ तुम्ही संतजन उद्धराल तत्काळ । नामा लडिवाळ विठ्ठलाचा ॥ ३ ॥ राखावें ब्रीद करावें पावन । करा बोलवण गोरोबासी ॥ ४ ॥ म्हणे मुक्ताबाई माजलें कीं कोरें । काकाचे उत्तरें खरें मानूं ॥ ५ ॥

१३

गोरा बोलविला जुनाट म्हातारा । अनुभव पुरा हातीं थापटणें ॥ १ ॥ परब्रह्मीं म्हातारा निवाला अंतरीं । अनुभव कुसरी जाणतसे ॥ २ ॥ सोहंशब्द विरक्ती विराली अंतरीं । पाती अणुभरी न हालती ॥ ३ ॥ ह्मणे मुक्ताबाई घालूं द्या लोटांगण । जाऊं द्या शरण अव्यक्तासी ॥ ४ ॥

१४

मोतियाचा चुरा फेंकीला अंबरीं । विजुचीयापरी कीळ झाला ॥ १ ॥ जरीपितांबर नेसविले नभा । चैतन्याचा गाभा नीळबिंदू ॥ २ ॥ तळींवरी पसरे झाला शुन्याकार । सर्पाचे पिला सारे नाचूं लागे ॥ ३ ॥ कडकडोनि जनीं माली ठायींचे ठायीं । भेटली मुक्ताबाई गोरोबाला ॥ ४ ॥ ज्ञानदेव ह्मणे कैशी झाली भेटी । ओळखिलिया बीटी आपेआप ॥ ५ ॥

१५

निवृत्तिदेव ह्मणे चला गुंफेमाजी । अढळ तया माजि समाधी असे ॥ १ ॥ सद्गुरुप्रसादें साधिली कसोटी । गुह्य गुजताटी आड केली ॥ २ ॥ दंड चक्राकार बांधिला चहूंकडोन । आंत सज्जन वास करिती ॥ ३ ॥ ऐसे गुंफेमाजि नाहीं नामदेव । ह्मणोनि माझा जीव थोडा होतो ॥ ४ ॥ गैनींची मिरास घेतली प्रमाण । पूर्वभूमि जतन करितसे ॥ ५ ॥

निवृत्ति ह्मणे मुक्ताबाईचीं उत्तरें । भाजलें कीं कोरें कळों घावें ॥ ६ ॥

१६

परस्परें गुह्य करिती भाषण। ह्मणती महाधन हातां आलें ॥ १ ॥ रक्त पीत श्वेत नीळ वर्णाकार । नक्षत्राची वर पूजा केली ॥ २ ॥ प्रकाश समय पहा ज्योतीकार । चांदण्यांचा प्रकाश चहूंकडे ॥ ३ ॥ निवृत्ति ह्मणे कुलालाचे चक्रें । अंतर्बाह्य सारें चक्राकार ॥ ४ ॥

१७

हांसोन सोपान खुणाविला खुणा । नामदेव पाहुणा आला असे ॥ १ ॥ तयासि पाक पाहिजे पवित्र । भाजलें कीं कोरें काळों घावे ॥ २ ॥ मृत्तिकेचे पारखी तुह्मी असां देवा । डेरा भाजुनियां सरसा करा ॥ ३ ॥ आनंदें डुलती हा निर्गुण निर्विकार । नेणुनि कोर राहिलें कीं ॥ ४ ॥ निर्गूणापासूनि सगुणाची व्यक्ती । नाहीं स्वरुपस्थिति आंगीं आली ॥ ५ ॥ ह्मणे मुक्ताबाई हेरूनिया हेरीं । हिरा किंवा गारी नेणूं बापा ॥ ६ ॥

१८

जोहारीया पुढें मांडियेलें रत्न । आतां मोला उणें येईल कैसें ॥ १ ॥ तैसें थापटणें पारखीयाचे हातीं । वाफ झाली घातीं जाती वांयां ॥ २ ॥ प्रथम थापटणें निवृत्तिच्या माथां । डेरा भाजला निका परब्रम्हीं ॥ ३ ॥ तेंच थापटणें ज्ञानदेवावर । आतां कैसें कोर राहिल येथें ॥ ४ ॥ तेंच थापटणें सोपानाच्या डोई । आतां लेश कांहीं कोरें नाहीं ॥ ५ ॥ तेंच थापटणें नामदेवा । डोई चोळी मोहरे रडूं लागे ॥ ६ ॥ नामा ह्मणे कोरा राहिलागे बाई । अनुमानाही भाजला कोठें ॥ ७ ॥

१९

संतसमागम फळाला रे बरा । सन्मानाचा झाला लाभ मोठा ॥ १ ॥ आधींच आदर केला मुक्ताबाई । लाकडानें डोई फोडियेली ॥ १ ॥ देवानें गोंधळ घातला गरुडपारीं । भिजला अश्रुनेत्रीं पितांबर ॥ ३ ॥ माझें माझें ह्मणोनि गाईलें गाऱ्हाणें । कळलें संतपण हेंचि तुमचें ॥ ४ ॥ भरीं भरोनियां आलीं तुह्मांजवळी । कैकाडी मंडळी ठावीं नव्हतीं ॥५॥ नामा ह्मणे सन्मान भरोनि पावलें । पूर्ण करूं आलें सोंग तुमचें ॥ ६ ॥

२०

उद्विग्न हें मन करी दीर्घ हानी । सखे नाहीं कोणी माझे येथें ॥ १ ॥ वैराग्य कसोटी सोसवेना घाव । पळावया वाव मार्ग पाहे ॥ २ ॥ होतांच जाचणी मन होय चंचळ । युगा ऐसें पळ वाटतसे ॥ ३ ॥ नामा ह्मणे जावें पळोनियां आतां । संतसंग होतां भाजतील ॥ ४ ॥ ह्मणे मुक्ताबाई चैतन्याचा खेळ । ब्रह्म अग्नी केवळ बोलावा ॥ ५ ॥

२१

आव्या माजि भाजा तुह्मी कुंभ आतां । भाजोनि स्वयें भता सरसा करा ॥ १ ॥ ॐ सोहं दोन्ही उर्ध्व फुंकुन कान । तया द्वारानें फुंकून शुद्ध करूं ॥ २ ॥ जीवत्व काढुनियां शिवत्व करूं । प्रीय हा करूं पांडुरंगा ॥ ३ ॥ ह्मणे मुक्ताबाई पळायाचें पाहीं । आसन स्थीर नाहीं नामयाचें ॥ ४ ॥

२२

न पुसतां संतासि निघाला तेथोनि । पळे इंद्रायणी पार झाला ॥ १ ॥ मार्गें पुढें पाहे पळतसे तांतडी । आला धड फडी पंढरीसी ॥ २ ॥ कवळोनियां कंठी मिठी ते घातली । विठ्ठल माउली नामयाची ॥ ३ ॥ सांगे नामदेव संताची जा-

गी । नको देउं कोणी हातीं निवृत्तिच्या ॥ ४ ॥ ज्ञानदेवें सोपान पाठऊन बोलाविला गोरा । जुनाट ह्मातारा जाकूं आला ॥ ५ ॥ मुक्ताबाईनें तेथें माजविली कळी । ही संत-मंडळी कपटी तुझी ॥ ६ ॥ नामा ह्मणे देवा आलों पूर्व दैवें । गेलों असतों जीवें सगळाची ॥ ७ ॥

२३

पूर्वी केली सेवा उपेगा आली देवा । वधिलें असतें जीवा सगळेंचिना ॥ १ ॥ अनंता जन्मींचें फळलें अनुष्ठान । पाहिलें चरण विठ्ठलाचें ॥ २ ॥ न जाणो माझ्या येती पाठोपाठीं । घालतील भीड मोठी तुम्हासी ते ॥ ३ ॥ त्यास द्याल मज अगत्य उदारा । मज कां न मारा आपुल्या हातें ॥ ४ ॥ नामा ह्मणे तुझे न सोडी चरण । युगायुगीं धरणें घेतलें असे ॥ ५ ॥

२४

हातांत नरोटी जीर्णाचे भार । ह्मणती सौदागर आह्मी संत ॥ १ ॥ चिपळ्या भोपळ्याचा विणा ही संपत्ती । तुह्मी कां श्रीपती भूषण सांगा ॥ २ ॥ भणंगासारखी त्याची ही रहाटी । सांगताती गोष्टी अचाट त्या ॥ ३ ॥ सर्वही मिळो-नी करिति गुडगूड । मज त्याचें गूढ समजेना ॥ ४ ॥ नामा ह्मणे गाती प्रकाराचें गाणें । आह्मा संतानें निंदियेलें ॥ ५ ॥

२५

ह्मणती घेतरया आम्ही धनाच्या कोडी । खर्चावया कवडी जवळी नसे ॥ १ ॥ हासति रडति चढती एकएकावरी । आनंदासी पार नाहीं म्हणती ॥ २॥ काय गुणें देव रीझला तयासी । न मिळे नेसावयासि पटकूर तें ॥ ३ ॥ पाहुनि द-रिद्र आलों कासावीस । केवळ परीस पांढरी ते ॥ ४ ॥ लहा-नशी मुक्ताबाई सनकादीची कांडी । केले देशोधडी महासंत

॥ ५ ॥ कशाचें सात्वीक अवघें दिसतें बंड । नामा म्हणे पाखांड दिसतसे ॥ ६ ॥

२६

या संताचा झाला एक मेळ । केवळ चांडाळ कुबुद्धी ते ॥ १ ॥ या संतानें केली माझी विटंबना । ह्मणोनि नारायणा मागें आलों ॥ २ ॥ पहिला तयाचा आदर उपचार । जमा केला केर जाळावया ॥ ३ ॥ त्याच्या धाकें मागें आलोंरे अनंता । येथें तुझ्या चित्ता त्यांचें बरें ॥ ४ ॥ नामा ह्मणे जीवें आलों हो वाचोनि । अजून तरी चक्रपाणी वांचवा मज ॥ ५ ॥

२७

आहे त्यांचें मनीं करावें आगमन । येतील मागोन तुह्मापाशीं ॥ १ ॥ या उपरी तुह्मी व्हाल कां वैमान । घाल कां काढून त्यांचें हातीं ॥ २ ॥ खादल्या प्याल्याचा राखीना सन्मान । तुजला माझी आण पांडुरंगा ॥ ३ ॥ चालविल्या उपरी लाविसी आवडी । देवा तुझी प्रौढी काय मग ॥ ४ ॥ काय माझी चिंता सांडिली अनंता । संतालागीं देतां हर्ष लागे ॥ ५ ॥ नामा ह्मणें कां तूं करिसी अबोला । कां अडचण राउळा झाली असे ॥ ६ ॥

२८

वाटारोनि डोळे पाहतसे आका । मज त्यांचा वांका समजेना ॥ १ ॥ उजूभुजू म्हणी उठलें भयंकर । मग म्यां बाहेर गमन केलें ॥ २ ॥ याजवर घाल तयाचीये हातीं । जिवित्वाची माती होउं पाहे ॥ ३ ॥ अभय तें दान देईबा श्रीहरी । दुर्बळाचा करीं अंगीकार ॥ ४ ॥ समर्थासी छंद लागला नामाचा । न जाणो देवाची आस कांहीं ॥ ५ नामा म्हणे नाम पतितपावन । त्याच्या बोला उणें आणूं नये ॥ ६ ॥

# ॥ सेना न्हावी ॥

असाल तेथें नामाचें चिंतन । याहुनि साधन आणिक नाहीं ॥ १ ॥ सोडवील माझा भक्ताचा कैवारी । प्रतिज्ञा निर्धारी केली आह्मीं ॥ २ ॥ गुण दोष याती न विचारी कांहीं । धांवे लवलाहीं भक्तकाजा ॥ ३ ॥ अवघे काळीं वाचें ह्मणा नारायण । सेना ह्मणे क्षण जाऊं न द्या ॥ ४ ॥

२

अंगिकार केला । भार चालवी विठ्ठला ॥ १ ॥ संतीं सांगितलें । तें म्यां हृदईं धरिलें ॥ २ ॥ तारिला अजामिळ । महा पापी कीं चांडाळ ॥ ३ ॥ पतितपावन । करी नाम हें जतन ॥ ४ ॥ वागवी अभिमान । सेना न्हावी यातिहीण ॥ ४ ॥

३

अंतरीचें पुरे काम । घेतां नाम विठोबाचें ॥ १ ॥ नाम साराचेंही सार । शरणांगत यमकिंकर ॥ २ ॥ पाहिले वेदांत । निश्चय केला नियमांत ॥ ३ ॥ सेना ह्मणे न वेंचा कांहीं । लाभ नाहीं या ऐसा ॥ ४ ॥

४

ऐसी आवडी आहे माझ्या जीवा । तुजसी केशवा निवेदिलें ॥ १ ॥ पांडुरंगा ऐसें वाटतसे जीवा । करिन संतसेवा अहर्निशीं ॥ २ ॥ नलगे वित्त गोत वैकुंठीं राहणें । सायुज्यसदनीं चाड नाहीं ॥ ३ ॥ करुणास्वरें सेना बहात विठ्ठला । हेतू पुरविला आवडीचा ॥ ४ ॥

५

करितों विनवणी । हात जोडूनियां दोन्हीं ॥ १ ॥ हेंचि द्यावें मज दान । करा हरिचें चिंतन ॥ २ ॥ जातों सांगूनियां मात । पांडुरंग बोलावित ॥ ३ ॥ सोडा द्वादशी पारणें । सुखें करावें कीर्तन ॥ ४ ॥ दिवस मध्यान्हीं आला । सेना वैकुंठासी गेला ॥ ५ ॥

६

करितां योगयाग । सिद्धि न पवेचि सांग ॥ १ ॥ देव एक भावाविण । नाहीं नाहीं व्यर्थ शीण ॥ २ ॥ केल्या तपाचिया राशी । तरि न मिळेचि त्यासी ॥ ३ ॥ करितां धूम्रपान । न भेटे नारायणण ॥ ४ ॥ सेना म्हणे नको कांहीं । एका वीण दुजें नाहीं ॥ ५ ॥

७

करितां देवपुजा । नित्य नेम सारिला वोजा । मग आठविलें अधोक्षजा । ध्यानस्थ बैसलों ॥ १ ॥ दूत आले लवलाहीं । रायें बोलाविलें पाहीं । कोठें आहे मज दावी । उरी न ठेवी याची कांहीं ॥ २ ॥ जाणुनि संकट श्रीहरी । धोकटी घेतली खांद्यावरी । त्वरें आला राजदरबारीं । देखुनि हरी क्रोध निमाला ॥ ३ ॥ राया सन्मुख बैसून । हातीं दिधलें दर्पण । मुख पाहे विलोकून । मूर्ती दिसे चतुर्भुज ॥ ४॥ हात लाविला मस्तका । वृत्ती हरपली देखा । राव म्हणे प्राणसखा । नित्य भेटे मजलागीं ॥ ५ ॥ मग केलें तेलमर्दन । वाटी बिंबला नारायण । विसरला कार्य आठवण । वेधलें मन रूपासी ॥ ६ ॥ मोंवतां पाहे विलोकून । अवघा बिंबला नारायण । तटस्थ पाहती सभाजन । नाहीं भान रायासी ॥ ७ ॥ राव ह्मणे हरीसी । तुह्मीं रहावें मजपाशीं । तुजविण न गमे दिवसनिशी । हरी ह्मणे भाकेसि न गुंते मी ॥ ८ ॥ मग प्र-

धानें काय केलें । राया स्नानासी पाठविलें । रायें होन दिधले । हरीनें ठेविलें धोकटींत ॥ ९ ॥ शुद्ध नाहीं याती । नाहीं केली हरिभक्ति । शिणविला कमळापती । नाहीं विरक्ति वाणली अंगीं ॥ १० ॥ नाहीं अपराधा गणित । देखोनि होन ब्राह्मणा देत । देवास घाली संकटांत । आण वाहत विठोबाची ॥ ११ ॥ सेना ह्मणे ऋषीकेशी । मज कारणें शिणलासी । ह्मणुनि लागलों चरणासी । संसारासी त्यागिलें ॥ १२ ॥

८

चिंतन चित्ताला । लावी मनाच्या मनाला ॥ १ ॥ उन्मनी मुखांत । पांडुरंग भेटी देत ॥ २ ॥ ऐसा आहे श्रेष्ठाचार । वेद शास्त्राचा निर्धार ॥ ३ ॥ कवटाळूनि पोटीं । सेना ह्मणे सांगूं गोष्टी ॥ ४ ॥

९

घेतां नाम विठोबाचें । पर्वत जळती पापाचे ॥ १ ॥ ऐसा नामाचा महिमा । वेद शिणला झाली सीमा ॥ २ ॥ नामें तारिले अपार । महा पापी दुराचार ॥ ३ ॥ वाल्हा कोळी ब्रह्महत्यारी । नामें तारिला निर्धारीं ॥ ४ ॥ सेना बैसला निवांत । विठ्ठल नाम उच्चारीत ॥ ५ ॥

१०

पांडुरंग दास । ह्मणसी सांभाळी भिदास ॥ १ ॥ नाहीं भाव आंगीं । भूषण मिरवितो जगीं ॥ २ ॥ व्रत आचरण । नाहीं केलें तुझें ध्यान ॥ ३ ॥ स्थिर नाहीं मन । सदा विषय तें ध्यान ॥ ४ ॥ सेना आहे अपराधी । सांभाळावें कृपानिधी ॥ ५ ॥

११

स्तुति करूं ऐसा नाहीं अधिकार । शिणला फणिवर वर्णवेना ॥ १ ॥ तेथें मी सरता होईन कैशापरी । वर्णावया हरी कीर्ति तुझी ॥ २ ॥ अठराही भागले सहाही शीणले । चाऱ्हीही राहिले मौन्यची ॥ ३ ॥ रुकमादेवीवरें अंगिकार केला । निवांत राहिला सेना न्हावी ॥ ४ ॥

१२

वेद वर्णिता शीणला । मग मौन्यची राहिला ॥ १ ॥ तेथें माझी वैखरी । कैशी वर्णूं पावे हरी ॥ २ ॥ नेणती गोरा कीं सांवळा । त्याची न कळेचि लीळा ॥ ३ ॥ हा सगूण कीं निर्गुण । गुणातीत परिपूर्ण ॥ ४ ॥ माथा ठेऊनि चरणीं । सेना पाहे विलोकुनि ॥ ५ ॥

१३

संत संगतीनें थोर लाभ झाला । मोह निरसला मायादिक ॥ १ ॥ घातले बाहेरी कामक्रोध वैरी । बैसला अंतरीं पांडुरंग ॥ २ ॥ दुजियाचा वारा लागूं नेदी अंगा । ऐसें पांडुरंगा कळूं आलें ॥ ३ ॥ संतांनीं सरता केला सेना न्हावी । ब्रह्मादिकां पाहीं नातुडे जो ॥ ४ ॥

१४

ह्मणवितो दास । तरी सांभाळीं ब्रीदास ॥ १ ॥ केलेसे जतन । घोंकटी आरसाची जाण ॥ २ ॥ करितो व्यवसाव । माझ्या जातीचा स्वभाव ॥ ३ ॥ सेना करितो विनवणी । हात जोडूनिया दोन्ही ॥ ४ ॥

१५

धन्य अळंकापूर धन्य सिद्धेश्वर । धन्य ते तरुवर पशु पक्षी ॥ १ ॥ धन्य इंद्रायणी धन्य भागीरथी । तेथें स्नान जे करिती धन्य जन्म ॥ २ ॥ धन्य ते प्रयाग धन्य ते त्रिवेणी ।

वहाती येऊनी गुप्तरुपें ॥ ३ ॥ धन्य ते भूमी धन्य ते प्राणी । देखती नयनीं ज्ञानदेवा ॥ ४ ॥ धन्य ते भाग्याचे जाती अळंकापुरा । त्याचे निर्धारा धन्य वंश ॥ ५ ॥ धन्य दासानुदास अळंकापुरीचा । सेना न्हावी त्याचा रजःकण ॥ ६ ॥

१६

विष्णुचा अवतार । सखा माझा ज्ञानेश्वर ॥ १ ॥ चला जाऊं अळंकापुरा । संतजनाच्या माहेरा ॥ २ ॥ स्नान करितां इंद्रायणी । मुक्ती लागती चरणीं ॥ ३ ॥ ज्ञानेश्वराच्या चरणीं । सेना आला लोटांगणीं ॥ ४ ॥

१७

नामाचें चिंतन श्रेष्ठ पैं साधन । जातील जळोनि महापापें ॥ १ ॥ न लगे धूम्रपान पंचाग्निसाधन । करितां चिंतनें हरी भेटे ॥ २ ॥ बैसुनि निवांत करा एकचित्त । आवडी गावें गीत विठोबाचे ॥ ३ ॥ सकळांहुनि सोपें हेंची पैं साधन । सेना ह्मणे आण विठोबाची ॥ ४ ॥

१८

स्वहिताकारणें सांगतसे तुज । अंतरींचें गुज होतें कांहीं ॥ १ ॥ करा हरी भजन तराल भवसागर । उतरील पैलपार पांडुरंग ॥ २ ॥ कृपा नारायणें केली मजवरी । तुह्मालागिं हरी विनवेना ॥ ३ ॥ सेना सांगूनिया जातो वैकुंठासि । तिथि ते द्वादशी श्रावण मास ॥ ४ ॥

१९

माझें झालें स्वहित । तुह्मां सांगतों निश्चित ॥ १ ॥ करा हरीचे चिंतन । गावें उत्तम हें गुण ॥ २ ॥ श्रावण वद्य द्वादशी । सेना समाप्त त्या दिवशीं ॥ ३ ॥

२०

धन्य धन्य दिन । तुमचे झालें दरुषण ॥ १ ॥ आजि भाग्य उदया आलें । संत पाउल देखिलें ॥ २ ॥ पूर्व पुण्य फळा आलें । माझें माहेर भेटलें ॥ ३ ॥ सेना ह्मणे झाला । धन्य दिवस आजे भला ॥ ४ ॥

२१

माझें अंतरींचें । जाणे पांडुरंग साचें ॥ १ ॥ जीवभाव त्याचे पाइ । ठेउनि कांहीं न मागो ॥ २ ॥ सुख संत समागम । घेऊं नाम आवडी । ३ ॥ सेना ह्मणे चुकलों साचे । आणिक वाचे न सेवीं ॥ ४ ॥

२२

देई मज जन्म देवा । करीन सेवा आवडी ॥ १ ॥ करीन संतांचें पूजन । मुखीं नाम नारायण ॥ २ ॥ असो भलते ठाई । सुखदुःखा चाड नाहीं ॥ ३ ॥ मोक्ष सायुज्यता । सेना ह्मणे नये चित्ता ॥ ४ ॥

२३

कांहीं न करी रे मना । चिंती या चरणा विठोबाच्या ॥ १ ॥ ठाव नाहीं कल्पनेसी । राशी सुखाची अमूप ॥ २ ॥ पाहिलें श्रीमुख । नासे दुःख महाताप ॥ ३ ॥ होईल विसावा । सेना ह्मणे सुख जिवा ॥ ४ ॥

२४

नाम माधवाचें सार । भवसिंधु उतरी पार ॥१॥ तिहीं लोकीं श्रेष्ठ । नाम वरिष्ठ सेवी हे ॥ २ ॥ शिवभवानीचा । गुप्त मंत्र आवडीचा ॥ ३ ॥ सेना ह्मणे इतरांचा । पाड केचा मग येथें ॥ ४ ॥

२५

फळा आलें पुष्प । गेलें भेदुनि गगन ॥ १ ॥ संत झाले ते कृपाळ । माझा केलाजी सांभाळ ॥ २ ॥ संचित ओळले । तुमचीं देखिलीं पाउलें ॥ ३ ॥ सेना ह्मणे नेणे । कृपा केली नारायणें ॥ ४ ॥

२६

## ॥ वासुदेव ॥

टळोनि गेले प्रहर तीन । काय निजतां झांकोनि लोचन । आलों मागावया दान । नका विन्मुख होऊं जाण गा ॥१॥ रामकृष्ण वासुदेवा । जाणवितो सकळ जिवा । द्या मज दान वासुदेवा । मागुता फेरा नाहीं या गांवा गा ॥२॥ आलों दुरुनि सायास । द्याल दान मागायास । नका करूं माझी निरास । धर्मसार फळ संसारास गा ॥ ३ ॥ एक भाव देवाकारणें । फारसें नलगे देणें घेणें । करा एकचित्त रिघा शरण । हेंचि मागतसें तुह्मांकारणें गा ॥ ४ ॥ नका पाहूं काळ वेळा । दान देई वासुदेवाला । ह्मा सावध झोंपेला । सेना न्हावी चरणीं लागला गा ॥ ५ ॥

२७

## ॥ गवळण ॥

गोपिका वेल्हाळा । अवघ्या मिळोनि सकळा । चालिल्या यमुनाजळा । तंव सन्मुख देखिला सांवळा वो ॥ १ ॥ राधा ह्मणे बहु चाळक होसी । नसतां आळ कां आह्मांवरी घेसी । त्वां देखिलें येशोदेसी । हा लबाड लटका ऋषीकेशी वो ॥ २ ॥ यशोदा ह्मणे कवटाळिणी । नसती खोडी करितां देखनि । सांगतां गार्‍हाणें येऊनि । गुणातीत हा चक्रपाणी वो ॥ ३ ॥ राधा ह्मणे यशोदा सुंदरी । चोरटा शिंदळ तुझा मुरारी । आह्मां ठाऊक अंतरीं । हा न करि ते करी काय सांगूं वो

॥ ४ ॥ हा ब्रह्मांडनायक । येणें मोहिले तिन्ही लोक । सेना ह्मणे यदुनायक । कर्मातीत परिपूर्ण वो ॥ ५ ॥

२८

## ॥ गवळण ॥

दूती जाणवित स्वामिनी । काम दाटला । हृदयभुवनीं । कोपा नयेचि शारंगपाणी । सेजे पाहतां न दिसे नयनीं ॥१॥ मज भेटवागे श्रीहरी । लागला वेध त्याचा अंतरीं । ध्यानीं विंवलागे मुरारी । प्राण रिघो पाहे जरी ॥ २ ॥ गोड न लगे काम धंदा कांहीं । नावडे चीर चोळी पाहीं । सुमनेसज रुपती वाई । चित्त वेधलें हरी पाईं हो ॥ ३ ॥ वृत्ति स्वानंदी निमग्न । गेली देहभाव विसरून । रंगीं रंगली परिपूर्ण । धन्य धन्य सेना ह्मणे ॥ ५ ॥

२९

## ॥ बाळक्रीडा ॥

गाय चारि घननीळा । सर्व गोपाळाचा मेळा । मोहिलें वेणुनादें सकळा । स्वानंदें गाई नाचती । गोपिका परमानंदें गाती । गोपाळ प्रेमें डुल्लती ॥ १ ॥ भला भला तूं श्रीहरी रे ॥ ध्रु० ॥ वेडे वांकुडे पांगुळे । बोबडे मुके आंधळे । धांवतां पडे अडखळे । हरी ह्मणे गोपाळासी । तुह्मी बैसा मजपाशीं । मिळवितों गाईसी ॥ २ ॥ भला ० ॥ नको संगती ऋषीकेशी । आह्मां गाई वळी ह्मणसी । आपण एका जागीं बैससी । तुझें काय केलें हरी । आह्मां दवडोसी दुरी । मज ठाऊकें अंतरीं । तुज ओळखी खरीचरे ॥ ३ ॥ भला ० ॥ गाय टाकुनी दुधाची । आपण सगळेंची खाशी । आह्मां धमकाऊनी ठेविशी । काय सांगूं तुझी मात । भेद नाहीं तुह्मां आह्मांत । सेना ह्मणे गोपिनाथ । समाधान कर्तारे ॥४॥ भला०॥



# मुक्ताबाई.

पंढरीचें सुख बहू । आलें भीमातीरीं पाहूं ॥ १ ॥ पहा पहा हरीचे दास । मध्यें पंढरीनिवास ॥ २ ॥ गरुड हनुमंत द्वारीं । नामदेव कीर्तन करी ॥ ३ ॥ मोक्ष पायीं लोळण घाली । देखोन मुक्ताई निवाली ॥ ४ ॥

२

स्वरूपाचा डोहो भरला घनदाट । ऐल पैल तट आढळेना ॥ १ ॥ आरहेना खळाळ अंतीं स्वयें खोल । हलेना निश्चळ भरला असे ॥ २ ॥ वाटे जातां जातां करें निवारावें । कोठें उसतावे कोणें ठायीं ॥ ३ ॥ जांभई देतां मुखामाजि जाये । नासिकाचे द्वारें भरला असे ॥ ४ ॥ ऐशा स्वरूपडोहीं मन होय मीन । तैं भय उष्ण न लागे तुज ॥ ५ ॥ निवृत्तिप्रसादें बोले मुक्ताबाई । अनुभवाचे डोहीं स्थिरावें हें ॥ ६ ॥

३

एका समुद्राचे तीरीं । मुंगी पत्रे निर्धारी ॥ १ ॥ मुंगी पैल तीरा जाये । वाळवंटीं साखर खाये ॥ २ ॥ तिकडून आला एक गज । मुंगी सर्वें करी झुंज ॥ ३ ॥ पांच अकरा पंचवीस । सेना मिळाली छत्तीस ॥ ४ ॥ पांचा जणांनीं झगडा केला । गज मुंगीनें ग्रासिला ॥ ५ ॥ मुक्ताबाई सांगे खूण । ज्ञानदेव सत्य जाणे ॥ ६ ॥

४

मातीचें भिंताड चालवित मडें । सांडुनिया वेडे तीर्था जाती ॥ १ ॥ वेडाचीये मतें तीर्थी देव आहे । देशोदेशीं काय उणा झाला ॥ २ ॥ आहे याच देहीं विचारूनि पाही । हिंडोनिया कांहीं दारोदारीं ॥ ३ ॥ मुक्ताबाई ह्मणे झकविले दर्शन । दिवसा नागवण नागवती ॥ ४ ॥

५

टेकावरी टेक त्यावरी टेकुडी । तेथें एक बाळी क्रीडा करी ॥ १ ॥ त्याचें नांव काय तिचें नांव काय । विचारुनि पाहे मनामध्यें ॥ २ ॥ डोळ्यांतील बाहुली झालीसे गरोदर । मुईंग बारोबार मिळवावी ॥ ३ ॥ मुईचें अणिवरि रचिलें पाठार । मुक्ताबाई ह्मणे खूण दृढ धरा ॥ ४ ॥

६

वेडी झाले मी वेडी झाले । पदर माथ्याचा विसरलें ॥ १ ॥ माझा भ्रतार मज व्याला । तो म्यां प्रीतीनें दादला केला ॥ २ ॥ आवडीनें बाबा ह्मणते त्याला । नित्य भोगितें तयाला ॥ ३ ॥ ऐशी सर्वत्राची चाळी । मुखीं बोलों नये बोली ॥ ४ ॥ ऐशी मुक्ताई झाली वेडी । फेडी प्रपंच लुगडी ॥ ५ ॥

७

झालासी तटस्थ नव्हे ती समाधी । उपायाची शुद्धि नेणोनिया ॥ १ ॥ काष्ठा ऐसा जड तैसा तूं झालासी । स्वरुपा नेणसी भ्रमोनिया ॥ २ ॥ बोलतां चालतां देखतां ऐकतां । ढळेना सर्वथा तोचि साधी ॥ ३ ॥ ब्रम्हादिक ऐसी समाधी इच्छिती । तयाची हे स्थिति प्राप्ति नाहीं ॥ ५ ॥ ऐकरे चांगया आसी हे कल्पना । पावसी त्या खुणा मुक्ताई ह्मणे ॥ ५ ॥

८

उलट उलट मावारा गड्या फिर गोते खासी । आला पूर मायेचा लोंढा वाहुनिया जासी ॥ १ ॥ भवनदीचें पाणी गड्या मोठें ओढतें । भल्या भल्या पोहणारा उलथून अस-डून पाडीतें ॥ २ ॥ भवनदीचें पाणी गड्या वेगीं ओसरेना । कल्पनेची मगरमिठी कदां सुटेना ॥ ३ ॥ मुक्ताई ह्मणे एक चांगया सांगते निजखूण । निवृत्तिसी शरण जातां चुकेल जन्ममरण ॥ ४ ॥

९

एका अधिकार एका पुढें । सांगावें निवाडें स्वमुख तें ॥ १ ॥ कोणी कोणा येथें चोरूं नये कसणी । निदान दे-खोनि अनुभव आणा ॥ २ ॥ कोणी येथें देखण्याचें करिल अनुमान । येथें असे आण निवृत्तीची ॥ ३ ॥ जालंधराचा पडदा फोडोनिया चढा । येथेंच निवाडा पडला असे ॥ ४ ॥ देह देखण्याचें सोडावें अनुमान । निधान पाहिलें पाहणें आहे जेथें ॥ ५ ॥ ह्मणे मुक्ताबाई राखा राखा समाधी । आधींचीया आधीं खूण असे ॥ ६ ॥

१०

स्थावर कुंडलनी गुंफिली जडित । कलिका अजपा चित्त देखा सूक्ष्माया ॥ १ ॥ भेडसाविलें जेथें साधूयोगीयातें । इगें महा महासंत झकाविलें ॥ २ ॥ अधउर्ध्व पाहतां मु-लोनियां जाये । पहातां पहातां होय सपाकार ॥३॥ नाना रंग सावळी आकारें संचली । तें मुरडुनि आसनातळीं घा-लोनि बैसा ॥ ४ ॥ पुढें उदयो होती पद्माचे पैं ठसे । ग-गनीं अवनीं दिसे ऐसें होय ॥ ५ ॥ त्याजवरी नाम सर्व द्यावा पद्मावरु । तेथें खांडणी संहारु निववावें ॥ ६ ॥ ह्मणे मुक्ताबाई देहाची गवसणी । मनोहर अवसणी येऊं द्यावा ॥ ७ ॥

११

भास आभास चिद्रुपणचि दळें । जैशीं डोळियां बुबळें मावळोनि जाये ॥ १ ॥ नाना दिशेची झळकती पाउल

निशाणें । तेथें तपाच्या आवसनें असों द्यावें ॥ २ ॥ उद-यो अस्ताची खूण मागें पुढें द्यावी । त्रिपुटी माया दावी जीवनकळा ॥ ३ ॥ तेथें जनिता जननी स्मरती हो मनीं । तें विसरावी कांहींनीं जन्म दुःख ॥ ४ ॥ ह्मणे मुक्ताबाई साधु साधक एकला । तो एकांत आपुला अनुमानावा ॥५॥

१९

पुढें चमत्कार होवोनि मावळती । नाना भास होती सत्रावी तेथें ॥ १ ॥ तरी येथें आपुली न झकवावी समाधी । वाव पुढें संगें बुद्धि अवसानाची ॥ २ ॥ जिवें भावें तेथें व्हावें नित्य नवें । लक्ष्य टाकुनि जावें अलक्ष्यासी ॥ ३ ॥ भेदाच्या वरुतें मनाच्या खालुतें । मुरडावी पाउलें तें आपसवें ॥ ४ ॥ ह्मणे मुक्ताबाई सुरंगीचा वारा । सारोनि अंगुळें बारा वरतें पहा ॥ ५ ॥

१३

जेथें निजध्यास सद्गुरुचा घडे । निसंग निवाडें सांपडला ॥ १ ॥ एकांतीचें गुज गुजाविलें जेणें । बोल अबोलणें सहज जाहलें ॥ २ ॥ कोणी कोणा उठा ह्मणों नेदी चाळा । तेथें उदयो जाहला पहिला दिवस ॥ ३ ॥ प्रकाशाचें राहणें प्रकाशाचें पाहणें । सिद्ध साधकपण ब्रह्म सर्व जाहलें ॥ ४ ॥ मग आपुली गोपुरी शृंगारिली सारी । सुनीळ ओवरी वाफा देती ॥ ५ ॥ ह्मणे मुक्ताबाई नारायण खूण । ज्याचें त्यानें मन आटोपिलें ॥ ६ ॥

१४

येथें मातेचें उदरीं । भरितें साठविलें अंतरीं । उत्साह गुढिया अंबरीं । उदयो जाहला ॥१॥ तेथें नभ डोहो उसळे । सुरंगीं मन खेळे । जैशी प्रळयाची जळें । कालवती ॥ २ ॥ वज्रासनाची मिठी ध्यावी । कडसणी करावी नित्य नवी । सुखी या आणावे गोळावी । पाहूं लागे ॥ ३ ॥ उल्हाट गोल्हाट चिन्मय अंगें । उन्मनी सुस्तावली संगें । मग तरंगा तरंगे । मावळों लागे ॥ ४ ॥ ह्मणे मुक्ताबाई । इंद्रियें बांधोनि दाही । सुखसागरीं पाहीं । बुडी दिल्ही ॥ ५ ॥

१५

मंगळमूर्ती मंगळ ध्यान। आत्मसाधनाचें साधन। गम्य आपुलालें मन। करीत जावें॥ १ ॥ आसनीचे पोटीं। प्रौढ व्हावें सद्गुरुचे ओठीं। तेथें आत्मगुह्याच्या गोष्टी। संपादाव्या॥ २ ॥ दृष्टी लाउनियां आंतुल्याकडे। निकट चंद्र ध्यावा अग्र पुढें। अजान वृक्ष छाया पडे। ऐसें होय॥ ३॥ तेथें अंगसंग हलूं नये। कोण कोणा बोलूं नये। चेष्टा जाहलिया चळूं नये। भलतीकडे॥ ४ ॥ ह्मणे मुक्ताबाई। सारी हे समाधी। ब्रह्मादिकां नादीं। लावियेलें॥ ५ ॥

१६

आपुलें हें धैर्य द्यावें सद्गुरु राया। निघालोसे उपाया साधनाच्या॥ १ ॥ द्यावें एवं सगळें गुरुमाय बापा। निटवलो जपा अनुभवाच्या॥ २ ॥ तूंचि तूं सर्व तूंचि तूं सुखधाम। नव्हे येथें काम आणिकाचे॥ ३ ॥ चुकलीं पाउलें नीट करा तुह्मी। सुनिश्चित आह्मीं जाहलों असे॥ ४ ॥ कल्पनेचा वारा न लागों द्यावा आह्मा। स्वामीची प्रार्थना केली असे॥ ५ ॥ ह्मणे मुक्ताबाई राजविद्येचें साधन। अढळ पद येणें प्राप्त होय॥ ६ ॥

१७

ॐ सोहं दोन्ही स्वामीचीं अक्षरें। याजपुढें शास्त्रें मंद झाली॥ १ ॥ वेदाचें व ृत्व मुरोनीया जेव्हां। आसन सहित तेव्हां ऐसें होय॥ २ ॥ तेथें आणिकाचें न करावें श्रवण। त्यासि बोलावणें सद्गुरुचें॥ ३ ॥ निश्चळा निश्चळ जाणें सर्व काळ। अमृत उदय वेळ पावली असे॥ ४ ॥ जेथें घटमठ आकाश राहिले डोलतां। अगम्याच्या माथां रिघालों तेव्हां॥ ५ ॥ ह्मणे मुक्ताबाइ सद्गुरु वाटाच्या भला। हात हात दिला साधनाचा॥ ६ ॥

१८

गगनामाजि झरे फुटती पाण्याचे । कोणा पानड्याचे सांगा नांव ॥ १ ॥ नलगे खोरे कुदळी नलगे ते खणणें । डवावे गगन पाणियानें ॥ २ ॥ नलगे पाडा रेडा नलगे मोट नाडा । नवखंडा एवढा मळा शिंपी ॥ ३ ॥ ऐसी हाव धरा वृत्ति उतावेळी । मुक्ताबाई भोळी हासतसे ॥ ४ ॥

१९

आह्मी कर्मी ना धर्मी निष्कर्मी झालों । जिताची मेलों आपोआप ॥ १ ॥ जितची मरणें उफराटें पहाणें । साहींत बोलणें मुक्ताईचा ॥ २ ॥ मुक्ताबाई ह्मणे चांगया सांडी भरणें । आह्मां तव राहणें निराळेवी ॥ ४ ॥

२०

अंतरीचें मुख कैसें मैं बोलावें । सूर्यासी पहावें कोणे दृष्टी ॥ १२ ॥ पतीचा संयोग केविं बोले नारी । साक्षात् अंतरीं तोंच जाणे ॥ २ ॥ आत्मतत्त्वीं दृष्टी जयाची फांकली । तयाची राहिली स्थूळक्रिया ॥ ३ ॥ मुक्ताबाई ह्मणे सांडावी कल्पना । तेव्हांचि चिद्घना पावसील ॥ ४ ॥

२१

॥ पद ॥

लटकीच खटपटरे आल्या ॥धृ०॥ मृगजळ डोहीं घातलेसे तारुं । जळच नाहीं तेथें कैचा उतारु ॥ १ ॥ वांझेच्या पुत्राचा मांडिला विवाह । पुत्रच नाहीं तेथें कैचा उत्साह ॥२॥ स्वप्नीच्या धनाचे शाश्वत कांई । धनच नाहीं तेथें कैची सवाई ॥ ३ ॥ ज्ञानदेव कृपे ह्मणे मुक्ताबाई । ओलेंच नाहीं तेथें पेरावें काई ॥ ४ ॥



# श्रीज्ञानेश्वराची सनद.

आदिनाथ शंकर गौरी मनोहर । खूण ही साचार मच्छिंद्रनाथ ॥ १ ॥ मच्छिंद्रें गोरक्षा सांगितलें गुज । तें गैनीनाथें मज उपदेशिलें ॥ २ ॥ तेथुनि तारक निवृत्ति आह्मासी । जाणा त्रिवर्गासी उद्धरिलें ॥ ३ ॥

२

तें नयनाचें अग्रीं पहावें आपण । उजळिल्या जाण दाही दिशा ॥ १ ॥ ब्रह्मांडाएवढें ओतींव सगळें । मन बुद्धि कळे ऐसें नाहीं ॥ २ ॥ निवृत्तिप्रसादें ज्ञानदेवा लाधला । सुखाचा पैं झाला तेणें सुख ॥ ३ ॥

३

सत्यज्ञान तेंचि गगनाचें प्रावर्ण । नाहीं रूप गूण वर्ण जेथें ॥ १ ॥ तो हा डोळेभरी पाहिला श्रीहरी । पाहतां पाहुणें दुरी सांडोनिया ॥ २ ॥ वाचेचा उच्चार नवल हें साचार । स्वरूप निर्विकार कोंदाटलें ॥ ३ ॥ ज्ञानदेव ह्मणे ज्योतीची निज ज्योति । ती ही उभी मूर्ती विटेवरी ॥ ४ ॥

४

विटेवरी मूर्ती दिसते सगुण । सगुण कां निर्गुण ह्मणूं दादा ॥ १ ॥ सगुण जरी ह्मणूं दिसते निर्गुण । वाचेचें भिन्न पडलें दादा ॥ २ ॥ वचन बुडालें स्तब्ध झालें मन । सगुण निर्गुण दोन्ही नाहीं ॥ ३ ॥ ह्मणे मुक्ताबाई सांगा ज्ञानदेवा । विचार हा बरवा करूनीयां ॥ ४ ॥

५

ज्ञानदेव ह्मणे ऐक मुक्ताबाई । सांगेन तूं पाहीं गुरुमुखें ॥ १ ॥ निर्गुणाचा बुंद सगुणीं उतरला ॥ कर्दम तो झाला एकाएकीं ॥ २ ॥ स्थापिलासे गोळा सगुणाचा सार । तयाचा आधार एक आहे ॥ ३ ॥ मूळद्वारीं मूळीं स्थापिला गणपती । तयापाशी वस्ती निर्गुणाची ॥ ४ ॥ निर्गुण ह्मणजे काय रेणू तें अक्षर । ह्मणे ज्ञानेश्वर मुक्ताबाई ॥ ५ ॥

६

मूळद्वारीं दादा स्थापिला गणपती । माया ही उत्पत्ति कैशी झाली ॥ १ ॥ मायेचा वंबाळ जाये ऐकसरा । इच्याही आधारा सांगा दादा ॥ २ ॥ ब्रह्मांड व्यापिलें आकाश कवळिलें । सर्व कांहीं व्यापिलें मायेनेंचि ॥ ३ ॥ माया कैशी दादा सांगता निर्गुण । मुक्ताबाई ह्मणे भिन्न फोडा ॥ ४ ॥

७

रेणू तें निरंजन अणू तेंचि माया । मायावचनीं देह निपजला ॥ १ ॥ नाहीं अक्षराचा आधार मेरूशीं । हें तों नाभीपाशीं स्थापियेलें ॥ २ ॥ दोहीं मधोनिया निघालें वचन वेदाचें जन्मस्थान तेंच वाई ॥ ३ ॥ दहा पवनाचा एक झाला मेळा । रेणूचा जिव्हाळा सर्वांसी हा ॥ ४ ॥ सर्वांतुनि वेगळा रेण तो अचळ । ह्मणे ज्ञानेश्वर मुक्ताबाई ॥ ५ ॥

८

सर्वांतुनि वेगळा हातीं कैसा येई । ह्मणे मुक्ताबाई सांगा दादा ॥ १ ॥ दहा पवनाचा खेळ योगी खेळती । ओढोनियां नेती ब्रह्मांडांत ॥ २ ॥ कुंडलनी निवटोनि करिती आकर्षण । रेणूचें दर्शन झालें कीं नाहीं ॥ ३ ॥ ह्मणे मुक्ताबाई सांगा ज्ञानेश्वरा । चुके येरझारा चौऱ्यांशीचा ॥ ४ ॥

९

कुंडलनी निवटोनी कोंडिती पवन । त्या रेणूचें दर्शन घडलें नाहीं ॥ १ ॥ नलगे आसन कोंडिती पवन । करावें साधन गुरुकृपें ॥ २ ॥ गुरुकृपेवीण न ये तो हातासी । पाहतां रेणूसी अंत नाहीं ॥ ३ ॥ ब्रम्हांडीं रेणू नांदे सदोदीत । सोहं त्याचा आंत जात असे ॥ ४ ॥ दहा पवना वेगळा सोहं तो अचळ । रेणू त्याचा खेळ सदोदित ॥ ५ ॥ ज्ञानदेव ह्मणे ऐक मुक्ताबाई । गुरुकृपे सोई कळों येईल ॥ ६ ॥

१०

गुरुकृपा झाली प्रत्ययासी आली । कैशीती कळली सांग दादा ॥ १ ॥ लेखा नाहीं आला साधन करितां । तो कैसा येइल हाता सांग दादा ॥ २ ॥ यास ते व्वाल्मीक वर्णिती अपार । तयासी ही पार कळला नाहीं ॥ ३ ॥ वेदासी ना कळे श्रुती वेडावले । तो कैसेनि हातां येईल सांगदादा ॥ ४ ॥ इंद्रिया वेगळा मन बुद्धि निराळा । सर्वांत व्यापिला कळे कैसा ॥ ५ ॥ मुक्ताबाई ह्मणे कैसें ज्ञानराजा । संदेह हा माझा फेडोनीयां ॥ ६ ॥

११

गुरुकृपा कैशी सांगतो तुजला । पूर्ण दिवशीं झाला चंद्र गुप्त ॥ १ ॥ तैसा प्राणी होता मायेमाजि भ्रांत । बीजेचा अवचित उदयो झाला ॥ २ ॥ दिवसें दिवस कळा चढे त्या चंद्रास । पूर्णतेसी आला पूर्णिमेला ॥ ३ ॥ तैसा प्राणी होता मायेमाजी भ्रांत । भेटला अवचित गुरुराज ॥ ४ ॥ केली त्यांनीं दया हरपली माया । मुळीचीया ठायां बैसवीले ॥ ५ ॥ ह्मणे ज्ञानदेव ऐक मुक्ताबाई । गुरुकृपाबाई ऐशी आहे ॥ ६ ॥

१२

पूर्णमेचे दिवशीं चंद्र झाला अस्त । देहाचीही गत तैशी होई ॥ १ ॥ कर्ण बंद होती नेत्र आच्छादती । मग कैशी गती होय दादा ॥ २ ॥ देह झाला विकळ जिव्हा ते खुंटली । दश पवना झाली हडबड दादा ॥ ३ ॥ तेथें कोण कळा सद्गुरुनें दिली । देह्यासी कैसी झाली मोक्षगती ॥ ४ ॥ ह्मणे मुक्ताबाई फेडावें हें भिन्न । कोणतें साधन करूं दादा ॥ ५ ॥

१३

देह मोक्ष होय साधन तें ऐक । मायेसी संकल्प करी बाई ॥ १ ॥ वाळी वज्रासन करोनियां मनन । करावें हें ध्यान सद्गुरुचें ॥ २ ॥ ॐ तोचि गुरु सोहं तोचि शीव । या दोहींचा लाघव करी बाई ॥ ३ ॥ नासाग्रीं दृष्टी सोहंगासी गोष्टी । रेणू पाठीपोटीं भरला बाई ॥ ४ ॥ सच्चिदानंद भरला झालें महाशून्य । तयामाजीं लीन होणें बाई ॥ ५ ॥ लीन झालें ह्मणजे नाहीं आपपर । ह्मणे ज्ञानेश्वर पूर्ण कृपा ॥ ६ ॥

१४

कृपा झाली आतां आली प्रत्ययासी । कैसें या मनासी करूं दादा ॥ १ ॥ कैसें वज्रासन कैसें तें मनन । इंद्रियासी दमन कैसें करूं ॥ २ ॥ कैसें करूं दादा सोहंगासी गोष्टी । नासाग्रीं दृष्टी कैसी ठेवूं ॥ ३ ॥ रेणूमध्यें कैसी मिळूं ज्ञानेश्वरा । सांगा या विचारा कृपा करुनि ॥ ४ ॥ धाकुटें भावंड घेतलीसे आळ । मुक्ताई लडिवाळ तुमची दादा ॥ ५ ॥

१५

ज्ञानदेव ह्मणे ऐक मुक्ताबाई । सद्गुरुचे पायीं मन ठेवीं ॥ १ ॥ करी निजध्यास सोहंगाचा बाई । इंद्रियासी नाहीं

रीघ तेथें ॥ २ ॥ सात हे आंत आठव्याच्या पोटीं । नवव्यासंगें गोष्टी करी बाई ॥ ३ ॥ मग दहावा सहज नवव्यासी भेटला । अक्राव्यासी सांगू लागला गुजगोष्टी ॥ ४ ॥ करुनि उपोशन मूळद्वार बुजवोन । लिंगस्थानीं चरण ठेवी बाई ॥ ५ ॥ ब्रह्मांडाहुनि ओढावा सोहंग । त्रिवेणी आसन घाली बाई ॥ ६ ॥ ॐ तोचि गुरु सोहं तोचि शिव । या दोहींचा लाघव करीवो बाई ॥ ७ ॥ ऐक्य झाल्यावरी उठेल बंबाळा । कोटि सूर्यकळा प्रकाशल्या ॥ ८ ॥ खेचरी हे मुद्रा नासाग्रीं दृष्टी । स्वयंभू पाठीपोटीं भरला बाई ॥ ९ ॥ ज्ञानदेव ह्मणे ऐक मुक्ताबाई । यापरता नाहीं उपदेश आतां ॥ १० ॥

१६

सहज समाधी लागली निर्गुणीं ॥ खुंटलीसे वाणी न चले पुढें ॥ १ ॥ खुंटला हा शब्द राहिला व्यवहार । झाला साक्षात्कार सदोदीत ॥ २ ॥ गळालीं इंद्रीयें राहिलेंसें मन । झालें महाशून्य एकाएकीं ॥ ३ ॥ विरालीसे शक्ती झालीसे निवृत्ति । झाली ब्रह्मप्राप्ती मुक्ताबाई ॥ ४ ॥

१७

ह्मणे ज्ञानदेव ऐक मुक्ताबाई । उघडी समाधी घेई जगामाजी ॥ १ ॥ आठवे समाधीचे अंग आलें तुज । आतां नाहीं काज आणिकासी ॥ २ ॥ हेंचि गुह्यज्ञान पार्वतीसी दिलें । मछिंद्रा लाधलें हेंचि ज्ञान ॥ ३ ॥ मछिंद्रांनीं दीलें गोरक्षाचे हातीं । तेंचि चौरंगीप्रती उपदेशिलें ॥ ४ ॥ चौरंगानें दीलें भर्तरीचे हातीं । तेणें गैनीप्रती उपदेशिलें ॥ ५ ॥ बापरुक्मादेवी निवृत्ति दयाळ । त्यांनींच आपणासि उद्धरिलें ॥ ६ ॥ ज्ञानदेव ह्मणे ऐक मुक्ताबाई । निवृत्तीचे पाईं सर्व सूख ॥ ७ ॥

१८

हेंचि गुह्यज्ञान नामदेवा लाधलें । कबिरानें कथिलें चार युगीं ॥ १ ॥ तेंचि गुह्य गोष्टी सांगितली तुज । विश्वासाचें बीज विटेवरी ॥ २ ॥ गुरुपुत्र जाणती योगी सदा ध्याती । शिवादिक जपती हेंचि ध्यान ॥ ३ ॥ अठरा अभंगाची क-रोनि सन्नद्ध । ठेवावी निबंध आपणापाशीं ॥ ४ ॥ याचे पुढें ज्ञान सांगती पापांड । जळो बाई तोंड काळें त्याचें ॥ ५ ॥ अंतकाळ समयीं तीन दिवस उपोषण । सायुज्यता जाण मुक्ती होय ॥ ६ ॥ आतां हेंचि गोष्टी न करी प्रगट । ठे-वावी हें गुप्त आपणापासी ॥ ७ ॥ प्रगट करितां होय मात्रा गमन । ज्ञानदेव ह्मणे आण निवृत्तिची ॥ ८ ॥

# नामदेवकृत ज्ञानेश्वराचे आधीचे अभंग.

हे अभंग श्री नामदेवांनीं केलेले आहेत, श्रीज्ञा-नेश्वरादिकांचे मातापितरांचें विस्तृत वर्णन या अभं-गांत आहे. ह्याचा कडवा एकंदर २३० आहेत. श्री विठ्ठलपंत ( पिते ) यांचे जन्मापासून तों ज्ञानेश्वरांनीं पैठणकरांकडून शुद्धीपत्र आणून आळंदीकरांस दिलें ये-थपर्यंत यांत हकीकत आहे. श्रीज्ञानेश्वरांची गोविंद-पंत आणि निराबाई हीं आजाआजी असावींत. आ-णखी आजापणजाची वगैरे माहिती नाहीं. मात्र ना-मदेवकृत समाधीचे अभंगांत यांचे पूर्वज कोणी त्र्यं-बकपंत आपेगांवकर या नांवानें प्रसिद्ध आहेत. अ-भंगांतील माहिती बहुतेक प्रसिद्ध आहे, तथापि ही नामदेवाचे हातचा असल्यामुळें विशेष महत्वाची आहे. आणि नामदेवाच्या गाथ्यांत हे अभंग नसल्यामुळें त्यांचा आह्मीं या पुस्तकांत संग्रह केला आहे.

१

जगत्रजीवन अंतर्निष्ठ जाण । संतासि शरण रिघिजे भावें ॥ १ ॥ हेचि भक्ति-ज्ञान-वैराग्याची निधी । विवेकेंसी बुद्धि नांदे माझी ॥ २ ॥ श्रवणमननाचें मनन । हेंचि निजध्यासन वैराग्याचें ॥ ३ ॥ ह्मणोनि बैसलों संताचे संगती । गोविंदा विश्रांती गैनीनाथीं ॥ ४ ॥

२

बैसलीं दोघे अतार वह्लभें । उदरींच्या गर्भें तेंचि ध्यान ॥ १ ॥ भक्ति नवमास भरले पूर्ण दिवस । आलें वैराग्य डोळस मूर्तिमंत ॥ २ ॥ विठ्ठल आवडी ठेवियेलें नाम । निराबाईसी प्रेम गैनीनाथीं ॥ ३ ॥

३

व्रतबंध दीक्षा उपदेश गायत्री । ओंकार मूळमंत्रीं स्वर सोळा ॥ १ ॥ केलें वेदपठण काव्य आणि व्याकरण । झाला असे पूर्ण शास्त्रवक्ता ॥ २ ॥ मग पुष्करादि तीर्थें पहावीं समस्तें । अनुताप चित्तें धरियेला ॥ ३ ॥ वैराग्यपुतळा ज्ञानगम्य मूर्ति । निघालासे भक्ती तीर्थाटणा ॥ ४ ॥ विठ्ठलें वंदोनि माता पिता दोन्ही । मग तीर्थाटणीं मुहूर्त केला ॥ ५ ॥

४

आला द्वारावती पाहिली कृष्णमूर्ती । जे मोक्ष विश्रांति मुमुक्षूंची ॥ १ ॥ धरी मत्स्यावतार करी शंखोद्धार । देव मुक्ती माहेर पांथिकाचें ॥ २ ॥ तेथूनि सत्वर आला पिंडारका । मंगळहुडीहुनि द्वारका देखियेली ॥ ३ ॥ सुवर्णाची नगरी ब्राह्मणा दीधली । ते पुरी पाहिली सुदाम्याची ॥ ४ ॥ मंडपाकार वृक्ष तो मूळ माधव । रुक्मिणी विवाह जाहला तेथें ॥ ५ ॥ संपादुनि गेला अवतार कृत्य । तें भालूका तीर्थ

वंदोयेलें ॥ ६ ॥ पश्चिमे प्रभास पट्टण लिंग तें देखिलें । सोरटीं वंदिले सोमनाथ ॥ ७ ॥ मुचकुंदादि गुंफा काळयवन उभा । विश्रांति पद्मनाभा द्वारकापुरीं ॥ ८ ॥ मार्गीचीं तीर्थें करूनि समस्त । आला शक्ति जेथें सप्तशृंग ॥ ९ ॥ अरुणा वरुणा प्राची गोदावरी । ते कपाळेश्वरी पूजा केली ॥ १० ॥ पुढें जोतिर्लिंग देखियेला नेत्रीं । उदक कुशावर्ती स्वीकारलें ॥ ११ ॥ वंदोनि ब्रह्मद्वार सव्य ब्रह्मगिरी । मग भीमाशंकरीं आनंदला ॥ १२ ॥ देखोनियां भीमा आठवी पंढरी । विठ्ठला अंतरीं पांडुरंग ॥ १३ ॥

५

ऐसें नित्य नित्य चालतां सुपंथीं । पदोपदीं कीर्ति नामघोष ॥ १ ॥ आला अळंकापुरीं इंद्रायणी तीरीं । स्नान संध्या करी देवपूजा ॥ २ ॥ देखोनि सुब्राह्मण केलेंसे नमन । वंदिले चरण शिदोपंतीं ॥ ३ ॥ कोण तुमचें ग्राम आलेति कोठून । काय नामाभिधान कां गमन केलें ॥ ४ ॥ विठ्ठल हें नांव रामेश्वरी भाव । वृत्ति आपेगांव गोदातीरीं ॥ ५ ॥ मातापिता वृद्ध वसताति तेथें । द्वारकादि तीर्थें करुनि आलों ॥ ६ ॥ आजि धन्य भाग्य स्वामींचें दर्शन । आश्रम पावन कीजे माझा ॥ ७ ॥ आणूनि मंदिरीं सारूनि भोजन । निद्रा करवीं पूर्ण तया ह्मणीं ॥ ८ ॥ स्वप्न अवस्थेमाजि येउनि पंढरिनाथ । ह्मणे कन्या साळंकृत द्यावी यासी ॥ ९ ॥ प्रातःकाळ झाला सांगितलें स्वप्न । नमस्कार करुनि शिदोपंतीं ॥ १० ॥ वंदोनि त्याचें सांगितलें स्वप्न । कन्या पाणिग्रहण कीजे तुह्मीं ॥ ११ ॥ हांसोनि उत्तर बोले तो सारांश । ह्मणे आज्ञा श्रीनिवास केली नाहीं ॥ १२ ॥ तरी आजिचा दिन स्वस्थ करुनि मन । वंदिले चरण शिदोपंतीं ॥ १३ ॥

संकल्प विकल्प हेलावती मनीं । तुळशीवृंदावनीं निद्रा केली ॥ १४ ॥ विश्वीं विश्वंभर अवस्था व्यापुनि तिन्ही । येउनियां स्वप्नीं काय बोले ॥ १५ ॥ भक्ती आणि ज्ञान वैराग्य आवडी । हे वसती उघडी तुझ्या अंगीं ॥ १६ ॥ मूर्तिमंत चारी जन्म ईच्या उदरीं । ह्मणोनि स्वीकारी आज्ञा माझी ॥ १७ ॥ उठोनि विठ्ठलें स्वप्न सांगितलें । हरुषें वंदिलें शिदोपंतीं ॥ १८ ॥ पाचारुनि जोशी घटितार्थ पाहिले । गूण उतरले छत्तीसही ॥ १९ ॥ निर्धारिलें लग्न मिळाले ब्राह्मण । निर्विघ्नपूजन केलें आधीं ॥ २० ॥ देवकप्रतिष्ठा ब्राह्मण भोजन । घटका झाली पूर्ण म्हणती द्विज ॥ २१ ॥ कुळदैवतस्मरण म्हणाति सावधान । उभयतांचें मन पांडुरंगीं ॥ २२ ॥ झालें पाणिग्रहण विधीसी अर्पण । वंदिले चरण शिदोपंतीं ॥ २३ ॥ पंढरीचे क्षेत्रीं मिळालीसे यात्रा । आले पंढरपुरा भक्तराज ॥ २४ ॥ गरुडटके पताका टाळ मृदंग वाजती । वैष्णव गाती नाचति जयजयकारें ॥ २५ ॥ गरुडपारीं उभी दाटी वैष्णवाची । उपमा वैकुंठीची पंढरीये ॥ २६ ॥ राउळा भीतरीं प्रवेशलीं दोघे । देखियेलें उभ्या पांडुरंगा ॥ २७ ॥ काया वाचा मनें पारुषले नयनीं । मस्तक चरणीं ठेवियेला ॥ २८ ॥ विठ्ठलासि ध्यान रामकृष्णमाळा । ह्रदयीं जिव्हाळा श्रीमूर्तिराया ॥ २९ ॥

६

आश्रमविधि करावें पाळण । परी विठ्ठलाचें मन तीर्थाटणीं ॥ १ ॥ जाणोनि अंतर ह्मणे शिदोपंत । आपुलें मनींचा हेतु पूर्ण कीजे ॥ २ ॥ जावेहो सत्वर यावें स्वस्तिक्षेम । पावले आश्रम शिदोपंत ॥ ३ ॥ मग विठ्ठलें गमन केलें तीर्थाटणा । मुख्य मुख्य स्थाना अनुक्रमें ॥ ४ ॥

७

पाहिलें श्रीशैल्य निवृत्ति संगम । पापराशी भस्म देख-
तांचि ॥ १ ॥ चालतां सुपंथीं हृदयीं विठ्ठलमूर्ति । मुखीं नाम
कीर्ति गात चाले ॥ २ ॥ आभोळ नृसिंह श्री वासुदेव । स-
कळ देवराव व्यंकटाद्रि ॥ ३ ॥ गेला अरुणाचला नमन
चिदंबरी । दक्षिण कावेरी मथुरा आहे ॥ ४ ॥ जानकीची
शुद्धि करावया गेला । हनुमंत उडाला जेथुनियां ॥ ५ ॥
आनंदभरित चालतसे मार्गी । हृदयीं अनुराग आवडीचा॥६॥
तें स्थान वंदोनि पावला गोकर्ण । हाटकेश्वरीं स्नानविधि के-
ला ॥ ७ ॥ आला कोल्हापुरा लक्ष्मीच्या दर्शना । पंच-
गंगे स्नान करुनियां ॥ ८ ॥ प्रीतीचा संगम देखिला कर-
हाटकीं । थोर झाला सुखी अंतरींच ॥ ९ ॥ कृष्णेचिया स्नानें
कृत्यकृत्य झाला । हारुपें देखिला संगम डोळां ॥ १० ॥
आला अलकावती हर्षयुक्त चित्तीं । दिधलें शिदोपंतीं आलिंगन
॥ ११ ॥ विठ्ठला अंतरी माता पिता पहावी । आज्ञा द्यावी
ह्मणे शिदोपंता ॥ १२ ॥

८

कुटुंबा सहित जावें जी भुवना । केलीसे प्रार्थना शिदो-
पंतीं ॥ १ ॥ सहज बोळवण संतांचें दर्शन । ह्मणे केलें मान्य
शीघ्र चला ॥ २ ॥ मग विठ्ठलानें माता पिता वंदिली । स्थिति
सांगितली शिदोपंतीं ॥ ३ ॥ चिरंजीव नांदा ह्मणति माता
पिता । सुख आमुच्या चित्ता थोर झालें ॥४॥ वस्त्रें अलंकार
शिदोपंतें दिधलें । मग नमन केलें सकलापती ॥ ५ ॥ असतां सु-
खरूप माता पिता वृद्ध । वैकुंठा स्वानंदें निघुन गेली ॥ ६ ॥
संसाराची चिंता नाहीं विठ्ठलासी । अखंड वृत्तिसी समाधान
॥ ७ ॥ जाहलें वर्तमान ऐकिलें शिदोपंतीं । परम तेणें चित्तीं
खेद केला ॥ ८ ॥ येऊनी परामर्श घेतला दोघांचा । ह्मणे

सांभाळ तुमचा करितो देव ॥ ९॥ उदासवृत्ति तुमची असे सर्वकाळ। पदार्थ मात्र सकळ पाहिजे तो ॥ १०॥ दया करोनीयां मज आतां सांभाळावें ॥ अळंकापुरीं रहावें सुखरूप ॥ ११ ॥ पुत्रसंतती होईल तुह्मांसी । येइल चित्तासि तें करा सुखें ॥ १२ ॥ मानोनि वचन विठ्ठलें तयानें । ह्मणें हें करणें देवाचें पैं असे ॥ १३॥ येउनी अळंकावती केला क्षेत्रवास ॥ देऊनि चित्तास समाधान ॥ १४ ॥ नित्य हरिकथा नामसंकीर्तन ॥ संताचें दर्शन सर्वकाळ ॥ १५ ॥ पंढरीची वारी आषाढी कार्तीकी ॥ विठ्ठल करी चित्तीं सुखरूप ॥ १६ ॥ ऐसा बहुकाळ क्रमिलिया वरी ॥ अपत्य उदरीं होतां न दिसे ॥ १७ ॥ विठ्ठल ह्मणे अहो ऐकतेस कांते। मज ऐसें वाटतें संन्यास घ्यावा ॥ १८ ॥ देशी आज्ञा तरी जाईन वाराणसी ॥ ऐसें रुक्माईसी ह्मणीतलें ॥ १९॥ रुक्माई ह्मणे ऐकतां जी ताता। संन्यास घ्यावा आतां ह्मणताती ॥ २० ॥ संततीवांचूनि न घ्यावा संन्यास। ऐसें सांगा त्यास ह्मणीतलें ॥ २१ ॥ निरोपाची वाट पाहे भलत्या मिसें । रुक्माई ते असे समाधान ॥ २२ ॥ असतां दुश्चित्तपणें निरोप पूसिला । जा जा ह्मणोनि दिला अवसरू ॥ २३ ॥ जाऊनि विठ्ठलें घेतला संन्यास। चिंता रुक्माईस पडली तेव्हां ॥ २४ ॥ उतरूनी भीमा आले प्रयागास। त्रिवेणी संगमा वंदीयेलें ॥ २५ ॥ करोनियां स्नान माधव पूजन। मग तेथूनि गमन आरंभिलें ॥ २६ ॥ आले वाराणसी जेथं शंकर निवासी। भक्त अहर्निशीं वसताती ॥ २७ ॥ मग मुक्तमंडपी बैसुनियां सुखें । श्रवण अनायासें करीताती ॥ २८ ॥ गीताव्याख्यान ते संन्यासमहीमा। ऐकोनि आश्रमा अतिथी आला ॥ २९ ॥ विचारलें मनीं पुरे हा संसार। अनंत अपार दुःखराशी ॥ ३० ॥ मग श्रीरामाश्रमासि गेले

पैं शरण । तिहीं पूर्वानुसंधान विचारिलें ॥ ३१ ॥ नाहीं मज कोणी मी असे एकला । विरक्त देखिला शिष्यराज ॥ ३२ ॥ याचे संगतीनें सुख आहे आम्हां । ह्मणउनियां प्रेमा आश्र-मासी ॥ ३३ ॥ देऊनीयां दीक्षा मंत्र उच्चारण । संन्यास-ग्रहण संपादीलें ॥ ३४ ॥ करावें सार्थक रुक्माईनें तेव्हां । आरंभिली सेवा अश्वत्थाची ॥ ३५ ॥ उग्र अनुष्ठान जाणु-नियां देवें । येणें केलें तंव श्रीपादाचें ॥ ३६ ॥ देखोनि स-त्पात्र केला नमस्कार । सारांश उत्तर बोलीयेलं ॥ ३७ ॥ पुत्रवंती होई दिला आशिर्वाद । रुक्मिणीसी विनोद वाटि-न्नला ॥ ३८ ॥ माते तूं कां हाससी श्रीपाद पुसती । स्वा-मी पुत्र कैसे होती पतीवीण ॥ ३९ ॥ भ्रतारें जाऊनी घेतला संन्यास । स्वामीच्या वचनास लागे बोल ॥ ४० ॥ पुसतां खाणखूण निश्चयें आणला । श्रीपाद बोलला सत्य सत्य ॥ ४१ ॥ रुक्माईसी पुसे असे तुझे कोणी । येरी कर जोडुनी बोलीयेली ॥ ४२ ॥ मातापिता बंधू आहेत समस्त । हें वर्तमान तयातें श्रुत करूं ॥ ४३ ॥ कृपा करूनियां आश्रमासि यावें । सनाथ करावें कृपादृष्टी ॥ ४४ ॥ ने-ऊनी आश्रमा दीधलें आसन । केलें श्रुत वर्तमान शि-दोपंता ॥ ४५ ॥ अर्घ्यपाद्यपूजा भोजन सारीलें । व-र्तमान पुसिलें शिदोपंतीं ॥ ४६ ॥ श्रीपाद ह्मणती रामे-श्वरीं भाव । तंव येथें अभिप्राव झाला ऐसा ॥ ४७ ॥ आतां फिरोनियां जावें वाराणसी । घेउनी रुक्माईसी तुह्मी यावें ॥ ४८ ॥ श्रीपाद ह्मणती इच्या दोषास्तव । माझें पुण्य सर्व विलया जातें ॥ ४९ ॥ शिदोपंत ह्मणत तुह्मी दयावंत । शीघ्र गमनार्थ करा स्वामी ॥ ५० ॥ जाउनी वाराणसी मठीं प्रवेशले । मग विचारिलें चैतन्यासी ॥ ५१ ॥ तुझें कोणी होतें सत्य सांग आतां । अन्यथा बोलतां उरी

नाहीं ॥ ५२ ॥ चैतन्यें येऊनी चरणीं ठेविला माथा । ह्मणे त्यागुनियां कांता आलों स्वामी ॥ ५३ ॥ उठवूनि श्रीपादें दिलें आश्वासन । करी पाणिग्रहण इचें आत ॥ ५४ ॥ अविधी कर्माचें न धरावें भय । त्यासी साह्य आहे जगदीश ॥ ५५ ॥ स्वदेशा जाऊनी करावा आश्रम । सुखरूप स्वधर्म चालवावा ॥ ५६ ॥ श्रीपादें मस्तकीं हस्त ठेवियला । निरोप दीधला चैतन्यासी ॥ ५७ ॥ चैतन्य संन्यासी झाले घरवासी । मुळिच्या प्रकृतीसी ऐक्य केलें॥५८॥ हांसताती लोक बरवा हा संन्यास । करिती उपहास दर्शनाचा ॥ ५९ ॥ द्विजीं वाळीयेलें जगीं सांडियलें । शेखीं उपेक्षिलें आप्तवर्गी ॥ ६०॥ ऐशीं बारा वर्षें क्रमिलीं निगुतीं । तंव झाली संतती चौघेजण ॥ ६१ ॥ निवृत्ति ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई । हांसती सकळही ऐकुनि नांवें ॥ ६२ ॥ जाहलीं उपवर व्रतबंधाजोगीं । उभयतां उद्वेगी चिंतातुर ॥ ६३ ॥ जातिकुळावेगळीं पडली निराळीं । माझी वंशावळी प्रायश्चित ॥ ६४ ॥ मेळवूनि द्वीज केली ब्रह्मसभा । अपराध क्षमा करा दीना ॥ ६५ ॥ निबंध निर्णय पाहती धर्मशास्त्रीं । तुह्मीं श्रुतिश्रोती परायण ॥ ६६ ॥ सांगाल तें मान्य ह्मणती साहजिणें । पुनीत करणें पतितासी ॥ ६७ ॥ निवृत्ति ह्मणे तुह्मी भूदेव प्रत्यक्ष । दर्शनेंचि मोक्ष जडमूढा ॥ ६८ ॥

६

पाहती ग्रंथ सभाश्रेष्ठ महाजन । वैदिक शास्त्रज्ञ पुण्यश्लोक ॥ १ ॥ देहांत प्रायश्चित तया ऐसें बोलिलें । विचारोनि भलें हित करावें ॥ २ ॥ ह्मणती द्विजवर आणिक नाहीं उपाव । नमस्कारें वैश्वदेव शुद्ध केला ॥ ३ ॥ श्रीपाद ह्मणती अवश्य करीन । देह हे दंडीन अनुतापें ॥ ४ ॥ त्रिवेणी संगमीं शरीर घालीन कर्वतीं । गेला पूर्व स्थिती वीतरागें ॥ ५ ॥

दारा पुत्र गृह त्यजुनी निघाला । नमस्कार केला द्विजवृंदां ॥ ६ ॥ झडझडा जाती परतोनि पाहती । नाहीं पुनरावृत्ति ह्मणती द्विज ॥ ७ ॥ अनुताप वैराग्य हेंचि प्रायश्चित । मग झाला शुचिर्भूत गुरुकृपें ॥ ८ ॥ निवृत्ति ह्मणे कोण आह्मासि ती गती । सांगावें श्रीमंती विचारोनि ॥ ९ ॥

१०

ह्मणती द्विजवर जावें प्रतिष्ठाना । तेथुनि पत्र आणा तेंचि वंद्य करूं ॥ १ ॥ नाहीं याति कुळ वर्ण अधिकार । क्षत्रीय ना वैश्य शूद्र ना द्विज नव्हे ॥ २ ॥ नव्हे देवगण यक्ष ना किन्नर । ऋषी निशाचर तेही नव्हे ॥ ३ ॥ तें मी अद्वैत अविनाश जुनाट । निजबोध-निष्ठ स्वरूप माझें ॥ ४ ॥ नव्हे आप तेज वायू व्योम नामही । महातत्त्व तेंही विराट नव्हे ॥ ५ ॥ नव्हे मी सगुण नव्हे मी निर्गुण । अनुभूतीं भज्य न होऊनि नव्हे ॥ ६ ॥ निवृत्ति ह्मणतसे ऐके ज्ञानेश्वरा । माझी परंपरा ऐशी आहे ॥ ७ ॥

११

विधी वेदविरुद्ध संपर्क संबंध । नाहीं भेदाभेद स्वस्वरूपीं । ॥ १ ॥ अवर्षी आचरणें परम दूषण । वेदोनारायण बोलीयेलें ॥ २ ॥ स्वधर्म अधिकार जातिपरत्वें भेद । उचित तें शुद्ध ज्याचें तया ॥ ३ ॥ ह्मणोनियां संतीं अवश्य आचरावें । जन्म दाखवावें आचरोनी ॥ ४ ॥ कुळींचा कुळधर्म अवश्य पाळावा । सर्वथा न करावा अनाचार ॥ ५ ॥ प्रत्यवाय ऐसे अशास्त्रीं चालतां । पावन अवस्था जरी झाली ॥ ६ ॥ ज्ञानदेव ह्मणे ऐकाजी निवृत्ति । बोलिली पद्धति धर्मशास्त्रीं ॥ ७ ॥

१२

हेंचि आह्मा इष्ट बोलीले परानिष्ट । असतां दुर्घट परि सेव्य असे ॥ १ ॥ पांडवाचें कुळ शोधितां निर्मूळ । कुंडजार

गोळ बुद्धिकामी ॥ २ ॥ भक्ती हे सरती जाति न सरती । ऐशी आत्मस्थिति विश्ववंद्य ॥ ३ ॥ दुर्वास वसिष्ठ अगस्ति गौतम । हे ऋषी उत्तम कुळिंचे कैसे ॥ ४ ॥ व्यास आणि वाल्मीक कोण कुळ त्यांचें । तैसेंचि आमुचें सोपान ह्मणे ॥ ५॥

१३

घेऊनिया पत्र निघाले सत्वर । करोनि नमस्कार सकळामी ॥ १ ॥ जाऊनी राहिले भोगावती तीरीं । तीर्थयात्रा वरी संपादिली ॥ २ ॥ अनाथ पतीत शरणांगत दीन । सनाथ करणें कृपादृष्टीं ॥ ३ ॥ केली ब्रह्मसभा बैसले वरिष्ठ । होतें तैसें स्पष्ट निवेदिलें ॥ ४ ॥ पत्र वाचुनियां सकळा झालें श्रुत । संन्याशाचे पुत्र कळों आले ॥ ५ ॥ या नाहीं प्रायश्चित यातिकुळ भ्रष्ट । बोलीले श्रेष्ठ पूर्वापार ॥ ६ ॥ त्या एक उपाय असे शास्त्रमतें । अनन्य भक्तीतें अनुसरावें ॥ ७ ॥ विप्र अनुतापें करावें भजन । गो खर आणि श्वान वंदोनियां ॥ ८ ॥ वंदावे ब्राह्मण ब्रह्मभावनेसी । ऐसे पद्धतीसी बोलीयेलें ॥ ९ ॥ ऐकोनि निवृत्ति संतोपला चित्तीं । धन्य तुमची मती वंदिली शिरीं ॥ १० ॥ ज्ञानदेव ह्मणे सांगाल तें मान्य । मुक्ताई सोपान आनंदली ॥ ११ ॥

१४

ऐकोनि ऐशीं नांवें हांसती ब्राह्मण । नामांचें अभिधान सांगा आह्मा ॥ १ ॥ एक ह्मणती नामापाशीं काय आहे । ज्ञान वाहताहे पाणी पखालीसी ॥२॥ ज्ञानदेव ह्मणे तोही आमुचा आत्मा । वेगळीक आह्मां तया नाहीं नाहीं ॥३॥ तेव्हां द्विज आसुड मारिति ह्मैशाचीये पाठीं । तोंचि वळ पाठीं उठिला ज्ञानदेवा ॥ ४ ॥ ह्मणाते द्विजवर अहो ज्ञानदेवा । यापासून बोलवावा वेदध्वनी ॥ ५ ॥ तरीच तुमची सभ्यता कळों येईल आह्मां । नाहींतरी रिकामा बोल बोलूं नका

॥ ६ ॥ ज्ञानदेव ह्मणे ज्ञाना बोलरे ऋग्वेद । ओंकार मूळ-
कंद प्रणवेसी ॥ ७ ॥

१५

वेदाचा आरंभ करिता झाला पशु । विधि उपन्यासु सांग पुढें ॥ १ ॥ करिती आश्चर्य सकळ द्विजवर । हे तिन्ही अवतार तिही देवाचे ॥ २ ॥ आदिमाया मुक्ताई मुक्तपणें अवतरली । आह्मापासून झाली निराळीं कीं ॥ ३॥ कर्मठ अभिमानें ठकलों देहबुद्धि । गोवियेलें विधी निःसंदेह ॥ ४ ॥ नेणो भक्ति ज्ञान वैराग्याचा लेश । कुटुंबाचे दास होउनि ठेलों ॥ ५ ॥ आणिकासी सांगों आपणा चरों । लटकेंचि हुंबरों प्रतिष्ठेसी ॥ ६ ॥ धन्य याचा वंश धन्य याचें कुळ । धन्य पुण्यशीळ अवतार हे ॥७॥ सकळ द्विजवर करिती नमस्कार । आनंदें जयजयकार करीताती ॥ ८ ॥ ज्ञानदेव ह्मणे तुमचे पायाचा महिमा । सामर्थ्य हें आह्मा आगीं नाहीं ॥ ९ ॥

१६

तुह्मी वेदरूप भूदैवत प्रत्यक्ष । दर्शनेंचि मोक्ष जडमूढा ॥ १ ॥ सकळही तीर्थें वसतीं तुमच्या पाईं । तेथें आमुचे काई उरती दोष ॥ २॥ धन्य दिवस आजिचा जाहलों कृतकृत्य । भेटलेति संत ब्रह्मवृंदा ॥ ३ ॥ ज्ञानदेवा ध्यान ब्राह्मणाचे चरण । कलिमलछेदन निवृत्ति ह्मणे ॥ ४ ॥

१७

जयाचें दर्शन होतांचि दुरूनी । सर्व जाय पळोनि पाप ताप ॥ १ ॥ तीर्थासि पावन कलिमलछेदन । देवासि कल्याण जयाचेनि ॥ २ ॥ ते पाय सादृश्य देखिलें आज दृष्टी । याग सहस्त्र कोटी न तुकती ॥ ३ ॥ जयाचे हृदयीं वेदाचा निवास । शास्त्रें रहिवास केला होय ॥ ४ ॥ जयाच्या वचनें देव पितर तृप्त । स्वाहा स्वधा होत ज्याच्या

मुखें ॥ ५ ॥ जोडुनियां कर विनवी सोपान । निश्चयेंसि वचन द्यावें आज्ञा ॥ ६ ॥

१८

शेष उच्छिष्टा करावे विभागी । बटुपणालागिं अधिकार ॥ १ ॥ अध्यात्म ग्रंथ पाहती पैठणीं । गीता संबोधिनी जवळी असे ॥ २ ॥ भोगावती स्नान कालिका दर्शन । वेदांत व्याख्यान परिसती ॥ ३ ॥ धन्य हा सोपान धन्य ज्ञानदेव । धन्य निवृत्तिराव ब्रह्ममूर्ती ॥ ४ ॥ सांगती पुराणें रात्रीं हरिकीर्तन । पैठणीचें जन वेधीयेले ॥ ५ ॥ पितृयज्ञ झाला एके गृहस्थाघरीं । पितर मंत्रोच्चारीं आव्हानिले ॥ ६ ॥ अवघे द्विजवर ह्मणती धन्य धन्य । यासारीखे ब्राह्मण कोणी नाहीं ॥ ७ ॥ उपनिषद्भाग पढिन्नले वेद । परी हें सामर्थ्य आह्मा नाहीं ॥ ८ ॥ नाहीं ऐकिलें ना कोठें वर्तलें । तें या सृष्टींत दाविलें आजि डोळां ॥ ९ ॥ पशुमुखें वेद दृश्य पितर लोक । थोर हें कौतुक दाखविलें ॥ १० ॥ मिळोनि समस्त सोडियेलीं शास्त्रें। विचारोनि पत्रें लिहियेलीं ॥ ११ ॥ हें परलोकिचें तारुं देवत्रय अवतारु । यासि कासया विरुद्ध द्यावें प्रायःश्चित ॥ १२ ॥ लिहूनियां पत्र दिधलें तया हातीं । समस्ता निवृत्ति नमस्कारी ॥ १३ ॥

१९

घेऊनिया पत्र केली प्रदक्षिणा । साष्टांग ब्राह्मणा नमन केलें ॥ १ ॥ मागोनियां म्हैसा नेवाश्यासिं आले । प्राकृत हे केले गीतादेवी ॥२॥ निवृत्ति ह्मणती ऐके ज्ञानदेवा । अनुभव करावा अमृत ऐसा ॥ ३ ॥ आदिशक्ती माता म्हाळसा वंदोनि । मग तेथुनियां चालियेले ॥४ ॥ क्रमिताती चौघे अनुभव कुशळ । हरिनाम सरळ कवित्वकळा ॥ ५ ॥ येऊनि

उतरले आळ्याचिये वनीं । पशु तये स्थळीं शांत झाला॥६॥ करूनीयां त्यासी शेंदूर स्थापन । अळंकावती निजस्थान प्रवेशले ॥ ७ ॥ सान थोर सकळ तेथील निवासी । निवृत्तीं तयासी नमस्कारिलें ॥ ८ ॥

२०

तिन्ही देव जैसे परब्रम्हींचे ठसे । जगीं सूर्य जैसे प्रगटले ॥ १ ॥ धन्य तो निवृत्ति धन्य तो सोपान । धन्य तो निधान ज्ञानदेव ॥ २ ॥ उपजतां ज्ञानी हें वर्म जाणुनि । आले लोटांगणीं चांगदेव ॥ ३ ॥ प्रत्यक्ष पैठणीं भट्टीं केला वाद । रेड्यामुखीं वेद बोलविलें ॥४॥ सोहं मुक्ताच्या सोडोनियां गांठीं । केलीसे मराठी गीतादेवी ॥५॥ नामा ह्मणे सर्व सुकृत लाहिजें । एक वेळा जाइजे अळंकापुरा ॥ ६ ॥

## ॥ चोखामेळा ॥

चोखामेळ्याच्या जन्माविषयीं माहिती लागली नाहीं. तो निःसीम भक्त होता. श्री एकनाथ महाराजांनीं संतांस विठोबाचीं भूषणें कल्पून त्याची स्तुती केली, त्यांत चोखामेळ्यास 'चरणतळींची वीट निर्मळ । तोहा जाणा चोखामेळ' असें ह्मटलें आहे. श्रीतुकाराम महाराजांनीं पंढरपुरच्या—आपल्या माहेरच्या—मंडळींचें वर्णन करीत असतां चोखामेळ्यास 'चोखामेळा संत जिवासि आवडे । विसर न पडे त्याचा मज' असें ह्मटलें आहे. आणखी एके ठिकाणीं 'चोखा मेळा वंका यातीचे महार । त्यासि सर्वेश्वर ऐक्य करी' व 'चोखामेळा तुझा साडू । त्याचीं ढोरें लागसि ओढूं' व नरहरि सोनारा, वडू फुंकू लागे । चोखामेळ्या संगें, ढोरें ओढी' असें ह्मटलें आहे.

ह्या पुस्तकांतील ६ व्या अभंगात श्री पांडुरंग चोखामेळयाच्या घरीं जेवावयास गेल्याचें वर्णन आहे. ८ व्या अभंगात--पंढरपूरचे पुजारी चोखामेळयास देवळांत येऊं देत नसत, विठोबाला जवळ जाऊन भेटावें असा याचा तर मोठा हेतू, महाद्वारा पर्यंत याणें यावें आणि तेथूनच दर्शन घेऊन कष्टी होऊन परत जावें, असें होऊं लागलें. विठोबालाही भक्तावांचून चैन पडेना. तेव्हां एके प्रसंगीं विठोबानें चोरून त्याला देवळांत आणून भेट दिली. भक्तांपाशीं आह्माला दिसणाऱ्या देवांतलें दगडत्व जातें आणि भक्तेच्छित गुणत्व येतें, त्याप्रमाणें हे देवभक्त गोष्टी सांगत बसले. परत जातांना चोखामेळयास देवानें रत्नहार, बुका, तुळशी इत्यादि प्रसाद दिला.

दुसरे दिवशी देवाचे गळ्यांतला रत्नहार नाहींसा झालेला पाहून पुजाऱ्यांनीं तपास केला. तों हा मुद्देमालासह चोर सांपडलेला पाहून त्यांनींही आपल्या जवळचे पुष्कळ मुष्टिप्र-हार त्यास दिले. चोखामेळयास या वेळीं असें दिसून आले कीं, देवाची भेट झाली तेव्हां त्यानें आपल्यास रत्नहार प्रसाद दिला आणि पाठोपाठ मुष्टी-प्रहारही त्यानेंच देवविले! देवाजीची ही करामत चोखामेळयाच्या पूर्ण ध्यानांत आली!! पण करतो काय? पुजाऱ्यांचे हार सोसवेनात, तेव्हां तो देवाची करुणा भाकूं लागला. हें वर्णन ८ व्या अभंगांत आहे.

चोखामेळा जातीचा महार, तरी तो पक्का वैष्णव होता. आपलें जातिकर्म आटपल्यानंतर माध्यान्हकाळीं स्नान करून तो धूतवस्त्रें परिधान करी, चंदन लेपन करी, ईश्वराचें ध्यान करी, अतिथीची आवड बाळगी, आणि देहरक्षणापुरता थोडासा धान्याहार करी. घरांत तुळशी वृंदावन असेच, तुलसीच्या पानानें मुखशुद्धि करी, आणि नामस्मरण करीत पुनः आपलें जातिकर्म करूं लागे.

पंढरपुरापासून आग्नेयीस जवळच मंगळवेढें गांव आहे, तेथें गांवकुसूं बालण्यासाठीं पुष्कळ महार कामास लाविले होतें. त्यांत चोखामेळा होता, ४ महिने गेल्यावर गांवकुसूं अकस्मात् पडून पुष्कळ महार लोक चिरडून मृत्यु पावले, आणि त्यांतच चोखामेळ्याचा देहांत झाला. शा. शके १२६० वैशाख वद्य ५ स त्यानें परलोकीं गमन केलें.

नंतर ८ दिवसांनीं विठोबानें नामदेवास मंगळवेढ्याहून चोखामेळ्याच्या अस्थी आणावयास पाठविलें. ज्या अस्थींतून विठ्ठल विठ्ठल असा शब्द निघेल त्या चोखामेळ्याच्या अस्थी, अशी नामदेवास खूण सांगितली. गांवकुसाजवळ जातांच त्याला विठ्ठल विठ्ठल हा शब्द ऐकूं आला. विठ्ठलाची भक्ती आणि विठ्ठलाविषयीं प्रेम चोखामेळ्याच्या अस्थींतही आहे हें पाहून श्री नामदेव आश्चर्यभरित झाले. संत भजनरंगांत गुंगुन जातात, तेव्हां त्यांना आहार निद्रा यांचे भानही रहात नाहीं. अंतःकरण ईश्वराशीं मिळविणें ही गोष्ट सामान्य नव्हे. मनाचा अभ्यास हाच योगमार्ग आहे. संतांनीं हा अभ्यास पूर्ण केला. चोखामेळ्याच्या अस्थींनीं विठ्ठलनामाचा उच्चार केला हें सत्य दिसतें. आणि श्री तुकाराममहाराजांनीं मांडी कापून तींत कापूस भरलेला दाखविला ही गोष्टही असत्य नव्हे.

नामदेवानीं आणलेल्या अस्थी श्री पांडुरंगानें मोठ्या प्रेमानें पितांबराच्या पदरांत घेतल्या. पदरांत पडतांच अस्थीनीं 'विठ्ठल विठ्ठल' असा पुनः गजर केला. त्या अस्थी महाद्वारीं पुरल्या आणि त्यावर समाधी बांधिली. सर्व संतांनीं मोठा जयजयकार केला. त्या समारंभांत प्रत्यक्ष राही–रुक्मिणी यांणी आरती केली.

५७–५८ अंकांची नजरचूक झाली आहे.

१

देहीं देखिली पंढरी । विठू अविनाश विटेवरी ॥ १ ॥ रुक्मीणी अंगना । आत्मा हा पुंडलीक जाणा ॥ २ ॥ आकार तितुका नासे । निराकार विठ्ठल दिसे ॥ ३ ॥ ऐसें गुज ठाईचें ठाई । चोखा ह्मणे लागा पाई ॥ ४ ॥

२

टाळी वाजवावी गुढी उभारावी । वाट हे चालावी पंढरीची ॥ १ ॥ पंढरीचा हाट कौलाची पेठ । मिळाले चतुष्ट वारकरी ॥ २ ॥ पताकाचे भार मिळाले अपार । गर्जे भीमातीर जयजयकारी ॥ ३ ॥ हरिनाम गर्जतां नाहीं भय चिंता । ऐसें बोले गीता भागवत ॥ ४ ॥ खटनट यावें शुद्ध होउनि जावें । दवंडी पिटी भावें चोखामेळा ॥ ५ ॥

३

कोणे देखियेले जगा । पांडुरंगा मी नेणे ॥ १ ॥ मौन्यें पारुषली वाणी । शब्दखाणी विसरली ॥ २ ॥ एका आधीं कैंचे दोन । मजपासुन मी नेणे ॥ ३ ॥ मुळिंच चोखा मूळ नाहीं । कैंची राही विठ्ठल ॥ ४ ॥

४

पांडुरंगीं लागो मन । कोण चिंतन करी ऐसें ॥ १ ॥ देहभाव विसरला । देव गेला बुडोनि ॥ २ ॥ जीव उपाधी भक्ति वंद्य । तेथें भेद जन्मला ॥ ३ ॥ चोखामेळा संत । हेही मात उपाधि ॥ ४ ॥

५

ऊंस डोंगा परि रस नोहे डोंगा । काय भुललासी वरलीया रंगा ॥ १ ॥ कमान डोंगी परि तीर नोहे डोंगा । काचे

भुल्लासी वरलीया रंगा ॥२॥ नदी डोंगी परि जळ नोहे डोंगें । काय भुल्लासी वरलीया रंगें ॥ ३ ॥ चोखा डोंगा परि विठ्ठल नोहे डोंगा । काय भुल्लासी वरलीया रंगा ॥४॥

६

विठोबा पाहुणा आला आमुचे घरा । निंबलोण करा जीवें भावें ॥ १ ॥ पंचप्राण ज्योति ओंवाळुनी आर्ति । ओंवाळिला पति रुक्माईचा ॥ २ ॥ षड्रस पक्वान्न विस्तारिलें ताट । जेवूं एकवट चोखा ह्मणे ॥ ३ ॥

७

भाव समुद्री भरियलें केणें । आणियेलें नागें द्वारकेचें ॥ ॥ १ ॥ बाराही मार्गींची वणिकरी । पंढर हे पुरी नामदेव ॥ २ ॥ चोखा ह्मणे लोटांगणीं जाऊं । नामदेव पाहूं केशवाचा ॥ ३ ॥

८

धांव घाली विठु चालूं नको मंद । बडवे मज मारिति ऐसा काय तरी अपराध ॥ १ ॥ विठोबाचा हार तुझ्या कंठ कसा आला । शिव्या देउनि ह्मणती महारा देव बाटवीला ॥ २ ॥ कर जोडुनि चोखा विनवितो देवा । बोलिलों उत्तरें परि राग नसावा ॥ १ ॥

९

## ॥ जोहार ॥

जोहार मायबाप जोहार । तुमचे महाराचा मी महार ॥१॥ बहु भुकेला झालों । तुमच्या उष्टयासाठीं झालों ॥२॥ बहु केली आस । तुमच्या दासाचा मी दास ॥ ३ ॥ चोखा ह्मणे पाटी । आणिली तुमच्या उष्टयासाठीं ॥ ४ ॥

## ॥ भानुदास ॥

कोरडीये काष्ठीं अंकुर फुटला । तेथें येता झाला विठो-बाच ॥ १ ॥ समर्थाचा आह्मीं धरिला आधार । तरीच स-त्वर आला तेथें ॥ २ ॥ माझीये संकटीं आलासि धांवोनि । भानुदास चरणीं लागलासे ॥ ३ ॥

२

देव आणि भक्त एकरूप झाले । मग दोघे आले आश्र-मासी ॥ १ ॥ देव ह्मणे भक्ता कष्टी कां झालासी । तुझिया उपकारासी काय वानूं ॥ २ ॥ भानुदास नयनीं जळ पूर्ण दाटलें । मग आलिंगिलें पांडुरंगें ॥ ३ ॥

३

जैसा पवनें सिंधाचा गाभा । तैसा विटेवरी उभा । आंगीं-चिया दिव्य प्रभा । धवळलें नभ ॥ १ ॥ उगवति सूरजा । बांधूं नवरत्नपूजा । मुगुटीं पैं भाव दुजा । उपमा नाहीं ॥ २ ॥ दोन्हीं कर कटितटीं । पीतांबर माळ गांठी । हार वैजयंती कंठीं । कौस्तुभ शोभे ॥ ३ ॥ कल्पद्रुम छत्राकार । तळीं त्रिवळी विदार । वनसी वाजवी मधुर । श्रुति अनुरागें ॥ ४ ॥ वेणुध्वनि गोडपणें । पवन पांगुळला तेणें । तो हा निववी एका गुणें । अमृतधारी ॥ ५ ॥ हा हो लेणियाचें लेणें । नादा सुखासी ओपणें । विश्व प्रबोधिलें येणें । गोपाळवेषें ॥ ६ ॥ पुंडली-काचेनि भावें । श्री विठ्ठल येणें नावें । भानुदास ह्मणे देवें । जो-डला आह्मां ॥ ७ ॥

४

शंभुचे हृदयीं लाधली भवानी । गोरक्षाच्या कानीं मछिंद्र सांगे ॥१॥ लाहोनि तें सुख निवाला चौरंगी । सर्वेश्वरालागिं

उपदेशिलें ॥ २ ॥ सर्वेश्वरें गूज दिधलें गैनीनाथा । निवृत्तीच्या हातां सहज आलें ॥ ३ ॥ निवृत्तीच्या साधना मिराशी मुक्ताबाई । योगमुद्रा देहीं साठविली ॥ ४ ॥ मुक्ता विश्वलीला धरिली देहाकृति । तें हे चिन्मयमूर्ती अवतरली ॥ ५ ॥ आदि परंपरा बोध बोधें आला । अनुभवें लाधला भानुदास ॥ ६ ॥

५

सांगती सद्गुरु मूळ ओंकार माया । तूंचि शिष्यराया आदि अंतीं ॥ १ ॥ मूळीचा निर्गुण होतासि निःशंक । उद्भव नाशक तुझा तुला ॥ ५ ॥ एकल्यासी काय न गमे ह्मणोनि । अहंब्रह्म ध्वनी उठविली ॥ ३ ॥ निरालंबी हाक गाजिन्नली जेव्हां । चिन्मयरूपीं तेव्हां साक्षी तूंचि ॥ ४ ॥ उद्भवला ओंकार चिन्मात्रकेसहित । अर्धमात्रेपरते पवन बीज ॥ ५ ॥ माया महतत्व झाले तीन गुण । चहूं देहाची खूण ओळखावी ॥ ६ ॥ अंतःकरणीं झाला तत्वाचा प्रसव । पंचभूतें सर्वरूप झालीं ॥ ७ ॥ पाचीं हे गुण झाले पंचवीस । परी भानुदास वेगळाचि ॥ ८ ॥

६

षड्विकार आणि सप्तचक्रावळी । अष्टभिन्न झाली प्रकृती तें ॥ १ ॥ नव नाडी रचना दश इंद्रियाची । अकराव्या मण्याची गणितुची ॥ २ ॥ विषयीं इंद्रीयें वासना उत्पत्ति । तुजमाजि होती जाती सर्व ॥ ३ ॥ छत्तीस तत्त्वाचा उभारिला पिंड । तैसेंचि ब्रह्मांड ओळखावें ॥ ४ ॥ चिन्मय चिद्रूप आलें आकारासी । भानुदास त्यासि नाम झालें ॥ ५ ॥

१०

॥ पद ॥

आजि विटेवरी नीट विठ्ठल सखा देखियेला गे । भाळीं गंध केशरी टिळक रेखियेला गे ॥ आजि० ॥ ध्रु० ॥ कसीं

कासे पितांबर ठेउनि कर कटेवरी । शंख चक्र पद्म गदा हरी प्रीतिनें धरी । गळांमाजि वैजयंति माळ शोभते वरी । उरीं लाथ मारिली भृगुनें सोसियेली गे ॥ १ ॥ शिवाकार मुगुट मस्तकासि फार शोभतो । कुंडलाचें तेज पाहुनि रवी फार लाजतो । शोभे नासिक कर्ण नेत्र आकर्ण वदन हास्य तो । तुळशी हार फार अंगीं झांकियेला गे ॥ २ ॥ कड-कडुनि भानुदास विठ्ठलासि भेटले । सद्गदीत कंठ भरुनि नेत्रिं अश्रु दाटले । अंतरींचें हेतु तेंचि आजि सर्व फीटलें । प्रेम भाव अबीरावरि झांकियेला गे ॥ ३ ॥

## ॥ गोरा कुंभार ॥

१

निर्गुणाचा संग । जंव धरिला आवडी । तव केला देशधडी । माझीयासी ॥ १ ॥ अनेकत्व नेलें । अनेकत्व नेलें । एकलें सांडिलें । निरंजनीं ॥ २ ॥ एकतत्वें पाहे । तंव अवघेंचि लटकें । आहे तें तितुकें । रूप तुझें ॥ ३ ॥ गोरा कुंभार । ह्मणे नामदेवा । आह्मा तुह्मा नांवा । कैचें कोण ॥ ४ ॥

२

कासया बहुवसी घालिसी मन । तुज येणेंवीण काय काज ॥ १ ॥ एक रूपपणीं एकपणीं एक । एकचि अनेक विस्तारलें ॥ २ ॥ अनेकत्वांतें ह्मणी देसी थारा । न चुकती वेरझारा संसारीच्या ॥ ३ ॥ ह्मणे गोरा कुंभार नाहीं कोणी दुजें । विश्वरूप तुझें नामदेवा ॥ ४ ॥

३

निर्गुणाचे भेटी आला गुण संग । तंव झाला प्रसंग गुणातीत ॥ १ ॥ मज रूप नाहीं नाम सांगों काई । झालों

कांहीं वांहीं बोलूं नये ॥ २ ॥ बोलतां बोलतां जिव्हा पैं खादली । खेचरी लाविली पाहतां पाहतां ॥ ३ ॥ ह्मणे गोरा कुंभार नाम्या तुझे भेटी । सुखासुख गिटी पडली कैशी ॥ ४ ॥

४

स्थूळ होतें तें सूक्ष्म झालें । मन हें मुरालें तया माजी ॥ १ ॥ माझें रूप माझ्या विसावलें डोळां । सामावलें ज्ञान बुबुळामाजी ॥ २ ॥ दृष्टीचें पाहणें परतलें मागुतें । राहिलें निवांतें नेत्रपातें ॥ ३ ॥ ह्मणे गोरा कुंभार नामया जिवलगा । आलिंगन दे गा विसाविया ॥ ४ ॥

५

नाम ऐसें नाम तुझीया स्वरूपा । अवण आलिया कवण ठेवी ॥ १ ॥ तूं शुद्ध चैतन्य निज वस्तु जाण । रहित कारण स्वयंप्रकाश ॥ २ ॥ याही शद्वा मज यावेंचि न लगे । मागुतें तुमगे निर्धारितां ॥ ३ ॥ गोरा कुंभार ह्मणे नामदेवा । चिद्रूप अवघा अससी साच ॥ ४ ॥

६

मुकिया साखर चाखो जे सूदली । बोलविला बोली सांगों नेणे ॥ १ ॥ तेथें कायसा शद्व खुंटला अनुवाद । आपुला आनंद अवघारे ॥ २ ॥ गोरा कुंभार ह्मणे जीवन्मुक्त होणें । जीव हे शहाणे करूं नये ॥ ३ ॥

७

केशवाचे भेटी लागलेंसे पिसें । विसरले कैसे देहभावा ॥ १ ॥ झाली झडपणी झाली झडपणी । संचरलें मनीं आजी रूप ॥ २ ॥ न लिंपेचि कर्म न लिंपेचि धर्म । न लिंपे आश्रमा पुण्य पापा ॥ ३ ॥ ह्मणे गोरा कुंभार सहज जीवन्मुक्त । सुखरूप अद्वैत नामदेवा ॥ ४ ॥

## ॥ शेखमहमद ॥

सेवा संतांची घडावी । तुमची निःसंतान व्हावी ॥ १ ॥
तुमच्या द्वारा लागो काठी । आयागमनीं पडो तुटी ॥ २ ॥
तुमचा सेवा ठाव पुसो । आणि जन्म मरण नसो ॥ ३ ॥
तुमच्या नावें यम रडो । मोक्ष सायुज्यता वडो ॥ ४ ॥ जना-
लागिं आशीर्वादु । देत असे शेख महमदु ॥ ५ ॥

२

टाकम टिका अवघा फिका जननिका भाव नाहीं ॥ १ ॥
चंचळ मनीं बैसला ध्यानीं वासना वाणी करीतसे ॥ २ ॥
डोईस जटा पोटांत खोटा पातकि मोठा वेषधारी ॥ ३ ॥ अंतरि
काळा फिरवितो माळा तया चांडाळा मोक्ष कैंचा ॥ ४ ॥
सोंवळा भाव तोचि झाला देव येरे उपाव दांभिकाचा । शेख
महमदा आनंद सदां लागलासे धंदा सोहंबुद्धि ॥ ५ ॥

३

ऐसा आत्मा जनापाशीं । भ्रम धुळी ती दाही दिशी
॥ १ ॥ करी असतां कंठमाळ । हरपली करी तळमळ ॥ २ ॥
जैसें असतां भ्रतार नारी । रांडावली बोंब मारी ॥ ३ ॥
आठव विसर नाहीं जरा । शेख महमद आत्मा खरा ॥ ४ ॥

४

जगदीशा हृदयामाजी । शीघ्र यावें त्वां वा आजी ॥ १ ॥
किती विनवूं या तुजला । काय अपराध माझा झाला ॥ २ ॥
वाट पाहतां शिणले डोळे । स्तुति करितां बोबडी वळे
॥ ३ ॥ प्रेमें गहिवरें दाटली । गुरु माउली भेटली ॥ ४ ॥
शेख महमद वोसंडले । नाम घोष करूं लागले ॥ ५ ॥

५

गोविंदाचें नाम जीवींचा विश्राम । तुटतील श्रम उच्चारितां ॥ १ ॥ तोडायासि भ्रमण दुःखाच्या यातना । चुकविल्या जाण आह्मासाठीं ॥ २ ॥ नाम हे औषधी हरल्या सर्व व्याधी । आणिक उपाधी लागलिया ॥ ३ ॥ पतिताचा मेळा नामें तरती शीळा । मार्ग हो मोकळा वैकुंठीचा ॥ ४ ॥ रिद्धिसिद्धि मुक्ती नामासि ओळंगिती । तेही नये चित्तीं शेखमहमदा ॥ ५ ॥

## ॥ सुरदास ॥

१

राधे कृष्ण कहो मेरे प्यारे । भजो गोविंद गोपाळ ॥ ॥धृ०॥ कृष्णजीकी लाल आंखिया जैसी खीलि रे गुलाब । शीरपर मुगुट विराजे बन्सी शोभे रे रसाळ ॥ १॥ पितांबर पटकुळ वाळी कंठे मोतनकी माळ । शुभ काने कुंडल झळके तीलक शोभे रे लल्लाट ॥ २ ॥ सुरदास प्रभु तुह्मारे चरणपर बलिहारि हो बलिहारि । मैं तो जनम जनम तेरो दास । तुम पूर्ण कृपाळ ॥ ३ ॥

२

मिलने सुदामजी आये । जाके कहिये समाचार ॥ धृ० ॥ फाटे तुटे कपडे हमारे । मैं तो दुर्बळ तेरो दास ॥ १ ॥ मुष्टी एक तांदुळ लाइये । लाइये बगल छुपाय ॥ २ ॥ हस बोली राणी रुक्मिणी । कोण लगे तुह्मारो भ्रात ॥ ३ ॥ बालपणके मित्र हमारे । भणला एक निशाळ ॥ ४ ॥ सुरदास प्रभुचरण बलिहारी । मैं तो जनम जनम तेरो दास ॥५॥

३

हरीजनकु हरी नाम । बडो धन हरीजनकु हरी नाम ॥ धृ० ॥ बिन रखवाले चोर नही चोरत । सुवत हे सुख-

धाम ॥ १ ॥ दिन दिन होते स्वारी दोहडी । वटत नहीं कछु दाम ॥ २ ॥ सुरदास प्रभु सेवा जाकी । पारसमु क्या काम ॥ ३ ॥

४

कायकु देह धरी । भजनविना कायकु देह धरी ॥ध्रु०॥ गर्भवासमां भक्ति कबुली । बाहार कहाडो श्रीहरी ॥ १ ॥ कोल देइकर बाहार निकलयो । पछे बुद्धी फरी ॥ २ ॥ सुरदास भगवंत भजनविना । जननी ते भारे मरी ॥ ३ ॥

५

केत्ते गये झक मार । भजनविना केत्ते गये झक मार ॥ ध्रु० ॥ प्रभाते उठी न्हावत धोवत । पालत है आचार ॥ १ ॥ दयाधर्मको नाम न जाण्यो । एसो प्रेत चांडाळ ॥ २ ॥ आप डुबे ओरनकु डुबावे । धरी लोभकी आस ॥३॥ माला छापा तिलक बनायो । ठग खायो संसार ॥ ४ ॥ सुरदास प्रभु भगवंत भजनविना । पडे नर्कके द्वार ॥ ५ ॥

६

क्यूं रे निंदभर सोया । मुशाफर क्यूं रे निंदभर सोया ॥ ध्रु० ॥ मनशा देही देवताकु दुर्लभ । जन्म व्यर्थ खोया ॥ १ ॥ धनदाराजोबन सुत तेरो । वामे मन तेरा मोह्या ॥ २ ॥ सुरदास प्रभु चलेही पंथकु । पीछें नैन भरभर रोया ॥ ३ ॥

७

दृढ हीण चरण न केरो । भरुसो दृढ हीण चरण न केरो ॥ ध्रु० ॥ श्रीवल्लभनखचंद्रचकोरि विना । सब जुगमे अंधेरो ॥ १ ॥ साधन ओर नहीं आ कलीमां । हरीनामसे होत निवेडो ॥ २ ॥ सुरदास कहे दो दिन आंधळो । विना मुलको चेरो ॥ ३ ॥

८

कोई मेरे काम न आयो । श्रीहरीविना कोई काम न आयो । आ जुठी मायाके लिने । रतनसे जनम गुमायो ॥ ध्रु० ॥ कंचन कलस चित्रविचित्र । रची रची भूवन बनायो । तामे तत्क्षण ग्रही काढ्यो । एक पलक रहने नही पायो ॥ १ ॥ घरतरीया कहे में संग चलुंगी । धुत धुत धन खायो । अंतसमे छुपी घर भीतर । ठग एक न पोंचायो ॥ २ ॥ सो सुकृतकर एक सुत जायो । तोतही लाड लडायो । काढ लियो कटिको धागो । आगनसु बदन जलायो ॥ ३ ॥ अधम उद्धारण गुणका तारण । सोई प्रभु क्युं ते विसरायो । ना लियो नाम रह्यो मन धोका । सुरदास पस्तायो ॥ ४ ॥

९

केवुं ते वहासे वहाणुं । घेला प्राणी केवुं ते वहासे वहाणुं ॥ ध्रु० ॥ लाडीने लावुं पुत्र परणावुं । कालनी वात न जाणुं ॥ १ ॥ वळिराजा कहे लेउ इंद्रासन । जगत कीवां नवाणुं ॥ २ ॥ काया जुठी ने माया जुठी । जुठु ते घर केरुं नाणुं ॥ ३ ॥ सुरदास कहे तमे हरीने भजी ल्यो । ओचिंतु आवशे आणुं ॥ ४ ॥

१०

काळनो शो रे उधारो । घेला प्राणी काळने शो रे उधारो ॥ ध्रु० ॥ राज मुकी राम वन पधार्या । चौद लोकनो करनारो ॥ १ ॥ आपी उधारे ने वळती विचारे । एवा वेहेता मनने वारो ॥ २ ॥ सो काईआ ते तो सुभट कहेवाया । तेनो साथे थयो संहारो ॥ ३ ॥ सुरदास कहे तमे हरीने भजी ल्यो । नहीं आवे एवो वारो ॥ ४ ॥

११

एसे संतनकी सेवा । कर मन एसे संतनकी सेवा ॥ध्रु०॥ सलिसंतोप सदा उर्जीनको । नाम रामको लेवा ॥ १ ॥

आ न भरोंसो हृदय नहीं जिनको । भजन निरंजन देवा ॥ २ ॥ जीवनमुक्त फरे जगमांही । जब नारदमुनि देवा ॥ ३ ॥ जीनके चरणकमलकु इच्छत । प्राग जमुना रेवा ॥४॥ सुरदास कहे कर उनकी संगत । मिले निरंजन देवा॥५॥

१२

नाथ केसो गजको बंध छुडायो । एही अचरत मोए आयो ॥ ध्रु० ॥ गज ओर ग्राह लडत जलभीतर । लडत लडत गज हार्यो । जब पुर सुंढ रही जलउपर । तब हरी-नाम पोकार्यो ॥ नाथ० ॥ १ ॥ शबरीके बोर सुदामाके तांदुळ । रुचि रुचि भोग लगायो । दुर्योधनको मेवोही त्याग्यो । भाजी विदुरघर पायो ॥ नाथ० ॥ २ ॥ वेठ पाताळ काळिनाग नाथ्यो । फेणपर नरत करायो । गिरि गोवर्धन करपर धर्यो । नंद घेर लाल केहवायो ॥ नाथ०॥३॥ अगासुर मार्यो बकासुर मार्यो । दावानल पान करायो । स्थंभ फोडी हिरणाक्ष मार्यो । नरसंग नाम धरायो ॥ नाथ० ॥ ४ ॥ आजामिल गजगुणका तारी । द्रौपदीको चीर पुरायो । पयपान करतां पुतना मारी । कुब्जाको रुप बनायो ॥ नाथ० ॥ ५ ॥ कौरव पांडवको जुध रचायो । कोरव कुमारको उठायो । दुर्योधनको मान घटायो । मोये भरुसो आयो ॥ नाथ० ॥ ६ ॥ सब सखियन मिलि कंगन बांध्यो । रेशम गांठ बंधायो । छुटे नहीं राधाजीको कंगन । केसे ए धनुष्य उठायो ॥ नाथ ॥ ७ ॥ खोल कोटडी बादल धायो । गरुडकु नाज संतायो । छुटे नहीं राधाजीको कंगण । ए बल कांहारे छुपायो ॥ नाथ० ॥ ८ ॥ जोगी जाको ध्यान धरत है । ध्यान धरत नहीं आयो । सुरदास प्रभु तुम्हारे मिलनकु । जसोदाकी धेनु चरायो ॥ नाथ० ॥ ९ ॥

१३

कोण गनी श्रीजनाथ । अब मोरी कोण गति श्रीजनाथ ॥ धृ० ॥ भजनबिमुख अरु स्मरण नही । फिरत विषया साथ ॥ १ ॥ हुं पतीत अपराधी पूरण । आचरु कर्म विकार ॥ २ ॥ कामक्रोध अरु लोभ चित्रवत । नाथ तुमही त्रिसार ॥ ३ ॥ अब चरण सरण लपटाणो । राखी लो महाराज ॥ ४ ॥ सुरदास प्रभु पतीतपावन । सरणको ब्रीद संभार ॥ ५ ॥

१४

राखो तेसे रहुं । जेंस हरी राखो तेसे रहुं ॥ धृ० ॥ कोई दिन भोजन दोरे कृपा करी । कोई दिन भुख सहू ॥ १ ॥ कोई दिन चडत तुरंग गजभारी । कोई दिन भार बहु ॥ २ ॥ कमलनयन घनश्याम मनोहर । अनुचर भयो मे रहु ॥ ३ ॥ सुरदास प्रभु भक्त कृपानिधि । तमारे चरण सहु ॥ ४ ॥

१५

सुंदर भेख बन्यो गोपाला । सुंदर गाऊं सखा संग शुं ॥ धृ० ॥ सुंदर पंथ हरी अवनी । सुंदर मुरली शब्द रसाळा ॥ १ ॥ सुंदर लोक सकळ ब्रज सुंदर । सुंदर नंद जसोदाके लाला ॥ २ ॥ सुंदर भोजन बचन गती सुंदर । सुंदर हलधर कृष्ण कृपाळ ॥ ३ ॥ सुंदर गोपी चित्रबन सुंदर । गुण माधवके रही विचारा ॥ ४ ॥ सुरदास प्रभु सबबीध सुंदर । सुंदर शाम सुभग अवतारा ॥ ५ ॥

१६

वेर वेर नहीं आवे । अवसर वेर वेर नही आवे ॥ धृ० ॥ जो जाणे तो कर ले भलाई । जन्मोजन्म सुख पावे ॥ १ ॥ धन जोबन अंजलीको पाणी । वणसतां वेर नहीं लागे ॥ २ ॥ तन छुटे धन कोण कामको । कायकु करपीण कहावे ॥ ३ ॥ जाको मन श्रीकृष्णमे लाग्यो । वाकु जुठ न भावे ॥ ४ ॥ सुरदासकी एह विनति । हरखी निरखी गुण गावें ॥ ५ ॥

# ॥ तुलसीदास ॥

हिंदुस्थानी (वृज) भाषेंत ज्यांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत, ते हे तुलसीदास नांवाचे साधु मध्य हिंदुस्थानांतील चित्रकूट पर्वताजवळ शहापूर नामें गांव आहे तेथें जन्मले. हे वाल्मिकाचे अवतार असें म्हणतात. हे कनोजी ब्राम्हण. ह्यांच्या वडिलांचें नांव आत्माराम. ते अकबराचे पदरीं होते. त्यांनीं ह्यांचा व्रतबंध करून ब्रम्हचर्य व्रतानें १२ वर्षे वेदाभ्यास करविला. नंतर ममतादेवी नांवाच्या कुलवान् कन्येशीं लग्न करून दिलें. ममतादेवी मोठी पतिव्रता होती. तशीच त्या उभयतांची एकमेकांवर अत्यंत प्रीति असे. कांहीं काळ गेल्यानंतर तुलसीदासास वैराग्य प्राप्त झालें. आणि ते कोदंडपाणि श्रीरामचंद्र यांचे उपासक झाले.

वैराग्यप्राप्तीचें असें कारण प्रसिद्ध आहे कीं, ममतादेवी कांहीं कार्यांनिमित्त जवळच्याच आपल्या माहेरगांवीं गेली होती. त्या पूर्वीच तुळशीदास हे बादशहाबरोबर स्वारीस गेले होते. ते लौकरच परतले होते. बापाच्या घरचें नैमित्तिक कार्य आटोपून ४।५ दिवसांत ती परत आपल्या घरीं यावयाची, परंतु तितके दिवस सुद्धां तुलसीदासास तिजवांचून चैन पडेना. वियोग दुःसह झाल्यामुळें एक दिवस तुलसीदासाची स्वारी बायकोसाठीं बावरी होऊन रात्रीचीच आपल्या गांवाबाहेर पडली. बायकोचें माहेर जवळ असल्यामुळें ४ कोस मजल मारून ही स्वारी श्वशुरगृहापाशीं येऊन पोंचली. ह्यावेळीं अपरात्र झाली असल्यामुळें श्वशुरगृहाचा दरवाजा बंद झाला; मोठ्यानें हांका माराव्या तरी पंचाईत, लोक हांसतील, तेव्हां आतां काय करावें या पंचाईतींत तो पडला. बायकोच्या

प्रीतिपाशांत बद्ध झाल्यानें त्याचें चित्त ठिकाणावर नव्हतेंच. शेवटीं त्यानें असें योजिलें कीं, आपली बायको माडीवर निजली असेल, आणि माडीची एखादी खिडकी उघडी असेल, तेव्हां तींतून आपला प्रवेश होईल. ही कल्पना मनांत येतांच स्वारी खिडकीकडे गेली तों तेथें खिडकींत एक महाभुजंग लोंबकळत होता, पण हे बेहोष झालेले गडी भुजंगाची गोष्ट मनांत आणतात कशाला? त्यांना वाटलें, आपल्या सारखीच बायकोचीही स्थिति झाली असून तिनें आपल्यासाठीं हा दोरच खिडकींत सोडला आहे. तेव्हां आतां अनमान कां? दोराला धरून वर चढावें ह्मणजे झालें! प्रेम आंधळें कसें असतें हें ह्या उदाहरणांत प्रत्यक्ष पाहून घ्यावें!! तुलसीदास माडीवर गेले, बायकोचीही भेट झाली; ममतादेवीस पतिराजाचें हें साहस पाहून फार आश्चर्य वाटलें. नंतर पतिराज 'मी दोर सोडला होता ह्मणतात' तो कसला दोर हें पहावयास ती खिडकींत आली. तों जिवंत दोर तेथें लटकत होताच. तो पाहून त्याचें नांव आणि भयंकरपणा समजून तिच्या अंतःकरणांत मोठा चरका बसला. आपले पतिराज अपरात्रीचे आपल्या साठीं धांवून आले, हें तिचें आश्चर्य बाजूलाच राहिलें.

तिच्या मनांत कांहीं निराळीच कल्पना आली. तिला वाटलें, प्राणनाथाचा हा अमोलिक प्राण सर्पदंशानें जर निघून गेला असता तर प्राणनाथाची स्वतःची, आणि त्याबरोबर माझीही केवढी हानि झाली असती!! 'आप मुवे पीछे, डूब गई दुनया' ह्या म्हणीची सत्यता भासून तिला फार वाईट वाटलें. नंतर ती तुलसीदासास म्हणाली:—"पतिराज, आपणास तळमळ लागून जसे आपण मजकरतां वेडे झालां, तसे जर श्रीरामचंद्रप्राप्तीची तळमळ लागली असती, आणि

त्यांजकरितां वेडे झालां असतां, तर देहाचें सार्थक तरी झालें असतें."

वाचकहो, महत्कार्य घडतें तेव्हां महत्प्रसंग येत असतात. वरील प्रसंग असाच चमत्कारीक होता, हा घडलेला प्रसंग, तुळशीदासाची चमत्कारिक झालेली चित्तवृत्ती, आणि त्यावर ममतादेवीचा हा वैराग्य दर्शक शब्दाचा मार्मिक उपदेश, ह्या तिहींचा संयोग होतांच तुळशीदासास एकदम कडकडीत वैराग्य उत्पन्न झालें. पत्नीचा उपदेश स्वीकारून त्यांणीं आनंदवनाचा मार्ग स्वीकारला.

ते पूर्वींच वेदशास्त्र पारंगत झालेले, त्यामुळें त्यांणीं ऐहिक मार्ग सोडला तो सोडलाच. श्रीतुकाराममहाराज यांणीं एका अभंगांत 'मनाचा संकल्प' सांगितला आहे, तसला संकल्प त्यांनीं केला. वृक्षांच्या गलित पानांवर निर्वाह करून त्यांनीं अनुष्ठान चालविलें. त्यांना पारमार्थिक तळमळ लागली. ग्रंथांतरीं असें सांगितलें आहे कीं, या प्रमाणें त्यांची १२ वर्षे गेलीं, नंतर हे शौचाहून परत येतांना उरलेलें पाणी ज्या एका ठिकाणीं ओतीत असत, तेथें एक पिशाच्च प्रगट होऊन तें तुळसीदासास प्रसन्न होऊन इच्छित वस्तु मागण्याविषयीं सांगूं लागलें. अनुष्ठानाची सिद्धी झालेली पाहून त्यांनाही बरें वाटलें !! करतात काय, त्यांनीं आपल्या दैवास बोल लाविला. पिशाचानें तुलसीदासानें हें असमाधान पाहून त्यांना इच्छित काय पाहिजे तें पुनः विचारिलें. तुलसीदासांनीं रामचंद्राचें दर्शन पाहिजें म्हणून सांगितलें. पिशाच्यानें मारुतीची खूण सांगून त्याजकडून प्रभूचें दर्शन घडेल असें सांगितलें. तुलसीदास रामायण वाचीत असतां वृद्ध ब्राम्हणाच्या वेषानें नित्य येणारा जो तोच मारु-

ती असें समजलें. मारुतीकडून तुलसीदासास श्रीरामचंद्राचें सगुण दर्शन झालें.

नंतर ते वाराणसीस येऊन राहिले. त्यांनीं हरिकीर्तन करून पुष्कळ लोकांस भक्तीस लाविलें. गोकुळ वृंदावन, मथुरा इत्यादि नामांकित स्थानें पाहून प्रभुसेवेंत त्यांनीं आपलें आयुष्य घालविलें. पुष्कळ संतांच्या भेटी घेतल्या, पुष्कळ अमानुष चमत्कार केले, आणि भगवल्लीला वर्णन करून प्राकृत जनांच्या उद्धारासाठीं कीर्तिरूपानें आणि स्वस्वरूपानें आपल्या पाठीमागें ग्रंथ ठेऊन, आपण निजधामास चालते झाले. एके ठिकाणीं त्यांनीं असें म्हटलें आहेः—

" संवत् सोलहसय अशी, गंगाजीके तीर
सावण शुक्ल सप्तमी, तुलसी त्यजो शरीर "

संवत् १६०१ म्हणजे शके १४६६ मध्यें यांणीं रामायण ग्रंथ लिहिला असें एका पुस्तकांत लिहिलें आहे, परंतु तें बरोबर दिसत नाहीं. कारण तुलसीदासच संवत १६८० त देह सोडला असें म्हणतात. म्हणजे ही ७९ वर्षें झालीं. मौंजीबंधनापर्यंत सुमारें ७।८ वर्षें, आणि त्यानंतर १२ वर्षें वेदाध्ययन, म्हणजे लग्नापूर्वीं त्यांचीं २० वर्षें गेलीं. नंतर ते संसारांत पडले, त्यांत त्यांचीं ८।१० वर्षें गेलीं असलीं पाहिजेत, शिवाय उपरती झाल्यानंतर १२ वर्षें अनुष्ठानांत आणखी गेलीं. बरें हीं बारावर्षें सोडिलीं तरी बाकीच्या वर्षांचीं बेरीज १००च्या वर होऊन जाते. रामायण पुस्तकांत ह्यांचा जन्म संवत् १५८३ त सांगितला आहे. तेव्हां ९७ वें वर्षीं ह्यांनीं देह ठेवला असें दिसतें. यावरून १८ व्या वर्षीं यांनीं रामायण रचिलें हें संभवनीय नाहीं. अकबराचा मरण काल शके १५२७ आणि तुळशी-

दासाचा शके १५४५. तेव्हां हे समकालीन होते असें मानतां येईल.

यांनीं रामायणाखेरीज तुलसी विनय पत्रिका, तुलसी सतसंई, रामगुणावली, गीतावली इत्यादि ग्रंथ लिहिले आहेत.

## ॥ तुलसीदासकृत पदें ॥

१

मेरे मन बस गयो सिताराम । सिताराम सिताराम सिताराम । मेरे मन० ॥ धृ०॥ रतन सिंवासन रघुवर पर बेठे । चमर ढळावे हनुमान ॥ १ ॥ तुम मत विसर जावोजी मेरे मनसे । तुमबीन निकसी जावोजी मेरे प्राण ॥ २ ॥ सिता रामलछमण भरथशत्रुघ्न । केरा सहस्र मुख लेतही नाम ॥ ३ ॥ तुलसीदास भज दशरथनंदन । चोसष्ट घडी आठु जाम ॥ ४ ॥

२

होलो होली[१] कहेछे रे, प्रभुजी मारे वारे चढो । बच्चा मारा मरे रे, तळे आवी भील खड्यो ॥ धृ० ॥ बाण ताणीने उभो पारधी, ने उपर आव्यो बाज[२] । पोलाणमांथी सर्प जो नीसरे, तो वणसे मारा काज । गरुडना गामी रे, आंटी राखी रखे रहो ॥ १ ॥ केहेता मांडा परवरीयाने, सर्पमां निवारण । पारधीने तो पगे डसीयो, तत्क्षण लीधां एना प्राण । त्यांथी बाण छुटो रे, बाज आवी हेठे पड्यो रे ॥ २ ॥ कठण वेळामां काम न आवे जो, भजन करो तो भे[३] जाय । एवा समर्थ स्वामिने मुकीने, कोना पुजू पाय । गुन्हेगार तारो रे, तुलसीदास खरो रे ॥ ३ ॥

---

१ कबुतर-नर मादी. २ महिरीससाणा. ३ भेग-फट.

३

लांबी सोडे सुतो रे, सुखनी ते शय्या करी । कदीए नव बोल्यो रे, मुखथी तूं हरी हरी ॥ ध्रु० ॥ आ छे रे तारुं ने आ छे रे मारुं, तेमां बंधाणुं तारुं चित्त । अलबेलीनो[1] संग न मुक्यो ते विना तूं आधळो भीत । ठेरीने ठेकाणे रे, बेठो[2] नहीं एक घडी ॥ १ ॥ सीर उपर तो काळ भमे छे, जेम तेतर[3] पर बाज । कहीए खरा पण कह्युं न माने, करे ममत ने काज । जे जेम ते तेमज रे, मुकीने तारे जाउं मरी ॥२॥ उंची मेडी ने बाग बगीचा, नवी नवी जातना रंग । ते घेर बेठा काग ककळसे, कोईए नहीं आवे तारे संग । तुलसी तो कहेछे रे, लखचौर्‍यासी फेरी ॥ ३ ॥

४

सिताराम उपासी । आये मोरे सिताराम उपासी ॥धृ०॥ भाल तिलक तुलसीकी माला । अवधपुरके रहिवासी ॥ १॥ तीर्थ व्रत सब कर आयो । कोटी गंगा ने कोटी काशी॥२॥ चरण धोई चरणामृत लीधो । सीतल हो गइ छाती ॥ ३ ॥ रघुबर छोड ओरनकूं भजे । सो नर जमपुरवासी ॥ ४ ॥ तुलसीदास रघुबरके शरणे । मीट गई लक्षचौर्‍यासी ॥५॥

५

शरण तीयारे में आयो । कुटुंब तजी शरण तीयारे में आयो ॥ धृ० ॥ छांडी हेरी लंका कनक केरे मंदिर । हरी चरण चित्त लायो ॥ १ ॥ जब मोये रावण मार्यो लंकाको । तब मेरो मान बडायो ॥ २ ॥ जन्ममरणको बंधन छुटो । रामदर्शन पायो ॥ ३ ॥ ओ रघुनाथ अनाथके नाथ । तम मोए कंठ लगायो ॥ ४ ॥ तुलसीदास प्रभु तमारी कृपासे । राज बिभिषण आयो ॥ ५ ॥

---

१ सुंदर स्त्री. २ स्वस्थपणें. ३ तितीरपक्षी.

६

भजी ले तूं श्रीराम । अब तारो दावे बन्यो ॥ ध्रु० ॥ तेरी काया कछु काम नही आवे । माता पिता धन धान ॥ १ ॥ ओचितो तेरो काळ आवेगो । अब तेरो कोण जमान ॥ २ ॥ भील पारधी आजामिळ उधार्यो । एसोई समर्थ नाम ॥ ३ ॥ तुलसीदास आस रघुबरकी । सबको पुरण नाम ॥ ४ ॥

७

नहीं बन जोग सखी, दोनूं बालक । नहीं बन जोग ॥ ॥ ध्रु० ॥ एक श्याम दुजा गौर रुप है । नैन भरे त्रिलोक ॥ १ ॥ रामलछमण सिता वनकु सधावे । देखत नगरके लोक ॥२॥ उनकी मातपिता केसे जीवे केसे जीवे अवधके लोक ॥ ३ ॥ कंदमुळ लछमण लेई आवत । वाके लगावत भोग ॥ ४ ॥ तुलसीदास रघुनंदके चरणे । भावीरे लखगई महाबन विजोग ॥ ५ ॥

८

भजनको परिमान । एसो हरीभजनको परिमान ॥ १ ॥ चलत तारा ने चलंत मंडळ । चलत रवी शशी भाण ॥ २॥ दास ध्रुवकु अविचळ पदवी । रामके दिवान ॥ ३ ॥ रावणके दश शीर छेदे । कर ग्रहे सारंगपाण ॥ ४ ॥ बिभिषणकु लंका दीनी । भक्त प्रीतिको जाण ॥ ५ ॥ निगम जाकी साख पुरे । सुनो संत सुखन ॥ ६ ॥ दास तुलसी शरण आए । राखीए लाज भगवान ॥ ७ ॥

९

बानानी पत राख, प्रभु तारा बानानी पत राख । बाना[1]रे माटे जो दुःख देशो तो, कोण जपे तारो जाप ॥ ध्रु० ॥

---

१ पाळी.

रोहीदासनी तमे पातरी लीधी ने, नव जोई जात के भात । सेनाने माटे राजा सन्मुख तमे, नापिक कहेवाया हो नाथ॥१॥ प्रल्हादनी तमे प्रतिपालन पाळीने, स्थंभमां पुर्यो वास । तप्त कढा तमे सीतल कीधी, सुधन्वाने पास ॥ २ ॥ पांचाळीने पटकुळ पुराव्या, राखी सभामां लाज । सरोवरमांथी बुडतो बचाव्यो, राम केहेता गजराज ॥ ३ ॥ झेर हतुं तेना अमृत कीधां ने, आल्या मिरांने हाथ । मेहेताने मंडलीक मारवा आ· व्यो त्यारे, केदारो आव्यो मधरात ॥ ४ ॥ भक्तोनां नेम संकट भाग्या त्यारे, दृढ आव्यो विश्वास । तुलसीना स्वामीने कहुं कर जोडीने, पुरो अंतरनी आस ॥ ५ ॥

## ॥ दोहरे ॥

तुलसी मनशा देह धरी । न जप्या श्रीजगदीश ।
जननी नार ववेरंतां[३] । कां काप्यो नहीं सीस ॥१॥

गर्भ ना गळ्यो तारो दुर्मती । वांझ न रही तेरी मात ।
ज्या घर कथाकीर्तन नहीं । तां घर बडो उत्पात ॥२॥

सब सोनेका नगर बन्यो । पारसमणिकी पोळ[४] ।
तुलसी हरीकी भक्तिविना । जमडा करे घमरोळ[५] ॥३॥

ढोर वडतां मनीष्य घड्यो । भुल्यो शिंग ने पुंछ ।
तुलसी हरीके भजनविना । धिःक दाढी धिःक मुछ ॥४॥

पारसमणिके संगथी । कंचन गई तरवार ।
तुलसी उनमें तीन रहे । धार भार आकार ॥ ५ ॥

सब नदीओ गंगा वहे । सब पथ्थर सालीग्राम ।
सब वनस्पती हे तुलसी । जाके हृदय राम ॥ ६ ॥

---

१ पूजा-( पत्री ) २ श्रीकृष्ण-( केदारनाथ ) ३ प्रसूती समयास. ४ ( शहराचे विभागापैकी ) एक मोहल्ला. ५ उत्पात.

# ॥ विठा. ॥

१

आई ओळली ओळशी । प्रेमपान्हा पान्हवली ॥ १ ॥ चौवेजण दोहणार । आझुनि न फुटेचि धार ॥ २ ॥ साही लागले कासेसीं । अठरा नित्य निदिध्यासी ॥ ३ ॥ ब्रह्मादिकां न मिळे वांटा । बोले नामयाचा विठा ॥ ४ ॥

२

आम्ही लहान पोरें परि भय नाहीं तुझें । ठेवणें दे माझें केशवराजा ॥ १ ॥ आम्ही रंकदीन हीनाहुनि हीन । दे माझें ठेवणें नामप्रेम ॥ २ ॥ तुझ्या दारवंटे बैसलों मी आतां । कोण सोडवितां तुजवीण मज ॥ ३ ॥ माझीया बापाचा पराक्रम थोर । मी त्याचा कुमार म्हणे विठा ॥ ४ ॥

३

जन्मोजन्मीं देवा अर्चिलासी आम्ही । तरी वैष्णवधर्मीं जन्मु आम्हां ॥ १ ॥ जन्मकर्म जाणों तूंचि जाणों एक । तुजवीण त्रैलोक्य न्यून आम्हां ॥ २ ॥ देई देवा भक्ती प्रेमजीवन आम्हां । जेथें निरंतर नामा सेवासुख ॥ ३ ॥ तीर्थ व्रत दैवत तूंचि बा केशवा । आवडती जीवा आमुच्या हरी ॥ ४ ॥ न घे मी हे सिद्धि न मागे कामना । प्रेम नारायणा देई आम्हां ॥ ५ ॥ विठा झाला मौन्य जपतुसे हरी । बाहेरी अंतरीं व्यापक विठ्ठल ॥ ६ ॥

४

धरुनि देवाची हनवटी । मेळविली दृष्टादृष्टी ॥ १ ॥ म्हणे तुज ऐसाचि पाहीन । ध्यानीं धरुनि राहीन ॥ २ ॥ जैशा कमळणी दिनकरा । चातक पावसाच्या धारा ॥ ३ ॥ बाळक जननीसी भावी । चकोर चंद्रासी आठवी ॥ ४ ॥ कृपणें ठेविलेंसे धन । तेथून न निवे त्याचें मन ॥ ५ ॥ विठा म्हणे अनुसंधान । असतां माझें काय उणें ॥ ६ ॥

५

नामा तुझ्या विश्वासा भाळला । आम्हां निरवोनि गेला तुझे हातीं ॥ १ ॥ आपुलें कां न म्हणसी लोभें कां न पाहसी । आमुचें कां न देसी नामप्रेम ॥ २ ॥ माझिये बापासी अगत्य हे जोडी । ठेविली कल्पकोडी तुझे चरणीं ॥ ३ ॥ तोचि ठेवा आम्हां उमगला मोठा । तो देगा म्हणे विठा नामयाचा ॥ ४ ॥

६

माझा बाप आंगलग तुझा । तूं तंव होसी आमचा आजा ॥ १ ॥ कैसें आम्हा धरिले दुरी । सांग कृपाळुवा हरी ॥ २ ॥ काय शिण्गांतर लोटली । कैसी लाघवळी तुटली ॥ ३ ॥ आम्ही तुझी सरती पिढी । संत जाणतात प्रौढी ॥ ४ ॥ तूं आमुचा मूळपुरुष । आम्ही अवघे तुझे वंश ॥ ५ ॥ हांसोनि बोले केशीराज । विठ्या अवघेंचि वेरै मज ॥ ६ ॥

७

माझा मी पूर्णता गुरुनामीं संपन्न । निवृत्ति निधान पूर्ण गंगा ॥ १ ॥ अमृताचा पाट वाहे इंद्रायणी । नित्यरया प्रवणीं हरिच्या दासा ॥ २ ॥ ज्ञानदेव निधी पूर्ण माझें धन । मुक्ताईनें खूण सांगितली ॥ ३ ॥ सोपान वागडा सर्वे सवंगडा । नित्य तो पवाडा विठोबाचा ॥ ४ ॥

८

वडिलांचा स्वामी म्हणोनि राखिलें तुज । आतां देवा मज बोल नाहीं ॥ १ ॥ माझें घेउनी मज चाळविसी । दे गा हृषीकेशी उभा राहे ॥ २ ॥ आमुचे वडिलीं सायास पैं केला । तो ठेवा दिधला तुजपाशीं ॥ ३ ॥ जोंवरि भीड आहे तोंवरि दे गा आमुचें । माझिये बापाचें म्हणे विठा ॥ ४ ॥

९

सांडूनि पंढरी वारी । मोक्ष मागे तो भिकारी ॥ १ ॥ आम्ही पंढरीचे लाटे । न जाऊं वैकुंठाचे वाटे ॥ २ ॥ ताट ओगरिलें निकें । सांडून कोण जाय भिके ॥ ३ ॥ म्हणे नामयाचा विठा । मोक्ष मागे तो करंटा ॥ ४ ॥

# ॥ गोणाई ॥

१

अगा विठोबा तूं पाहे मजकडे । कांगा केलें वेडें बाळ माझें ॥१॥ तुवां काय दिधलें तुझें काय खादलें । भलें दाखविलें देवपण ॥२॥ आम्ही म्हणतों कीं तूं कृपाळू आहेसी । आतां कळलासी पांडुरंगा ॥३॥ तूं तंव कैसा या लौकिका वेगळा । तुझा साधिते गळा परी या संता भ्यावें ॥४॥ तुझी अनुभव स्थिति मज आहे ठाउकीय । म्यां बोलोन काय हळुवट व्हावें ॥५॥ देवपण आपुलें भोगूंचि जाणावें । भक्तां सुख द्यावें हेळामात्र ॥६॥ देव होउनिया अपेश कां घ्यावें । माझें कां विघडावें एक बाळ ॥७॥ वरघेण्या त्वां वैस पैं न म्हणे । जडसी जीवप्राणें सात्विकभावें ॥ ८ ॥ झणीं तूं करिशी आपुला बोभाट । मग होईल वाट लोकाचारी ॥ ९ ॥ थोरपणें नामा करिशी आपुला अध्याह्म । गोणाबाई म्हणे धरिन चरण तुझे ॥ १० ॥

२

आपणीया वेगळे कैसे निवडसी । कां रे दवडीसी सांग मज ॥ १ ॥ बरवा पुत्रपणें झालामी उत्तीर्ण । आतां अभिमान पाहे माझा ॥ २ ॥ तुज नेल्याविण नव जाय येथुनी । पंढरी गिळीन विठ्ठलेसी ॥ ३ ॥ झालासी शहाणा तरि माझेचि लेंकरूं । मज आहे व्यवहारू विठ्ठलेसी ॥४॥ हा दानवांतें छळी आपणातें म्हणे निवळी । ते मजजवळी न चाले कांहीं ॥५॥ देहाचा संकल्प आलें मी करुनी । घातलें-से पाणी संसारासी ॥६॥ हा त्रिभुवनी समर्थ असे मी जाणत । आजि मी पुरुषार्थ पाहिन याचा ॥७॥ विटेसहित चरण बांधीन मी गळा । क्षण जिवावेगळा करीना यासी ॥८॥ आ-

सनीं शयनीं न विसंबे भोजनीं । घालीन मुरडूनी हृदयामाजीं ॥९॥ अठ्ठावीस युगें झालीं तया वोला । हा धरुनी उभा केला पुंडलीकें ॥१०॥ गोणाबाई म्हणे विठोबा कैसा ताना । बांया-परधना धरिसी लोभ ॥ ११ ॥

३

उपजोनि दुर्लभू नाम्या झालासि ये जन्मीं । सांडिलासि कर्मी दुराचार ॥ १ ॥ ऐसें नको नाम्या करूं तूं आम्हांतें । नेईरे सांगातें हरीपाशीं ॥ २ ॥ कीर्तन पसारा प्रेमेवीण नाचती । तयाची संगती नको नाम्या ॥ ३ ॥ दुर्लभ हा देव योगीया-सिद्धांसी । वेगीं त्या आम्हासी भेटि करी ॥ ४ ॥ सोपा रे सुलभ ध्यानीं जे भाविसी । ते आणि आम्हांसी ऐक्य करी ॥ ५ ॥ संसार व्यर्थ त्रिगुणाच्या गांठी । सोडुनि उफराटी माळ घाली ॥ ६ ॥ नामा म्हणे माते एकतत्वीं सोय । तेंव हरी आहे जवळीच ॥ ७ ॥ गोणाई म्हणे नाम्या या परी विरळा । तेथेंचि गोपाळा वसणें सत्य ॥ ८ ॥

४

ऐके नाम्या गोष्टी यापरी रे याची । परतोनि रे आमची सोय धरी । आम्ही तंव येथें तूं तंव तेथें । कैसेनि मोहातें तरूं सांग ॥२॥ गोविंद नामें सांगडी तुवां बांधली रे पाठीं । आम्ही अवघीं शेवटीं राहिलों येथें ॥ ३ ॥ माझें मन तुज भावित रे आवडी । नवमास कडोविकडीं खेळविलें ॥ ४ ॥ आठवीरे नाम्या सुखदु:खें आमचीं । तोडी ये जन्मीची विषय दोरी ॥ ५ ॥ न दिससीरे आम्हां नव्हेसी कुळीचा । उपजुनि कुळाचा करी उद्धारूं ॥ ६ ॥ पंढरी पुण्यभूत प्रत्यक्ष भूवैकुंठ । नाम्या दावी कांरे वाट वैकुंठीची ॥ ७ ॥ न सोडीरे आम्हा पडोनि नाना योनी । तूं तंव ये जन्मीं अछिद्र असती ॥ ८ ॥ नामा म्हणे माते न बोले सर्वथा ।

मी तंव कुळ-गोता न विसंवे ॥ ९ ॥ गोणाई म्हणे नाम्या होंचि करी खरें । तरी दैवत दुसरें नाहीं आम्हां ॥ १० ॥

५

गोणाई म्हणे नाम्या सांडीं देवपिसें । बळें घर कैसें बुडवितोसि ॥ १ ॥ सवत्याचि लेंकुरें वर्ततातिे कैशीं । तूं जन्मलासी कुलक्षण ॥ २ ॥ धनधान्य पुत्र कलत्र नांदती । तुज अभाग्याचे चित्तीं पांडुरंग ॥ ३ ॥ शिवण्या टुपण्या घातलेसें पाणी । न पाहसी परतोनि वराकडे ॥ ४ ॥ कैशी तुझी भक्ती या लौकिका वेगळी । संसाराची होळी केली नाम्या ॥५॥ याची तुवां कैसी धरियेली कास । हा तंव कोणास झाला नाहीं ॥ ६ ॥ याचे जे ऐकती त्यांचे नुरे कांहीं । हा देव पाहीं वरवेणा ॥ ७ ॥ गोकुळीं करी चोरी आपुलें पोट भरी । तो तुज निर्धारीं देईल काय ॥ ८ ॥ गोणाई म्हणे अरे हें नव्हे भलें । वर तुंवा बुडविलें कुळासहित ॥ ९ ॥

६

गोणाई म्हणे रे विठ्ठला । माझा नामा वेडा केला ॥ १ ॥ नारद वैष्णव जगजेठी । त्यासि लाविली लंगोटी ॥ २ ॥ हरी कोणाचें बरें केलें । आम्हां पुरतें कळून आलें ॥ ३ ॥ भीष्म वैष्णवाचा राव । त्याचे सैन्याचा पुसिला ठाव ॥ ४ ॥ रुक्मांगद तुझा दास । त्याचा गांवच केला ओस ॥ ५ ॥ ताम्रध्वज राजा भला । त्यासि करवतीं वातला ॥ ६ ॥ अंजनी बाळ भक्त निकट । त्याशी केलें त्वां मर्कट ॥ ७ ॥ ध्रुव बाळ कोडिसवाणें । त्याचें खुंटविलें येणें जाणें ॥ ८ ॥ उपमन्यु प्रेमभक्ति करित । त्यासि ठेविलें सागरांत ॥ ९ ॥ बळिराज संध्यावळी । त्यासि घातलें पाताळीं ॥ १० ॥ व्यास वाल्मीक कवी गाढे । त्यासि फिरविसी वाडे कोडें ॥ ११ ॥ हरिश्चंद्र तारा राणी । वाहे डोंबा घरीं पाणी ॥१२ ॥ पाहे पां

राजा श्रियाळ । त्याचें मारियलें बाळ ॥ १३ ॥ भक्तासि न कळे तुझा पार । हिंडविसी दारोदार ॥ १४ ॥ गोणाई म्हणे विठोबाला । काय उतराई होऊं तुला ॥ १५ ॥

७

दीनाचा कैवारी ब्रीद ज्याचें गाजे । त्या केशवराजें करिजे कृपा ॥ १ ॥ तरीच नाम्या सोय घडे याची जाण । एरवीं अज्ञान समस्त जीव ॥ २ ॥ जाणीव शहाणीव यापुढें न चले । दुर्लभ पाउलें योगीयासी ॥ ३ ॥ तल्लीन तटस्थ ध्यानीं रमले सिद्ध । तेव्हां ते प्रसिद्ध तेचि झाले ॥ ४ ॥ विष्णुमय जग ज्यासि कळला भाव । तेथेंचि हा देव तिष्ठतसे ॥ ५ ॥ यापरी पुंडलीकें आणियेला येथें । तेंची वेळोवेळां तूंतें पुसतसे ॥ ६ ॥ नामा म्हणे परतलीये दृष्टि पाहे । उमजुनी राहे दुर्वासना ॥ ७ ॥ गोणाई म्हणे नाम्या मावळली वासना । एकरूप नारायणा देखेन दृष्टी ॥ ८ ॥

८

निर्गुणपणाचा अभिमान सांडिला । निगम लाजविला नारायणा ॥ १ ॥ कपट करुनी भक्तांसी तारूं पाहसी । तंव तुझाचि ठकलासी पांडुरंगा ॥ २ ॥ शहाण्यासी तर घडे चिलवणी । तैसें चक्रपाणि आले देखा ॥ ३ ॥ ठकवुनी पुंडलीकासी न्यावें वैकुंठासी । या बुद्धी आलासी पंढरीये ॥ ४ ॥ तंव तेणें भक्तराजा धरियेलें चित्त । परतोनि मागुते जाऊं नेदी ॥ ५ ॥ अठ्ठावीस युगें झालीं विचारितां । निगम सर्वथा होऊं नेदी ॥ ६ ॥ कटीं ठेउनी कर लाज धरुनी धीर । उभा निरंतर राहिलासी ॥ ७ ॥ सर्व हिरोनि म्हणसि म्यां बळीसि बांधिलें । तरी विचारी साधिलें कवणें कवणा ॥ ८ ॥ ऐसें मंथिलें कारिशी आपण यातें गोंविसी । बोल कां ठेविसी नामयासी ॥ ९ ॥ गोणाबाई म्हणे माझें न कळे विंदान । देई कृपादान बाळ माझें ॥ १० ॥

९

परियेसीरे नाम्या वचन माझें एक । पोटींचें बाळक म्हणोनि सांगे ॥ १ ॥ महिमाचा संसार टाकिला आपुला । संग कांरे केला निःसंगाचा ॥ २ ॥ खाया काय मागसी हा काय देईल । संगेंचि नेईल वैकुंठासी ॥ ३ ॥ आणिक रिद्धि-सिद्धि जयाच्या कामारी । कल्पतरू चारी कामधेनु ॥ ४॥ तेही टाकोनीयां बळिच्या वरा गेला । धरूनि बांधिला दारवंटा ॥ ५ ॥ रुक्मिणी सारिखी सुंदरा टाकोनि । ताटका गौळणी गोकुळींच्या ॥६॥ कुबडी कुब्जा कैसी कंसा घरची दासी । जिवें प्राणें तिसी माळलासे ॥७॥ याला भजे त्याचा संसार नासी । जडला प्राणासी दुरी नोहे ॥ ८ ॥ गोणाई म्हणे नव्हे रे हें भलें। वर बुडविलें कुळासहित ॥ ९ ॥

१०

प्रथम अवतारीं मर्दियलें शंखा । अवलीळा लोका वेधीं लावियेलें ॥ १ ॥ तैसें नको नाम्या आचरूं ये जनीं । नको ये कीर्तनीं उभा राहूं ॥ २ ॥ दुसरे अवतारी कूर्म रूप कमठें । भक्त वैकुंठ वाटे ऐसेचि नेलें ॥ ३ ॥ तीसरे अवतारी केली बा करणी । दाढेवरी धरणी धरियेली ॥ ४ ॥ चवथे अवतारीं भक्तां लावियलें पीसें । प्रल्हादासी कैसें वेडें केलें ॥ ५ ॥ पांचवे अवतारीं रूप याचें अद्भुत । बळी भावें भजत तळीं घाली ॥ ६ ॥ सहावे अवतारीं फरश हातीं धरुनी। अवघी हे मेदिनी शोणित केली ॥ ७ ॥ म्हणती सातवा आत्मारामु जीवा । तो तंव सदाशिवा आवडे आधीं ॥ ८ ॥ आठवें रूपडें गोकुळिं जन्मलें । येणें समूळ खादलें कुळ अविनाश ॥ ९ ॥ बौद्ध रूप म्हणती न बोले कोणासीं । कर्मठ मंत्रासी चळले तेथें ॥ १० ॥ कलंकी-रूप हरी दहावा अवतार । तो येउनी संहार करिल अंतीं ॥ ११ ॥ उरों नेदी कांहीं नको उभा राहूं । वांया विठ्ठल ठाऊ टाकी नाम्या ॥ १२ ॥ नामा

म्हणे माते यापरि ते झाले । म्हणोनि येथें आले केशवराज ॥ १३ ॥ गोणाई म्हणे नाम्या प्रथम विचार ऐसा । तारी हरिदासा पंढरीसी ॥ १४ ॥

११

राही रखमाबाई सत्यभामा माता । शिकवावे कांता भक्तापरी ॥ १ ॥ संत सनकादीक साक्षी हे सकळ । येणें माझा बाळ चाळवीला ॥ २ ॥ हा काय आमुचा धनी कां गोसावी । नाहीं ते शिकवी लेंकुरासी ॥ ३ ॥ झाला देव तरी पडूं याच्या पायां । मी दावा केलिया भलें नव्हे ॥ ४ ॥ भीड तुटी या नेईन चौबाचारीं । होईल सम सरी याची माझी॥५॥ देव काय नसे आम्ही आयकिले। परि नाहीं देखिलें ऐसें कोठें ॥६॥ दर्शनेंचि जेथें जित्यासिही हानी । नाठवे परतोनि वरदार ॥ ७ ॥ जन्म मरणा यावें या देवाच्या भेटी । मावळली। दृष्टी संसाराची ॥८॥ कैंची हो पंढरी मी हो काय जाणे । याच्या पुत्रपणें देखियेली॥९॥तुम्ही अवघ्या जणी जिवीच्या संगातिणी । पुसा याचें मनीं काय आहे ॥ १० ॥ देऊनीयां नामा मज लावा वाटे ।गोणाई म्हणे वोखटें नकरी बापा॥ ११॥

१२

विश्वजन मोहना कमळनयना । काय देवपणा मिरविसी ॥ १ ॥ दर्शना आलियाच्या हृदयीं संचरसी । देहभाव घेसी हिरोनिया ॥ २ ॥ या विश्वावेगळें नवल तुझें करणें । सांगावें गाऱ्हाणें कोणापाशीं ॥ ३ ॥ नामा संत लावी संताचीया पाईं । विनवी गोणाई केशवराजा ॥ ४ ॥

१३

सोय सांडिली घराची । जोडी केली विठ्ठलाची ॥ १ ॥ मायबापासि टाकिलें । ध्यान देवाचें लागलें ॥ २ ॥ स्त्रीपुत्र बहिणी । केली सर्वांची सांडणी ॥३॥ गण गोत्र इष्ट मित्र । सर्व जोडिले विठ्ठलमात्र ॥ ४ ॥ गोणाई म्हणे नामा । भली केली बारे सीमा ॥ ५ ॥

# ॥ राजाई ॥

१

घरधन्यानें केला गुरू । बाई आतां मी काय करूं । असून नाहीं संसारू । चमत्कारू कृपेचा ॥१॥ धांव पाव गे मेसाई । येथें कवणाचें न चले कांहीं । सत्यपण तुझिये ठायीं । तरि तूं नाहींसें करी गे ॥ २ ॥ अनुग्रह घेतला कैसा । घरीं संताचा ओळसा । ओस पडो हरिच्या दासा । गेले ते न येती मागुती ॥ ३ ॥ काय सांगूं यांची रीती । सोसें पायवणी पीती । अवघे भांबरभुतें होती । नाचताती आनंदें॥४॥ लौकिकांत गेले वांया । एकमेकांच्या पडती पायां । म्हणती ये गा पंढरीराया । ब्रम्हानंदें डुल्लती ॥ ५ ॥ भोळी सासू गोणाबाई । पांढरा स्फटीक व्याली पाहीं । येणें जोडिला शेषशाई । म्हणे राजाई काय करूं ॥ ६ ॥

२

जोडुनि दोन्ही कर माथा ठेविला चरणीं । म्हणे परिसावी विनवणी स्वामी राया ॥ १ ॥ मी तंव अज्ञान नकळे तुमचा महिमा । अपराध क्षमा करणें मज ॥ २ ॥ अंतरींची खूण सांगा मज कांहीं । जे तुम्ही हृदयीं ध्यात असा ॥३॥ जे सुख तुमचे चित्तीं निरंतर । आनंदें निर्भर सदां असे ॥ ४ ॥ इच्छा तृष्णा देहीं मावळली कल्पना । सदा समाधाना इंद्रियासी ॥ ५ ॥ मायबापें मज दिधलें तुमचे हातीं । जन्मोनि सांगाती लावियेलें ॥ ६ ॥ देव द्विज गुरु साक्षी हे करुनि । तुमच्या चरणीं मज जोडियेली ॥७॥ तुमची चित्तवृत्ति उदास देखोनि । पडिलें चित्त वनीं काय करूं ॥ ८ ॥ मग तो तुमचा स्वामी कृपेचा कोंवळा । न धरीत पातला आर्तभूत ॥ ९ ॥ तंव ते कृपाळु गे भक्तजन करुणाकरें । पुसिली आदरें गोष्टी तुमची ॥ १० ॥ म्यां दुराचरणीनें नि-

भेरितलें तुम्हां । ऐकुनि मेघःश्यामा करुणा आली ॥ ११ ॥ मग तो जगज्जीवन बोले अमृत वचनीं । लोटुनि त्यागुनि दारवंटा ॥ १२ ॥ म्हणे हें द्रव्य वेंचावें सर्वही । मागावें आणिक कांहीं लागेल तितुकें ॥ १३ ॥ सद्गदीत कंठें क्षेम सांगितलें तुम्हां । परि नकळे महिमा देवावीण ॥ १४ ॥ कृपेचा वेषु कोणीये जन्मीचा । न कळे त्याचा तुमचा ऋणानुबंध ॥ १५ ॥ त्याचे पाहतां श्रीमुख निवाले माझें चित्त । मग हे मनोरथ विसरले ॥ १६ ॥ क्षण एक आनंद झाला माझ्या जीवा । उपमा सुखा तया काय द्यावी ॥ १७ ॥ आतां ये संसारी धन्य धन्य जगीं । ते तुमचे अर्धांगीं विनटली ॥ १८ ॥ परी ये वेळे मज घाला विठोबाचे पाईं । विनविते राजाई नामदेवा ॥ १९ ॥

३

दोन प्रहर रात्र पाहोनि एकांत । राजाई वृत्तांत सांगे माते ॥ १ ॥ अहो रखमाबाई विठोबासी सांगा । भ्रतारासी कां गा वेडें केलें ॥ २ ॥ वस्त्र पात्र नाहीं खाया जेवायासी । नाचे अहर्निशीं निर्लज्जसा ॥ ३ ॥ चवदा मनुष्यें आहेत माझे घरीं । हिंडती दारोदारीं अन्नासाठीं ॥ ४ ॥ बरा मार्ग तुम्ही उमजोनी सांगा । नामयाची राजा भली नव्हे ॥ ५ ॥

४

शिकविताती ऐसे तुम्ही न आइका । नाहीं भय शंका लौकिकाची ॥ १ ॥ लावोनि लंगोटी झालेति गोसावी । आमुची उठाठेवी कोण करी ॥ २ ॥ तुमचीं ऐशी स्थिति लेंकुरें नेणती । कवण चालविती घरचार ॥ ३ ॥ तुम्ही त्यजिला मोह त्यजीली ममता । कोणें तुमच्या चित्ता भुलवीलें ॥ ४ ॥ धडचि ये काटीं वाळोनिया कैसें । आपणा पिसें लावियेलें ॥ ॥ ५ ॥ सुखाचा संसार करुनि बारा वाटे । नांव केलें मोठें जगामाजी ॥ ६ ॥ सोडविला मोह तोडविली माया । भुलविलें तुमचिया चित्ता कोणी ॥ ७ ॥ कन्यापुत्र ऐशी जोडि-

येली जोडी । केली विघडा विवडी आम्हा तुम्हां ॥ ८ ॥ म्हणोनि माझें चित्त दाटलें उद्योगेंचि । कोणा सांगो जिवींचीं सुखदुःखें ॥ ९ ॥ सर्वस्व सांडुनि तुम्हीं धरिला देव । त्यानें पुसिला ठाव संसारीचा ॥ १० ॥ आमुची कणव तुम्हां न वाटेचि कांहीं । विनविते राजाई नानदेवा ॥ ११ ॥

---

# ॥ सावता माळी ॥

१

ऐकावे विठ्ठल धुरे । विनंती माझी हो सत्वरें ॥ १ ॥ करी संसाराची बोहरी । इतुकें मागतों श्रीहरी ॥ २ ॥ कष्ट करितां जन्म गेला । तुझा विसर पडला ॥ ३ ॥ माळी सावता मागे संतान । देवा करी गा निःसंतान ॥ ४ ॥

२

कां गा रुसलासि कृपाळू वा हरी । तुजविण दूसरी भक्ती नेणे ॥ १ ॥ दीन रंक पापी हीन माझी मती । सांभाळा श्रीपती अनाथनाथा ॥ २ ॥ आशा मोह माया लागलीसे पाठीं । काळ क्रोध दृष्टी पाहतसे ॥ ३ ॥ सावता म्हणे देवा नका ठेऊं येथें । उचलोनि अनंते नेई वेगीं ॥ ४ ॥

३

कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी ॥ १ ॥ लसूण मिरची कोथिंबिरी । अवघा झाला माझा हरी ॥ २ ॥ मोट नाडा विहीर दोरी । अवघी व्यापिली पंढरी ॥ ३ ॥ सावता म्हणे केला मळा । विठ्ठल पायीं गोंविला गळा ॥४॥

४

नको तुझें ज्ञान नको तुझा मान । माझें आहे मन वेगळेंचि ॥ १ ॥ नको तुझी भुक्ती नको तुझी मुक्ती । मज आहे विश्रांती वेगळीच ॥ २ ॥ चरणीं ठेउनि माथा विनवितो सावता । ऐका पंढरिनाथा विज्ञापना ॥ ३ ॥

५

पैल पहाहो परब्रम्ह भुलले । जगदीश कांहो परतंत्र झालें ॥ १ ॥ काय सुख केलें येणें नेणिजे । कोण भाग्य गोळीयांचें वर्णिजे ॥ २ ॥ आदि अंतू नाहीं जया व्यापका। माया उखळीं बांधिला देखा ॥ ३ ॥ सर्व सुखाचें सुख निर्मळ । कैसें दिसताहे श्रीमुख कमळ ॥ ४ ॥ योगियां हृदयकमळीचें हें निधान । दृष्टी लागे लगे उतरा निंबलोण ॥ ५ ॥ सावत्या स्वामी परब्रम्ह पुतळा । तनुमनाची कुरवंडी ओंवाळा ॥ ६ ॥

६

मागणें तें आम्हा नाहीं हो कोणासी । आठवावें संतासी हेंचि खरें ॥ १ ॥ पूर्ण भक्त आम्हां ते भक्ती दाविती । घडावी संगती तयाशींच ॥ २ ॥ सावता म्हणे कृपा करी नारायण । देव तोचि जाण असे मग ॥ ३ ॥

७

भली केली हीन याति । नाहीं वाढली महंती ॥ १ ॥ जरि असतां ब्राम्हण जन्म । तरि हें अंगीं लागतें कर्म ॥२॥ स्नान नाहीं संध्या नाहीं । याति कुळ संबंध नाहीं ॥ ३ ॥ सावता म्हणे हीन याति । कृपा करावी श्रीपती ॥ ४ ॥

८

विकासिले नयन स्फुरण आलें बाहीं । दाटलें हृदयीं करुणाभरितें ॥ १ ॥ जातां मार्गीं भक्त सावता तो माळी । आला तया जवळी पांडुरंग ॥ २ ॥ नामा ज्ञानदेव राहिले बाहेरी । मळिया भीतरीं गेला देव ॥३॥ माथां ठेऊनि हात केला सावधान । दिलें आलिंगन चहूं भुजीं ॥ ४ ॥ चरणीं ठेउनि माथा विनवितो सावता । बैसा पंढरिनाथा करिन पूजा ॥ ५ ॥

# ॥ निळोबा ॥

आर्त माझें पूर्ण झालें । याचीं पाऊलें देखतां ॥ १ ॥
आतां कोठें न धांवे मन । राहिलें होऊन अचळ ॥ २ ॥
याहुनि कांहीं नलगे जोडी । पुरली आवडी विषयाची ॥३॥
निळा म्हणे ध्यानीं मनीं । राहे चिंतनीं हेंचि रूप ॥ ४ ॥

२

अहो देवा कृपामूर्ती । गुण संपत्ति निधाना ॥ १ ॥ पिंड
पदीं समर्पिला । आम्ही आपुला जीवभाव ॥ २ ॥ न मागो
कांहीं अणुमात्र । कृपापात्र करावें ॥ ३ ॥ निळा म्हणे वि-
ज्ञापना । परिसा दीना रंकाची ॥ ४ ॥

३

काय द्याल तुम्ही देवा । घ्यावो सेवा आमुचीच ॥ १ ॥
पूर्वीं पासुनि करित आलों । कळासलों अभ्यासें ॥ २ ॥
द्याल तें तें अवघें मिथ्या । आम्हा सत्य। न सांडूं ॥ ३ ॥
निळा म्हणे जीवन आम्हां । पुरुषोत्तमा दास्यत्व ॥ ४ ॥

४

कीर्तनाचा घोष गजर । ऐकतां अपार उद्धरले ॥ १ ॥
ऐसे किती सांगावे ते । कीर्तन सरते वैकुंठीं ॥ २ ॥ आदि
करून स्त्रिया बाळें । कीर्तन कल्होळे हरिपदीं ॥ ३ ॥ निळा
म्हणे श्रोते वक्ते । एकात्म ते पावले ॥ ४ ॥

५

जेणें कीर्तनीं धरिली निष्ठा। झाला वरिष्ठा वरिष्ठ तो॥१॥
पहा प्रल्हाद दैत्यवंशी । झाला देवासी परम पूज्य ॥ २ ॥
नामा शिंपी विष्णुदास । यवन कबीरास बहु मान ॥ ३ ॥
निळा म्हणे कीर्तनरंगीं । रंगले जगीं धन्य झाले ॥ ४ ॥

६

जो जो काळ कीर्तनीं जाय । तो तो होय सार्थक ॥१॥ घटिका पळही न वचे वायां । चुकवी अपाया पासुनी ॥२॥ नलगे जन्मांतरा येणें । पुढती मरणें मागुती ॥ ३ ॥ निळा म्हणे ऐसा निका । उपाय नेटका सकळांसी ॥ ४ ॥

७

तेचि संत तेचि संत । ज्यांचा हेत विठ्ठलीं ॥ १ ॥ नेणती कांहीं टाणाटोणा । नामस्मरणावांचोनि ॥ २ ॥ काया वाचा मन । धालें चिंतन डुल्लती ॥ ३ ॥ निळा म्हणे विरक्त देहीं । आठव नाहीं विषयाचा ॥ ४ ॥

८

दळण दळितां आठवे मानसीं । अलंकापुरवासी ज्ञानराज ॥ १ ॥ ओविया मंगळीं गाईन मी त्यासी । स्वामी तुकयासी निजानंदें ॥ २ ॥ एकाजनार्दन आणि नामदेव । देती स्वानुभव आठवितां ॥ ३ ॥ परलोकीं सोयरे जिवलग माझे । जे कां पंढरीराजें अनुग्रहिलें ॥ ४ ॥ निळा म्हणे संत ते हे भूमंडळी । त्यांची पायधुळी वंदीन मी ॥ ५ ॥

९

निरोप मागावया संत । आले राऊळा समस्त ॥ १ ॥ चरणीं ठेउनियां माथा । विनविती पंढरीनाथा ॥ २ ॥ म्हणती कृपा असों द्यावी । उपेक्षा आमुची न करावी ॥ ३ ॥ निळा म्हणे पंढरिनाथा । वियोग न साहे सर्वथा ॥ ४ ॥

१०

प्रतिवर्षीं पंढरपुरा । जाती महाद्वारा हरिभेटी ॥ १ ॥ मस्तक त्यांच्या पायावरी । या वारकरी संताच्या ॥ २ ॥ भेटी त्यांची इच्छी मन । करिती कीर्तन अनुराग ॥ ३ ॥ निळा म्हणे लोटांगणीं । जाईन पुढती सामोरा ॥ ४ ॥

## ॥ निळोबा ॥

११

विनंती माझी एक ऐका । अहो पुंडलीका महामुनी॥१॥ ठाव द्यावा चरणापासीं । मज विठोबासी विनवुनी ॥ २ ॥ अंगिकारा रंक दीना । विज्ञापना हे माझी ॥ ३ ॥ निळा म्हणे सांभाळावें । मज हें द्यावें वरदान ॥ ४ ॥

१२

शिंपी सोनार चांभार । ब्राह्मणादि नारीनर ॥ १ ॥ हरिच्या कीर्तनीं हरिभक्त । होउनि ठेले जीवन्मुक्त ॥ २ ॥ सुतार कुंभार यवन । अंत्यजादि हीन जन ॥ ३ ॥ निळा म्हणे क्षत्रिय शुद्र । वैश्यही पावले मुक्तिपद ॥ ४ ॥

१३

सरलीया खेळागे म्हणती अवघ्या बाळा । आरती करूं नंदाचिया बाळा ॥ १ ॥ हाचि जीव प्राणगे सोयरा सज्जन । यासि ओंवाळितां बाई निवे तनुमन ॥ २ ॥ करुनियां आरतीगे पंचप्राणज्योति । मिळोनीयां सकळा बाळा श्रीमुख पाहती ॥ ३ ॥ निळा म्हणे आजिगे धन्य पर्वकाळ । सांपडला तो साधा आजि आलिंगूं गोपाळ ॥ ४ ॥

१४

नामयाचे श्रवण कीर्ती । पावलें चित्तीं समान ॥१॥ काळ सार्थक केलें त्याणीं । धरिला मनीं विठ्ठल ॥ २ ॥ कीर्तनाचा समारंभ । निजदंभ सर्वदां ॥ ३ ॥ निळा म्हणे स्वरूपसिद्धि । नित्य समाधि हरि नाम ॥ ४ ॥

१५

### निळोबाकृत–आरती ज्ञानदेवाची.

होतां कृपा तुमची पशु बोले वेद । निर्जिव चाले भिंती महिमा विशद । भगवत्गीता टीका ज्ञानेश्वरि शुद्ध । करुनी

भाविक लोकां केला निजबोध ॥ जयदेव जयदेव जय ज्ञान-सिंधू । नामस्मरणें तुमच्या निरसे विंधू ॥ ध्रु० ॥ चौदाशे वर्षांचे तपती तीरवासी । येउनि चांगदेव लागति चरणासी ॥ करुनि कृपा देवें अनुग्रहिलें त्यासी । देउनि आत्मज्ञान केला रहिवासी ॥ २ ॥ समाधिसमयीं सकल संत समुदाय । येउनि सुरवर आले श्रीपंढरिराय । द्वारीं अजानवृक्ष सुवर्ण पिंपळ अस्माय । जाणुनि महिमा नीळा चरणातळीं रहाय ॥ ३ ॥

१६

## निळोबाकृत–आरती तुकारामाची.

प्रपंचरचना सर्वेहि भोगुनि त्यागीली । अनुतापाची जाणीव देहबुद्धि हारविली । वैराग्याची निष्ठा प्रभुनीं दाखविली । अहंता ममता दवडुनि निज अंकीं बैसविली । जयदेव जयदेव जय सद्गुरु तुकया दातारा । तारक तूं सकळांचा जिवलग सोयरा ॥ ध्रु० ॥ हरिभक्तीचा महिमा वरिष्ठ वाढविला । वीरक्ती ज्ञानाचा ठेवा दाखविला । जगदोद्धारालागीं उपाय सुचवीला । निंदक दुर्जन यांचा संदेह निरसीला ॥ १ ॥ तेरा दिवस वह्या रक्षुनियां उदकीं । कोरड्याच काढूनि दाखविल्या शेखीं । अपार कविताशक्ती प्रगटुनि निजअंकीं ॥ कीर्तन श्रवणें तुमचा जयजय इहलोकीं ॥ २ ॥ बाळवेषें येउनी श्रीहरी भेटला । अहंता जनता तींचि आठव दिधला । तेणें ब्रम्हानंदें प्रेमा ओढवला । इतुकें म्हणोनि तुकया नामें गौरविला ॥ ३ ॥ प्रयाण समयीं तया विमान पाठविलें । कलिच्या काळामाजीं अद्भुत वर्तलें । मानवदेहा घेउनि निजधामा गेले । निळा म्हणे सकळ संतां तोषविलें ॥ ४ ॥

———:o:———

# श्रीनिवृत्तिराज, ज्ञानदेव, सोपान, चांगदेव आणि वटेश्वरकृत नमनस्तोत्र.

## ॥ श्री निवृत्तिराजकृत नमनस्तोत्र. ॥

नमो गणपति गजानना । नमो सरस्वती मंगल ध्याना । नमो अगाध ब्रह्मपरायणा । नमो नमो स्वामी ॥ १ ॥ नमो आदिमायादिसागरा । नमो चिदानंद दिगंबरा । एकत्व एकसारा । नमो नमो तुज ॥ २ ॥ नमो मत्स्येंद्रनाथा अनादि । नमो सर्व व्यापका सुबुद्धि । नमो जुनाट युगादि । तुज नमो स्वामिया ॥ ३ ॥ नमो सत्यकाळनाथ त्रिजगती । नमो नमो पुढत पुढती । योगेश्वरा आदि अंतीं । नमो नमो स्वामी ॥ ४ ॥ नमो गैनीनाथ अविनाशा । नमो सहजा सहज प्रकाशा । नमो व्यापूनि दाही दिशा । आदिगुरु तुज नमो ॥ ५ ॥ गुप्तनाथ तुज नमन । नमो सद्गुरु परब्रह्मपूर्ण । सदां स्वरूपीं अनुसंधान । नमस्ते तुज ॥ ६ ॥ नमो गैनीनाथ आदिगुरू । तूं संकटीं आदि तारूं । नमो संसारहर्त्ता हरू । सद्गुरुनाथा तुज नमो ॥ ७ ॥ नमो कर्त्ता हर्त्ता नारायणा । नमो उदयो अस्तु गगन घना । नमो विराटपुरुषा जगज्जीवना । नमस्ते नमस्ते कुळस्वामी ॥ ८ ॥ नमो त्रिपुटी गुप्तघना । नीलवर्णा कलंकी कोंदणा । नमो ज्योतिर्मय दारुणा । नमो नमो जगद्गुरु॥९॥नमो पांडुरंग दयाळा । नमो गोविंदा गोपाळा । नमो वैष्णवां सकळा । योगियां ऋषीश्वरां नमो नमो ॥ १० ॥ नमो सर्व चराचर । नमो अंतर बाहेर । नमो दाहीही अवतार । जगद्रूपणा तुज नमो ॥ ११ ॥ नमन नेणो कैसे रीती । नमन रंगलें विश्वरूपीं । नमन चिन्मय गुह्य गोप्यीं । नमो सर्वभूतीं निजगुरु ॥ १२ ॥

## ॥ श्रीज्ञानदेवकृत नमनस्तोत्र ॥

नमो कालकौतूहल । नमो चक्रचालक गोपाळ । नमो विश्वप्रतिपाळ । प्रभंजन ॥ १ ॥ नमो शिव शिवेशा । नमो शिवादि विश्वेशा । नमो रूपा अष्टदिशा । व्यापक नारायणा ॥ २ ॥ नमो सकळ गर्भोद्भवा । नमो चित्तचालक भावा । नमो विष्णुमूर्ति देवाधिदेवा । श्री विठ्ठला ॥ ३ ॥ नमो भजनशील व्यापका । नमो ज्योतिर्लिंग दीपका । नमो नमो तुज एका । आत्मव्यापका जगद्गुरु ॥४॥ नमो श्रीये श्रीनिवासा । नमो आगम परेशा । नमो ज्ञानगम्याधीशा । प्रतिकूळा ॥ ५ ॥ नमो स्वलीला विनटा । नमो स्तुति वैकुंठपीटा । नमो कृपादि श्रेष्ठा । वैकुंठीचिया ॥ ६ ॥ नमो दर्शन स्पर्शना । नमो उपरतिनिधाना । नमो तितिक्षा दारुणा । कमळालया ॥ ७ ॥ नमो त्रिगटी आदटा । नमो त्रिगुणा तूं उद्भटा । नमो सत्वरूप सुदृढा । ब्रम्हनामा ॥ ८ ॥ नमो नमो राजेश्वरा हरी । नमो विगलित संहारी । नमो वाचा वक्ता करी । वाचाळ वाक्पुष्पीं ॥ ९ ॥ नमो तम हर्ता कर्ता । नमो सकळ संहर्ता । नमो काळकौळूदाता । रक्षिता हरिभक्ता तुज नमो ॥ १० ॥ नमो हरिहरेश्वरा । नमो न देखों दूसरा । नमो वेदांतसागरा । सर्वेश्वरा तुज नमो ॥ ११ ॥ नमो द्वैतश्रुति निरामय नमो । नमो ज्ञानरूपनमो । नमो व्यक्ताव्यक्त निरसन नमो । करी तूं निजकरें ॥ १२ ॥ नमो सर्वांच्या माजिघरीं । हरी । नमो माया संहारकेसरी । नमो सर्वांच्या माजिघरीं । मांदसी तूं आत्मारामा ॥ १३ ॥ जीव शिव नमो तुज । नमो सर्व जीवबीज । नमो तूंचि सहज । श्री विठ्ठल ॥ १४ ॥ नमो जगदादि अखिल स्तंभ । उभा राऊळीलेस्तव नटारंभ । होनि प्रतीभ । भीमातीरीं पंढरीये ॥ १५ ॥ नमो ऐशिया रूपेशा । नमो त्रैलोक्य विस्तार ठसा । नमो आदि परेशा । जगदादीशा युगादि ॥ १६ ॥ नमो पुरुषोत्तम परेशा । नमो

सकळही उदासा । करुनि जीवरूप ठसा । नांदसी तूं चराचरीं ॥ १७ ॥ मधुसूदना तुज नमो । मधुमाधवा हृदय रमो । नमो मधुर गीततमो । माजिवरीं आत्म्याचिये ॥ १८ ॥ त्रिविध तिमिरनाशा । परमानंद उल्हासा । नमो पुरविसी आशा । हरिभक्तीची श्रीहरी ॥ १९ ॥ नमो वासना चक्रचाळी । नमो तंडावितंड गेली । नमो सर्वही हरिली । प्रपंचरचना ॥ २० ॥ नमो श्रीधर श्रीकर । नमो सर्वसंगी विकार । नमो विकृति विकार । हरिसी नामें एके ॥ २१ ॥ नमो शांति दया क्षमा । नमो कृपाकर पुरुषोत्तमा । नमो कांसवदृष्टीसमा । निष्कलंकनाथा ॥ २२ ॥ नमो विश्वाब्धिछेदका । नमो एकार्णव पावका । नमो द्वादश अर्का । सुभाषका वेदवक्ता ॥ २३ ॥ नमो चित्तचकोर हर्त्यां । नमो तुजवांचूनि सर्त्यां । विवेक प्रत्यया । पैं नये ॥ २४ ॥ नमो अद्वैत अनंता । नमो निर्द्वंद्व भोक्ता । नमो नित्यानित्य सरता । तुज नमो नमो ॥ २५ ॥ नमो दुर्गतिहरणा । नमो सर्व हरणभरणा । नमो सर्वदुष्ट निवारणा । भवहरणा जगदीशा ॥ ॥ २६ ॥ नमो शिवशक्तिसमलिंगा । नमो भक्षक काळवेगा । रुद्रादित्या वसु पैं गा । सम सर्वांगा परम परेशा ॥ २७ ॥ नमो कृत्रिमदहना । नमो कृशकरणहरणा । नमो प्रतिपाळकरणा । नारायणा तुज नमो ॥ २८ ॥ नमो इंद्रियनियंत्या । नमो प्रपंच अकृत्या । नमो दीनादित्या । सकळ बुद्धि तूंचि ॥ २९ ॥ नमो अवधूत दत्ता । नमो अपरमित मित्ता । नमो सर्वा वरिष्ठ सत्ता । तूं चाळितां हृषिकेशी ॥ ३० ॥ नमो दुष्टदर्पदर्पा । नमो चमत्कार गंगासर्पा । नमो नमो हरणपापा । नमो स्वरूपा रामकृष्णा ॥ ३१ ॥ नमो चतुर्वेददीप्ता । नमो हरणकरण सूप्ता । जागृति स्वप्नगुप्ता । सत्यसुप्ता महाविष्णु ॥ ३२ ॥ नमो देवेश्वर सूक्ता । महामोहा महा-

हर्ता । मंद मंद नियंता । नमो नारायणा ॥ ३३ ॥ क्षीर नीर निर्झरा । नमो विदग्धअनुकारा । नमो विवेकसारा । महानादा ॥ ३४ ॥ नमो मुखदंतसदना । नमो भक्षकभुवना । भोक्तावरा शुक्लवर्णा । दयाघना गुणनिधी ॥ ३५ ॥ मृता· मृता नमो नमो । नमो श्रुतिशास्त्रसमो । नमो हा गर्वगमो । पद्मगर्भानंतानंता ॥ ३६ ॥ नमो चिदाकाश व्यापा । चित्सत्ता चळणसत्ता । चित्स्वरूपादिरूपा । भुवनदीपा महा· मूर्ती ॥ ३७ ॥ नमो एक एकार्णव । नमो कल्पादि गुणवैभव । नमो सकळ हें दैव । हे भाव पैं तुझे ॥ ३८ ॥ गो गोपाळ नमो नमो । गोविंदगुण विष्णुधर्मो । नमो चित्त चिंतनी रमो । सर्वकाळ तुझ्या चरणीं ॥ ३९ ॥ ध्वजवज्रांकुशा । ध्वज नीळ विकाशा । ध्वजांबरा अष्टदिशा । नळिभामा युक्ता शामांकिता ॥ ४० ॥ सुषुप्तिचें जें सत्य । तें नमो तुज कृत्य । असोस जें अमित्य । तें तें क्षमा करी स्वामी ॥ ४१ ॥ नमो निर्धार नियंता । नमो सुखरूप दाता । नमो आलीया पदार्था ।·क्षमा करी स्वामी ॥ ४२ ॥ नमो चित्त विभ्रमो । नमो धार्य धैर्य नमो । नमो पुराण पुरुषोत्तमो । पाहे कांसव· दृष्टी ॥ ४३ ॥ पसायदाना नमो । परम परेशा नमो । ध्यानां· तर गमो । तुझ्या चरणीं केशवा ॥ ४४ ॥ आग्रहनिर्हरत्या नमो । सु· ग्रह परी नमो । अनंता नित्यधर्मो । वैकुंठ गुणग्राम नमोनमस्ते ॥ ४५ ॥ अनादृश्य दृश्यमान । दृश्यादृश्य नित्यघन । सुखरूप ज· गज्जीवन । तुज नमो स्वामी ॥ ४६ ॥ दीप्तादीप्त अदृश्या । जीव न दिसती सादृश्या । जीवमय हे भासा । तुज नमो स्वामी ॥ ४७ ॥ परम परब्रम्हा । आदिब्रम्हा तूं रामा । भक्तालागीं तूं साउ- मा । तुज नमो ॥ ४८ ॥ नमो नमो एकतत्वा । बाह्य मुद्रा शुद्धसत्वा । योगारूढ परतत्वा । सबाह्य पावसी तुज नमो ॥ ४९ ॥ वेदादि परमवक्ता । वेदादि तूंचि कर्ता । तुजवांचोनि·

सर्व सत्ता । नमो भक्ता न देखो ॥ ९० ॥ ज्योतिर्मय रूप तुझें । सर्व तत्वां तूंच बीज । नमो तुंज सहज । पुढती पुढती नमो नमो ॥ ९१ ॥ परब्रह्म परात्पर । परमतत्व परमसार । परमगुह्य परम विर्चार । तुज नमो नारायणा ॥ ९२ ॥ दिघड विघड सुघड । जाडाजाड़ अवघड । द्वैताद्वैत जोडाजोड । कर्ता कार्यतां तुजनमो ॥ ९३ ॥ संख्यारहित जीवना । असंख्या जीव पाळणा । नमो तुज संजीवना । पुंडलीकधना पांडुरंगा ॥ ९४ ॥ निर्गुण सगुण रूपा । देवा देव तूं सोपा । तुझी झालीया कृपा । नमन बापा तुझ्या चरणीं ॥ ९५ ॥ नमो नमो तारका । तूं ब्रह्मा नाम विशेखा । नमो तुजवांचोनि सखा । योगियासी पैं नाहीं ॥ ९६ ॥ युगादि युगत्रय । युगजोग योगमय । हे तुजपासाव होय । ऐशिया नमो ॥ ९७ ॥ नमो नमो नम । नाहीं नाहीं तुजसि सम । ऐसा परा पश्यंती नेम । बलीयाचारी ॥ ९८ ॥ चहूं मुक्ती परनखा । पंचमु जो बद्धसत्वा । षण्मार्ग गुणसत्वा । ग्रास न करिसी तुज नमो ॥ ९९ ॥ चिद्रद चिद्विलासा । भानुबिंबा प्रतिप्रकाशा । नमो तेज तेजसा । आदिसूर्या ॥ ६० ॥ ऐसा चहूं ग्रंथांचा क्लेशू । वाउगाचि वाहे सोसू । तो सत्वांशु तोडि माझा ॥ ६१ ॥ साही नाडीचक्रभ्रमें । वाहतां इंद्रियांचीं भ्रमें । आडखळोनि साउमे । न ये ऐसें करी नमो ॥ ६२ ॥ बाध्य बाधा कर्माची । सर्व सत्ता या भ्रमाची । नमनें करूनियां तुमचीं । तुह्मांसी अर्पिलीं स्वामी ॥ ६३ ॥ यम धर्माचिया सत्ता । कर्म धर्माचिया पंथा । कर्म धर्म विधाता । ऐसिया नेमिता तुज अर्पिला ॥ ६४ ॥ दम शम समान । इडा पिंगळा सुषुम्न । साही चक्रें दरुशन । तुझीं तुज अर्पिलीं ॥ ६५ ॥ मन पवन योग धारण । तूं यांसी पैं कारण । सम तुकें अवघे गुण । तुझ्या चरणीं निक्षेपिले ॥ ६६ ॥ हे भूत भौतिक प्रचंड । जन्म उत्पत्तीचें अंड । जन्म

जुगादि ब्रम्हांड । खंड विखंड तूं जाणता ॥ ६७ ॥ प्रचुर चर्या चित्ताची । धावन वळन आकोचनाची । सूचना जे चमत्काराची । तेही अर्पण तुज सदां ॥ ६८ ॥ निर्वासना वासनायुक्त । फळें राहिलें जेथें चित्त । तेथें तूं धांवोनि अनंत । सोडविसी वासनामय ॥ ६९ ॥ सूक्ष्म अविचारा बोला । बोली नातुडे व्यर्थ गेला । तो म्यां बुझावोनि संबोखिला । मग लाविला तुझ्या पंथीं ॥ ७० ॥ नित्य धर्माचिया बोली । चळल्या वळल्या कोण चाळी । त्यासी वेद तुझा पाळी । त्या तूं सांभाळी परब्रम्हा ॥ ७१ ॥ श्रुतिस्मृतीचीं वचनें । त्याचीं आंगरीग मार्गस्थानें । कीर्तनीं गुण वर्णनें । हींही नारायणें अंगिकारावीं ॥ ७२ ॥ उदंड विदंड वितंड । देहद्वयाचें अभंड । जें जें दिसे भ्रंश अंडअंड । ते शुभ्र चंड सांभाळी ॥ ७३ ॥ देह भरणाची ममता । देह पाखिती जे सत्ता । त्याही वरील सूक्ष्मता । ते कृपावंता सांभाळी ॥ ७४ ॥ त्रिमिर त्रिगुण अवघें । जें जें आलें असेल वावे । तें तें मी नेघे । तें तूं सकळ वेगें सांभाळी ॥ ७५ ॥ योनीचिया कष्टा । वरि वासना होत्या भ्रष्टा । संसार हा कटकटा । रतलो तुझ्या चरणीं ॥ ७६ ॥ विद्या वय साकुळ । ब्रह्मकर्म आचारशीळ । गेले आले विठ्ठळ । ते तूं दयाळ सांभाळी ॥ ७७ ॥ नाना जन्म अवतार । नाना शाखांचें निर्धार । नाना गोत्र उच्चार । तुझा विचार तूं जाणसी ॥ ७८ ॥ पाठ वेदादि वचनें । शास्त्रदृष्टीं अवलोकनें । कीर्तनीं गुणवर्णनें । हींही नारायणें अंगिकारावीं ॥ ७९ ॥ सर्वमय सर्व सपाटा । त्यावरि करूनिं चालिलों वाटा । चंद्र सूर्य नक्षत्रें घनदाटा । करुनि एकवट पायरी ॥ ८० ॥ सर्व अंडाचें ब्रम्हांड । मी न म्हणे अंडा अंड । खंडें करूनियां निखंड । प्रचंड मी तुजसी बोले ॥ ८१ ॥ रोमरंध्रीं ब्रम्हांडें । सकळ

विराटमय खंडें। ऐशीं महद्भूतें प्रचंडें। तुझ्या अंगीं दातारा ॥ ८२ ॥ तूं विश्वरूपाची घडी। तारक ब्रह्मचि उघडी। मी या निजदृष्टीनें चोखडी। तुझी मूर्ती न्यहाळीन ॥८३॥ ते न सुटे निजकळे। एऱ्हवीं हें माकळे। तुझिया कृपागुणें आकळे। तुझिया दासा निज भक्तां ॥ ८४ ॥ अनंत या नामाचा संकेत। मन मुरालें जेथें निर्धूत। तूंपणें परमाद्भुत परमानंदा॥८५॥गुणाग्र गोसावी राम। गुणसमुद्र गुण ग्राम। सर्व भूतांचा विश्राम। तुज नमो ॥ ८६ ॥ नमन केलिया विभूतीं। चित्त रमलें झाली विश्रांति। तुज देखिलीया श्रीपती। न राहे चित्तींची तळमळ ॥ ८७ ॥ नमन हेंचि थोर दिसे। एऱ्हवीं तरंगाकार भासे। देखिलें तितुकें नासे। नैश्वर्य ऐसी श्रुति बोले ॥ ८८ ॥ नमन हेंचि परम। नमन हें सुवर्म। नमन हेंचि आत्माराम। करूनि घाली ॥ ८९ ॥ नमन हाचि अनुभव। नमन हाचि मुख्य भाव। नमन हाचि पैं देव। देवाधिदेव तूं पावसी ॥ ९० ॥ नमन हेंचि श्रेष्ठपीठा। नेतसे तुझिया वाटा। तुज ऐसा श्रेष्ठा। मग या वाटा काय कराव्या ॥ ९१ ॥ नमन हेंचि तारक। नमन हाचि विवेक। नमनेंवीण त्रैलोक्य। आडमार्गें रिघताती ॥ ९२ ॥ नमन लटिकें नव्हे नव्हे। नमन भलतियासि न साहे। जें साह्य सखा होय। श्रीनिवृत्ति ॥ ९३ ॥ नमना एवढा मंत्र। नाहीं नाहीं धुंडिता शास्त्र। विचार लक्षण पात्र। तेंचि जाणें येथींचें ॥ ९४ ॥ नमन करी ब्रह्मा श्रेष्ठ। नाभीकमळीं धरी वैकुंठ। नमन करी नीळकंठ। तीर्थें मस्तकीं वंदिती ॥९५॥ इंद्र चंद्र महेंद्र थोर। नमनें वीण नैश्वर। अंडामध्यें चराचर। नमनेंवीण न तरती ॥ ९६ ॥ श्रीगुरुकृपा जें होय। तें नमनाची ऐशी सोय। पाऊनि सुगम उपाय। नमो नमस्ते तुज ॥ ९७ ॥ नमस्ते नमस्ते नमस्ते। पुढती पुढती नमस्ते। समाधि

सुख आस्ते । नमोनमः करितां ॥ ९८ ॥ नमो नमो आदिपीठा । शिवादि गुणवरिष्ठा । येथें येऊनि वैकुंठा । समाधि सेज वातली ॥ ९९ ॥ महाविष्णु तूं योगरूपा । महारूपाचिया स्वरूपा । महादित्या अमूपा । कोटि रुद्र तेजसा ॥ १०० ॥ शंख चक्रानें मंडित । करकमळ तुझें मिरवत । पदक हृदयावरी शोभत । आणि श्रीवत्सलांछन ॥ १०१ ॥ अनंत बाहूंचा मेळ । तो तूं चतुर्भुज गोपाळ । मुगुट दिसत तेजाळ । कोटि सूर्याहुनि प्रभा ॥ १०२ ॥ पीतांबर माळ कंठीं । सर्वांगीं चंदनाची उटी । हिरेमाणकें कटितटीं । अनेक कीळा फांकती ॥ १०३ ॥ क्षुद्र घंटिकाच्या ओळी । घणघणाट तया वेळीं । देउडा पाउलीं निश्चळीं । वेणू वाजविसी सुस्वरें ॥ ॥ १०४ ॥ रुणुझुणु रुणुझुणु । ऐसा वाजविसी वेणू । सुंदर तूं शामतनु । अळकापुरीं उभा अससी ॥ १०५ ॥ सभोंवते गोपाळ तुझे । ते अंतरंग सखे माझे । पुंडलीक तरी सहजें । प्राणसखा पैं माझा ॥ १०६ ॥ ऐसा ज्ञान उद्बोध बोले । ज्ञानाज्ञान निरसले । विज्ञानही हारविले । दृश्य द्रष्टनेसी ॥ १०७ ॥ बाप रखुमादेवीवरू । समाधि देऊनियां स्थीरू । वरी ठेऊनियां अभयकरू । वर देउनी राहिला ॥ १०८ ॥

---

## ॥ श्री सोपानकृत नमनस्तोत्र ॥

नमो ज्योतिर्मय ब्रह्मा । आनंद ईश्वर पुरातना । नमो नारायण कमळ कोंदणा । नमो नमो स्वामिया ॥ १ ॥ नमो सद्गुरु निवृत्ति । नमो रखुमाईच्या पती । नमो ज्ञान मूर्ती । अगम्या पुरुषा ॥ २ ॥ नमो भक्ति मुक्ति चैतन्य माया । नमो कर्ता हर्ता काया । नमो आदि पुरातन पाया । परब्रह्मा ॥ ३ ॥ नमो विराटपुरुषा पुरातना । नमो जगज्जीवना करुणाघना । चराचरपाळका गहना । नमना माझिया ॥ ४ ॥ नमो ब्रम्हांडव्यापका । नमो गुणातीता मातांका ।

चुकवी जन्ममरण एका । तारी विश्व अंगें ॥ ५ ॥ नमो जळ स्थळ-रक्षिता । आदि अवसानीं तारिता । नमो रोमारोम अव्यक्ता । नमो नमो दीनबंधू ॥६॥ नमो विराट् महद्ब्रम्हा । निष्कलंक समुद्रुमा । योगियांच्या सुखधामा । नमो नमो द-याळा ॥ ७ ॥ ओट हात ध्वनी । नमो नमो अंतःकरणीं । नमो सत्रावि त्रिवेणीं । त्रिपुटी जेथें ॥ ८ ॥ नमो विटेवरी सदटा । नमो वैकुंठीचिये पीठा । आदि अंतीं एकटा । नमो आदि पुरुषा ॥ ९ ॥ आदि अंतीं शेवटीं । सहस्रदळी गुह्य पीठीं । नमो उवडी दृष्टी । स्वरुपीं तुझ्या ॥ १० ॥ नमो पायीं पडली मिठी । नमो बांधिली हृदयीं गांठीं । सांठवी पोटीं । गुण दोष स्वामी ॥ ११ ॥ नमो गेलें आलें । नमो झालें तें झालें । नमो तुझे त्वां केलें । सांभाळुनि ॥ १२ ॥

---

## ॥ श्री चांगदेवकृत नमनस्तोत्र ॥

नमो नमो गणपती । नमो सरस्वती । नमो नमो रमापती । दीनबंधू ॥ १ ॥ नमो योगी दिगंबरा । नमो वैष्णवांचिया भारा । नमो गंधर्व ऋषीश्वरा । लहान थोरां ॥ २ ॥ नमो नमो अंतरीं । नमो नमो दिशा चारी । नमो अंतर बाहेरी । एकत्व एक ॥ ३ ॥ नमो अनंता अनंत नाना । नमो जान-कीश जगज्जीवना सुखधामा । जयजय रामारामा । तुज नमो ॥ ४ ॥ नमो मत्स्य कच्छ अवतार । नमो सिंह सूकर । नमो परशुराम फरशधर । वामना तुज नमो ॥ ५ ॥ नमो रामा वेदपालका । नमो इंद्रियचक्रचाळका । नमो बोध भाविका । श्री विठ्ठला ॥ ६ ॥ नमो कलंकी विनटला । मायापटलनाश-का विठ्ठला । सारासार नटला । तुज नमो ॥ ७ ॥ निराम-य निर्गुण तुज । नमो नमो चतुर्भुज । नमो सर्व जगदात्मज । अनाथनाथा ॥ ८ ॥ नमो बारा ज्योतिर्लिंगा । नमो पंढरी-नाथा पांडुरंगा । नमो भीवरा चंद्रभागा । नमो वैकुंठपीठा ॥ ९ ॥ मी काय जाणे नामस्थिति । नमन केलें भोळी भक्ती । नमन श्रीपती । मान्य झाले ॥ १० ॥ नमन निवृत्ति

ज्ञानेश्वरा । नमो सोपान वटेश्वरा । नमन मुक्ताई निर्झरा । सत्रावीच्या ॥ ११ ॥ नमो हंसा सुअक्षरा । नमो व्यापक चराचरा । नमो नमो अव्यक्त विषयवरा । पांडुरंगा ॥१२ नमन तुमचे तुम्हीं केलें । नमन सहजासहज झालें । नेणों काय आलें गेलें । सद्गुरुनाथा ॥ १३ ॥

---

## ॥ श्रीवटेश्वर नमनस्तोत्र ॥

नमो अनादि चक्रपाणी । नमो निवृत्ती ज्ञानस्वामी । नमो सोपान संजीविनी । मुक्ताबाई ॥ १ ॥ नमो सद्गुरु मुक्ताबाई । नमो स्वस्वरूप ठायीं ठायीं । नमो घनजात पायीं । नमो नमो परमपद ॥ २ ॥ नमो चंद्र सूर्य घसणी । नमोस्तु मध्यें आटणीं । नमो माय कुंडलिनी । योगियांची ॥ ३ ॥ नमो त्रिविध तापहरणा । नमो विषय निवारणा । नमो स्वामी निष्कामा । कर्ता हर्ता नमो ॥ ४ ॥ नमो अर्ध नासिक वसणी । नमो पाठीं पोटीं दाटणीं । नमो जनीं वनीं । चिन्मय छत्र ॥ ५ ॥ नमो योगमाया दिगंबर । नमो व्यापक चराचर । नमो दाही अवतार । परब्रम्ह नमो ॥ ६ ॥ कळिकाळहरणा नमो नमो । तुझ्यानें परब्रम्ह गमो । शांति अव्यक्त शमो । श्रीहरी ॥ ७ ॥ नमो संसार निरसिता । नमो माया हर्ता । नमो अद्वय अनंता । पांडुरंगा ॥ ८ ॥ नमो पातक संहारी। नमो परब्रम्ह खेचरी । नमो योग अगोचरी । परमात्मा आम्हां ॥ ९ ॥ नमो शिव शिवेशा । नमो आदिगुरु जगदीशा । नमो प्रकाश प्रकाशा । परब्रम्हा ॥ १० ॥ पुरे पुरे येरझारा । नमो व्यवहार सारा । नमो शार्ङ्गधरा । अंतःकरणा पाहसी ॥ ११ ॥ नमो मुक्ताईच्या उपदेशा । नमो आदि अनंता जगदीशा । स्वरूपाची परेशा। जगद्गुरु नमो नमो ॥ १२ ॥ नमस्ते नमस्ते निवृत्ति । नमस्ते नमस्ते ज्ञानमूर्ति । नमस्ते नमस्ते सोपान ज्योति । परेशा मुक्ताबाई तुज नमो ॥ १३ ॥

---

# ॥ मुक्ताबाई ॥

२२

अक्षराचें नांव काय । अक्षर कोठून झालें पाहे ॥ १ ॥ त्रिपदा ती कैशी काय । तिचा सांगा चवथा पाय ॥ २ ॥ ओंकाराची कोठें जागा । मूळ वेदाचें उमगा ॥ ३ ॥ सिद्ध-चैतन्य सिद्धाचा बाळ । नाळ मोठा एकचि कळ ॥ ४ ॥ हें मी हें तूं प्रचीत पाही । अकारा आलिया भेदावें काई ॥ ॥ ५ ॥ मी नाहीं तेथें दुजे केचें । सोहं सोहं भजन सांडी साचें ॥ ६ ॥ अहं तें मी सोहं तें गुज । म्हणे मुक्ताई चांग-या तूं बुझ ॥ ७ ॥

२३

मुक्त होता तूं बद्ध कां झालासी । आपल्या बंधनें तूं आपण बांधलासी ॥ १ ॥ तोडी रे बंधन सोय धरी कान्हा। जाई मूळ स्थाना आपुलीया ॥ २ ॥ जेथिचा तेथें राही भुलूं नको कांहीं । वटेश्वर चांगया म्हणे मुक्ताबाई ॥ ३ ॥

२४

दिवस न राति अखंड पाहिलें । विचित्र जाहलें बाईया-नो ॥ १ ॥ चंद्र सूर्य दिनीं नसतां प्रकाश । चिदीं चिदा-काश व्यापियेला ॥ २ ॥ नाद बिंद कळा जाहली विश्रांति। स्वयंभ स्वयंज्योति प्रगट केली ॥ ३ ॥ आपुले देह विदेहीच झालें । हेंचि हारपलें जाण असे ॥ ४ ॥ निजीं निज पूर्ण निज निजलें । मुक्ताई म्हणे धाले गुरु खुणें ॥ ५ ॥

२५

मुक्ताई म्हणे चांगया तूं ऐक । परमार्थाचें सूख जोडे जेणें ॥ १ ॥ मी कोण ऐसे विचारूनि पाहीं । देहातीत होई पूर्ण ब्रम्ह ॥ २ ॥ लक्ष्य लक्षणातें लक्षीता तूं पूर्ण । गैनी-नाथें खूण सांगितली ॥ ३ ॥

२६

मुंगी उडाली आकाशीं । तिणें गिळिलें सूर्यासी ॥ १ ॥ थोर नवलाव झाला । वांझ पुत्र प्रसवला ॥ २ ॥ विंचू पाताळासी जाय । शेष माथा वंदी पाय ॥ ३ ॥ माशी व्याली घार झाली । देखून मुक्ताई हांसली ॥ ४ ॥

२७

विरक्त म्हणवी आणि इच्छेचा पाइक । तयाचा विवेक जाळी परता ॥ १ ॥ तपोनिधी म्हणवी क्रोधाचा पाइक । तयाचा विवेक जाळी परता ॥ २ ॥ ज्ञानीया म्हणवी इंद्रियाचा रंक । तयाचा विवेक जाळी परता ॥ ३ ॥ वेदशास्त्रवक्ता वितंड वादक । तयाचा विवेक जाळी परता ॥ ४ ॥ मुक्ताई म्हणे नकळे संसार माइक । तयाचा विवेक जाळी परता ॥ ५ ॥

२८

तेथें अजपाळाचे कुळे । केशरी सुगंध चर्चिलें । त्रिकोण आसन उदय जाहलें । आदिपुरुषाचें ॥ १ ॥ तेथें तीन शून्यें लाउनी । दीपक कळिकास पुरं देखणी । मयूर माथा मुगुटमणी । झळकूं लागे ॥ २ ॥ मुक्ताफळाच्या मौन्यें माळ । ऐसें ढाळ देती ढळढळ । दिसूं लागे अळुमाळ । ऐसें जाहलें ॥ ३ ॥ घोगावलें घोरें । भासलें नाना विकारें । तेथें प्रतिबिंब चक्रें । जडूं लाहती ॥ ४ ॥ म्हणे मुक्ताबाई । हें देणें अनुमानाचें । त्यावरी समाधी साचें । निवडूं दादा ॥ ५ ॥

२९

नाना रंगाचे अर्क । दांभिक संपादिती देख । येथें अवसानाचें एक । काम आहे ॥ १ ॥ घ्यावा सद्गुरुचा संग नेटा। धरावा निश्चय कसवटा । नेटें उलंघावा उरवंटा । तया आसनाचा ॥ २ ॥ तेथें वारा वाजूं विसरे । अवघा प्रकाश पसरे । आदित्य मावळूनि उरे । निजरूप ॥ ३ ॥ तेथें अंधेर नाज्ञां-

दणें। दिशा दिसती भिन्न भिन्न । संपादिली पाहिजे खूण । सद्गुरुची ॥ ४ ॥ म्हणे मुक्ताबाई । येथें नये हो बोलतां । निघाली हे माथा । अगम्याची ॥ ५ ॥

३०

आत्मविचारा ठायीं सर्व एकाकार । नाहीं नारीनर भिन्न भेद ॥ १ ॥ वर्णाश्रम धर्म आणि कुळ गोत्र । एकाकार होत आत्मत्वेंचि ॥ २ ॥ चांगया भिन्नता मुळिच कांहीं नाहीं । सदोदीत पाही मुक्ताई म्हणे ॥ ३ ॥

३१

अधारींच्या चारी षड्दळी सहा जी । मणीपुरी दहाजणी आल्या जमा ॥ १ ॥ अनुहातीं बारा विशुद्धीच्या सोळा । सुबुद्धि वेल्हाळा चाले पुढें ॥ २ ॥ द्विदळीं दोघी सहस्रदळीं दोन्हीं । बावन योगीनी झाल्या जमा ॥ ३ ॥ औटपीठाहुनि वाट ही चढली । गोल्हाटीं काढिलें पुनः अग्नीं ते ॥ ४ ॥ औटपीठाहुनि चाचरी लाविली । खेचरी ओढली भूचरींत ॥ ५ ॥ भूचरीच्या अंगीं अगोचरी साधिली । अलक्ष माउली आली हातां ॥ ६ ॥ त्याहूनि पलीकडे ब्रम्ह निरंजन । स्थीर तेथें होऊन घडी एक ॥ ७ ॥ त्याहूनि पलीकडे जिवा शिवा भेटी । पाहून मूळदृष्टीं मागें यावे ॥८॥ भेटी झाल्यावरी होईल समाधान । मुक्ताई सांगे खूण सद्गुरुची ॥ ९ ॥

३२

बापभाग्या योगींद्र ।नभ गोसावी स्वयें सार । सुनीळ गुह्याचें विवर उघडिलें असें ॥१॥ मूळ धैर्येन टाकिला। रवी अग्रभाग घेतला । प्रकाश गुह्य तेथिला। मुर्तीमंत ॥ २ ॥ मग पाहिला प्रातःकाळ । सुनीळ प्रकाशली शाम नीळ । अवघा चिदानंद प्रांजळ । ऐसें जाहलें ॥ ३ ॥ तेथें अनंत विद्युल्लता नयनीं । शुद्धत्व रूपें गोसाविणी । ब्रम्हांड भावा-

ची देखणी। प्रगटली ॥ ४ ॥ म्हणे मुक्ताबाई भरतें आलें। तेथें डोलती स्वरुपाचीं गिरिवरें। येती देह्याच्या समोरें। भेटावया ॥ ५ ॥

३३

मग रोमांच सकळा। तटस्थ पातीं लागलीसे डोळां। ओंकार छिद्र भूगोला। शीघ्रवेळा अनुभवा॥१॥ तेथें गवसणीचें नव्हे काम। शरीर केलें पाहिजे आराम। स्वयें सद्गुरु पुरुषोत्तम। थापटूं लागे ॥२॥ तेथें सुख सुखत्वा। बोला अबोलणें जाहलें। पुढें त्रिदुलें उगवलें। गुह्य गुप्त ॥ ३ ॥ तेथें नर नारायण ईश्वर । ब्रम्ह जाहलें नैश्वर। झडझडीत तुषार। अनुभवाचें ॥ ४ ॥ तेथें दाविता ना निवता। भेटी जाहली एकली एका। दया सद्गुरु समर्थें। ऐसी केली ॥ ५ ॥ म्हणे मुक्ताबाई। तेथिचें हें मूळ। प्राप्तीचें हें फळ। वेचूं लागे ॥६॥

३४

मग चक्राकाराची वुंथी। पांघरला श्याम कांती। दिव्यांबरें लखलखिती। गोमटेपणें ॥ १ ॥ उदय होवोनि मावळे। दादा आरिसा खेळे। तेथें पापणी एकपळे। हालों नेदी ॥ २ ॥ तेथें देह्या भरुनि ताटें। ढळती सकळ कुंभाची काटे। तेथें सद्गुरु समर्थ भेटे। रक्षूं लागे ॥ ३ ॥ तेथें शरीराचें पिसे। नेणोनि वारियेलें कैसें। एकसरा माणसें। धाडलागे ॥ ४ ॥ म्हणे मुक्ताबाई। एकांताचें पाहणें। समाधी देखणें। येणें रीती ॥ ५ ॥

३५

पैल राउळा महात्वरें। आकार निका दिवाकर। दुजें आरक्त दिसें द्वार। कुंडलनीये ॥१॥ येथें पायरी मन चपळ। निरमूं पाहे दृष्टीचें पडळ। वरी साचिलें घनवट अळें। कृपा आगुली ॥ २ ॥ तेथें इडता केला माथुला। पाहिला विश्वगुंतीचा बाफला। निजका कांहीं उठला। दिसूं लागे ॥३॥

वसे निवृत्तीची कृपा । पुढें ज्ञानानंद दीपा । सोपी जाहली मुक्ता । सरिता उलंघावया ॥ ४ ॥

३६

तुझें अग्रभागा तेणें नाव । तो म्हणों नये जीव शिव । सदैव रायाचे संगीये । उवडे तेंच ब्रम्हं गुह्याचे ॥ १ ॥ तो एकटपणी एकला । संदेहचि भागला मुकला । स्वप्रभावादि त्याला । मिरवूं लागे ॥ २ ॥ श्वेतपीत वर्णाकार । आरक्त शेंदुर चक्र । तंव मावळोनिया पुरे । इवप्रभा ॥३॥ तेथें शून्य मोटकेपणें । निर्झर वाहती ते जीवनें । धृती जाहली मोहन मौन्यें । एकले एक ॥ ४ ॥ निवृत्ति तयाची पाउटी । ज्ञान सोपी कुसुमाकांती । विराली मुक्तपणा मुक्ती । आपुलीया ॥ ॥ ५ ॥

३७

नगाचे भोग ते सिद्ध साधु संत । ज्ञानाचा अर्थ तया पोटीं ॥ १ ॥ ज्ञानें करुनि धाले अल्पत्व पावले । सुखाचें पैं झालें तेणें सुख ॥ २ ॥ शेती आणि स्थिती ओळीवरी ओळी । भक्तीची नवाळी होती जया ॥ ३ ॥ म्हणे मुक्ताबाई चिन्मयाचें सार । नग ते अपार साधु त्याले ॥ ४ ॥

३८

विराटाचें मौन्य चिन्मय कोंदण । मायेचें चैतन्य नग एक ॥ १ ॥ स्वरूप चिद्रत्न चिन्मयाची ज्योति । पाहतां नेत्रपातीं तटस्थ ठेलीं ॥ २ ॥ कोंदलें गे माये अंतर बाहेर । उपमा दिनकर देतां नये ॥३॥ म्हणे मुक्ताबाई नग जडला डोळा । आदिरंगाच्या कळा मावळल्या ॥ ४ ॥

३९

मुरुनि विराले तया नगा पोटीं । त्या नांव हें सृष्टी नग रूप ॥ १ ॥ सर्वही देहाचा चैतन्य नग झाला । येणें जाण याला नगरूप ॥ २ ॥ पाठीं पोटीं नग व्यापिला सर्वांगीं ।

समाधी त्याला जगीं नगरूप ॥ ३ ॥ कानीं नाकीं नग त्याले ज्ञानी जगीं । नग युगा युगीं कामा आले ॥ ४ ॥ म्हणे मुक्ताबाई लेवविलें मज । पाहुनिया बीज शुद्ध अंगीं ॥ ५ ॥

४०

फुलला आदित्य जडावाचे पोटीं । आत्मा स्वयंज्योति नग झाला ॥ १ ॥ रोमा रोमीं जडला भरला नखो नखीं । देखणेचि चोखीं नग झाला ॥ २ ॥ ज्याचे त्याचे अंगीं हाचि नग असे । गुरुकृपें दिसे सर्वांभूति ॥ ३ ॥ म्हणे मुक्ताबाई ल्यावे तैसे प्यावे। आल्या वाटे जावें स्वरूपीं द.दा॥४॥

## ४१ संवाद

अरतीं ये ग धाकटे मुली । हीच काय जी तुमची बोली ॥ १ ॥ घरदार रीण करते । मडक्यानें भोंक बुजाविते ॥२॥ फुटक्या मडक्यास नऊ वाटा । येउन बैसगे माझ्या दारवंटा ३ हा हा दावा दारवंटा । तुझ्यानें झाला मोठा ॥ ४ ॥ तुझ्या माझ्या समोर उभा राहिला तो कोण । तुझे आंत गेला भिक्षोन ॥५ ॥ हातीं दिधला घोडा । भाव धरशील तर देईन, नाहीं तर देईन आपुला *डा ॥ ६ ॥ फटग माझे सवती । तु?ा सहाजण *वती ॥ ७ ॥ सहाजण कोण कोण गे बाई सवती । पडली षड्विकाराचे हातीं ॥ ८ ॥ षड्विकार कशानें ग जाती । सद्गुरुचे पाय धर चित्तीं ॥ ९ ॥ सद्गुरु देईल उपदेश तुला । तनमनधन देईन त्याला ॥ १० ॥ संसार देईन सारा । उद्यां येईल काळाचा फेरा ॥ ११ ॥ आम्हीं पतिव्रता नारी । शिंदळ कां गे तुझ्या घरीं ॥ १२ ॥ असें कोण कोण म्हणती ग बाई । चारी वेद देती ग्वाही ॥१३॥ मिरावाई मुक्ताबाई त्यांनीं केला संग । सवें भेटला पांडुरंग ॥ १४ ॥ ऐसें कोण मिळेल ग बाई । निजवृत्ति धरुनि राहे निवृत्तीचे पाईं ॥ १५ ॥

## ॥ नरसी मेहता ॥

१

गौचरी घेर आवे, वालोजी मारो गौचरी घेर आवे ॥ धृ० ॥ हाथमां लाकडीया ने खभे कामळीया, मीठीसी मोरली वजावे ॥ १ ॥ गुंजा फर हर मनोहर, मोर मुगुट शीर सोहीए ॥ २ ॥ शामतणी सुंदरता जोई, वृजवनिता मन मोहिए ॥ ३ ॥ कुम कुम केरा छडा देवरावुं, मोतीडे चोक पुरावुं ॥ ४ ॥ नरसईयाना स्वामी मंदिर पधारो, शेरी-ए ते फुलडा वेरावुं ॥ ५ ॥

२

जन्म धरी शुं कीधुं, मुनशा जन्म धरी शुं कीधुं ॥धृ०॥ क्यांथी आव्यो ने क्यां तूं जइश, एक काम नव सीधुं ॥१॥ अमृतनो रस ढळतो मुकी, विष हळाहळ पिधुं ॥ २ ॥ नर-सईयाना स्वामी पतीतपावन, तेनुं नाम नव दीधुं ॥ ३ ॥

३

जाय छे जवानी तारी, हरीना भजनविना जाय० ॥धृ०॥ काया तारी कंचन जेसी, मोती जेसा पाणी । मुवा केडे बाळी मुकसे, उडी जासे वानी ॥ १ ॥ जाती रहेशे जवानी ने पछी थशे हानी । छानामाना जम आवशे, लेई जासे तानी ॥ २ ॥ माया तमे मुकी दो ने, थाओ ने ज्ञानी । नरसईयानो स्वामी साचो, दुनिया दीवानी ॥ ३ ॥

४

जेणे रे गोविंदराम तमने विसार्या, तमने विसार्या ते नर भवोभव हार्या ॥ धृ० ॥ तमने विसारी कवण सुख कीधुं; अमृत ढोळी हळाहळ पीधुं ॥ जेणे रे ॥१॥ तमने विसारी अवर मन मोहयुं, कोडीने बदले कंचन खोयुं ॥ २ ॥ तमने विसारी अवर रंग रच्या, वांझ न रही तेरी जनुनी माता

॥ ३ ॥ तमने विसारी निद्राभरी सुतो, भणे नरसईयो ते नर भवोभव गुंतो ॥ ४ ॥

५

जेणे सामळिया चरण रस चाख्यो, तेणे संसारनो कुंचो करी नांख्यो ॥ धृ० ॥ जे नर कृष्णचरणना भोगी, ते नर जाणो तमे सवळा जोगी ॥ १ ॥ जे नर कृष्णचरणथी अळगा, ते जन घड मुकी डहाळे वळग्या ॥ २ ॥ जे नर कृष्णचरणथी नाठा । भणे नरसईयो ते नर भवमां गांठ्या ॥ ३ ॥

६

झांझर झमखां ने आंखडी उचांडी, निरख्या वदन सकोमळ साडी रे ॥ धृ० ॥ आसन वाळीने बेठा वनमाली, मोटां मोटां जोगेश्वर शुं लागी ताली ॥ १ ॥ सोनानी झारी करमा रे लीधी, भरी सभामां नागर नरसईयाने दीधी ॥ २ ॥ मे जाणुं ते वालो मारो ब्रम्हचारी, सोलसहस्त्र गोपीओ छे घरनी नारी ॥ ३ ॥ नरसईयो कहेछे मारि श्री पेर थाशे, बांवडी ग्रहो तो मारी देहडी जाशे ॥ ४ ॥

७

नारायणनुं स्मरण करतां, वारे तेने तजीये रे । मनशा वांछा क्रमण करीने, रुडा लक्ष्मीवरने भजीए रे ॥ धृ० ॥ कुळ तजीने कुळधर्मने तजीए, तजीएं मातने तात । भ्रात भगिनि सर्वे तजीए, जेम तजे कांचळी साप रे ॥ १ ॥ प्रथम पिता प्रल्हादे तजीया, ना तजीयुं हरीनुं नाम । भरथशत्रुघ्न तजी जनिता, नव तजीओ श्रीराम रे ॥२ ॥ ऋषीपत्नी राघवने काजे, तजी लो भरथार । ते माटे कांई कुछुं ना पडीयुं, पाम्या पदार्थ चार रे ॥ ३ ॥ व्रजवनिता विठ्ठलने काजे, सर्व तजीने वन चाल्यां । भणे नरसईयो वृंदावनमां, श्रीकृष्ण संगाथे माहाल्या रे ॥ ४ ॥

८

रामकृष्ण रामकृष्ण बोलोरे बावा । दलडामांथी दुर करो दुनियाना दावा ॥ धृ० ॥ पूर्ण पुन्य पाम्याछो अवतार आवा, आवी उत्तम कुल प्रगट्या लाहावोरे लेवा॥१॥ चालवा चरण आप्या तीर्थे न्हावा, सेवा करवा कर आप्या समरणी सावा ॥ २ ॥ नेत्र आप्यां हरी निरखवा, मुख प्रसाद खावा । जुगदीशे जीभ आपी, हरि गुण गावा ॥ ३ ॥ मस्तक आप्युं मानवी, हरी गुरुने नमवा । कहे नरसंईयो कान आप्या, हरी गुण सांभळवा ॥ ४ ॥

९

संत अमारा वेहेवारीया, श्रीरामनामना । वेपारी आवे रे बधा, गामगामना ॥ संत० ॥ धृ० ॥ अमारुं वसाणुं सारुं सऊ कोईने भावे । अढारे वर्ण जेने होरवाने आवे ॥ १ ॥ अमारुं वसाणुं काळ–दुकाळे ना खुंटे । जेने चोर न लुंटे जेने राजा न दंडे ॥ २ ॥ राम नाम धन्य मारे वाजे ने गाजे । छपन उपर भेर भुंगळो वागे ॥ ३ ॥ लाखतणां तो लेखा नहीं ने पारवनी छे पुंजी । होरवुं होय तो होरी लेजो कस्तुरी छे मोंघी ॥ ४ ॥ आवरोने खातावहीमां लक्ष्मीवरनुं नाम । चिठ्ठीमां चतुर्भुज लख्यां नरसईयानुं काम ॥ ५ ॥

१०

हरी हरी रटण कळिकाळमां, दाम बेसे नहीं काम सरशे। भक्ताधिन छे शामसुंदर सदा, ते तारा कारज सिद्ध करसे ॥ धृ० ॥ अल्प सुख सारुं शुं मुढ फरतो फरे, सीसपर काळ रह्यो दंत करडे। पाभर पलकनी खबर तुजनें नहीं, मुढ शुं नोईने मूंछ मरडे ॥ १ ॥ प्रौढ पापे करी बुद्धि पाछी फरी, पर हरी थड शुं डाळ वळग्यो । इशने ईर्षा छे नहीं जीनपर आपणे, अवगुणे रह्योरे अळगो ॥ २ ॥ प्रपंच परहरो

सार रुदीए धरो, उधारो हरीमुखे अचळ राणी। नरसईया हरीतणी भक्ति भुलीश मां, भक्तिविना बीजुं धुळधाणी ॥ ३ ॥

११

हरी तणुं हेत तने केम गयुं विसरी, पशुरे स्हेडीने नर रुप कीधुं। हाड ने छेद करी सहु तने हांकतुं, आज वधारीने मान दीधुं ॥ ध्रु० ॥ घांचीनुं गाळियुं कंठथी टाळियुं, नेत्रना पाणी श्रीनाथे छोड्या। ते तणां चरणने नव भज्या कृतघ्नी, तेना गुण पाड्यां हाथ जोड्या ॥ १ ॥ पग ठोकी करी मागतो मुढ मती, घास पाणी करी शब्द झीणा। आज गोविंद गुण गाईने नाचतां, लाज आवे तने कर्म हीणां ॥ २ ॥ लांबीशी डोक ने कांई ललचावतो। उंट जाणी घणो भार लादे। आज अमृत जमे हरखे हळवो भमे, वैकुंठनाथने नव आराधे ॥ ३ ॥ पिठ अंबारी ने अंकुश मार सही, वेण उंडा तो धरणी हेठो। आज चुवाचंदन आभ्रण अंग धरी, वेगे जाय छे तूं वेहले वेठो ॥ ४ ॥ अन्न ने वस्त्र भूषण सर्व जे, तेहनो तुजने हतो उधारो। नरसईयाना स्वामिए सर्वे सारुं कर्युं, ते प्रभुने तमे कां विसारो ॥ ५ ॥

१२

स्मरने श्रीहरी मेल्य ममता परी, जोने विचारिने मुळ तारुं। तूं अल्या कोण ने कोणे वळगी रह्यो, वगर समजे कहे म्हारुं म्हारुं ॥ ध्रु ॥ देह तारी नथी जो तूं जुगते करी, राखतां नव रहे विश्वे जाये। देह संबंधी तजी नव नवी बहु थशे, पुत्रकळत्र परिवार व्हाए ॥ १ ॥ धनतणु ध्यान तूं अहर्निश आदरे, एज तारे अंतराय मोटी। पास छे पियु अल्या तेने नव परखियो, हाथथी बाजी गई थयो रे खोटी ॥ २ ॥ भर निद्राभर्यो रुंधि वभा घणो, संतना शब्द सुनी कां न जागे। जागतां नरसईया लाज छे अति घणी, जन्मोजन्म तारी संत मागे ॥ ३ ॥

# ॥ मुक्ताबाई ॥

४२

अजपाचें मौन्य सहस्त्र अर्थ शिकले । नाहीं त्याणें पू-सिलें ज्ञान कांहीं ॥ १ ॥ तेथें कोण वर्म नाहीं तें कळलें । ब्रम्हयानें केलें घोषपाठ ॥ २ ॥ घोषाचा अभ्यास पारायण वेद । गुरुगम्य भेद कळला नाहीं ॥ ३ ॥ न कळे तें कळे पुसिलें विचारें । हाही तो प्रकार केला नाहीं ॥ ४ ॥ सार-खींच खोडें सारखींच पानें । कैवी हो हिंगणे हेचि होती ॥ ५ ॥ हिरे आणि गारा दगड आणि मोल । हिरीयाच्या मोलें गारा न होती ॥ ६ ॥ म्हणे मुक्ताबाई गुरु शिष्य सा-रिखा । निगुरुच्या अर्था संपादेना ॥ ७ ॥

४३

साधकाहूनि अधिक ऐकती बोलती । परि नव्हे स्थिती वैराग्याची ॥ १ ॥ देखिल्या ऐकिल्या अंतर बोलती । नव्हे संपादणी बहुरूप्याची ॥ २ ॥ काना डोळीयाचें अंतर चार बोटें । तैसे ब्रम्ही पाठ वेद झाले ॥ ३ ॥ प्रसादापरिस अधिक शीघ्र कवी । परि शब्दाची चवी लाभ नाहीं ॥ ४ ॥ दत्तात्र-याहूनि अधिक संन्यासी । देलण्याचे राशी तोचि जाणे ॥ ५ ॥ म्हणे मुक्ताबाई चोर साव सारिखा । धनाचिया अर्था कळों येती ॥ ६ ॥

४४

गुणाची गोमटी दिसती वृंदावन । अनाराचे गुण केंवी येती ॥ १ ॥ पोंवळयाहून अधिक दिसे रानगुंज । शृंगाराचें काज कळों येतें ॥ २ ॥ खर आणि अश्व प्रसवति शिंगरें । मोलाच्या प्रकारें कळों येती ॥ ३ ॥ ऊंसाहूनि एरंड वरता

सुरवाडी । इक्षु ऐशी गोडी नये त्यासी ॥ ४ ॥ दोडक्या घोसाळ्याच्या सारख्याच शिरा । चवीच्या प्रकारा कळूं येती ॥ ५ ॥ म्हणे मुक्ताबाई सारखीच बोलणीं । गुणी अवगुणीं रहस्य कळे ॥ ६ ॥

४५

जैसा दीपक ठायीं ठेविला । तो चोरा सारखा झाला । तैसा तुम्ही केला, बोध देवा ॥ १ ॥ तुम्ही एक मुक्त कैवल्य । ते विश्वकर्में सारखे जाहले । सत्य ब्रीद आपुलें । वेद बोले ॥ २ ॥ जैसें आपण करूं जाये । तैशीं धरितो विश्वंभर नांवें । परि सद्गुरु कृपा नव्हे । जाहली नाहीं ॥ ३ ॥ जैसे पर्वत दरीचे ओघ । । समुद्रीं निघाले सैघ । तैसे तुझीयानें जग । मुक्त झाले ॥ ४ ॥ जे जगदीशें गांजले । ते शेवटीं ब्रम्ह जाहले। अमर्यादेसि आले। अति वैभवाचे ॥५॥ सद्गुरुतें सांडिल्या पाही । ते कोठें गेलिया मोक्ष नाहीं। देही अथवा विदेही । नाडिले देखा ॥ ६ ॥ मुक्ताबाई म्हणे सद्गुरु वचन । निवृत्ति देवाचा सत्य प्रश्न । ज्ञानेश्वराचा सोपान । भाविकाला ॥ ७ ॥

४६

शून्याचे पोटीं सकळ माया सृष्टी । शून्यासि शेवटीं ठाव नसे ॥ १ ॥ शुन्यें निशून्य दृष्टीचें देखणें । निळियाची खाण प्रभा जशी ॥२॥ प्रभा ते आरती जोत ते परती । अहं सोहं विरती अक्षरामाजीं ॥ ३ ॥ मुक्ताबाई म्हणे अक्षर हें नोहे । चांगया तूं पाहीं निरखूनि ॥ ४ ॥

४७

धन्य धन्य सद्गुरुराव । माझे देहीं दाविला देव ॥ १ ॥ माझ्या देहीचे देऊळ केलें। आत्मलिंग दाखविलें ॥ २ ॥ स्वानंदाचें जळ आणिलें । त्यांत देवाचें पूजन केलें ॥ ३ ॥ मन

बेलपत्री केली । तुजलागि समर्पिली ॥ ४ ॥ त्रिगुणाची वळु-नि वाती । सत्रावीच्या लाविल्या ज्योति ॥ ५ ॥ पंचप्राणाची आरती । मुक्ताबाई ओंवाळिती ॥ ६ ॥

४८

योगिया म्हणवी आणि इंद्रियाचा रंकू । तयाचा विवेकू जळो परता ॥ १ ॥ शास्त्रवेत्ता म्हणवी आणि वितंडवादकू। तयाचा विवेकू जळो परता ॥ २ ॥ ब्रम्हनिष्ठ म्हणवी आणि अहंकाराचा पंकू । तयाचा विवेकू जळो परता ॥ ३ ॥ अभिमानें युक्त वेदाचा पाठकू । तयाचा विवेकु जळो परता ॥ ४ ॥ म्हणे मुक्ताबाई मूळ संसार माइकु । तयाचा विवेकू जळो परता ॥ ५ ॥

४९

वेदासि पुरेना श्रुतीसी उरेना । गुरुगम्यें आठवेना मौन्य जाहलें ॥ १ ॥ तेथें आज्ञानाची काय चाले श्रुती । स्वामी ज्ञानमुर्ती चित्त देवो ॥ २ ॥ नवविधा भक्ती पूर्ण बोध आला । तो तुम्ही आपुला साठवावा ॥ ३ ॥ पुजा प्रदक्षिणा करितो नमस्कार । वाणी करा पार दयानिधी ॥ ४ ॥ येथें चाळाचुळ न करावें मन । ब्रम्हीं अनुसंधान पुरे लावा ॥५॥ पूजियेला गुरु श्रुतीसी नमन । संताचे चरण वंदियेले ॥ ६ ॥ म्हणे मुक्ताबाई जाणती नेणती । असो सर्वाभुतीं नमन माझें ॥ ७ ॥

५०

वणा पुरा कोठें सांगावया वाट । दिसतो प्रगट गुप्त कैसा ॥ १ ॥ गातो हा नाचतो ऐकाया बैसतो । व्याकरण करितो अनुभवासी ॥ २ ॥ जेविता जेवितां पुरे पुरे म्हणे । भरलें तें जाणें अनुभवासी ॥ ३ ॥ म्हणे मुक्ताबाई ऐसे साक्ष व्हावें । तरीच रिघावें वैराग्यासी ॥ ४ ॥

९१ ॥ पद ॥

चाल निरंजना सुख होईल मना ॥ धृ० ॥ चांग भांग करुनि सोंग दाविसी तूं काई । वरधन्याची भेटि नाहीं व्यर्थ जन्म जाई ॥ १ ॥ वरल्या भोंवया सारून पोरी देह सुपली वारी । वरधन्याची भेटि जाहल्या वैस मूळचे पारीं ॥ २ ॥ मुक्ताबाई म्हणे हें तो निवृत्तीचें देणें । निजस्वरूपा न्यून्य नाहीं वैराग्याचें ठाणें ॥ ३ ॥

## ॥ गोरा कुंभार ॥

८

ब्रम्हमूर्ती संत जगीं अवतरले । उद्धरावया आले दीन जनां ॥ १ ॥ ब्रम्हादिक ज्याची वंदिती पायवणी । नाम घेतां वदनीं दोष जाती ॥२॥ हो कां दुराचारी विषया आसक्त । संत कृपें त्वरित उद्धरती ॥ ३ ॥ अखंडित गोरा त्यांची वास पाहे । निशिदिनीं ध्याये संतसंगा ॥ ४ ॥

९

केशवाचें ध्यान धरुनि अंतरीं । मृत्तिके माझारि नाचतसे ॥ १ ॥ विठ्ठलाचें नाम स्मरे वेळोवेळ । नेत्रीं वाहे जळ सद्गदीत ॥ २ ॥ कुलालाचें वंशीं जन्मलें शरीर । तो गोरा कुंभार हरीभक्त ॥ ३ ॥

१०

निर्गुण रूपडें सगुणाचे कुंथी । विठ्ठल निवृत्ति प्रवृत्ति दिसे ॥ १ ॥ एक पुंडलीक जाणे तेथील पंथ । तुम्हां आम्हां चित भाग्य योगें ॥ २ ॥ सभाग्य विरळे नामा पाठीं गेले। अभागी ते ठेले मौन्यरूप ॥ ३ ॥ म्हणे गोरा कुंभार नामया भोगितां । उरल्या उचिता सेवूं सुखें ॥ ४ ॥

११

काया वाचा मन एक विध करी । एक देहीं धरी नित्य

सुख ॥ १ ॥ अनेकत्व सांडी अनेकत्व सांडी । आहे तें ब्र-
म्हांडीं रूप तुझें ॥ २ ॥ निर्वासना बुद्धि असतां एकपणें ।
सहज भोगणें ऐक्य राज्य ॥ ३ ॥ म्हणे गोरा कुंभार नाहीं
रूप रेखा । तेचि तुझ्या सुखा नामदेवा ॥ ४ ॥

१२

सरितेचा ओघ सागरीं आटला । विदेही भेटला मना मन
॥ १ ॥ कवणाची संगत पुसावया कवणातें । सांगते ऐकतें
तेथें कैचें ॥ २ ॥ नाहीं दिवस याति नाहीं कुळ राती । नाहीं
माया भ्रांति वेगळीच ॥ ३ ॥ म्हणे गोरा कुंभार परियेसी
नामदेवा । सपांडला ठेवा विश्रांतीचा ॥ ४ ॥

१३

एकमेका माजी भाव एकविध । असो एका बोधें भेद
रहित ॥ १ ॥ तूं मज ओळखी तूं मज ओळखी । मी तुज
देखत आत्मसुखी ॥ २ ॥ आत्मवस्तु देहीं बोलतों लाज
वाटे । अखंडता विखुंटे स्वरूपाची ॥ ३ ॥ म्हणे गोरा कुं-
भार अनुभवाचा ठेवा । प्रत्यक्ष नामदेवा भेटलासी ॥ ४ ॥

१४

अंतरींचें गुज बोलूं ऐसें कांहीं । वर्ण व्यक्ती नाहीं शब्द
शून्य ॥१॥ जय जय जय झनकुट जय झनकुट । अनुहात
झंगट नाम गर्जू ॥ २ ॥ परतल्या श्रुती म्हणती नेती नेती ।
त्याही नादा अंतीं स्थिर राहे ॥ ३ ॥ म्हणे गोरा कुंभार
सत्राविचें नीर । सेवी निरंतर नामदेवा ॥ ४ ॥

१५

वंदावें कवणासी निंदावें कवणासी । सिंपावें गगनासी
कैसें लिंपे ॥ १ ॥ नाहीं जया रूप नाहीं जया नाम । तेंचि
व्यापी वर्म सांगतसे ॥ २ ॥ जीवनीं चंद्रबिंब बिंबलें पैं
साचात । परि नाहीं बिंबत जवळी जेंवी ॥ ३ ॥ म्हणे गोरा
कुंभार नामया जिवलगा । आलिंगन देगा मजलागीं ॥ ४ ॥

१६

कवणाची स्तुती करूं कवणे वाचे । बोध संकल्पाचे गिळिलें साचे ॥१॥ मन झालें मुके मन झालें मुके । अनुभवाचे सुखें हेलावलें ॥ २ ॥ दृष्टीचें पाहणें परतलें मागुती । राहिली निवाती नेत्रपातीं ॥ ३ ॥ म्हणे गोरा कुंभार मौन्य सुख घ्यावें । जीवें ओवाळावें नामयासी ॥ ४ ॥

१७

कैसें बोलणें कैसें चालणें । परब्रम्हीं राहणें अरे नाम्या ॥ १ ॥ जेवि त्याची खूण वाढी तोचि जाणें । येरा लाजिरवाणें अरे नाम्या ॥ २ ॥ म्हणे गोरा कुंभार अनुभवी तोचि जाणे । आम्हा तेरसी राहणें अरे नाम्या ॥ ३ ॥

१८

देवा तुझा मी कुंभार । निशी पापाचे डोंगर ॥ १ ॥ ऐशा संता शरण जाती । घडें साधूची संगती ॥२॥ पूर्ण कृपा भगवंताचीं । कुंभार गोरा मागे हेंचि ॥ ३ ॥

१९

अनंत नामाचा हा देव । भावें आकळे पंढरीराव ॥ १ ॥ तो हा विठ्ठल निधान । ब्रम्हादिकां ज्याचें ध्यान ॥ २ ॥ गोऱ्या कुंभाराचे हातीं । मडकें घडवी श्रीपती ॥ ३ ॥

२०

रोहीदासा शिवराई साठीं । दिधली पुंडलीका भेटी॥१॥ पुंडलीका झाला अनुताप । धन्य संत मायबाप ॥२॥ जन्मा येवोनि केली करणी । व्यर्थ शिणविली जननी ॥ ३ ॥ नऊ महिने ओझें वागवून । नाहीं गेला तिचा शीण ॥ ४ ॥ ऐसा झालों अपराधी । क्षमा करा दयानिधी ॥५॥ ऐसा पुंडलीकाचा भाव । उभा केला पंढरीराव ॥ ६ ॥ भक्ता पुंडलीका साठीं । उभा भीवरेच्या तटीं ॥ ७ ॥ कटावरी ठेऊनि कट । उभा विटेवरी नीट ॥ ८ ॥ ऐसा भाव धरी म्हणे गोरा । तीर्थां जासी फजितखोरा ॥ ९ ॥

## ॥ भानुदास ॥

११

आजि कां यमुना स्थिर स्थिर वाहे । रविमंडळ चालतां स्तब्ध होये । शशी कूर्म वराह थाकित राहे । बाळा स्तनपान द्याया विसरली माये ॥ १ ॥ वृंदावनीं वेणू कोणाचा माये वाजे । येणें नादें गोवर्धन गाजे । पुच्छ पसरूनि मयूर विराजे । मज पाहतां भासती यादवराजे ॥ २ ॥ धेनु चारा चरूं विसरली । पक्षिकुळें निवांत राहिलीं । गाई व्याघ्र हीं एके ठायीं झालीं । वैरभाव समूळ विसरलीं ॥ ३ ॥ ध्वनी मंजुळ मंजुळ उमटती । वाक्या रुणझुण रुणझुण वाजती । देव विमानीं बैसुनि स्तुति गाती । भानुदासा लागली प्रेमभक्ती॥३॥

१२

वरी आकाश पडूं पाहे । ब्रम्ह गोळ भंगा जाये। त्रिभुवन वडवानळ खाये । परि मी तुझाच वास पाहेगा विठोबा ॥१॥ न करी आणिकाचा पांगिला । नामधारक तुझाचि अंकिलागा विठोबा ॥ धृ० ॥ सप्तसागर समरस होती । परि तें विरुनियां क्षिती । पंचभूतें महालय पावती । परि मी तुझाच संगातीगा विठोबा ॥ २ ॥ भलें तैसें पडो जडभारी । परि नाम न संडे न टळे निर्धारी । जेवि पतिव्रता प्राणेश्वरी । भानुदास विनंती करीगा विठोबा ॥ ३

१३

जें सुख क्षीरसागरीं ऐकिजे । तें सुख वैष्णव मंदिरीं देखिजे ॥ १ ॥ धन्य धन्य तें वैष्णव मंदिर । जेथें नामघोष निरंतर ॥ २ ॥ टके पताका द्वारी तुळसी वृंदावन । मन निवताहे नाम संकीर्तन ॥ ३ ॥ ज्याच्या दर्शनें पाप ताप जाये । भानुदास तयासि गीती गाये ॥ ४ ॥

१४

शंख-चक्र-गदा-धरू । कासेसि सुरंग पीतांबरू । चरणीं ब्रीदाचा तोडरू । असुरावरी सोडीतसे ॥ १ ॥ बरवा बरवा केशवराजु । गरुड वाहन चतुर्भुजू । कंठी कौस्तुभ झळके विजू । मेघःश्याम देखोनी ॥ २ ॥ करी सृष्टीची रचना । नाभीं जन्म चतुरानना । जगठेवा खाणी मदना । तें लेकरूं जयाचे ॥ ३ ॥ कमळा विकासली बाई । आतं तुळसीचे ठायीं । ब्रह्मादिकां अवसर नाहीं । ओ यशोदे तो संगा ॥ ४ ॥ उपमा द्यावी कवण्या अंगा । चरणीं जन्मली पैं गंगा । सोळा सहस्त्र रमासंग भोगा । नित्य न पुरे कामी ॥ ५ ॥ अधिष्ठान गोदातिरीं । रिद्धी सिद्धी तिष्ठति द्वारीं । भानुदास पूजा करी । वाक् पुष्प अनुपम्य ॥ ६ ॥

१५

॥ फुगडी ॥

ऐक साजणीग बाई । तुझा एवढें थोर नाहीं । भाव केला वर जावाई । खायाला तुपशेवाई । प्रपंच गोड केला सगळा ग । ज्ञान फुगडी वरती सबळा ग । प्रेमा तीचा चांगटग । सुंदर पहातां आलगट ग । फुगडी फू फुगडी ग तुह्मी आह्मी खेळूं दोघी ग ॥ १ ॥ शांति सोयरि सखि माझी । तिची संगत वरी ताजी । तिचा हात धरिल्या गेली माझी । देह ममतेची त्रिज भाजी । फुगडी खेळतां हात शिणलाग । आगमींचा भेद भंगलाग । हृदयीं प्रगटला ज्ञान दीपग । गेली आज्ञानाची झोंप ग । फुगडीग० ॥ २ ॥ दया क्षमा माझी व्हाणि । तिसी म्यां धरिलें कवळून । फुगडी खेळतां आला शीण । गरगर भोवंड गेली जिरून । ऐशी फुगडी मीं खेळलें ग । ब्रह्मसुख आंगावलें ग । भानुदास ह्मणे रंगलेग । जन्म मरणा आधीं भंगले ग । फुगडी फू० ॥ ३ ॥

## ॥ कान्हा ॥

१

दुःखें दुभागलें हृदयसंपुट । गहिवरें कंठ दाटताहे ॥ ॥ १ ॥ ऐसें काय केलें सुमित्रा सखया । दिलें लोटोनियां वनामाजि ॥ २ ॥ आक्रंदती बाळें करुणावचनीं । त्या शोकें मेदिनी कांपताहे ॥३॥ काय हें सामर्थ्य नव्हतें तुजपाशीं । सर्वें न्यावयासि अंगभूत ॥४॥ तुज ठावें नाहीं आम्हां कोणी सखा । उभय लोकीं तुका तुजविण ॥ ५ ॥ कान्हा म्हणे तुझे वियोग पोरटीं । झालों देरे भेटी बंधुराया ॥ ६ ॥

२

सख्यत्वानें गेलों करीत सलगी । नेणेंचि अभागी महिमा तुझा ॥ १ ॥ पावलो आपले केलेल्या फळास । निदैवा परिस काय करी ॥२॥ कष्टविलासी म्यां चांडाळें संसारीं । अझुनियां तरी उपदेशीं ॥ ३ ॥ उचित अनुचित सांभाळिलें नाहीं । कान्हा म्हणे काई बोलों आतां ॥ ४ ॥

३

असो आतां काय करूनीयां ग्लांती । कोणा काकुलती यावें आतां ॥ १ ॥ करूं कांहीं दिवस राहो तो सायास । झोंबूं त्या लागास भावाचिया ॥ २ ॥ करितां रूदना बापुडें ह्मणती । येरीं नये अंतीं कामा कोणी ॥ ३ ॥ तुकया बंधु ह्मणे पडलीया वनीं । विचार तो मनीं बोलीला हे ॥ ४ ॥

४

चरफडे चरफड शोके शोक होय । कार्य मूळ आहे धीरापाशीं ॥ १ ॥ कल्पतसे मन ऐसें हें पाहतां । करावी ती चिंता मिथ्या साटीं ॥ २ ॥ न चुके होणार सांडिल्या

शूरत्वा । फुकटाचि सत्वा होईल हानी ॥ ३ ॥ तुकया बंधू ह्मणे दिल्या बंधू मना । वांचूनि निधाना न पविजे ॥ ४ ॥

५

न लगेचि आतां अनुमान हाता । आले मूळ भ्रांता गेला त्याचा ॥ १ ॥ वर भेद्या येथें आहे तो सुकाणूं । धरितो कवळुनु पाया दोन्ही ॥ २ ॥ त्याचे त्याच्या मुखें पडियलें ठावें । न लगे सारावें मागेंपुढें ॥ ३ ॥ तुकया बंधू ह्मणे करिल भेटी भावा । सोडीन तेधवां या विठ्ठला ॥ ४ ॥

६

मूळ स्थूळ ज्याचें गौतमीचे तीरीं । तो हा सारी दोरी खेळवीतो॥१॥ऐसें हें कळलें असावें सकळां । चोर त्या निराळा नाहीं दुजा ॥ २ ॥ वैष्णव हेर तयाचे पाळती । खूण ही निरुतीं सांगितली ॥ ३ ॥ तुकयाबंधू ह्मणे आलें अनुभवास । तेणेंच आह्मास नागविलें ॥ ४ ॥

७

बरारे निर्गुणा नष्टा नारायणा । घरबुडवणा भेटलासी ॥ १ ॥ एके वरीं कोणी कोणासी न वरी । ऐशी आपपरी केली आम्हां ॥२॥ कान्हा म्हणे कांरे निकाम देखिलें । म्हणुनि मना आलें करीतसे ॥ ३ ॥

८

धिंद धिंद तूझ्या करीन धिंदड्या । ऐसें काय वेड्या जाणीतलें ॥ १ ॥ केली तरी बरें मज भेटि भावास । नाहीं तरी नाश आरंभीला ॥ २ ॥ मरावें मारावें या आलें प्रसंगा । बरे पांडुरंगा कळलें असो ॥ ३ ॥ तुकया बंधू म्हणे तुझी माझी उरी । उडाली न धरी भीड कांहीं ॥ ४ ॥

९

भक्ती मुक्ती तुझें जळो ब्रम्हज्ञान । दे माझ्या आणून भा-

वा वेगीं ॥ १ ॥ रिद्धी सिद्धी मोक्ष ठेवी गुंडाळुनी । दे माझ्या आणून भावा वेगीं ॥ २ ॥ नको आपुलिया नेऊं वैकुंठासी । दे माझ्या आणून भावा वेगीं ॥ ३ ॥ नको होऊं कांहीं होईल प्रसन्न । दे माझ्या आणून भावा वेगीं ॥ ४ ॥ तुकया बंधु म्हणे ऐसे नाहीं तरी । हत्या होईल शिरीं पांडुरंगा ॥ ५ ॥

१०

मुख्य आहे आम्हा मातेचा पडगा । तुज पांडुरंगा कोण लेखी ॥ १ ॥ नको लावूं आम्हा सवें तूं तोरी । पहा दुःख अंतरीं विचारूनी ॥ २ ॥ साह्य संतजन केलें महाराज । नडे आतां तुज भिईना मी ॥ ३ ॥ तुकया बंधू म्हणे ऐक्यें ऐक्यतां । वाटतें अनंता दुःखें दुःख ॥ ४ ॥

११

नये साम्यसरी उपचारा हरी । करकरेने करी काळें तोंड ॥ १ ॥ मागतों इतुकें जोडूनीया कर। ठेऊनीयां शीर पायांवरी ॥ २ ॥ तुम्हां आम्हां एके ठाईच वास । येथें द्वैत द्वेष ॥ ३ ॥ काय बरा तुकयाबंधु म्हणे बहुतां बहुतां रीती । अनंता विनंती परीसावी ॥ ४ ॥

१२

लालुचाईसाठीं बळकाविसी भावा । परी जाण देवा जिरोंनेदी ॥ १ ॥ असूंद्या निश्चय हा मनीं मानसीं । घातली येविशीं दृढ कास ॥२॥ मज आहे बळ आईचें सबळ । फोडी हें आभाळ हृदय तुझें ॥ ३ ॥ करुणारसें तुकयाबंधू म्हणे भुलवीन । कोंडोनि घेईन तुज वस्तु ॥ ४ ॥

१३

तुझें वर्म आम्हां ठावें नारायणा । परी तूं शहाणा होत नाहीं ॥ १ ॥ मग काला भुली हाका देते वेळे । होतोसि

परि डोळे नुघडिसी ॥ २ ॥ जाणुनि अज्ञान करावें मोहरे । खोटी खोडी हेरे तुझी देवा ॥ ३ ॥ तुकया बंधु म्हणे कारण संचिती । पहातां वेळे किती तेंचि गुण ॥ ४ ॥

१४

अवघीं तुज बाळें सारखीं नाहींत । नवल वाटत पांडुरंगा ॥ १ ॥ म्हणतां लाज नाहीं सकळाची माऊली । एक जवळी धरी एक दुरी ॥ २ ॥ एका सुख द्यावें घेऊनी ओसंगा । एक द्वारीं गळा श्रमविती ॥ ३ ॥ एकासी नवनित दाटुनि पाजावें । एक अन्न अन्न करिताती ॥ ४ ॥ एक ओटींतलें नव जावें दुरी । एकाचा मत्सर जवळी येतां ॥ ५ ॥ तुकयाबंधू म्हणे नावडती त्यास । कातया व्यालास पांडुरंगा ॥ ६ ॥

१५

नाहीं घटका म्हणसीं । लागला गळा तुजसी । पडलें ऋषीकेशी । जाब सकळ करणें ॥ १ ॥ माझें नेलें पांवरूण । ठावें असून दुर्बळ दीन । माणसांमधून । उठविलें खाणोऱ्या ॥ २ ॥ आम्हीं हें जगवुनि होतो पाणी । संधी देव करूनी । झालासी कोठूनि । पैदा चोरा दहाच्या ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे केलें । उवडें मजचि उमगिलें । ऐसें काय केलें । होतें तुज न परते ॥ ४ ॥

१६

कनवाळू कृपाळू । उदार दयाळू मवाळू । म्हणवितो परि केवळू । गळेकापू दिसतोसि ॥१॥ काय केलें होतें आम्हीं । सांग तुझें एकया जन्मीं । झालासी तूं स्वामी । एवढी सत्ता करावया ॥ २ ॥ भलेपणाचा पवाडा । बरा दाखविला रोकडा । करुनि बंधु वेडा । जोडा माझा विघडला ॥ ३ ॥

तुकयाबंधू म्हणे भला । कैसा म्हणताती तुजला । जीव आमुचा नेला । आतां पाही कांहीं तरी ॥ ४ ॥

१७

आतां कळों आले गुण । अववेंचि यावरून । चोखट लक्षण । धरिले हे बरवेंणे ॥ १ ॥ या नांवें कृपासिंधू । म्हणवितोसि दीनबंधू । मज तरी मैंदू । दिसतोसी पाहतां॥२॥ अमळ दया नाहीं पोटीं । कठीण तैसा कपटी । आंधळ्याची काठी । माझी गुदरसीचना ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे पुरता । नाहीं बरे म्हणूं अनंता । एरवीं असतां । तुझा घोट भरियेला ॥ ४ ॥

१८

काय सांगूं ऋषिकेशा । अनुताप आला ऐसा । गिळावासि निमिषा । निमिष लागुं न द्यावें ॥ १ ॥ माझें बुडविलें घर । लेंकरें बाळें दारोदार । लावीला कहार । तारातीर करूनी ॥ २ ॥ जीव व्यावा किंवा द्यावा । तुझा आपुला केशवा । इतुकें उरलें आहे भावा । चिया निमित्यें॥३॥ तुकयाबंधु म्हणे जग । बरें वाईट म्हणो मग । या कारणें परी लाग । न सांडावा सर्वथा ॥ ४ ॥

१९

मायबाप निमाल्यावरी । घातलें भावाचे आभारीं । तोही परि हरी । तुज झाला असमाई ॥ १ ॥ हे कां भक्तीचे उपकार । नांदतें विध्वंसिलें घर । प्रसन्नता व्यवहार । शेवटी ह झालासी ॥ २ ॥ एका जीवावरी । होतीं दोन्हीं कुटुंबें हरी । चाळवूं तो तरी । तुज येतो निर्लज्जा ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे भला । आणिक काय म्हणावें तुला । वेडा तेणें केला । तुजसवें संबंधू ॥ ४ ॥

२०

पूर्वी पूर्वजाची गती । हेचि ऐकिली होती । सेवे लावूनि श्रीपती । केली निश्चिती तयाची ॥ १ ॥ ऐसे संग ऋषी-केशी । अद्यापवरी न राहसी । अंत पाहसी । किती म्हणून ॥ २ ॥ जन्म जन्मांतरीं दावा । आम्हां आपणा केशवा । निमित्य चालवा । कासयास्तव हें ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे देखणा । किती होसी नारायणा । देखो सकवेना । खातया-सी न खातां ॥ ४ ॥

२१

निसुरा संसार करून । होतो पोट भरून । केली विवशी निर्माण । देवपण दाखविलें ॥ १ ॥ ऐसा काढियला नीस । काय म्हणसी हित वंश । आणिले शेवटास । हौस तरी न पुरे ॥ २ ॥ पुरलो पाळण्या शेवटीं । ते हे न देखतां दृष्टी । दोघामध्यें तुटी । रोकडीची पाडिली ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्ह-णे गोड । बहु झाले अतिवाड । म्हणूनि कां बूड । मुळा-सहित खावे ॥ ४ ॥

२२

बरा जाणतोसि धर्म नीती । उचित अनुचित श्रीपती । करूं नये राती । ऐसे डोळे झांकुनियां ॥ १ ॥ आतां जाव काय कैसा । देसी तो दे जगदीशा । आणील तो ओळसा । आपणा आपणा भोंवता ॥२॥ सेवेचिया सुखास्तव । बळें घ-रिलें अज्ञानत्व । पैल परी हा भाव । ज्याचा त्यास कारण ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे नाहीं । आतां आह्मां बोल कांहीं । जडोनिया पाईं । तुझें त्वांचि घेतलें ॥ ४ ॥

२३

कांहीं विपत्या आपत्या । आतां आमुचिया हेता । काय होईल 'अनंता । पहा बोलूं कासया ॥ १ ॥ बरें अनायासें

झालें । सायासाविण बोले चाले । काबाड चुकविले । केलें कष्टावेगळें ॥ २ ॥ बरा सांपडलासि वोजा । वर्मावर्मी केशवराजा । बोलायासी तुझा । उजूरची नाहीं ॥ ३ ॥ तुकयाबंधू म्हणे दगा । बरा दिला होता बा गा । झडकरी चलगा । चांग देवें पावलों ॥ ४ ॥

२४

देवा तुजपें माझ्या पूर्वजाचें ऋण । आहे तें कां न देसि अझुन । अवगलासि झोडपणें । परि मी जाण जिरों नेदी ॥ ॥ १ ॥ कळों येईल रोकडें । उभा करीन संतापुढें । तुझें काय एवढें । भय आपुलें मागतां ॥ २ ॥ आजवरी हो नेणता । तों तुज फावलेरे अनंता । कवडीचा तो आतां । पडों नेदी तो फेर ॥ ३ ॥ ठेविला ये जीवनीं जीव । म्हणे तुकयाबांधव । माझा गळा तुझा पाय । एके ठायीं बांधीन ॥ ४ ॥

२५

मागें असतांसि कळला । उमस नसतां घेऊं दिला । तेणेंचि काळें केला । असतां अवघा निवाडा ॥ १ ॥ इतका न लागतां उशीर । न धरितो भीड फार । सिद्धासि व्यवहार । कासयासी लागला ॥ २ ॥ असोनीयां माल खरा । किती केल्या वेरझारा । धरणें ही दिवस तेरा । माझ्या भावें घेतलें ॥ ३ ॥ अझुन तरी इतुक्यावरी । चुकुनि जे चार हरी । तुकयाबंधू म्हणे हरी । नाहीं तरी नुरे कांहीं ॥ ४ ॥

२६

अनंता न राहे क्षण एक । तुझा कळलारे लौकिक । न देई हलों एक । कांहीं केल्या वांचुनी ॥ १ ॥ संबंध पडला कोणासी । काय डोळे झांकितोसि । नेईन पांचापासी । दे नाहीं तर उठूं ना ॥ २ ॥ सुखें नेदीसे जाणवळें । नाश

केल्या न उगले । तरी तेंही विचारिलें । आम्हीं आहे तुज आधीं ॥ ३ ॥ असेंच करुनि किती । नागविलें नाहीं निति तुकयाबंधु म्हणे अंतीं । न सोडिसी ते खोडी ॥ ४ ॥

२७

तुज ते सर्व आहे ठावे । ध्यावें त्याचें बुडवावें । परी तें आम्हां सर्व । आतां न फावे कांहीं ॥ १ ॥ नव्हे सोडायाचे धनी । कष्ट मेळविलें करूनि । पहा विचारूनि । अढी धरुनि काम नाहीं ॥ ९ ॥ अवघे राहिले प्रकार । झालों जिवासी उदार । ऐसा हा निर्धार । कळला असावा तुज ॥ ॥ ३ ॥ आतां निदसुर नसावें । गांठी पडली कुणब्यासवें । तुकयाबंधु म्हणे रहावें । देवा महत्व आपुलें ॥ ४ ॥

२८

वहु बोलणें नायका । वाउगें तें पुरुषोत्तमा । एकचि वचनें आम्हां । काय सांगणें तें सांगा ॥ १ ॥ देणें आहे कीं भंडाई । करणें आहे सांग भाई । आतां भीड कांहीं । कोणी न धरी सर्वथा ॥ २ ॥ मागें गेलें जें होउनि । असो तें धरीत नाहीं मनीं । आतां पुढें येथुनि । कैसा काय विचार ॥ ॥ ३ ॥ सारखी नाहीं अवघी वेळ । हें तों कळतें सकळ । तुकयाबंधु म्हणे खळखळ । करावी तें उरलें ॥ ४ ॥

२९

आतां हें सुटे न चुके । बोल कां दवडिसी फिके । जन लोक पारखे । अवघें केलें म्यां यासाठीं ॥ १ ॥ न ये सरता नव्हे भलें । तुझें लक्षण कळलें । वैसलासि काढिलें । देहाच्या मूळीं दिवाळें ॥ २ ॥ दिसतोसि बरा बोल कोंवळे । गुण मैंदाचे चाळे । दिसताती सगळे । काय करूं विसंबुनि ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे देखतां । अंध बधिर ऐकतां । कैसें व्हावें आतां । इतुक्या उपरी ॥ ४ ॥

३०

तिहीं ताळी हेचि हाक। म्हणती पांढरा स्फटिक। अ-वघा बुडविला लौकिक। सुखेंचि भीक लाविली ॥१॥ थोटा नांव शिरोमणी। नाहीं जोडा त्रिभुवनीं। म्हणोनि शहाणे ते कोणी। तुझें दारीं बैसती ना ॥ २ ॥ निर्गुण निलाजरा निनावा। लंड झोड कुव्या देवा। नागवणा या नांवा। वां-चुनि दुजा नाइको ॥ ३ ॥ सर्वगुणें संपन्न। कळों आलासी पूर्ण। तुकयाबंधु म्हणे चरण। आतां जीवें न सोडीं ॥४॥

३१

तोचि प्रसंग आज सहज। गुज धरितां नाहीं काज। न सांडितां लाज। पुढें ओज न दिसे ॥१॥ तूं तर न होसी शहाणा। नये सांगतां तें मना। आपण आपणा। आतां प्रयत्न करावा ॥ २ ॥ न पुर्वी पाहतां वाट। द्यावें प्रमाण चोखट। कास घालुनियां नीट। चौघाचार करावा ॥ ३ ॥ आतां श्रमाचें कारण। न व्हावें उदासीन। न पडे तयावीण। गाठी तुकयाबंधु म्हणे ॥ ४ ॥

३२

हळूहळू जाड। होत चालले लिगाड। जाणवेल निवाड। न करिसी परी पुढें ॥ १ ॥ मी सांगुनि उतराई। झालों आतां तुज काई। कळों येईल भाई। तैसा करीं विचार॥२॥ मागें युगें अठ्ठावीस। झाली दिवसांचीं दिवस। मुद्दल यात कासावीस। होसी देवा या कामें ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे राखे। आतां टाकी तुझीं तीं मुखें। जगा जाहीर ठाउकें। झालें नांव खंडलेसे ॥ ४ ॥

३३

पत्र उचटिल प्रयत्नें। ग्वाही करावया कारणें। नाहीं तरी पुण्यें। तुझ्या काय उणें आम्हां ॥ १ ॥ नांव तुझेंचि

करुनि । आहों सुखें पोट भरुनि । केली जाणवणी । म्हणुनि नाहीं म्हणसील ॥ ९ ॥ आतां इतुकियावरी । देऊं नको भलते करी । म्हणती रिणकरी । आमुच्या इतुकें उदंड ॥३॥ तुकयाबंधु म्हणे जगा । आळवावया पांडुरंगा । केली कांहीं मागा । याची नव्हती गरज ॥ ४ ॥

३४

वचन ऐका कमळापती । माझी रंकाची विनंती ॥ १ ॥
कर जोडितों कथे काळीं । आपण असावें जवळी ॥ २ ॥
घ्यावी घ्यावी माझी भाक । जरी कां मागणें आधीक ॥ ३ ॥
तुकयाबंधु म्हणे देवा । शब्द इतुकाची राखावा ॥ ४ ॥

३५

॥ दसरा ॥

पवित्र सुदिन उत्तम दिवस दसरा । सांपडला आजि साधा मुहूर्त बरा । करा जयजयकार हरी हृदयीं धरा ॥ आळस नका करूं सांगतों लहान थोरा ॥ ध्रु० ॥ १ ॥ याहो याहो बायांनो निघाले हरी । सिलंगणा घेउनि वेगीं आरती करी । ओवाळूं श्रीमुख वंदूं पाऊलें शिरीं । अहो दैव आलें आजी घरीचे घरीं ॥ २ ॥ अक्षय्य मुहूर्त औटामध्यें साद्यंत मग घन गर्जना कैशी होत जात । म्हणूनि मागें पुढें कोणी न पहावें येथें । सांडा परतें काज जाऊं हरी सांगातें ॥ ३ ॥ बहुतां बहुतां रीती चित्ति धरा या मनीं । नका गय करूं जे जे ऐकाल कानीं । मग हे सुख तुम्हीं कधीं न देखाल स्वप्नीं । मग पडेल हाय हाय पुढें होईल कहाणी ॥ ४ ॥ ऐशियासी चितीना त्याच्या अभाग्या पार । नाहीं नाहीं सत्य जाणा हाचि निर्धार । मग ही वेळ घटिका जाती अजरामर ॥ ५॥ जयासाठीं ब्रम्हादिक जाहले पिसे । उच्छिष्टा कारणें देव झाले मासे । अर्ध आंगीं विश्वपाळा लक्ष्मी वसे । तुकयाबंधु म्हणे आजी आलें अनायासें ॥ ६ ॥

## ॥ मीराबाई ॥

१

अजब सलुनी प्यारी मृगया नैनो, तें मोहन वश कीधोरे ॥ ध्रु० ॥ गोकुळमां सौ वात करेरे वाला, कां न कुबजे वश लीधो रे ॥ १ ॥ मकनो सो करि ते लाल अंबाडी, अंकुशे वश कीधोरे ॥ २ ॥ लवींग सोपारी ने पानना बीडला, राधासुं राख्यो कीनोरे ॥ ३ ॥ मीरा कहे प्रभु गिरधरनागर, चरणकमल चित्त दीनोरे ॥ ४ ॥

२

आतुर थईछुं मुख जोवाने, घेर आवो नंद लालारे ॥ध्रु० गौतणां मीस करी गयाछो, गोकुळ आवो मारा वालारे ॥ १ ॥ मासीरे मारीने गुणका तारी, टेव तमारी एसी छोगळारे ॥२॥ कंस मारी मातपिता उगार्या, घणा कपटी नथी भोळारे ॥३॥ मीरा कहे प्रभु गिरधरनागर, गुण घणाज लागे प्यारारे ॥ ४ ॥

३

अरज करे छे मीरा रांकडी, उभी उभी अरज० ॥ध्रु०॥ माणिगर स्वामी मोरे मंदिर पधारो, सेवा करुं दीन रातडी ॥ १ ॥ फूलनोरे तुरा ने फूलनारे गजरा, फूलना ते हार फूल पांखडी ॥ २ ॥ फूलनी ते गादी रे फूलना तकीया, फूलनी ते पांथरी पीछोडी ॥ ३ ॥ पय पक्वान् मीठाई ने मेवा, सेवैया ने सुंदर दहींडी ॥ ४ ॥ लवींग सोपारी ने एलची तजवाला, काथाचूनानी पानबीडी ॥ ५ ॥ सेज बीछावुं ने पासा मंगावुं, रमवा आवो तो जाय रातडी ॥ ६ ॥ मीरा कहे प्रभु गिरधरनागर, तमने जोतामां ठरे आंखडी ॥

४

आज मारे साधुजननो संगरे राणा, मारा भाग्ये मळयो ॥ धृ० ॥ साधुजननो संग जो करीए पियाजी, चढे ते चोगणो रंग रे ॥ १ ॥ सीकुटजननो संग न करीए पियाजी, पाडे भजनमां भंगरे ॥ २ ॥ अडसठ तीर्थ संतोनें चरणे पियाजी, कोटी काशी ने कोटी गंगरे ॥ ३ ॥ निंदा करसे ते तो नर्ककुंडमा जासे पियाजी, थशे आंधळा अपंगरे ॥ ४ ॥ मीरा कहे गिरिधरना गुण गावे पियांजी, संतोनी रजमां शीर संगरे ॥ ५ ॥

५

कहां गयो रे पेलो मुरलीवाळो, अमने रास रमाडी रे ॥ ॥ धृ० ॥ रास रमाडवाने वनमां तेड्यां, मोहनी मुरली सुनावीरे ॥ १ ॥ माता जसोदा शाख पुरोवें, केशर छांट्या घोळीरे ॥२ ॥ हमणां वेण समारी सुती, पेहरी कसुंबळ चोळीरे ॥ ३ ॥ मीरा कहे प्रभु गिरधरनागर, चरणकमल चित्त चोरीरे ॥ ४ ॥

६

चालने सखी मही वेंचवा जइए, ज्यां सूंदर वर रमतोरे ॥ धृ० ॥ प्रेमतणां पक्वान्न लई साथे, जोइए रसिकवर जमतोरे ॥ १ ॥ मोहनजी तो हवे मोंघो थयो छे, गोपीने नथी दमतो रे ॥ २ ॥ मीरा कहे प्रभु गिरधरनागर, रणछोड कुबजाने गमतोरे ॥ २ ॥

७

कठण थयां रे माधव मथुरा जई, कागळ न लख्यो कटकोरे ॥ धृ० ॥ अहींयाथकी हरी हवडां पधार्या, ओद्धव साचे अटक्यो रे ॥ १ ॥ अंगें सोवरणीया वावा पेर्या, शीर पीतांबर पटकोरे ॥ २ ॥ गोकुळमां एक रास रच्यो छे, क-

हा न कुबजा संग अटक्योरे ॥ ३ ॥ कालीसी कुबजा ने आंगें छे कुबडी, ए शुं करी जाणे लटकोरे ॥ ४ ॥ ए छे काळो ने ते छे कुबडी, रंगें रंग वच्यो चटकोरे॥ ५ ॥ मीरा कहे प्रभु गिरधरनागर, खोळामां घुंघट खटकोरे ॥ ६ ॥

८

कागळ कोण लेई जायरे, मथुरामां वसे रेवासी मेरा प्राण पियाजी ॥ धृ० ॥ ए कागळमां झाझुं शुं लखिए, थोडे थोडे हेत जणायरे ॥ १ ॥ मित्र तमारा मळवाने इच्छे, जशोमती अन्न न खायरे ॥ २ ॥ सेजलडी तो मुने सुनीरे लागे, रडतां तो रजनी न जायरे ॥ ३ ॥ मीरा कहे प्रभु गिरधरनागर, चरणकमळ तारुं त्यां जायरे ॥ ४ ॥

९

सांभळोजी मारी वात, बाई तमे सांभळोजी मारी वात ॥ धृ० ॥ राधा सरखी सुंदर घरमां, कुबजाने वर जात॥ १ ॥ नवलाख धेनु घरमां दुभाय, घर घर गोरस खात ॥ २ ॥ मीरा कहे प्रभु गिरधरनागर, चरणकमलपर हात ॥ ३ ॥

१०

बन जाऊं चरणकी दासी रे, दासी मैं भई उदासी ॥ ॥ धृ० ॥ और देव कोई न जाणुं, हरीबिन भई उदासी॥ १ ॥ नहीं न्हावुं गंगा नहीं न्हावुं जमुना, नहीं न्हावुं प्रयाग काशी ॥ २ ॥ मीरा कहे प्रभु गिरधरनागर, चरणकमलकी प्यासी ॥ ४ ॥

११

तोती मैना तोती मैना राधे कृष्ण बोल ॥ धृ० ॥ धुंडत धुंडत एक तोती आया, लख ठगीया नहीं मोल ॥ १ ॥ दाना ना खावे तोती पानी ना पीवे, पींजरेमे करत कलोल ॥ २ ॥ मीरा कहे प्रभु गिरधरनागर. चरणकमलपर डोल ॥ ३ ॥

१२

चीर दे बनवारी, अमारो चीर दे० ॥ धृ० ॥ लेकर चीर कलंब चढ बैठे, आम जळमे नंगी उघाडी ॥ १ ॥ तुह्मारे चीर तो तवी मै देउंगा, हो जाना जलसे न्यारी ॥ २ ॥ ऐशी प्रभुजी क्यूं करणी कैशी, तुम पुरुष हम नारी ॥ ३ ॥ मीरा कहे प्रभु गिरधरनागर, तुम जीते हम हारी ॥ ४ ॥

१३

मागत माखण रोटी, गोपाळ प्यारो मागत माखण रोटी ॥धृ०॥मेरे गोपालकु रोटी बना दऊंगी, एक छोटी एक मोटी ॥ १ ॥ मेरे गोपालकु बीहा करुंगी, ब्रखुभानकी बेटी ॥ २ ॥ मेरे गोपालकु झबला शिवाऊंगी, मोतनकी लड छुटी ॥ ३ ॥ मीरा कहे प्रभु गिरधरनागर, चरणकमलपर लोटी ॥ ४ ॥

१४

मुखडानी माया लागीरे, मोहन तारा मुखडानी० ॥धृ०॥ मुखडुं में जोयुं तारुं, सर्वे जुग थयुं खारुं, मन तारुं रहयुं न्यारुंरे ॥ १ ॥ संसारीनुं सुख एवुं, झांझवाना नीर जेवुं, तेने तुच्छ करी फरीयेरे ॥ २ ॥ संसारीनुं सुख काचुं, परणीने रंडावुं पाछुं, तेने घेर शीद जईयेरे॥३॥भणुं तो प्रीतम प्यारो, अखंड सौभाग्य मारो, रांडवानो भय टाळ्योरे ॥ ४ ॥ मिराबाई बलिहारी, आशा एक मने तारी, हवे हुं तो बडभागीरे ॥ ५ ॥

१५

मेरो मन हर लियो राजा रणछोड, मेरो मन० ॥ धृ० ॥ त्रीकम माधव ओर पुरुषोत्तम ने, कुबेर कल्याणनी जोड॥ १॥ राधा रुक्माणी ओर सतभामा, जांबुक करणी जोड ॥ २ ॥ चार पास रत्नागर गाजे, गोमती करत कलोल ॥ ३ ॥ मीरा कहे प्रभु गिरधरनागर, हरी मारा दलडाना चोर ॥ ४ ॥

# ॥ विसोबा खेचर ॥

१

एकचि आतां दुजें कां बोलणें । योग कां करणें सांग कवणा ॥ १ ॥ मरणाचे तव मार्ग वाहती । वायां काकुलती करूं नका ॥ २ ॥ खेचर विसा म्हणे जीतचि मरिजे । धन्य होइजे तिहीं लोकीं ॥ ३ ॥

२

नामया म्हणसी मज राम भेटला । हा तंव शब्द नव्हे धाकुला ॥ १ ॥ माझा मी न तुटे । तंव श्रीराम कैसेन भेटे ॥ २ ॥ खेचर विसा म्हणे जाण । जीवाचा जीव नाम्या ॥ ३ ॥

३

आहे आहे म्हणउनि गेलों । कांहीं नाहीं तें पाहुनि आलों ॥ १ ॥ कोठें मेलों कोठें धाविन्नलों । कांहीं नाहीं पाहुन कोठें राहिलों ॥ २ ॥ खेचर विसा म्हणे मुक्ताबाई । कांहीं नाहीं तें दाखवून देई ॥ ३ ॥

४

तुझें निजसुख तुजपाशीं आहे । सावध होउनि पाहे गुरुमुखें ॥ १ ॥ विवेक वैराग्य शोधुनियां पाहे । तेणें तुज होय ब्रम्ह साक्षी ॥ २ ॥ ज्ञानाचा प्रकाश सहजचि झाला । अहंभाव गेला गळोनियां ॥ ३ ॥ चित्तवृत्ति मनस्वरुपीं वेधली । एकरूप झाली ओंकारेसी ॥ ४ ॥ खेचर विसा म्हणे जेथें ओंकार निमाला । सहजचि झाला ब्रम्हबोधु ॥ ५ ॥

५

मेघावीण जळ जळाविण पूर । नख न भिजे परि नाहीं उतार ॥ १ ॥ आहे तेणें बुडे नाहीं तेणें तरे । लटकीयाचें खरें वाढविसी ॥ २ ॥ म्हणे खेचर विसा झालासि पिसा । या दृश्याची आशा सांडी नाम्या ॥ ३ ॥

# ॥ रामेश्वरभट ॥

१

माझी मज आली रोकडी प्रचीत । होऊनी फजीत दुःख पावे ॥ १ ॥ कांहीं द्वेष त्याचा करितां अंतरीं । व्यथा या शरीरीं बहु झाली ॥ २ ॥ ज्ञानेश्वरें मज केला उपकार । स्वप्नीं सविस्तर सांगितलें ॥ ३ ॥ तुका सर्वा श्रेष्ठ प्रिय आह्मां थोर । कां जे अवतार नामयाचा ॥ ४ ॥ त्याची तुज कांहीं घडली रे निंदा । ह्मणोनि हे बाधा जडली तुज ॥ ५ ॥ आतां एक करी सांगेन तें तुला । शरण जाय त्याला निश्चयेंसी ॥ ६ ॥ दर्शनेंचि तुझ्या दोषा परिहार। होय तो विचारें सांगीतला ॥ ७ ॥ तोचि हा विश्वास धरोनि मानसीं । जावें कीर्तनासी नित्य काळ ॥ ८ ॥ ह्मणे रामेश्वर त्याच्या समागमें । झाला हा आराम देह माझा ॥ ९ ॥

२

वैष्णवाची याती वाणी जो आपण । भोगी तो पतन कुंभपाकीं ॥ १ ॥ ऐसी वेद श्रुती बोलली पुराणें । नाहीं तें दूषण हरिभक्तां ॥ २ ॥ उंचनीच वर्ण न ह्मणावा कोणी । जे कां नारायणीं प्रीय झाले ॥ ३ ॥ चहूं वर्णासी हा आहे अधिकार । करितां नमस्कार दोष नाहीं ॥ ४ ॥ जैसा शाळिग्राम न ह्मणावा पाषाण । होय पूज्यमान सर्वत्रांसि ॥ ५ ॥ गुरु परब्रह्म देवाचाही देव । त्यासी तो मानव ह्मणूं नये ॥ ६ ॥ ह्मणे रामेश्वर नामीं जे रंगले । स्वयेंचि ते झाले देवरूप ॥ ७ ॥

३

पंडित वैदिक अथवा दशग्रंथी । सरी न पावती तुकयाची ॥१॥ शास्त्रेंही पुराणें गीता नित्य नेम । वाचितां तें वर्म नकळे तयां ॥ २ ॥ मागें कवीश्वर झाले थोर थोर । कोणी कलेवर

नेलें सांगां ॥ ३ ॥ ह्मणे रामेश्वर सकळिकां पुसोनि । गेला तो विमानीं बैसोनीया ॥ ४ ॥

---

## ॥ नारायण ॥

( श्रीनामदेवाचे पुत्र )

१

किती तुजलागीं करूंरे विनंति । धांव रघुपती दीनबंधू॥ १ ॥ कां नयेचि दया कोठें गुंतलासी । नको अनाथासी मोकलूंरे ॥ २ ॥ आपुलें नामीं कैंचि एकाग्र हें मन । काय देवा अझुनि पाहतोसी ॥ ३ ॥ सर्वस्वें अपराधी आहे दिनानाथा । शरण आलों आतां आजि तुज ॥ ४ ॥ म्हणे नारायण पतितपावन । ब्रीद सांभाळुन तारी दीना ॥ ५ ॥

२

जें असे संचितीं तें घडे निश्चिती । बोल देवाप्रती ठेऊं नये ॥ १ ॥ पूर्वी जें करावें तें आतां भोगावें । व्यर्थ कां रुसावें देवावरी ॥ २ ॥ दैवयोगें होती शरीरीं यातना । रामाच्या चरणा सांडूं नका ॥ ३ ॥ ह्मणे नारायण भार देवापायीं । ठेउनियां राही स्मरा राम ॥ ४ ॥

३

माझ्या विठोबाचें श्रीमुख चांगलें । झळकती कुंडलें दिव्य ज्योति ॥ १ ॥ मना तूं आठवी आसनीं शयनीं । भोगुनि उन्मनी सहज सुख ॥ २ ॥ गगनीं अस्त जैसा नव्हेचि मार्तंड । तैसा तूं अखंड धरी ध्यान ॥ ३ ॥ कमळकळिके जैं भ्रमर आसक्त । तैसें ठेवीं चित्त हरिचे चरणीं ॥ ४ ॥ नारा म्हणे माझ्या बापाचें हें ध्यान । सांगितली खूण साधुसंतीं ॥ ॥ ५ ॥

---

# ॥ सेना न्हावी ॥

३०

ही माझी मिराशी । पांडुरंग पायापाशीं ॥ १ ॥ करीन आपुलें जतन । वागवितों अभिमान ॥२ ॥जुनाट जुगादीचें । वडिलीं साधीयलें साचें ॥ ३ ॥ सेना ह्मणे कमळापती । पुरातन राखीतों वृत्ति ॥ ४ ॥

३१

अळंकापुरवासिनी । ज्ञानाबाई मायबहिणी ॥ १ ॥ लेंकुराची चिंता । वागवावी कृपावंता ॥ २ ॥ मी तों आहे यातींहीन । माझा राखा अभिमान ॥ ३ ॥ करुनि विनवणी । सेना लागतो चरणीं ॥ ४ ॥

३२

क्रोध अभीमान अर्पीला चरणां । नामसंकीर्तनीं धरिला हेत ॥ १ ॥ देहभाव अवघा हरपुनी गेला । पहातां श्रीमुखाला विठोबाच्या ॥२॥ मोक्ष सायुज्यता दवडिले दुरी । वायां वेरझार शिणतो कां ॥ ३ ॥ सेना म्हणे—

३३

स्वर्गींचे अमर मागतात देवा । संताची सेवा करावया ॥ १ ॥ पंढरीचें सुख देखुनि नयनीं । करिती विनवणी जोडुनि हात ॥ २ ॥ चारी मुक्ती तेथें हिंडे दीनरूप । येऊं नेदी समीप कोणी तया ॥ ३ ॥ धिक्कारुनि तया घालिती बाहेरी । मागुती पायांवरी लोळताती ॥ ४ ॥ वैष्णवा शरण येती काकुळती । आमुची ते गती काय सांगा ॥ ५ ॥ या सुखाचा थेंबुटा न मिळे ब्रह्मादिकां । तेथें सेना देखा सरता झाला ॥ ६ ॥

३४

गोपाळा सहित वनमाळी । गाई चारित कळंबा तळीं ।

शिदोऱ्या आणिल्या सकळीं । मध्यें वनमाळी बैसला ॥१॥ गोपाळ म्हणती कृष्णासी । वांटा देईं ज्याचा त्यासी । न दे अधिक उणें कोणासी । द्वैत तुजपाशीं असेना ॥ २ ॥ हरी म्हणे गोपाळासी । सांगतों तें धरा मानसीं । नीर ठेवा मजपासीं । दुरी ताकासी सांडावें ॥ ३ ॥ ऐसें सांगोनिया हरी। शिदोऱ्या सोडिल्या झडकरी । सुरवर पहाती अंबरीं। वांकुल्या हरी दावितु ॥ ४ ॥ सेना म्हणे गा श्रीहरी। टोकत बैसलोंसें द्वारीं । देईं कवळ झडकरी । माझी न करी उपेक्षा ॥ ५ ॥

३५

सुख या संताचे पाईं । आणिका ठाईं नसें तें ॥१॥ तिहीं लोकीं पाहूं जातां । ऐसें न दिसें धुंडितां ॥२॥ तुळणा करितां या सुखें । पैं वैकुंठ झालें फिकें ॥ ३ ॥ या सुखाची नवल परी । न पवती सरी हरीहर ॥ ४ ॥ सेना म्हणे झाली भेटी। न सुटे गांठी पडली ती ॥ ५ ॥

३६

माझे पुरवा मनोरथ । सिद्धी पाववी अनंत ॥ १ ॥ तान्हेला ये धाउनी । करितां पाण नोहे उणी ॥ २ ॥ श्रीद वागविसी चरणा । माझी पुरवावी वासना ॥ ३ ॥ सेना म्हणे कृपादृष्टीं । पाहे नको करूं हिंपुटी ॥ ४ ॥

३७

व्यर्थ कासया शिणावें । उगेंच घोकुनी मरावें ॥ १ ॥ एका विठ्ठलावांचून । आणिक नाहीं बा साधन ॥ २ ॥ वेदशास्त्र जाणितलें । व्यर्थ अभिमानें मेले ॥ ३ ॥ झाली पुराण व्युत्पत्ती । मग अभिमानें फुगती ॥ ४ ॥ व्यर्थ ऐसे शिणले । सेना म्हणे वांया गेले ॥ ५ ॥

३८

मातेपाशीं आहे नाहीं । बाळक नेणेची कांहीं ॥ १ ॥ घेउनिया छंदासी । मागे भलत्या वेळेसी ॥ २ ॥ चालुनियां मिठी । मागे पडलें तें दिठी ॥ ३ ॥ सेना म्हणे कृपावंता । मज समजावीं आतां ॥ ४ ॥

३९

हरीच्या चिंतनीं । व्हारे सावध धरा मनीं ॥ १ ॥ स्वहित विचारावे । आपुलें सार्थक करावें ॥ २ ॥ उपमन्यु आणि ध्रुरू । स्मरणें तरले निर्धारू ॥ ३ ॥ प्रल्हाद तरला । स्मरतां नरहरी पावला ॥ ४ ॥ सेना म्हणे छंद । ऱ्हदईं भरला गोविंद ॥ ५ ॥

## ॥ चांगदेव ॥

१

चांगयाचें वऱ्हाड मुक्ताईनें केलें । मळ जे फेडिले जन्मांतरींचें ॥१॥ आठरु होता भाजीये हाडें । नाचे संतापुढें स्फुंदे रडे ॥ २ ॥ चवदा शतें झालीं ब्रह्मामाजीं गेलीं । सोय दाखविली मुक्ताईनें ॥ ३ ॥ धन्य ज्ञानदेवो धन्य सोपानदेवो । परब्रम्हीं ठावो दाखवीला ॥ ४ ॥ धन्य ते निवृत्ति धन्य मुक्ताबाई । चांगा म्हणे आई पोटा आलें ॥ ५ ॥

२

पाहिला दक्षिणेचा वारा । येतां देखिला सामोरा ॥ १ ॥ चला चला पंढरपुरा । विठोबा रायाच्या नगरा ॥ २ ॥ जवळीं आहे महाद्वार । काठी कांबळ्या अपार ॥ ३ ॥ चांगा आला लोटांगणीं । रुळे वैष्णवचरणीं ॥ ४ ॥

३

आजिचा पाहुणा पंढरिचा राणा । तांदुळ कांडणा कांडियेलें ॥ १ ॥ देहीचें उखळ मनाचें मुसळ । कांडिले तांदुळ विवेकाचे ॥ २ ॥ साही संगातिणी कांडूं चौवीजणी । बारा सोळाजणी मिळोनियां ॥ ३ ॥ चौवीजणी सुगरणी करिती निवडणी । कोंडा पाखडुनि जुदा केला ॥ ४ ॥ त्रिगुणाच्या चुलीवर देहाची तवली । सत्राची ओतिली तयामाजीं ॥ ५ ॥ प्रकृति हांडीं आधण ठेविलें । इंधन जाळिलें काम-क्रोध ॥६॥ मदनाचा ऊत येतो वेळोवेळां । चाटू त्या जवळा सत्व धीर ॥ ॥ ७ ॥ बहु उतावेळ रांधिलें तांदुळ । धरणीवर मोकळा भात केला ॥ ८ ॥ रुक्मिणी श्रीपती बैसले पंगती । वेल्हाळा वाढिती बरवेपरी ॥ ९ ॥ चांगदेव म्हणे भली मुक्ताबाई । ज्ञानाचिये सोई दाखविलें ॥ १० ॥

४

म्यां बापच नवरा केला । बाई मी सांगूं कोणाला ॥धृ०
आला सद्गुरु जोशी । त्यानें केलें निश्चयाशी । लग्न लाविलें पौर्णिमेसी । एकादशीला ॥ १ ॥ माय सवतीशीं न कळत । रात्रीं मी झालें रत । गर्भिण झालें मी त्वरित । पुत्र झाला॥२॥ स्त्री कीं पुरुष विसरलें । तेव्हां बाळकासि ग्रासिलें । चांगया म्हणे आई मुक्ताईनें । नवल केलें ॥ ३ ॥

५

महाक्षेत्र सत्यपुरी । त्यांत शिरोमणी पंढरी ॥ १ ॥
कागा हिंडसि जेथें तेथें । पांडुरंगीं लावी चित्तें ॥ २ ॥
चंद्रभागे करितां स्नान । कोटि कुळासि उद्धरण ॥ ३ ॥
मज आहे हा विश्वास । चांगा विठोबाचा दास ॥ ४ ॥

## ॥ जनाबाई ॥

२९

धन्य वंश जयाचा । वारकरी पंढरीचा ॥ १ ॥ होय पितरासी उल्हास । यमपुरी नाहीं त्यास ॥ २ ॥ जन्मोजन्मीचा अंकिला । देव त्यानें ऋणी केला ॥ ३ ॥ पवित्र तयाची जननी । ह्मणे नामयाची जनी ॥ ४ ॥

३०

पक्षी जाये दिगंतरा । बाळकासि आणी चारा ॥ १ ॥ घार उडत आकाशीं । तिचा जीव पिलापासीं ॥ २ ॥ माता गुंतली कामासी । चित्त तीचें बाळापासीं ॥ ३ ॥ वान्नर हिंडे वृक्षावरी । पिलीं बांधोनी उदरीं ॥ ४ ॥ तैसी आम्हां विठ्ठल माये । जनी वेळो वेळां पाहे ॥ ५ ॥

३१

भला बापा पुंडलिका । तुझ्या भावार्थाचा शिक्का ॥ १ ॥ भलें घालोनियां कोडें । परब्रम्ह दारापुढें ॥ २ ॥ घांव घातला निशाणीं । ख्याति केली त्रीभुवनीं ॥ ३ ॥ जनी म्हणे पुंडलिका । धन्य तूंचि तिहीं लोकां ॥ ४ ॥

३२

जन्मा येवोनियां एक । करा देहाचें सार्थक ॥ १ ॥ मुखीं नाम विठोबाचें । तेणें सार्थक जन्माचें ॥ २ ॥ नाम तारक महिमा । शेष वर्णिता झाली सीमा ॥ ३ ॥ नामतारक त्रिभुवनीं । म्हणे नामयाची जनी ॥ ४ ॥

३३

विठोबाचें पदक गेलें । ब्राम्हण म्हणति जनीनें नेलें ॥ १ ॥ अगे शिंपीयाचे जने । पदक म्हणती ब्राम्हण ॥ २ ॥ नाहीं नेलें म्यां जनीन । सख्या विठोबाची आण ॥ ३ ॥ जनी बा-

कळ, झाडून दावी । पदक पडलें भूमीठायीं ॥ ४ ॥ चंद्रभा-
गेंत रोविला शूळ । आलें जनाईला मूळ ॥ ५ ॥ दंडी ला-
विल्या काढण्या । विठो धांवरे धावण्या ॥ ६ ॥ हातीं टा-
ळ्या वाजवी । मुखें विठ्ठल बोलवी ॥ ७ ॥ माझ्या वेळे कोठें
गेला । जनी म्हणे विठो धाला ॥ ८ ॥ आले दहापांच
गडी । पडली जनाईवर उडी ॥ ९ ॥ विलंब लागतां तये
वेळीं । म्हणती जनीला द्यारे सुळीं ॥ १० ॥ तंव त्या शू-
ळाचें झालें पाणी । धन्य म्हणे दासी जनी ॥ ११ ॥

३४

लोलो लागला अंबेचा । विठाबाई माउलीचा ॥ १ ॥
आदि ठाणें पंढरपुर । नांदे कान्हाई सुंदर ॥ २ ॥ गोणाईनें
नवस केला । देवा पुत्र देई मला ॥ ३ ॥ जाणोनियां शुद्ध
भाव । पोटीं आले नामदेव ॥ ४ ॥ दामा शेटी हरुषला
दासी जनीस आनंद झाला ॥ ५ ॥

३५

सांडूनि पंढरी जाती वाराणसी । काय सूख यासी आहे
तेथें ॥ १ ॥ तया पंचक्रोशी म्हणति मरावें । मरोनियां व्हावें
जीवन्मुक्त ॥ २ ॥ नकोगा विठोबा मज धाडूं वाराणशी ।
सांगेन तुजपाशी ऐक आतां ॥ ३ ॥ मरती मानव रणस्तंभीं
घाली । घालूनियां गाळिलीं पापपुण्यें ॥ ४ ॥ जाऊनीयां तेथें
प्रहर दोन रात्रीं । सत्य मिथ्या श्रोत्रीं श्रवण करा ॥ ५ ॥
आई आई बाबा म्हणती काय करूं । ऐसें दुःख थोर आहे
तेथें ॥ ६ ॥ इक्षुही दंडणा भारी जैसा माळी । तैसा तो कु-
वळी काळनाथ ॥ ७ ॥ लिंग देहादिक करिती कंदना । ते-
थील यातना नको नको ॥ ८ ॥ न जाय तो जीव एक्या
सरे हरी । रडती नानापरी नाना दुःखें ॥ ९ ॥ नको नको
देवा माझी तुज आण । न देई मरण वाराणसी ॥ १० ॥

अमरादि देव फार भांबावले । भुलोनियां गेले मुक्तीसाठीं ॥ ॥ ११ ॥ तेही मुक्ती माझी देखे पंढरीसी । लागतां पायासी मुक्ती जनां ॥ १२ ॥ मोक्ष हा फुकाचा मुक्ती लोळे वंदी । न वेई कोणी कधीं तया लागीं ॥ १५ ॥ समर्थाच्या द्वारीं भिक्षा नानापरी । मग त्या पदरीं घालिताती ॥ १४ ॥ तैशी हे पंढरी पाहिल्या शिखर । आणि भीमातीर मोक्ष आला ॥ ॥ १५ ॥ सख्या पुंडलीका लागतांचि पायां । मुक्ती म्हणे वायां तेथें गेले ॥ १६ ॥ घर रिघवणी दासी होते मुक्ती । मोक्ष ते धांवति पाठिलागीं ॥ १७ ॥ आवंतण सांडोनि कोण मागे भीक । सामराज्याचे राजक तुझे पायीं ॥ १८ ॥ जनी म्हणे तुज रखुमाईची आण । न देई मरण वाराणसी॥१९॥

३६

वारा पाणी मुसळ धारा । तेणें मोडिला निवारा ॥ १ ॥ मग विठाई धांवली । हातीं चक्र धांव घाली ॥ २ ॥ वांसे लाविलें चहूं फेर । केलें क्षणामाजि घर ॥ ३ ॥ जागा झाला नामदेवो । दारीं उभा पंढरीरावो ॥ ४ ॥ डोई ठेवोनि चरणावरी । दासी जनी पाय चुरी ॥ ५ ॥

३७

तुझे पाय माझ्या डोई । मला सुखा उणें काई ॥ १ ॥ आपुल्या ब्रीदाचा कैवारी । विठल उभा गरुडपारी ॥ २ ॥ जनी म्हणे शरण आलें । पाय पाहतां निवालें ॥ ३ ॥

३८

जातिहीन चोखामेळा । देव पाळी त्याचा लळा ॥ १ ॥ कबीर जातीचा अविंध । देवा बहु त्याचा छंद ॥ २ ॥ उच्छिष्ट फळें भिल्लटीचीं । रामराजा खाय तिचीं ॥३॥ नाहीं जातीसी संबंध । भुलला भक्तीसी गोविंद ॥ ४ ॥ जनी म्हणे श्री अनंत । झाला भक्तिचा अंकित ॥ ५ ॥

३९

कायी करुं उपचार । भक्ती भावाचा लाचार । विश्वीं विश्व आधार । सर्व साक्षीरे विठोबा ॥ १ ॥ झडतरलें आसन । वरी खडतरलें वसन । रत्नजडित सिंहासन । तुजला नाहींरे विठोबा ॥ २ ॥ तुटकीशी खाट । वरि वाकळाची सेज । सुकुमाराशी नीज । कैशी येईल रे विठोबा ॥ ३ ॥ फुटकासा तुंबा । उदक कैसें पिशिल तूं बा । ताट वाढुनि रुक्मिणी रंभा । वाट पाहिलेरे विठोबा ॥ ४ ॥ वाळले चिळले तुकडे। ते मोडके आणि तोडके । दासी जनीचे विटके । कैसे खाशिलरे विठोबा ॥ ५ ॥ काया कुरवंडुनि । प्राण पुष्पें वाहिलीं । कैशी ठावी नाहीं झाली । दासी जनीरे विठोबा ॥ ६ ॥

४०

संसार निधान लाधलिया जाण । सद्गुरु चरण म्हणे बापा ॥ १ ॥ तन-मन-धन तयासि देऊन । वस्त घ्या मागोन अगोचर ॥ २ ॥ अगोचर जाण गुरुकृपेवीण । येरवीं आपणामाजीं असे ॥ ३ ॥ असोनि सम्यक जया चुकामूक । भूलले निंदक मंत्री तंत्री ॥४॥ मळवट करीं टापर घेती शीरीं। परी ते निर्धारीं अवघें वांत्र ॥ ५ ॥ पांचा वदवीता माळा करीं धरिता । तया हृदयतीर्था नेणे कोण ॥ ६ ॥ हृदयीं नारायण धाविजे पूर्ण । तया निंबलोण कीजे बापा ॥ ६ ॥ हंसात्मा प्रगट दाविलें सुभट । सद्गुरु वरिष्ठ तोचि जाणा ॥ ८ ॥ तया उत्तीर्णता व्हावया पदार्थां । न देखे सर्वथा जनी म्हणे ॥ ९ ॥

४१

थोर अभिमान ज्यासी । तो हा मुकला विठ्ठलासी ॥ १ ॥ त्याच्या कृत्या नाहीं जोडी । काळ हाणोनि तोंड फोडी॥२॥ गळा बांधोनि खांबासी । विंचु लाविती अंगासी ॥ ३ ॥ नर्क कुंडीं थारा त्याला । ऐसा अभिमानें बुडाला ॥ ४ ॥ नामा बोध करी मना । दासी जनी लागे चरणा ॥ ५ ॥

४२

सख्या घेतलें पदरीं । आतां न टाकावें दुरी ॥ १ ॥ तुम्हां थोरांचें उचित । सख्या काय सांगू तूतें ॥ २ ॥ ब्रम्हयाच्या ताता । सजणा लक्षुमिच्या कांता ॥ ३ ॥ जनी म्हणे शरण आलें । आवरितां ब्रीद ठेलें ॥ ४ ॥

४३

दीनवत्सल महाराज । जना सर्वें काय काज ॥ १ ॥ तुझी नाहीं केली सेवा । दुःख वाटे माझ्या जीवा ॥ २ ॥ जीं जीं दुःखें झालीं मला । तीं त्वां सोशिलीं विठ्ठला ॥ ३ ॥ रात्रंदिवस मजशीं । दळूं कांडूं लागलासी ॥ ४ ॥ दुष्ट पतित नामहीन । नाहीं केलें तुझें ध्यान ॥ ५ ॥ क्षमा करा देवराया । दासी जनी लागे पायां ॥ ६ ॥

४४

कथा रामायणी गोड । उघडा कानाचीं कवाडें ॥ १ ॥ घ्यारे कथामृत श्रेणी । रामनामें पुष्पखाणी ॥ २ ॥ परशुराम एके दिवशीं । आला जनकाचे भेटीशी ॥ ३ ॥ चाप ठेवूनि आंगणीं । राम बैसला भोजनीं ॥ ४ ॥ सीता आली अकस्मात् । अश्व करुनि चापातें ॥ ५ ॥ बाळ लेंकराचे परी । घालुनि पायाचे भीतरीं ॥ ६ ॥ चारी गह्या फिरवी त्यासी । म्हणे नामयाची दासी ॥ ७ ॥

४५

रामें सारूनि भाजन । विडे घेतलें संपूर्ण ॥ १ ॥ सहज अवलोकीं चापातें । करणें काय हें अघटित ॥ २ ॥ ऐसा वीर आहे कोण । चाप उचलिलें दारुण ॥ ३ ॥ शुद्धि करीत चालले । जानकीनें अश्व केलें ॥ ५ ॥ चोज तया मनीं। म्हणे नामयाची जनी ॥ ५ ॥

४६

हें तंव अपूर्व वर्तलें । नव्हें तोंचि कैसें झालें ॥ १ ॥ वृत्ति विस्मित रायाची । म्हणे नकळे लीला इची ॥ २ ॥ पहातां धनुष्य दारुण । इसी न म्हणावें सामान्य ॥ ३ ॥ उचली शिवाचें कोदंड । काय बळ हें प्रचंड ॥ ४ ॥ वचन बोलिला रायातें । म्हणे कोण वर इतें ॥ ५ ॥ आज्ञा करावी स्वामीनीं । तेचि आम्हांसि प्रमाण ॥ ६ ॥ तिष्ठे जोडुनिया पाणी। म्हणे नामयाची जनी ॥ ७ ॥

४७

लीला विग्रह अवतारी । तोचि पर्णिल हे नोवरी ॥ १ ॥ राव विनवी कर जोडून । कोण त्याचें आंगीं चिन्ह ॥ २ ॥ काय लक्षण तयासी । कृपें सांगावें आम्हांसी ॥ ३ ॥ म्हणे स्वयंवर नेमावें । राजे मिळतील सर्व ॥ ४ ॥ तयामध्यें तोही जाण । सहज येईल आपण ॥ ५ ॥ राम निवाले तेथुनि । म्हणे नामयाची जनी ॥ ६ ॥

४८

शोभे कीर्तनाचे मेळीं । तारांगणीं सोळा कळी ॥ १ ॥ श्रोत्या चकोरू पीयूष । कैसा ओतिला ब्रम्हरस ॥ २ ॥ करी घन गर्जना । मयूर आनंदती मना ॥ ३ ॥ धनी पुरवी श्रोत्याची । म्हणे जनी नामयाची ॥ ४ ॥

४९

एके दिवशीं वाडियांत । देव आले आकस्मात ॥ १ ॥ अवचीं पायासी लागली । देवें त्यांवरि कृपा केली ॥ २ ॥ बाहेर कामासी गुंतलें । देवें मज विचारिलें ॥ ३ ॥ देव बाहेर बोलती । मजलागीं हटकिती ॥ ४ ॥ हात धरुनि जवळी नेलें । कोठेंगे जनी म्हणुनि बोले ॥ ५ ॥

५०

उभा कीर्तनाचे रंगीं । प्रेम ओसंडे सर्वांगीं ॥ १ ॥ आंगीं बाणलें हे शौर्य । जेणें तेजें लोपे सूर्य ॥ २ ॥ सिद्ध साधू आणि पंडित । तयामध्यें ज्याची मात ॥३॥ ऐसा अवसान गाढा । जनी म्हणे धडफुडा ॥ ४ ॥

५१

संतभार पंढरींत । कीर्तनाचा गजर होत ॥ १ ॥ जेथ पांडुरंग उभा । समचरणाची शोभा ॥ २ ॥ रंग भरे कीर्तनांत । तेणें हो ते दास गर्जत ॥ ३ ॥ सखा विरळ ज्ञानेश्वर । नामयाचा जिव्हार ॥ ४ ॥ ऐशा संता शरण जाऊं । जनी म्हणे त्यांला ध्याऊं ॥ ५ ॥

५२

वैरिलें गीतासी । दळणी मिसें विठ्ठलासी ॥ १ ॥ देह बुद्धीचें वैरणें । बरवा दाणा निसोन ॥ २ ॥ विठ्ठलाची ज्यासी गोडी । जनी म्हणे आवडी ॥ ३ ॥

५३

जिव्हा लागली स्मरणीं । रितें माप भरली गोणी ॥१॥ नित्य नामाची लाखोली । गुरु आज्ञा मी पाळी ॥ २ ॥ मज नामाचा भरवसा । गजर नाम्याच्या दासीचा ॥ ३ ॥ विटेवरी ब्रम्ह दिसे । जनी त्याला पाहतसे ॥ ४ ॥

५४

भिल्लणी ती फळें कैशीं । चाखोनि वाहत देवासी ॥ १ ॥ भाव तिचा अंगिकारी । सर्वांहुनी कृपा करी ॥ २ ॥ गुज वानरासी पुसावें । राक्षसांसी जीवें मारावें ॥ ३ ॥ वानर अवघे भुभुःकारे । बोलती रामासमोर ॥ ४ ॥ आज्ञा करावी आम्हांसी । रावण आणितों तुम्हांपाशीं ॥ ५ ॥ तुझ्या नामा-

च्या प्रतापें । हनुमंत गेलाजी संतापें ॥ ६ ॥ सीताशुद्धी करुनी आला । दासी जनीस आनंद झाला ॥ ७ ॥

५५

निढळावरि देउनि पाणी । वाट पाहे चक्रपाणी ॥ १ ॥ धांव धांव पांडुरंगा । सख्या जिवलगा अंतरंगा ॥ २ ॥ तुजवांचुनि दाही दिशा । ओस मज जगदीशा ॥ ३ ॥ हांसे होय ऐसे जनीं । न करी म्हणतसे जनी ॥ ४ ॥

५६

माझी आंधळयाची काठी । अडकली कवणें बेटी ॥ १ ॥ हांक मारूं कवणासी । धांव पाव ऋषीकेशी ॥ २ ॥ तुज वांचूनि विठ्ठला । नाहीं कोणीरे मजला ॥ ३ ॥ तुझीये चरणीं माथा । ठेवि दासी जनी आतां ॥ ४ ॥

५७

धन गोत कलत्र माय । सर्व जों तुझे पाय ॥ १ ॥ सखा तुजविण पैं पाहीं । दुजा मज कोणी नाहीं ॥ २ ॥ माझी न करावी सांडणी । म्हणे नामायाची जनी ॥ ३ ॥

५७

अरे मेल्या विठ्या । मुळमायेच्या कारट्या ॥ १ ॥ विठ्या तुझें गेलें मढे । तुला देखून काळ रडे ॥ ३ ॥ तुझी रांड रंडकी झाली । जन्मसाविश्री चूडा ल्याली ॥ २ ॥ उभी राहून वृंदावनीं । शिव्या देत दासी जनी ॥ ४ ॥

५८

॥ गवळण ॥

गवळण म्हणती गवळणीला । यशोदेशी पुत्र झाला ॥ ॥ १ ॥ एक धांवती एकीपुढें । एक वाटिती सुंठवडे ॥ २ ॥ वानें भरुनियां ताटी । नंदा घरीं झाली दाटी ॥ ३ ॥ ऐशी गलबल झाली । दासी जनी हेल वाली ॥ ४ ॥

# ॥ श्रीतुकारामकृत सार्थ नामगायन अभंग ॥

प्रसिद्ध अभंगापैकीं हे अभंग आहेत. पहिल्या अंकांत कळविल्याप्रमाणें आम्हीं असें समजतों कीं, श्रीज्ञानेश्वर तुकाराम इ०कांच्या अभंगांचा अर्थ करणें हें साहसकर्म होय. अभंगाचा अर्थ करूं नये किंवा सांगू नये असें आमचें म्हणणें नाहीं. ज्यांची योग्यता असेल त्यांनीं हें काम अवश्य करावें. ही योग्यता आमची नाहीं, तरी एक दोघांच्या आग्रहासाठीं ह्या अंकांत अर्थ सांगण्याचा हा आम्हीं प्रयत्न केला आहे. वर्ष भरेपर्यंत हा प्रयत्न तहकूब ठेविला जाईल.

खालीं लिहिल्याप्रमाणें श्रीतुकाराममहाराजकृत नामगायनाचे ४ अभंग घेऊन महाराजांची माफी मागून यथामत्या त्या अभंगांचा अर्थ लिहून ते वाचकांपुढें ठेविले आहेत.

१

गोविंद गोविंद ।
मना लागो हाचि छंद ॥ १ ॥
मग गोविंद ते काया ।
भेद नाहीं देवा तया ॥ २ ॥
आनंदलें मन ।
प्रेमें पाझरती लोचन ॥ ३ ॥
तुका म्हणे आळी ।
जेंवि नुरेचि वेगळी ॥ ४ ॥

तुकाराममहाराजांच्या अभंगाच्या एका चरणावरून अभंगाचा भाव कोणाला समजावयाचा नाहीं. सर्व चरण ध्यानांत आणून जेव्हां त्यांचें मनन करावें, तेव्हां अभंगाचा भाव कोणाला समजला तर समजतो. उत्तम गवई जसे सूर

चढवीत् चढवीत चढवितो त्याप्रमाणें महाराजांच्या अभंगांत प्रत्येक चरणीं विवक्षित रस वाढत असतो. ' अति मधुरं मधु मधुरं द्राक्षा मधुरं सितापि मधुरंच' याप्रमाणें यांची कृती आहे. विवक्षित रसाची पूर्णता झाल्यावांचून यांनीं कोणताही अभंग संपविला नाहीं; एखाद्या अभंगाचे १०।१२ चरण असतात, आणि एखाद्या अभंगाचे ३।४ असतात त्याचें कारण हेंच. हा अभंग स्वतःस उद्देशूनच आहे.

तुकाराम म्हणतातः— गोविंद, गोविंद, असा-गोविंद, गोविंद, या नांवाचा मनाला छंद लागूं दे. जर छंद लागला तर मग—ज्या तोंडानें तो उच्चार झाला तें तोंड ज्या देहाचा एक भाग—तो देहच गोविंदरूप झाला. त्या देहांत आणि देवांत भेद नाहीं. देहाला मिळालेलें लौकिक नांव आणि गोविंद यांत फरक नाहीं. छंद म्हणजे—नाद—एखाद्या एकाच गोष्टीचा चाळा—विवक्षित गोष्टीवांचून दुसरी गोष्ट न सुचणें—व्यसन—चित्त गुंतून जाणें—पुरें लक्ष्य लागणें इतका अर्थ होतो. असा छंद लागला तर ' मग ते काया गोविंद ' झाली. गोविंद नांवाला मन जडलें तेव्हां शरीर वेगळें रहातच नाहीं. मनानें आपल्या बरोबर त्यालाही जडवून टाकिलें. तेव्हां शरीर आणि गोविंद हीं एकरूपच झालीं. (गोविंद अक्षरांचा अर्थ इंद्रीयांना जाणणारा असा आहे.) गोविंदाचा छंद लागून मन आनंदलें, आणखी शिवाय नेत्रावाटें अश्रुप्रवाहही सुरू झाला, म्हणजे आतां भिन्नत्व नाहींसेंच झालें. ज्याप्रमाणें आळी म्हणजे—लाडकेपणानें हट्ट करणें, आवडत्या गोष्टीसाठीं गळ घालणें इ० प्रकार हा मन, शरीर, वृत्ती ह्यांहून किंवा ह्यांच्या चांचल्याहून वेगळा नसतो, त्याप्रमाणेंच वरील प्रकार होय. ह्या वृत्तीला सहजस्थिति म्हणतात.

२

ज्याचे गर्जती पवाडे ।
कळिकाळ पाया पडे ॥ १ ॥
तो हा पंढरिचा राणा ।
पुसा सा चौं अठरा जणा ॥ १ ॥
चिंतितां जयासी ।
रिद्धि सिद्धि कामारी दासी ॥ ३ ॥
वैकुंठासी जावें ।
तुका म्हणे ज्याचे नांवें ॥ ४ ॥

तुकाराम म्हणतातः--ज्याची कीर्ती गाजत आहे--ज्याच्या कीर्तीचे पवाडे होऊन राहिले आहेत; कळिकाळ ज्याच्या पाया पडतो, तो हा पंढरीचा राणा पांडुरंग आहे. 'गर्जना हा शब्द बहुतकरून मेघास किंवा सिंहास लागतो, मेघ उंच अंतरिक्षांत असतात, मृग नक्षत्र सुरू झालें म्हणजे सायंकाळीं आकाश काळ्या ढगांनीं व्याप्त होऊन क्षितिजाकडे उतरलेल्या ढगांतून गंभीर आणि भयंकर शब्द होतो, त्या वेळीं शेतकऱ्यांची उल्हासवृत्ती होऊन जाते, मुलें आंगणांत येऊन ती गर्जना ऐकून नाचूं उडूं लागतात,' अशा प्रकारची गर्जना ज्याची पवाडे करीत आहेत तो हा पांडुरंग होय, पवाडा ह्मणजे कीर्ती किंवा कीर्तीचें स्तोत्र. भरतखंडांत जे महात्मे होऊन गेले त्यांनीं सर्व वस्तूंचे ठायीं मूर्तत्व स्थापिलें आहे. कलियुगाचा स्वामी कली हा मूर्तिमान् पुरुष मानिला आहे. ह्या युगांतला जो दुष्टपणा तो तो पुरुष होय. दुष्टवृत्तीचें प्राबल्य हल्लीं विशेष आहे, दुष्टाचे सर्व बंदे आहेत. कळिकाळ हा एक सांचा आहे ह्या सांचाबाहेर कोणाला जातां येत नाहीं. मोठमोठ्यानांही ह्या सांचाप्रमाणें वागावें लागतें. रामकृष्णादिकांनीं सांचाप्रमाणेंच वर्तन ठेविलें. श्रीज्ञानेश्वरांसही

बहिष्कृतांच्या पोटीं जन्म घ्यावा लागला. असला जबरद-स्त आणि वेगवेगळ्या प्रसंगाचा कर्ता–घडामोड करणारा–तोही ज्याच्या पाया पडतो असा हा 'पंढरीचा राणा' आहे. ४ वेद ६ शास्त्रें १८ पुराणें हीं सर्व याप्रमाणें सांगत आलीं आहेत. जाऊन विचारा. ज्याचें चिंतन केलें असतां अणिमा, महिमा इ० सिद्धि, हलक्या प्रकारचीं कामें करणाऱ्या मोल-करणी होतात. ज्याच्या नांवानें वैकुंठाला–विष्णुलोकाला–जावें असा हा आहे.

३

ज्याचें जया ध्यान।
तेंचि होय त्याचें मन॥ १॥
म्हणवुनि अवघे सारा।
पांडुरंग दृढ धरा॥ २॥
समखुणीं त्याचे पायीं।
उभा व्यापक विटेठायीं॥ ३॥
तुका म्हणे नभा।
परि ते अणूचाही गाभा॥ ४॥

'खेळाडू मुलांचें खेळाकडे किंवा नाटकशोकी मनुष्याचें नाटकाकडे किती लक्ष्य लागलेलें असतें हें विचार करून पा-हणारांस माहित आहेच. दिवाळीच्या सुटींत जर एखादा मुलगा रात्रंदिवस एकच खेळ खेळेल तर जेवतांना सुद्धां त्या मुलाचें खेळाकडे लक्ष्य लागेल हें उघड आहे. असा खेळा-चा किंवा नाटकाचा ज्यांस नित्य ध्यास लागला आहे त्याचें मन वस्तूचा उपभोग घेणारें असतांही तें वस्तूच्या स्वाधीन होईल.' तेव्हां ज्याचें ज्याला ध्यान लागतें त्या सारखेंच किंवा तेंच त्याचें मन होतें. म्हणून–हा अभ्यास वाढविला पाहिजे–श्रीपांडुरंगावांचून ज्या इतर गोष्टी त्या सर्व एकेवा-

जूस लोटा, आणि पांडुरंग अंतःकरणांत दृढ धरा. जो पाय जुळून विटेवर उभा राहिला आहे त्याचे चरणीं लक्ष्य ठेवा. तो सर्वत्र भरलेला आहे. श्रीपांडुरंगस्वरूप सर्वव्यापी आहे म्हणजे आकाश व्यापून आहे, इतकेंच नव्हे तर अणू-रजःकण-याचाही तें गाभा आहे, म्हणजे यांतही तें स्वरूप आहे. पांडुरंग हा आकाश आणि अणू ह्यांत आणि ह्यांबाहेरही व्यापून राहणारा, तेव्हां तो दोन हात उंचीचा होऊन पुंडलीकापुढें उभा राहिला यांत नवल नाहीं,

४

राम म्हणे ग्रासोग्रासीं ।
जेविला तो उपवासी ॥ १ ॥
धन्य धन्य तें शरीर ।
तीर्थव्रतांचें माहेर ॥ २ ॥
राम म्हणतां भोगी त्यागी ।
तोही न लिंपे त्या आंगीं ॥ ३ ॥
राम म्हणतां करी धंदा ।
ध्यान समाधिस्थ सदा ॥ ४ ॥
राम म्हणतां वाटचाली ।
यज्ञ पाउला पाउलीं ॥ ५ ॥
अहो राम नित्य ध्याय ।
तुका वंदी त्याचे पाय ॥ ६ ॥

तुकाराम म्हणतात:—प्रत्येक घांस घेतांना जो रामराम म्हणेल तो जेवला नाहींच, उपाशी समजावा. 'एखाद्यास वाटेल बरें आपलें हें सोपें काम आहे! एकादशी दिवशीं उपवास करावा असें सांगितलें आहे नाहीं? आपण आपलें रामराम म्हणत जेवूं म्हणजे झालें! पण तसें नव्हे. हें तुकाराममहाराजांचें राम 'म्हणणें' महा कठीण आहे.' घांस घे-

तांना राम हीं अक्षरें अशा प्रकारचीं म्हटलीं जावींत कीं, राम म्हणाराला मी जेवलों आहे किंवा जेवीत आहे किंवा उपाशी आहे याची आठवण असूं नये; जेवणें आणि उपाशी राहणें ही कल्पना त्याला नसावी. अशी वृत्ती ज्याची झाली, त्यानें ग्रासोग्रासीं राम राम म्हटलें तर तो मात्र जेवला नाहीं; उपाशी समजावयाचा. राम म्हणारांचें शरीर धन्य होय. त्याच्याच देहाचें खरें सार्थक. तें शरीर तीर्थांचें आणि व्रतांचें माहेर होय. तेथें तीर्थें आणि व्रतें मोठ्या आवडीनें रहावयास येतात. राम म्हणतांना हरएक वस्तूचा उपभोग घेतो आणि त्यागही करतो तथापि भोगांत आणि त्यागांत जो मिसळत नाहीं, तोच राम म्हणणारा. हें कर्म मोठेंच कठीण आहे. कारण निःसंग होऊन एखाद्याला राम राम म्हणतां येईल, पण वरील कार्य अगदींच असाध्य. ज्याला वर लिहिलेलें राम राम 'म्हणणें' साधलें, त्यालाच हें कार्य साधलें. असा राम राम म्हणणारा राम राम म्हणत असतां हरएक उद्योग धंदा करतो पण वास्तविक तो ध्यानस्थ आणि समाधिस्थ असतो. ह्या समाधीला उघड समाधी म्हणतात. वाट चालतांना जो राम म्हणतो त्याच्या प्रत्येक पावलीं त्यांजकडून यज्ञ घडतो. असा जो राम म्हणणारा, रामाचें नित्य चिंतन करणारा त्याचे मी पाय वंदितों—त्याचे चरणीं नमस्कार घालतों.

## सूचना.

१३७ व्या पृष्ठांत 'सेना न्हावी' यांचा ३२ वा अभंग मिळाला तसाच घेतला आहे. ज्या कोणाच्या संग्रहीं संपूर्ण अभंग असेल त्यानें तो आमच्याकडे पाठविल्यास फार उपकार होतील.

# ॥ कबीर ॥

१

ॐनामासिधं, पढो मन० ॥धृ०॥ ॐकारसे सब जग सरजे, कर वाहिको संग । अलक्ष पुरुष है सबसे न्यारा, धर ले मनवा संग ॥ १ ॥ नन्ना नाम निरंजन नेना, नाना रूप धरं । निर्गुण निराकार निष्कलंक है, निरखो वाहिको अंग ॥ २ ॥ माया ममता मृगजलवत है, मन ममता निरःसंग । ये मटीकी तनु स्थिर न रहत है, मायाजाल दुःसंग ॥ ३ ॥ सिलसंतोषे सिलजनहारा, सिलसबोरी संग । साधुको बचन सतकर मानों, सिलजनहारा संग ॥ ४ ॥ धद्धा ध्यान धरो दिल बीच, धर ले मनवा संग । गोरखनाथ कहे सुसंगी, दास कबीर सोहंग ॥ ५ ॥

२

अंधे चाल चालत सब झुठी, तेरी दोनूं आंखिया फुटी ॥ धृ० ॥ दमडीके कारण मन ललचावे, बांध रखे पदका जोडा । दश बीस कंठी बांधकर बैठे, रामभजनका घोडा ॥ ॥ १ ॥ मंछा तेरी मंझार जेसी, कावा ब्रम्हज्ञानी । रामनामका परचा न पाया, तो डुब मुवे अभिमानी ॥ २ ॥ इंद्रिके मद राता माता, बांधे करमके भारे । कहे कबिरा सुन भाई साधु, तोरे मइनुसे न्यारे ॥ ३ ॥

३

काया तेरी पलक न रखे कोय ॥ धृ० ॥ जबलग तेल दीवामें बत्ती, तबलग सुजें संसार । जल गया तेल बुज गई बत्ती, मंदिर हुवा अंधार ॥ १ ॥ घर भीतर तेरी जोरु रे, गलीयां झुरे तेरी माई । पंड पडे मुखवासन होई, तो कुड काड न होय ॥ २ ॥ कौन आई कौन माई, कौन बेहन कौन भोजाई । पंथ चले पांच बांधव रोहे, तो हंस एकला होय ॥ ३ ॥

उड गया हंस गगन जा बैठा, सम संसार न कह्या । कहे कबीर सुनो भाई साधु, दीनानाथको सोहोवाया ॥ ४ ॥

४

करना फकिरी भजना साहेब, क्या विरानी आसरे॥धृ०॥ घरघर टुकडा मागकर खाना । कछु न रखना पासरे ॥ १ ॥ खांदे कमलीया हाथ तुमडीया । जंगल करना बास ॥ २ ॥ कहत कबीरा सुन भाई साधु । एक साहेब रखना पास॥३॥

५

कायकु माया जोडी, नर कायकु० ॥धृ०॥ जमीन खोदी माया उंडी दाटी, तो कहेगा माया थोडी ॥ १ ॥ तांबा पीतलको तो पार न आवे, पण काहडे खोखरी दौडी ॥२॥ तीन गज कपडो लोकलाजको, उपर डाभकी दोरी॥ ३ ॥ दो चार वटवा ले चलेगा, तूं चढ बैठा वांसकी घोडी ॥४॥ कहत कबीरा सुनभाई साधु, फंद कीया तेशी होली ॥ ५ ॥

६

क्या मागूं मेरे राम, थोडे जीवनमे क्या० ॥ धृ० ॥ घर नहीं रहे, उमर ना काया, थोडे जीवनमे में क्या मागूं॥१॥ एक लक्ष पुत्र सव्वा लक्ष नाती, तां घर रह्या कोई दीवा न बत्ती ॥ २ ॥ मेघनाद पुत्र समुद्र जैसी खाई, कुंभकर्ण बिभिषण जैसे भाई ॥ ३ ॥ शंकर सरखे पूजने आवे, ब्रम्हा करत है पाठ ॥ ४ ॥ क्या करूं भींती क्या करूं टा टी न जाणुं कहां पडेगी माटी ॥ ५ ॥ क्या करूं मेहेल क्या करूं टा टी, छोडगयो रावण लंकाको ठाठा ॥ ६ ॥ कहत कबीरा सब छोडकर जाना, मैं तो एक तेरे चरणकु चहाता ॥ ७ ॥

७

जगत यहरेनको सपनो, समज देखे नहीं अब अपनो। लेहे लोभकी धारा भम्यो सब जगत संसारा ॥ धृ० ॥ देवजन

भुले तन गोरा, जगमे जीवना थोडा । तजो मद लोभ चतुराई, रहो निरसंधे जुगमांही ॥ पात ज्यूं डालसे छुटा, वडा ज्यूं नीरका फूटा । तैसे जन जान जंदगानी, अब तूं क्यूं न चेत्यो अभिमानी ॥१॥ लाडकपण खेल खोया, ज्यानीमे निंदभर सोया । बुडपण देखकर रोया, सजनविना जिंदगी खोया ॥ ठगको भेद ना दीजे, इनकु समजके लीजे । विदेशी देशकु पावे, उनकु भेद बतलावे ॥ २ ॥ सजन परिवार सुत दारा, रहो उस रोज सब न्यारा । नीकल जब प्राण जावेंगे, नहीं कोय काम आवेगे ॥ देखो जन भुले ये देहा, लगावो प्यारे रामसे सोहा । कटा ये काळका घेरा, कहे कबीर दास जन तेरा ॥ ३ ॥

८

बाबा हरमे हरकूं देखा ॥ धृ० ॥ ठाकुरद्वार बमन बैठा, पके अंदर सिधारे । एक गुरुके दोनो चेले, एक मुजी एक मुजोर ॥ १ ॥ आपही मट्टी आपही मत कर, आपही चूवा वनवाळा । आपही पिवे और आपही पीलावे, आपही पिवे मतवाला ॥ २ ॥ आपही माल आपही खजिना, आपही लुटावनवाला । अपने घरकूं आप लुटावे, आप नहीं घरवाला ॥ ३ ॥ आपही काजी आपही मुल्ना, आपही न्याय चुकावे । कहत कबीरा सुनभाई साधु, सबका एकही अल्ला ॥४॥

९

नजर न आवे आत्म जोती ॥ धृ० ॥ तेलबीन बत्ती बुज नहीं जाती, नहीं जागत नहीं सोती ॥ १ ॥ झिलमिल झिलमिल निसिदिनि चमके जैसा निर्मल मोती ॥ २ ॥ कहत कबीरा सुनभाइ साधु, घर घर बाचत पोथी ॥ ३ ॥

१०

मन रे आगम तीरथकूं चलना ॥ धृ० ॥ गाज न बीज

पवन ना पाणी, बिनबादलका झरना ॥ १ ॥ जाहां नाहीं ताल अखंडही धार, उस सरोवरमे झुलना ॥ २ ॥ कहत कबीरा सुनभाइ साधु काहेकूं भटके मरना ॥ ३ ॥

११

मेरे नजरमो मोती आयो, मैं भला भरोंसे पायो ॥ धृ० ॥ चार खुंटका देवल बनायो उसपर कलस धरायो ॥ १ ॥ देश देशके दर्शन आये, संतनके मन भायो ॥ २ ॥ सेज सुनोपर साहेब मेरा, तीन लोक सब छायो ॥ ३ ॥ कहत कबीरा सुनभाई साधु, हुकुमी नाम चलायो ॥ ४ ॥

१२

वोही राम पछानोजी, मेरा कहेना मानोजी ॥ धृ० ॥ परनारीकु पंढ बने है, परनिंदाकु बेहेरा । परधन देखत अंधा होवे, आपही है जग सारा ॥ १ ॥ सदा रहत उदासी निंदा स्तुति नहीं, जाने कीनकी । ये धेनु ये वाग न जाने, सब आत्मा है येकी ॥ २ ॥ भेद नहीं अभेद हुवा मन, राम भरा जग सारा । कहत कबीरा सुन भाई साधु, जगमो रहकर न्यारा ॥ ३ ॥

१३

जमसे खुब लढुंगा बे, हरीभजन करुंगा बे ॥धृ० ॥ अहंता मारुं ममता मारुं खानाजाद कहाऊं । मन मेरा चोकस कर रखो, चित्त चैतन्य मिलाऊं ॥ १ ॥ रामनामका घोडा मेरा, मनका कर्द खाउ । भजनप्रतापे हातमे बरछी, सन्मुख लेकर जाऊं ॥ २ ॥ और लोक सब है चाकर, मैं हुजूरका काजी । काम-क्रोधकी गरदन मारुं, साहेब राखुं राजी ॥२॥ मैं साहेबका खासा चाकर, मेरा नाम कबीरा । सब संतनकु सीस नमावुं, जोहारी पारखे हीरा ॥ ३ ॥

१४

भक्ति रसायण बडा, हुवा भवरोगनका काढा ॥ धृ० ॥ श्रवण परीक्षित कीर्तन नारद, स्मरण करे प्रल्हाद । पादसेवन लक्ष्मीसे हुवा, हरीचरण चित्त जडा ॥ १ ॥ अर्चरण किया पृथुराजने. वंदन आक्रुर किया । दास्य किया हनुमाननीशिर्दीनि, प्रभुके आगे खडा ॥ २ ॥ सांख्य भक्ति अर्जुनने पाया, और निवेदन किया । तन-मन-धन सब दे डारा नहीं मुसे कह्या कर खडा ॥ ३ ॥ नव जोबनमे एक रोगी चूकती तुम्हारी दासी । पोथी पुरान कुरान देखो, मार्ग दुजा नहीं बडा ॥ ४ ॥ भक्तीविना तर जावे भवमें, सब शास्त्रमें देखा । नहीं दुजो उपाय करके कबीरा भक्तने छडा ॥ ५ ॥

१५

मेरी जात वर्ण कुलहीण, कहोजी कैसे तारोंगे ॥ धृ० ॥ रंका तारी वंका तारी, तारा सजन कसाई । सुवा पडावत गुणका तारी, तारी मिराबाई ॥ १ ॥ नामदेवकी छापरी छाई मुई गाय जीवाई । सेनाभगतकी चाकरी कीनी, आप बने नापीकभाई ॥ २ ॥ वहे जात संसारसागरकी, संवित पार उतरना । आपणी करणी पार उतरणी, कह गया धुरु प्रल्हादा ॥ ३ ॥ वृंदावनके कुंजगलीनमे, भाई रामसे भेटी । अब तो प्रभुजी कैशी बनेगी, यहीं कबीराने फेंटी ॥ ४ ॥

१६

हरीसे कोई नहीं बडा, दीवाने क्यूं गफलतमे पडा ॥धृ०॥ प्रल्हाद बेटा हरीसे लपटा, जबी खंब कडकडा ॥ १ ॥ गोपीचंदने बचन सुनकर, मेहल मुलख सब छोडा ॥ २ ॥ हनुमानने सेवा कीनी, ले द्रोणागिरी उडा ॥ ३ ॥ पुंडलीकने ने सेवा कीई, विठ्ठल वीटपर खडा ॥ ४ ॥ कहत कबीरा सुन भाई साधु, हरीचरण चित्त जडा ॥ ५ ॥

## ॥ भानुदास ॥

१६

जोगेश्वरी क्षेत्र जुनाट अनादी । नांदती आनंदी मूळमाया ॥ १ ॥ ऐसें स्थळ पाहोनीयां शुद्ध बुद्ध । झाले महासिद्ध ज्ञानेश्वर ॥ २ ॥ गर्जती वैष्णव कीर्तनाचा छंद । होतो ब्रह्मानंद गोदातीरीं ॥ ३ ॥ कार्तीकाचा नेम केला समुदाव । आणिलें वैभव आळंदीचें ॥ ४ ॥ एवढाचि उपकार केला चिन्मयनाथा । भानुदास माथा ठेवी पाई ॥ ५ ॥

१७

अष्टोत्तरशें तीर्थें आलीं इंद्रायणीं । तेव्हां गंगा जनीं प्रसिद्धची ॥ १ ॥ सिद्धेश्वर तोचि ईश्वर पहावा । सन्मूख बरवा नंदी शोभे ॥ २ ॥ वट हे पिंपळ सिद्धबेट मनोहर । येती रमती निरंतर योगी जन ॥ ३ ॥ द्वारीं वृंदावनें तुळशीचीं बनें । होतातीं पुराणें ज्ञानेश्वरी ॥ ४ ॥ ऐसें सुख नित्य भोगी हा चिन्मय । झालसे तन्मय भानुदास ॥ ५ ॥

१८

लावोनी पताका येती वारकरी । ह्मणती हे पंढरी समीप आम्हां ॥ १ ॥ अंध पंगू मूढ येती लोटांगणीं । कैवल्य सुखदानी पहावया ॥ २ ॥ होतसे उत्साह महानंद मोठा । भरल्या आहेत पेठा भक्तीचिया ॥ ३ ॥ निजसुखाचें केणें उघडोनि बाजारीं । बैसले महाद्वारीं साधुसंत ॥ ४ ॥ चिन्मयनाथें कौल दिला असे लोकां । भानुदासें सखा जोडिला तो ॥ ५ ॥

१९

फुकाचें हें केणें घ्या रे सांठोवांठीं । सांठवा हृदयसंपुटीं नेऊनीयां ॥ १ ॥ जकातीचें झट नाहीं अळुमाळ । सदां सर्वकाळ यावें जावें ॥ २ ॥ पताका तोरणें गुढिया उभारोनी । येती गात गाणीं रामनाम ॥ ३ ॥ शांती दया क्षमा उज-

ळोनि ज्योती । ओंवाळिती मूर्ती आनंदाची ॥ ४ ॥ चिन्मय चित्सुखाची झाली घनदाटी । भानुदासा पोटीं न समाये ॥ ५ ॥

२०

लांचावले डोळे पाहती घडोघडी । तृप्तीची आवडी न पुरेचि ॥ १ ॥ पंढरीचें सूख आलें गंगातिरीं । मूर्तिमंत हरी उभा असे ॥ २ ॥ राही रखुमाबाई आणि चंद्रभागा । तेचि वाहे गंगा गोदावरी ॥३॥ पुंडलीक चिन्मय-नाथ होय खरा । आणिलें गोदातिरां पांडुरंगा ॥ ४ ॥ ज्याच्या योगें झाला विश्वाचा उद्धार । देव तोचि थोर भानुदास ॥ ५ ॥

२१

पंढरीचें प्रेम ओसंडलें येथें । ह्मणोनि येते संत धांवोनीया ॥ १ ॥ ज्ञानदेव आणि निवृत्ति सोपान । कीर्तनीं येऊन उभे ठाती ॥ २ ॥ योग्याची उन्मनी मुख्य मुक्ताबाई । कीर्तनाचे ठाई डुल्लतसे ॥ ३ ॥ अगम्या अगम्य बोलती बोलणीं । अमृतसंजीविनी उतों आली ॥ ४ ॥ चिन्मय चिद्रंगेसि आला प्रेमओघ । न्हालों अंतरंग भानुदास ॥ ५ ॥

२२

वृत्तीचा उपरम झाली पूर्ण शांती । कल्पिला निवृत्ती तोचि येथें ॥ १ ॥ ज्ञानाप्त जिव्हाळा तो हा ज्ञानेश्वर । भरे निरंतर ज्ञानसिंधू ॥ २ ॥ मुमुक्षा मुक्तीची सोपी केली वाट । सोपान तो स्पष्ट ओळखावा ॥ ३ ॥ मुक्ताबाई ब्रह्मकळा जे म्हणती । ते हे चिन्मय-मूर्ती अवतरली ॥ ४ ॥ चतुर्मूर्ती एके ठाई आल्या रूपा । करावया कृपा भानुदासा ॥ ५ ॥

२३

स्वसुखाचें नित्य होतसे पारणें । तृप्त केले जन सिद्ध साधू ॥ १ ॥ पूर्णोद्धारें देती स्वानंद ढेकर । श्रुती गर्भ-सार उवडलें ॥ २ ॥ सिद्धांतींचें गुह्य आणिलें वाग्द्वारा । विश्वाच्या उद्धारा लागोनियां ॥ ३ ॥ चिन्मय चित्कळा ओंकाराची मात्रा । भानुदास नेत्रा गोचर झाली ॥ ४ ॥

# ॥ जनाबाई ॥

५९

व्हावें सावधान चित्तीं । कथा अपूर्व भारती ॥ १ ॥ कर्णपर्व वाढे वोवी । गोड रस सभापर्वी ॥ २ ॥ राजसूय यज्ञ धर्म वरी । आरंभिला कवणेपरी ॥ ३ ॥ यज्ञकंकण धर्मासी । ते आनंद सर्वांसी ॥ ४ ॥ कामें विभागिलीं सर्व । अवघीं तिष्ठताति सर्व ॥५॥ उच्छिष्ट पात्रांचें काढणें । आंगें करी नारायण ॥ ६ ॥ यादव कौरव सुहृदें । ऋषि राजे श्रेष्ठवृद्ध ॥ ७ ॥ यांच्या बैसवुनि पंगती । द्रौपदीच्या हातें तृप्ति ॥ ८ ॥ केला निश्चय सर्वांनीं । म्हणे नामयाची जनी ॥९॥

६०

न करि प्रपंचाची जाती । सर्व समानचि पंक्ती ॥ १ ॥ वाढी द्रुपदबाळी । उठलीं कुविद्या सकळी ॥२॥ अन्नपूर्णा येते म्हणती । कळलें आजि आमुचे पंक्ती ॥ ३ ॥ सहस्त्र पदार्थ सहस्त्रांनीं । मागितलें एकें क्षणीं ॥ ४ ॥ कोणी भक्ष्य कोणी भोज्य । कोणी दुग्ध कोणी आज्य ॥ ५ ॥ क्षीर भात रोटी पोळी । झाली एकचि आरोळी ॥६॥ एके वडा एके कढी । अशी झाली ओढाओढी ॥७॥ वचन बोलती दुरात्मे । म्हणती तुमचें नव्हे काम ॥८॥ वृक्ष कुंजराचे भेटी । शाखा पल्लवासि तुटी ॥ ९ ॥ पंच कुंजराचे मेळी । नवल उरलीसे केळी ॥ १० ॥ तेचि परि झाली रीति । वाढावया कैशी शक्ती ॥ ११ ॥ आजि तृप्ती तुमच्या करें । कैंचि आम्हां हरिजागर ॥ १२ ॥ ऐकतांचि दुष्ट वचनें । आंगीं खडतरलें बाण ॥ १३ ॥ ऐकोनि खोटें घाली कानीं । म्हणे नामयाची जनी ॥ १४ ॥

६१

सुवर्ण पंचपाळें हातीं । वाढितसे चपळगती ॥ १ ॥ सु-

टली कंचुकिची ग्रंथी । झाली साशंकित चित्तीं ॥ २ ॥ सलज्जा दिसे दीन वदन । आतां पाहतील दुर्जन ॥३॥ अन्न पात्र दोन्ही कर । चळला डोईचा पदर ॥ ४ ॥ लावुनियां नेत्रपातीं । आठविली कृष्णमूर्ती ॥ ५ ॥ म्हणे कायरे भगवंता । वैरी हांसतील आतां ॥६॥ मी तंव दीन तुझी देवा । दूर नससी केशवा ॥ ७ ॥ तुझी जाय ब्रीदावळी । ऐशीं आळवी पांचाळी ॥ ८ ॥ कळों सरलें अंतरीं । जनी म्हणे कृपा करी ॥ ९ ॥

६२

दया उपजली वैकुंठा । म्हणे होईना प्रतिष्ठा ॥ १ ॥ ईश्वरी मायेचें कौतुक । केली चतुर्भुज देख ॥२॥ झाली निर्भय मानसीं । आतां न गणी कळिकाळासी ॥ ३ ॥ साह्य झालासि श्रीरंगा । पुरवीन पीयूषाची गंगा ॥ ४ ॥ बिरडें घालीं उभय करें । पुरवी अन्नाचे ढिगारे ॥ ५ ॥ आणिक चमत्कार तेथ । डोळा दाखवी भगवंत ॥ ६ ॥ माव नकळे गोविंदी । पात्रा गणिक द्रौपदी ॥ ८ ॥ निर्मी त्रैलोक्याचा राजा । जनी म्हणे बाप माझा ॥ ८ ॥

६३

जया आवडे जो पदार्थ । वाढी अन्नाचे पर्वत ॥ १ ॥ परस्परांतें बोलती । अन्नें कैशीं पावती ॥ २ ॥ कळों सरलें भीमासी । आरंभिलें विनोदासी ॥ ३ ॥ म्हणे एक वचन स्पष्ट । जेवा भरोनिया पोट ॥ ४ ॥ कोणी अन्नासी सांडी । हातीं उपटीन शेंडी ॥ ५ ॥ तुटलें अभिमानाचें तुक । सलज्ज करुनि काळें मुख ॥ ६ ॥ धर्म म्हणे भीमसेना । कासियासि करिसि छळणा ॥ ७ ॥ कर्में भोगितील तैसीं । होय क्षमावंत यासी ॥ ८ ॥ मानी आमुच्या वचनार्था । आतां होई प्राणदाता ॥ ९ ॥ मानी वृद्धांचें वचन । नामयाची जनी म्हणे ॥ १० ॥

६४

धन्य पांडव समर्थ । सर्वे तिष्ठत भगवंत ॥ १ ॥ भणंग ब्राह्मणांच्या पंक्ती । इच्छा भोजनाची तृप्ती ॥ २ ॥ लक्ष हो-तांची भोजनें । घंटा स्वर्गींची वाजणे ॥ ३ ॥ तोही स्वानंद सोहळा । पाहों इच्छी शुक डोळां ॥ ४ ॥ मनीं आनंदभ-रित । पावे योगीराज तेथ ॥५॥ रीघ नोहेचि भीतरीं । म्ह णोनि थोकले बाहेरी ॥६॥ झणीं उच्छिष्टांचे कवळ । बा-हेर टाकित गोपाळ ॥ ७ ॥ पात्रें देवांचे हातींची । वैसो-नीया शितें वेंची ॥ ८ ॥ शीत घालितां मुखांत । महा नवल अद्भुत ॥ ९ ॥ हा तों ब्रम्हनिष्ठ मोठा । स्वर्गीं घणाणली घंटा ॥ १० ॥ घोष झाला गगनीं । म्हणे नामयाची जनी ॥ ॥ ११ ॥

६५

धर्म म्हणे नारायणा । बरवें आणोनियां मनां ॥१॥ ग-णित होतां लक्ष जनीं । तेव्हां उमटे एक ध्वनी ॥२॥ आतां नकळे याची सोय । सांग आश्चर्य हें काय ॥ ३ ॥ म्हणे ब्रम्हविद् कोणी । आला असेल ये क्षणीं ॥ ४ ॥ करिल संशयातें मन । ब्रम्हविद् म्हणजे कोण ॥ ५ ॥ देईं अवधान कानाचें । मुखें सांगेन मी पांचे ॥ ६ ॥ ऐक त्यांचें हें लक्ष-ण । जातिमंत्र हे ब्राम्हण ॥ ७ ॥ असे जाण एक शत । संख्या होतांचि गणित ॥ ८ ॥ ज्यासि वेदाचें विज्ञान । तो एक इतुक्यासमान ॥ ९ ॥ वेदपाठक शत एक । तितक्या-सि म्हणा आर्थिक ॥ १० ॥ त्याहीं होउनी शतगुणी । एक आगळा अनुष्ठानी ॥ ११ ॥ ऐसे शत एक भरती । इंद्रिय-जित् तया म्हणती ॥ १२ ॥ तेही होती जेव्हां शत । तो-चि होय विष्णुदास ॥ १३ ॥ गुणी पांडवा । ब्रम्हनिष्ठ श्रेष्ठ सर्वां ॥ १४ ॥ ऐसा आला असेल कोणी । म्हणे नामयाची जनी ॥ १५ ॥

६६

याज्ञवल्की कपिलाचार्य । वामदेव शुक दत्तात्रय ॥ १ ॥ पांचामाजि कोणी एक । पहा शोधूनि कौतुक ॥ २ ॥ धर्मराज कृष्ण दोन्ही । निघते झाले हात धरुनि ॥३॥ उच्छिष्ट पत्रावळी जेथें । शुद्र योगीराज तेथें ॥४॥ महा आनंदें करुनि । शीत घालितसें वदनीं ॥५॥ धर्मा दाखविलें डोळां । लोटांगण वेळोवेळां ॥ ६ ॥ घालोनि नमिले चरण । कृष्णें दिधलें आलिंगन ॥ ७ ॥ घेउनि आले मंडपांत । षोडश उपचारें पूजित ॥ ८ ॥ सरलीं यापरि भोजनें । सुमनमाळा हरि चंदनें ॥ ९ ॥ भीष्म बोलला धर्मासी । करा सन्मान रायासी ॥ १० ॥ धर्में मानोनि वचनार्था । अहेर ओपिले समस्ता ॥ ११ ॥ तो हा नववा प्रसंग । सांगितला यथासांग ॥ १२ ॥ कथा पुढील रसाळ । शब्द जैसें मुक्ताफळ ॥ १३ ॥ श्रोत्या राजहंस चारा । जनी वाली कर्णद्वारां ॥ १४ ॥

६७

॥ पद ॥

श्रीहरी चक्रधारी, पांडवांचा साह्यकारी, पडलें संकट जेव्हां । द्रौपदीचा पाहुनी भाव, आले देव घेती धांव, भाव पाहुनी देवा ॥ १ ॥ ऋषी आले भोजनासी, धांव पाव ऋषीकेशी, पडलें संकट तेव्हां । सत्वहानी होती जाती, धांव पाव जगत्पती । तुजविण कवण आम्हां ॥ २ ॥ पांडवांचा प्राणसखा, द्रौपदीचा पाठीराखा, आले हरी जेव्हां । ऋषी जेउनि तृप्त झाले, धर्मालागीं यश आलें, हरले संकट तेव्हां ॥ ३ ॥ श्रीहरी पूतनारी, कंसाआधि कौतुक करी, मल्ला लागीं जेव्हा । जनी म्हणे देवा देवा, पुरवा माझा तुम्हीं ठेवा, रक्षी आतां आम्हां ॥ ४ ॥

## ६८ ॥ पद ॥

नवल वर्तलें नवल वर्तलें नवल गुरूचे पाईं । कापूर जळून गेला परि ते काजळि उरली नाहीं ॥ ध्रु० ॥ साकर पेरुन ऊंस काढिला कान झाला डोळा । निबर बायको भ्रतार तान्हा सासरा तो भोळा ॥ १ ॥ नवल मायबो नवल मायबो नवल चोजवेना । डोहामाजीं मासोळीनें वांचविलें जीवना ॥२॥ नवल वर्तलें नवल वर्तलें नवल चक्रपाणी । गोकुळ चोरुन नेलें तेथें कैंची दासी जनी ॥ ३ ॥

## ६९

यातीहीन चोखामेळा । त्याला भक्तीचा जिव्हाळा ॥१॥ देव बाटविला त्यानें । ऐसें बोलती अज्ञान ॥ २ ॥ देव आहे त्याचे घरीं । भूमी वैकुंठ पंढरी ॥ ३ ॥ दुजें धरूं नका कोणी । ह्मणे नामयाची जनी ॥ ४ ॥

## ७०

भजन करी महादेव । राम पूजी महादेव ॥ १ ॥ दोघे एकपणें पाहीं । एकत्वें तें दुजें नाहीं ॥ २ ॥ शिवराम नाहीं भेद । ऐसें वदताती वेद ॥ ३ ॥ जनी ह्मणे हो ऐका । सर्वां वटीं तोचि देखा ॥ ४ ॥

## ७१

भक्त जें जें कर्म करिती । तें तूं सोसिसी कृपामूर्ती ॥ १ ॥ नवल नोहेजी देवा । तूं भुललासि भक्तिभावा ॥२॥ वाग्दोर धरुनि हातीं । चारी घोडे चहूं हातीं ॥ ३ ॥ धुतां लाज नाहीं तुला । दासी जनी ह्मणे भला ॥ ४ ॥

## ७२

देव पांडवाचा सखा । द्रौपदीचा पाठीराखा ॥ १ ॥ माया जाळ तें तोडिलें । आंत विवर कोरिलें ॥ २ ॥ भीष्में निर्वाण मांडिलें । शस्त्र आपण धरियेलें ॥ ३ ॥ उच्छिष्ट

काढी धर्माघरीं । अर्जुनाचा रथ फेरी ॥ ४ ॥ भक्त रक्षिले निर्वाणीं । ह्मणे नामयाची जनी ॥ ५ ॥

७३

ऐसी कीर्तनाची गोडी । वैकुंठाहूनि घाली उडी ॥ १ ॥ आपण वैकुंठींच नसे । भक्तापाशीं सदां वसे ॥ २ ॥ भक्त आठवती तया । देव धांवे तया समया ॥ ३ ॥ जनी म्हणे कृपानिधी । भक्त भावाची मांदी शोधी ॥ ४ ॥

७४

येरे येरे माझ्या रामा । मनमोहन मेघःशामा ॥ १ ॥ संतमिसें भेटी । देई देई कृपादृष्टी ॥ २ ॥ आमुची चुकवी जन्मव्याधी । आम्हां देई वो समाधी ॥ ३ ॥ जनी ह्मणे चक्रपाणी । करी ऐसी वो करणी ॥ ४ ॥

७५

अहो नारायणा । मजवरी कृपा कां कराना ॥ १ ॥ मी तों आज्ञानाची राशी । म्हणोनि आलें पायापाशीं ॥ ॥ २ ॥ धांव धांवगा श्रीहरी । मजवरी कृपा करीं ॥ ३ ॥ जनी ह्मणे आतां । मज सोडवीं कृपावंता ॥ ४ ॥

७६

गंगा गेली सिंधूपाशीं । तेणें आव्हेरिलें तिसी ॥ १ ॥ तिनें मागावें कवणाला । ऐसें बोलेवा विठ्ठला ॥ २ ॥ जळ कोपें जळचरा । माता अव्हेरी कुमरा ॥ ३ ॥ जनी ह्मणे शरण आले । पाहिजे ते उद्धरले ॥ ४ ॥

७७

तुझी नाहीं केली सेवा । दुःख वाटे माझ्या जीवा ॥ १ ॥ नष्ट पापीण मी हीन । नाहीं केलें तुझें ध्यान ॥ २ ॥ जें जें दुःख झालें मला । ते त्वां सोशिलें विठ्ठला ॥ ३ ॥ क्षमा करी देवराया । दासी जनी लागे पायां ॥ ४ ॥

७८

देव भावाचा लंपट । सोडुनि आलासे वैकुंठ ॥ १ ॥ पुंडलीका पुढें उभा । समचरणाची शोभा ॥ २ ॥ उभा अ-सेना सर्वथा । पायीं वीट पंढरिनाथा ॥ ३ ॥ सर्व सुखाचा सागर । जनी ह्मणे सारंगधर ॥ ४ ॥

७९

ज्याचा सखा हरी । त्यावरि विश्व कृपा करी ॥ १ ॥ उणें पडों नेदी त्याचें । वारें सोशी आघाताचें ॥ २ ॥ तया-वीण क्षणभरी । कदां आपण नोहे दुरी ॥ ३ ॥ अंग आपुलें ओढोनी । त्याला राखे जनीं वनीं ॥ ४ ॥ ऐसा अंकित भ-क्तासी । जनी म्हणतसे दासी ॥ ५ ॥

८०

सुखें संसार करावा । मांजि विठ्ठल आठवावा ॥ १ ॥ असोनीया देहीं । छाया पुरुष जैसा पाहीं ॥ २ ॥ सूर्य जैसा घटकेसी । तैसी देहीं जनी दासी ॥ ३ ॥

८१

चोरा संगतीनें गेला । वाटे जातां नागवला ॥ १ ॥ तैशी सोडोनियां भक्ती । धरी विषयाची संगती ॥ २ ॥ अग्नीसवें खेळे । न जळे तरी चरकीं पोळे ॥ ३ ॥ विश्वासला चोरा । जनी म्हणे घाला खरा ॥ ४ ॥

८२

रानां गेलें शेणीसाठीं । वेंचू लागे माझ्या पाठीं ॥ १ ॥ पीतांबर कासे खोवीं । पाई शुभा पारखावी ॥ २ ॥ पूर्ण भरोनीया मोट । जनी ह्मणे द्यावी गांठ ॥ ३ ॥

८३

राधा आणि मुरारी । क्रीडा कुंजवनीं करी ॥ १ ॥ राधा डुलत डुलत । आली निजभुवनांत ॥ २ ॥ सुमनाचे शेजेवरी ।

राधा आणि तो मुरारी ॥ ३ ॥ आवडीनें विडे देत । दासी जनी उभी तेथ ॥ ४ ॥

८४

वाचे म्हणतां सोपान । प्राप्त वैकुंठचि जाण ॥ १ ॥ सोपानदेव करितां जप । जोडे वैकुंठीचें तप ॥ २ ॥ सोपानदेवीं धरितां ध्यान । पुनः जन्मा नाहीं येणें ॥ ३ ॥ दासी जनी तल्लीन झाली । सोपान चरणीं विनटली ॥ ४ ॥

८५

माझ्या नामयाचा गुरु । तोहा-सोपान सद्गुरु ॥ १ ॥
माझ्या जीवीच्या जीवना । हृदयीं राहे तूं सोपाना ॥ २ ॥
कऱ्हा तीरीं करुनी वस्ती । ब्रह्मपुरी जया ह्मणती ॥ ३ ॥
विश्व उद्भवे ज्याची सत्ता । जनी म्हणे माझ्या ताता ॥ ४ ॥

८६

सोपानाची ऐशी मूर्ती । विश्वकर्ता ब्रम्हा म्हणती ॥ १ ॥ ऐसें बोले पुराणांत । सृष्टीकर्त्ता जो भगवंत ॥ २ ॥ जनी म्हणे हा सोपान । ब्रम्हा अवतरला पूर्ण ॥ ३ ॥

८७

खंती वाटे माझे मनीं । राहे पंढरीसी येवोनी ॥ १ ॥
आठवे स्वामी हा सोपान । तया क्षेम मी देईन ॥ २ ॥
वैशाख शुद्ध एकादशी । संतसमुदायासरसी ॥ ३ ॥ स्वामी सोपान भेटला । जनी ह्मणे श्रम गेला ॥ ४ ॥

८८

सदाशिवाचा अवतार । स्वामी निवृत्ती दातार ॥ १ ॥
महाविष्णूचा अवतार । सखा माझा ज्ञानेश्वर ॥ २ ॥ ब्रम्हा सोपान तो झाला । भक्ता आनंद वर्तला ॥ ३ ॥ आदि शक्ती मुक्ताबाई । दासी जनी लागे पाई ॥ ४ ॥

८९

यातीहीन चोखामेळा । त्यासी भक्तीचा कळवळा ॥१॥ त्याचा झाला म्हणीयारा । राहे वरी धरुनि थारा ॥ २ ॥ देव बाटविला तेणें । हांसे जनी गाय गाणें ॥ ३ ॥

९०

माळीयाचा लेक झाला । शेखीं कूर्म्यालागीं गेला ॥ १ ॥ चांभारानें जानव्यासी । काढुनि दाविलें भटासी ॥ २ ॥ तुकाघरी शेले विणी । म्हणे नामयाची जनी ॥ ३ ॥

९१

रुक्मीणीच्या कुंका । सुरां असुरां प्रिय लोकां ॥ १ ॥ तूं धांवे माझे आई । सखे साजणी विठाबाई ॥ २ ॥ शिवा-चिया जपा । मदन ताता ये निष्पापा ॥ ३ ॥ भाव धरा मनीं । म्हणे नामयाची जनी ॥ ४ ॥

९२

ऐसा पुत्र देई संता । ज्याची आवडी पंढरिनाथा ॥१॥ गीता नित्य नेमें । वाची ज्ञानेश्वरी प्रेमें ॥ २ ॥ संताच्या चरणा । करी मस्तक ठेंगणा ॥ ३ ॥ कन्या व्हावी भागी-रथी । तुझें प्रेम जीच्या चित्तीं ॥ ४ ॥ ऐसें करी संतजना । म्हणे जनी गा निधाना ॥ ५ ॥

९३

चोखामेळा भक्त भला । तेणें देव भुलविला ॥ १ ॥ भक्ती आहे ज्याचे चित्तीं । त्याला पावतो निश्चितीं ॥ २ ॥ चोखामेळ्याची शुद्ध करणी । म्हणे नामयाची जनी ॥३॥

९४

जन्मा येउनिया देख । करी देहाचें सार्थक ॥ १ ॥ वाचे नाम विठ्ठलाचें । तेणें सार्थक देहाचें ॥ २ ॥ ऐसा नामाचा

महिमा । शेष वर्णितां झाली सीमा ॥ ३ ॥ नाम तारक त्रिभुवनीं । म्हणे नामयाची जनी ॥ ४ ॥

९५

शेट्या झाला हरी । द्रव्य गोणी लोटीं द्वारीं ॥ १ ॥ बुद्धी सांगे राजाईसी । तुम्ही न छळावें नामयासी ॥ २ ॥ अवघ्या वित्तासी वेंचावें । सरल्या मजलागीं मागावें ॥ ३ ॥ विठ्ठलशेटी नाम माझें । नामयासी सांगा वोजें ॥ ४ ॥ आज्ञा उचित दासासी । ऐसें बोले राजाईसी ॥ ५ ॥ ऐसें बोलोनीया गेला । जनी म्हणे नामा आला ॥ ६ ॥

९६

नामा येवोनीया पाहे । आजि कवतुक दिसताहे ॥ १ ॥ वृत्तांत निवेदी राजाई । लागे नामयाचे पाईं ॥ २ ॥ नामा म्हणे या द्रव्यासी । आम्हीं नातळों मानसीं ॥ ३ ॥ वेगीं बोलवा ब्राह्मण । करूं आतां संतर्पण ॥ ४ ॥ हातीं टाळ दिंडी गाणें । हेंचि आमुचें सर्व धन ॥ ५ ॥ ऐसें आश्चर्य देखोनी । जनी हांसतसे मनीं ॥ ६ ॥

९७

नामदेवाचें हें थोर । तरला कोळी तो कुंभार ॥ १ ॥ ऐशी नामाची आवडी । तुटली संसाराची बेडी ॥ २ ॥ वंदी पाय वेळोवेळां । दासी जनीला नित्य चाळा ॥ ३ ॥

९८

बापरखुमादेवीवर । माझें निजाचें माहेर ॥ १ ॥ तेणें जाणा पंढरपुर । जगा मुक्तीचें माहेर ॥ २ ॥ तेथें मुक्ती नाहीं म्हणे । जनी न पाहे त्याचें वदन ॥ ३ ॥

९९

सख्या पंढरीच्या राया । घडो दंडवत पाया ॥ १ ॥ ऐसें करी आखंडित । शुद्ध प्रेम शुद्ध चित्त ॥ २ ॥ वेध

माझ्या चित्ता । हाचि लागों पैं सर्वथा ॥ ३ ॥ जावें ओवाळुनी । जन्मोजन्मीं म्हणे जनी ॥ ४ ॥

१००

नाम विठोबाचें घ्यावें । मग पाऊल टाकावें ॥ १ ॥ नाम तारक हें थोर । नामें तरले अपार ॥ २ ॥ अजामिळ उद्धरिला । चोखामेळा मुक्तिस नेला ॥ ३ ॥ नाम दळणीं कांडणीं । गाय नामयाची जनी ॥ ४ ॥

१०१

चरण विठोबाचे देखिले । साही रिपू हारपले ॥ १ ॥ नाहीं नाहीं ह्मणती आम्ही । सांगसी त्या लागूं कामीं ॥२॥ नाहीं तरी जाऊं देशीं । जनी नामयाची दासी ॥ ३ ॥

१०२

घेतलें पदरीं । आतां न टाकावें दुरी ॥ १ ॥ तुम्हां थोरांचें उचित । हेंचि काय सांगूं तूतें ॥ २ ॥ ब्रह्मीयाच्या ताता । सख्या रुक्मिणीच्या कांता ॥ ३ ॥ आपुली ह्मणवोनी । आंपगावी दासी जनी ॥ ४ ॥

१०३

किती सांगूं तूतें । बुद्धी शिकवण मातें ॥१॥ सोमवंशींच्या भूषणा । प्रतिपाळीं आरुष जना ॥ २ ॥ शिकवावें तूतें । हाचि अपराध मातें ॥ ३ ॥ स्वामी लागीं धीट ऐसी । म्हणतसे जनी दासी ॥ ४ ॥

१०४

मांडियेला खेळ । बुद्धी रंगाची बुदबळें ॥ १ ॥ कैसा शह आला । प्यादा फर्जीसवें मेला ॥ २ ॥ शहाबाजी झाली । जनी ह्मणे मात केली ॥ ३ ॥

१०५

देशी गर्भवास । तरी पुरवावी आस ॥ १ ॥ मग पक्षी

हो कां सूकर । श्वान श्वापद मार्जार ॥ २ ॥ मज करी हे पंढरी । अथवा नामयाचे घरीं ॥ ३ ॥ ऐसा हेत माझे मनीं । ह्मणे नामयाची जनी ॥ ४ ॥

१०६

शिणल्या बाह्या आतां । येउनीयां लावीं हाता ॥ १ ॥ तूं माझें माहेर । काय पाहसी अंतर ॥ २ ॥ ओवाळीन पाया । जीवें भावें पंढरिराया ॥ ३ ॥ धर्म ताता धर्म लेकी । म्हणे जनी हे ओळखी ॥ ४ ॥

१०७

एक ब्राम्हणाचें पोर । रडे दूध मागे फार ॥ १ ॥ माता म्हणे बाळकासी । दूध मागे देवापाशीं ॥ २ ॥ क्षीरसिंधू भरुनी वाटी । जनी म्हणे लावीं ओठीं ॥ ३ ॥

१०८

पाय जोडोनि विटेवरी । कर ठेवुनि कटावरी ॥ १ ॥ रूप सावळें सुंदर । कानीं कुंडलें मकराकार ॥ २ ॥ गळा वैजयंती माळा । तोहा मदनाचा पुतळा ॥ ३ ॥ गरुड सन्मुख उभा । जनी म्हणे धन्य शोभा ॥ ४ ॥

१०९

शरण शरण नारायणा । मज तारी वो पावना ॥ १ ॥ शरण आला मारुती राय । त्याचा दिव्य झाला काय ॥ २ ॥ शरण प्रल्हाद तो आला । हिरण्यकशिपु मारिला ॥ ३ ॥ जनी म्हणे हेंचि खूण । जावें देवाला शरण ॥ ४ ॥

११०

योग न्याचा सिद्धि । सकळ गुणांचा तूं निधी ॥ १ ॥ अरूपाच्या रूपा । सामराज्याचिया बापा ॥ २ ॥ ब्रह्मयाच्या ताता । म्हणे जनी पंढरीनाथा ॥ ३ ॥

———:o:———

# ॥ श्रीज्ञानदेव ॥

## गुह्यसप्तक.

१

ॐ सोहं दोन्ही धरितां मारग । लाधले निजांग आत्मरूप ॥ १ ॥ तत्वमसि वाक्य साधिलें निर्धार । परेचे विवर हाता आलें ॥ २ ॥ लय लक्ष्य ध्यान सर्व नाशिवंत । पाहणें पहा तें ज्योतिरूप ॥ ३ ॥ ज्ञानदेव तेथें अक्षय्य राहिला । आत्मा म्यां पाहिला याचि डोळां ॥ ४ ॥

२

अहं तें सांडुनि सोहं अस्मि ध्याये । ब्रम्ह स्वयें होये गुरुपुत्रा ॥ १ ॥ एक कळा सार वाउगी असार । स्वरूप स्थिती पार पाववील ॥ २ ॥ नामरूपीं भेद लय साक्षी याचा । होईल सुखाचा अनुभव ॥ ३ ॥ निवृत्तीनें गुज सांगितलें कानीं । ज्ञानदेवा मनीं हाचि छंद ॥ ४ ॥

३

औट हात डोंगरी एक गाय वसे । क्षीर सेवितसे एक योगी ॥ २ ॥ धाले पूर्णपदीं समाधी लक्षितां । क्षुधा चाड चित्ता नाहीं नाहीं ॥ २ ॥ नाहीं तें सांडुनि आहे तें पाहिलें। मन उन्मन झालें आपेआप ॥ ३ ॥ ज्ञानदेवीं देव देव या अभाव । अनादि स्वयंभ तें एकविध ॥ ४ ॥

४

आदिनाथें बीज सांगितलें. कानीं । सोहं हे निशाणी कैवल्याची ॥ १. ॥ मत्स्येंद्र गोरक्ष पावले या सुखा । उजळल्या आरोखा ज्ञानाचिया ॥ २ ॥ निवृत्तीनें गुज ओतिलें स्वतंत्र । पावले आधार सिद्ध पंथ ॥ ३ ॥ सोहं हा मंत्र वेदाचा उच्चार । म्हणे ज्ञानेश्वर पूर्ण योगी ॥ ४ ॥

५

नेणपणें जाणे जाणपणें नेणे । होय सनातन एकविध॥ १॥ बोले सोहं तत्व चाले सोहं तत्व । कवळी परतंत्र मंत्रमय ॥ ॥ २ ॥ मुक्ताबाई बोले काय हो आणिक । निवृत्ति सम्यक् एक अर्थ ॥ ३ ॥ ज्ञानदेवीं बोली अक्षर निर्विकार । पावलेसे पार पैल तीरा ॥ ४ ॥

६

आतां या परतें उरलें नाहीं कांहीं । देहीच विदेही होउनि ठेलों ॥ १ ॥ आमचे आम्हीं देव आमचे आम्हीं भक्त । आमचे आम्हीं मुक्त एकविध ॥ २ ॥ आमचे आम्हीं ज्ञान आमचे आम्हीं ध्यान । सोहं अस्मि खूण हातां आली ॥३॥ ज्ञानदेवा पाहणें निर्गुण निरंजन । मनाचें मोहन मूर्ती माझी ॥ ॥ ४ ॥

७

नवाग नवाचे नवही द्वारें पाहीं । सोहं होंचि येइं एकविध ॥ १ ॥ अंबाळयीं सांगे निवृत्तिनाथा कानीं । पावला तो ज्ञानी सिद्ध पंथ ॥ २ ॥ ज्ञानदेव म्हणे गुह्य हे सम्यक । अनुभवीं उल्लेख पायऱ्या ह्या ॥ ३ ॥

---

१

ब्रह्मरंध्रीं मन जाहलेंसे तल्लीन । केलें अमृतपान सत्रावीचें ॥ १ ॥ इडा आणि पिंगळा सुषुम्ना हे नाडी । रोधोनि प्रौढी ठेवियेल्या ॥ २ ॥ त्रिकूट शोधिलें श्रीहाट भेदिलें । गोल्हाट ओळखिलें योगमार्गें ॥ ३ ॥ जीवशीव दोन्ही झाले एकाकार । म्हणे ज्ञानेश्वर तोचि पूर्ण योगी ॥ ४ ॥

२

पहिली माझी ओवी त्रिकूट स्थळासी । ब्रम्ह जागृतीसी रक्तवर्ण ॥ १ ॥ दुसरी माझी ओवी श्रीहाट अंगुष्ठीं । विष्णु-

लिंग कंठीं श्वेतवर्ण ॥ २ ॥ तिसरी माझी ओवी गोल्हाटा कारण । रुद्र कृष्णवर्ण सुषुम्नेसी ॥ ३ ॥ चवथी माझी ओवी महातेकारण । औटपीठ शिखरीं नीळवर्ण ॥ ४ ॥ पांचवी माझी ओवी भ्रमर गुंफे स्थानीं । सदाशिव उन्मनी पीतवर्ण ॥५॥ सहावी माझी ओवी सहस्त्र दळासी । तेथें गुरु-मूर्तीसी देखियेलें ॥ ६ ॥ सातवी माझी ओवी अनुलेख उ-ल्लेख । सर्वाभूतीं देख परब्रम्ह ॥ ७ ॥ आठवी माझी ओवी अलक्ष स्वरूपीं । आपेआप नामीं ओळखावे ॥ ८ ॥ नववी माझी ओवी अलक्ष्य देवासी । आपेआप नासी ब्रम्हरूप ॥ ९ ॥ ज्ञानदेव म्हणे अनुभवी जाणे । संताची हे खूण संतोपती ॥ १० ॥

३

एक माझी माता दोघेजण पिता । कन्या झाल्या कांता सुत दोघे ॥ १ ॥ दोघेजण बंधू दशक बहीणी । कन्या झाल्या तिघी तिच्या पोटीं ॥ २ ॥ बहीण भावाचे वाल्हाव पैं केलें । अघटित केलें सांगवेना ॥ ३ ॥ ज्ञानदेव म्हणे सां-गावें हें गूढ । नाहीं तरी मूढ होउनि राहे ॥ ४ ॥

४

अंतरिचें सूख दृष्टीनें तूं देख । ओंकार अरूप बोलतसे ॥ १ ॥ नादुलें ऐकावें बिंदुलें पहावें । कोंदलें जाणावें चौं-देशीं ॥ २ ॥ आंत ना बाहेरी आहे अभ्यंतरीं । एकलें नि-र्धारीं वावरत ॥ ३ ॥ उलटोनि दृष्टी निवृत्ती शेवटीं । ज्ञान-देवा भेटी होउनि ठेली ॥ ४ ॥

५

नोव्हे तो आकार नोव्हे तें साकार । वस्तु परात्पर अलक्षित ॥ १ ॥ काळें ना सांवळें पिवळें ना ढवळें । चहूं-ते वेगळें पुढें पाहे ॥ २ ॥ तांबडे अथवा निळे देंही त्या न

मिळे । उपमेसी सगळें हातां नये ॥ ३ ॥ गुप्त ना प्रगट पाहे हा साक्षात । लक्षितां भर्चीत वेडावली ॥ ४ ॥ ज्ञानराज म्हणे निवृत्तीची सत्ता । त्याचा कर माथा तेव्हां कळे ॥ ५ ॥

६

कशाला विभूती आंगी उधळसी । व्यर्थ कांरे जासी दिगंतरा ॥ १ ॥ ब्रम्ह सर्वगत असें सर्वां ठायीं । नेणोनीयां पाहीं धांव घेसी ॥२॥ तुझें रूप तुज जवळीं असतां । विसर कांरें भ्रांता पडला तुज ॥ ३ ॥ होय सावधान पाहे परतोन। ज्ञानदेव ह्मण सांगतसे ॥ ४ ॥

७

भक्ती तें ज्ञान वाचे नारायण । देव तो संपूर्ण सर्वांभूतीं ॥ ॥ १ ॥ ज्ञान नारायण ध्यान नारायण । वाचे नारायण सर्वकाळ ॥ २ ॥ संसारग्रामीं नाम हेंचि साठा । पावले वैकुंठा नामें एका ॥ ३ ॥ नामेंचि तरले शुकादिक दादुले । जड जीव उद्धरले कलियुगीं ॥ ४ ॥ गोविंद गोपाळ वाचेसि निखळ । पद पावले अढळ अच्युताचें ॥ ५ ॥ स्मरण करितां वाल्मीक वेखरी । वारुळाभीतरीं रामनाम ॥ ६ ॥ सर्वांमाजि श्रेष्ठ पुण्यभूमि वैकुंठ । विठ्ठल मूळपीठ जगदोद्धार ॥ ७ ॥ निवृत्ति निरूपण ज्ञानदेवा ध्यान । सर्वत्र नारायण एकरूप ॥ ८ ॥

८

त्रिवेणीचें स्नान अखंडित करा । काशीवासी मरा ज्ञानावीण ॥ १ ॥ नाहीं गती वस्ती निरंजनी । भोगी रुद्रयोनी कर्मयोगें ॥ २ ॥ नाहीं ब्रम्हज्ञान न चुके यातायाती । न पाविजे मुक्ती गुरुवीण ॥ ३ ॥ ज्ञानदेव म्हणे करावें स्मरण। तरीच चिदानंद पाविजेल ॥ ४ ॥

९

मोतीयाचे डोहीं बुडाला चंद्रमा । तो म्हणे विहंगमा काढी मज ॥ १ ॥ विहंगम झेंपावला जळचरीं ग्रासिला । चंद्रमा झांकोळला मुंगी मुखीं ॥ २ ॥ चंद्रकळा अवघ्याही लो-

पल्या । दाही दिशा गेल्या लपोनिया ॥ ३ ॥ प्रकाशलें चांदणें प्रकाशला निरालंब । तें बीज स्वयंभ सत्राविचें ॥ ४ ॥ ज्ञानदेव ह्मणे ऐसें हें गुज । संत सेउनि सहज सुखी झाले ॥ ५ ॥

५

स्वरूपाचा पूर गगनसरींत पावला । देखणा बुडाला देखतांची ॥ १ ॥ चैतन्याच्या लाटा हेलावती एकसरा । प्रळईच्या नीरा सारखीया ॥ २ ॥ नावरी मोतीं विखुरलीं अंबरीं । दिसती परिकरी येतेंचिना ॥ ३ ॥ गुरुमुखें खूण ओळखून घ्यावी । देहींच पावावी मुक्तदशा ॥ ४ ॥ ज्ञानदेव म्हणे निवृत्ती दातार । चोजविलें सार माझें मज ॥ ५ ॥

६

नयनाचें आंगणीं पाहिलें आपण । तेथें उजळण दाही दिशा ॥ १ ॥ ब्रह्मांडा एवढें ओतींव सगळें । मन बुद्धि कवळे ऐसें नाहीं ॥ २ ॥ तें ज्ञानबुबुळीं ज्ञानदेव लाधला । निवृत्तीनें दिधला धरुनि हातीं ॥ ३ ॥

७

वर्ण व्यक्ति पाहे निजतेज । संताचें हें गुज आत्मरूप ॥ १ ॥ मोतीयाचा सागर भरते दाही दिशा । पाहतां जीव दशा बुडोनि जाय ॥२॥ तें सुख माझ्या दाटलें नयनीं । चिद्रत्नाची खाणी उघडली ॥ ३ ॥ निवृत्तीप्रसादें ज्ञानदेवा लाधला । सुखी पैं झाला येणें सुखें ॥ ४ ॥

८

महेशें खूण हंसा दाखविली । हंसें लाधविली कमळासना ॥ १ ॥ सनकादिक तृप्त ज्या सुखें जाहले । योगी आनंदले युगायुगीं ॥ २ ॥ तेणें मज केलें करतळामळ । निवृत्ती कृपाळ काय वानूं ॥ ३ ॥ चहूं शून्यावरी नांदताहे देही ।

तेंही ब्रह्मांडगेहीं भरोनि असे ॥ ४ ॥ जयाचा तो भास असे बिंबाकार । तें खूण लाहें कीर गुरुपुत्रा ॥ ५ ॥ बिंबा-चेचि अंग परब्रह्म निघोट । ते वस्तु अवीट जेथें तेजःपुंज ॥ ६ ॥ चळेना ढळेना जैशीचि तैशी । उपमा आणिकाशी देतां नये ॥ ७ ॥ बहु जन्मांशेवटीं फळ हें पुण्याचें । अभाग्यासि कैचें प्राप्त होय ॥ ८ ॥ ज्ञानदेव ह्मणे या परतें नाहीं । उपदेश काहीं बोलावया ॥ ९ ॥

९

ओट हात स्थूळ पांढरा तो डोळा । कारण तुतुळा पाहे बापा ॥ १ ॥ मसुरे एवढें महा तें कारण सावळें चिद्‍घन । तयामाजि चैतन्य लखलखित ॥ २ ॥ अणूरेणू एवढी ज्योती ब्रह्मांड निरुतीं । योगी डोळां लक्षिती लक्षातीत ॥ ३ ॥ ज्ञानदेव ह्मणे कुसळाचें अग्र । तें रूप सुंदर विठोबाचें ॥४॥

१०

रिंगणीचे खोडीं बांधियेला हत्ती । मुंगीनें पर्वतीं गिळि-येलें ॥ १ ॥ तृणानें धेनु साठविली पोटीं । गगनासि गोष्टी सांगतसे ॥ २ ॥ तंतूच्या पटानें विणियेला साळी । पानानें तांबोळी गिळियेला ॥ ३ ॥ ज्ञानदेव ह्मणे कळला वृत्तांत । पोथीनें पंडित वाचियेला ॥ ४ ॥

११

बोलण्यासारखा पाहिजे तो अनुभव । व्यर्थ तो गौरव वायां जातो ॥ १ ॥ अर्थ स्वार्थ लोक करिती पाल्हाळ । शेवटीं ती साळ खोटी पडे ॥ २ ॥ सद्गुरूची दया नसतां बोलती । पुढें ती फजीती जन्मवरी ॥ ३ ॥ आज्ञान नि-घेना वैराग्या वांचुनी । ज्ञानदेवा नयनीं गुरुरूप ॥ ४ ॥

१२

दृष्टीचा देखणा दृष्टी अगोचर । दृष्टीसि गोचर कैसा

होय ॥ १ ॥ आदि मध्य झाला नाहींच कीं अंत । व्यापक श्रीमंत निवृत्तीराज ॥ २ ॥ ज्ञानदेव म्हणे डोळियाचा डोळा । ओळखावा डोळां आपुलिया ॥ ३ ॥

१३

पाहूं चला आतां आत्म्याची मांडणी । दृष्टीची उन्मनी करारहा ॥ १ ॥ प्रथम आधार कमळ रक्तवर्ण । गणेश देव जाण नांदे तेथें ॥ २ ॥ जप सहा शतें आधारीं होतीं । सिद्धी बुद्धि शक्ती तयाजवळी ॥ ३ ॥ चतुर्दशकमळ विकासलें असे । ज्ञानेश्वर वसे ज्ञानरूपें ॥ ४ ॥

१४

स्वाधिष्ठाण स्थान तें लिंग श्वेतवर्ण । अंगुळें सहा जाण ते ठायीं ॥ १ ॥ विष्णुरूपें ब्रम्हा तेजें जो आला । विश्वाचा जिव्हाळा तेचि ठायीं ॥ २ ॥ मणिपूर स्थान पाहिलें आत्म्याचें । तेथें स्वर्ग देवाचें स्थान असे ॥ ३ ॥ ज्ञानदेवा बोध जाहला सकळ । शब्दाचे पाल्हाळ उठताती ॥ ४ ॥

१५

पृथ्वी हे क्षणिक जाण । अवस्था जागृती खूण वसे नेत्रीं ॥ १ ॥ वेद तो ऋग्वेद मात्रा ते आकार । वैखरी निर्धार वाचा कीरे ॥ २ ॥ प्रणव चरण प्रथम हा देह । आत्मा निःसंदेह सर्व साक्षी ॥ ३ ॥ ज्ञानेश्वर म्हणे स्थूळ ऐसें झालें । लिंग प्रकाशलें तेंही ऐका ॥ ४ ॥

१६

आप तत्वचि लिंगवर्ण श्वेताकार । स्वप्न अवस्था सुंदर पाहे तेथें ॥ १ ॥ यजुर्वेद तेथें मात्रा उकाराची । मध्यमा वाचा साक्षी थोर असे ॥ २ ॥ प्रथम चरण द्वितीये ऐसा उगव । लिंग हा तथैव ऐसा कीरे ॥ ३ ॥ ज्ञानदेव म्हणे लिंग हाचि झाला । कारण उगवला कवणे परी ॥ ४ ॥

१७

कारण देह हें तंव पूर्वार्ध प्रमाण । अवस्था हे खूण सुषुप्तीची ॥ १ ॥ सामवेद मात्रा मकार यंत्राकार । पश्यंती निर्धार वाचा कीरे ॥ २ ॥ स्वरूपाचा विसर अज्ञान कारण । गुरुपुत्र खूण जाणती हे ॥ ३ ॥ ज्ञानदेवा कारण शोधोनि पाहतां । महाकारण अवचिता रीघ झाला ॥ ४ ॥

१८

महाकारण मसुरा वर्तुळ आकारू । वेद अथर्वण निरोपिला ॥ १ ॥ अवस्था ते तूर्या मुक्ति सायुज्यता । वाचा तेचि आतां परा ऐशी ॥ २ ॥ शुद्ध सत्व चौथी ध्वनी अर्धमात्रा । असिपदीं ऐक्यता तेथें असे ॥ ३ ॥ ज्ञानदेव म्हणे महाकारण नीळ । वर्णाचा वेल्हाळ ऐसा सांगिजे ॥ ४ ॥

१९

स्थावर जंगम शिवशक्ति भेद । पिंड ब्रह्मांड अभेद अनुभवासी ॥ १ ॥ जैसा दोर रज्जु सर्प भास भासे । मीपण मज पिसें केसें जाण ॥ २ ॥ अमृताची क्षीर ब्रम्हांड भुवनीं । पहातां त्रिभुवनीं नवल झालें ॥ ३ ॥ आत्मा वर्तुळाकार रूप डोळां पाही । ज्ञानदेवा सोई येणें अर्थें ॥ ४ ॥

२०

नादाबिंदा भेटी जाहली कोण्या रीतीं । शुद्ध ब्रम्हज्योति संचरली जेथें ॥ १ ॥ प्रकृती पुरुष शिवशक्तीचा भेद । त्याचें शरीर देह द्वंद्व जाण ॥ २ ॥ ज्ञानदेव म्हणे अनुभवी ऐका । निवाल ब्रम्हसुखा निवृत्तीच्या ॥ ३ ॥

२१

शून्य शोधलें नाहीं जेणें । काय विवरण केलें त्याणें । ज्ञानपणें फुगणें । गाढव जिणें पशूचें ॥ १ ॥ वर्णाकृति शून्यें चार । हा नाहीं जयासि विचार । न वडे

न घडे साक्षात्कार । जाण सर्वथा तया नरा ॥ २ ॥ आधीं शून्याचीं शोधनें केलीं । मग शुद्ध वस्तूची प्राप्ती जाहली । अमृत वेळाची बोली । बोलतांचि नये मग ॥ ३ ॥ अर्ध शून्य तें ताम्रवर्ण । उर्ध्व शून्य तें शुभ्रवर्ण । मध्यें श्वेत रचिलें जाण । प्रत्यक्ष जाण दिसतसे ॥ ४ ॥ महाशून्याचा वर्ण निळा । अव्यक्त तेजाचा ओतिला गोळा । ग्रासोनि ठेला भूगोळा । योगी डोळां पाहती ॥ ५ ॥ ज्ञानदेव ह्मणे । अनुभवी तो जाणे । सद्गुरु मुखें खुणे । जाणितली ॥ ८ ॥

२२

ऐसें शून्याचें नाहीं ज्ञान । तोंवरि अवघें अज्ञान । जनीं अवघें जनार्दन । अज्ञान सज्ञान काय बोलूं ॥ १ ॥ ब्रम्हज्ञानाची किल्ली । सांगितली एकेचि बोलीं । जयाची वासना निमाली । तोचि प्राप्ति पुरुष ॥ २ ॥ तया शून्याचेंचि वळें । राहिलीं तिन्हीं ताळें । एकवीस स्वर्ग अंतराळें । राहिलीं जाण पां कैसीं ॥ ३ ॥ शून्याची ओळखा । जयासि नाहीं रूप ना रेखा । अगोचर ऐका । अपरंपार ॥ ४ ॥ तेथें रात्र ना दिन । जागृति ना स्वप्न । आपणचि दर्पण । होउनि ठेले ॥ ५ ॥ श्रीनिवृत्ती माउली । कृपेची बोली बोली । ज्ञानदेव तेचि बोली । बोलियेले ॥ ६ ॥

२३

चौं शून्या आरुतें महाशून्यापरुतें । सर्वांसि पाहतें तेंचि तें गा ॥ १ ॥ दिसतेंही शून्यें पाहतेंही शून्य । दोन्ही माजि भिन्न निरंतर ॥ २ ॥ शून्य निःशून्य दोन्हीं हारपलीं । तेथूनि पाहिली निजवस्तू ॥ ३ ॥ ध्येय ध्याता ध्यान निरसुनि तिन्हीं । ज्ञानदेव निरंजनीं अतिलीन ॥ ४ ॥

२४

सुनीळ जें ब्रह्म बिंब सत्रावीचें । विश्वरूप चैतन्याचें महा-

कारणीं ॥ १ ॥ ब्रम्हज्योतिचिया एका सेवनीं । देखती त्रिभुवनीं एक वस्तुराज ॥ २ ॥ ज्ञानदेव म्हणे ज्योतीचिया ज्योति । ब्रम्हरंध्रीं वस्ती परमात्म्याची ॥ ३ ॥

२५

मन हें लावितां त्रिकूटा शेजारी । ओळखी दशम द्वारीं बिंदूचिया ॥ १ ॥ ब्रम्हरंध्रा पासोनि गोल्हाटाचा गोल्हाट । मसुरा मात्र नीट नीळवर्ण राया ॥ २ ॥ विश्वरूप श्रीकृष्णें अर्जुना दाविलें । संत सज्जनीं पाहिलें सहस्त्र दळीं ॥ ३ ॥ ज्ञानदेवा स्वरूप निवृत्तीनें दाविलें । अनुभवा आलें नयनांजनीं ॥ ४ ॥

२६

भजनापरतें साधन आणीक । कलियुगीं देख आन नाहीं ॥ १ ॥ सर्वथा भजन हेंचि जाणा ज्ञान । मग मुक्तपण आपेआप ॥ २ ॥ मीपण मावळे सद्भाव उजळे । सुखाचे सोहळे गुरुपदीं ॥ ३ ॥ श्रीगुरु निवृत्तिचरणीं प्रसाद । भजनीं आनंद ज्ञानदेवा ॥ ४ ॥

२७

गोड तुझें नाम विठोबा आवडतें मज । दुजें उच्चारितां मना वाटतसे लाज ॥ १ ॥ कर्म आणि धर्म आचरी जे जया लागीं । साधनें साधितां कां शिणताती अभागी ॥ २ ॥ भक्ती आणि मुक्ती नामापाशीं प्रत्यक्ष । चारी वेद साही शास्त्रें देताती साक्ष ॥ ३ ॥ तनमन धन चरणीं ठुललें गहाण । बाप रखुमादेवीवरा विठ्ठलाचि आण ॥ ४ ॥

२८

॥ पद ॥

कान्हा मनमोहना गुणातीत निर्गुणा ॥ धृ० ॥ निशिदिनि ध्याती न येसि तयाच्या ध्याना । वेद श्रुति श्रमवोनी आतां

म्हणोनि निष्ठुर राहे निर्गुणा ॥ १ ॥ वर्ण व्यक्ति पाहतां तुज नाहीं निरंजना । बापरुक्मादेवीवर विठ्ठल सुलभ वैष्णवजना ॥ २ ॥

२९

गुरुगम्य नेणसी । साधु म्हणविसी आपणारे । जाणोनि नेणसी बोल ठेविसी कवणारे ॥ ध्रु० ॥ मृगजळ डोहीं मोट वाऱ्यानें बुडवीरे । गगनाचे पोकळी वंध्या पुत्र प्रसवलीरे । छाया सांगे वार्ता नेत्री बाहुलि हासलीरे । इतुका अनुभव जाणेल धन्य त्याची माउलीरे ॥ १ ॥ रिंगणीचे डाहाळीं हस्ती गुंडाळिला होतारे । शेंडावर एक मुंगी तीन्ही लोक तिचे माथांरे । उदकामध्यें अग्नी देखिला तो म्यां जळतांरे । ऐकेरे गुरुपुत्रा त्याची कोण झाली अवस्थारे ॥ २ ॥ सप्त समुद्र एक्या टिटवीनें चोचीमध्यें धरिलेरे । पुढें एक नवल वर्तलें आळीनें गगन गिळियलेंरे । शहाणा तो संतोषला मूर्खा ठकांचि पडलेंरे । सुख समाधान ज्ञानदेवें निरोपिलेंरे ॥ ३ ॥

३० ॥ **सौरी** ॥

चाल माझ्या विठू । तुम्ही आम्हीं भेटूं ॥ ध्रु० ॥ भावाची मी सौरी झालें गेलें संतापासी । ज्ञान डौर घेउन हातीं लिंगदेह नासी ॥ चा० ॥१॥ पांच माचवे तीन गाते त्यावर निजले होते । रामनामें मिळोनि गेले खाटलें पडलें रितें । चा० ॥ २ ॥ वेणी फणी करुन गेलें केतकीच्या बना । बारा सोळा मुलें झालीं दादला येइना मना ॥ चा० ॥ ३ ॥ आंत पोकळ बाहेर पोकळ कोल्हाट्याचा वेळू । म्हातारपणें दादला केला त्याचे आवज पेळू ॥ चा० ॥ ४ ॥ कर्म नेणं धर्म नेणूं नेणूं आम्हीं कांहीं । ज्ञानदेव म्हणे आम्हां येणें जाणें नाहीं ॥ ५ ॥

## ३२ ॥ गोंधळ ॥

विटेवरी तूं सखये बाई हो । करि कृपा । माझें मन लागों तुझें पाईं हो । क० । तूं सावळें सुंदर होईं हो । क०। लावण्य मनोहारी हो । क० । निजभक्तां करुणा करी हो । क० । पंढरपुरीं राहिली, संतीं वेष्टिली, डोळां पाहिली, भरुन विठाई। सच्चिदानंद अंबाबाईहो । क०॥१॥ करि कृपा, उजळ कुळदिपा, बोध कर सोपा, येऊन लवलाहीं ॥सच्चि०॥ धृ० ॥ तुझा देव्हारा मांडिला हो । क० । चौक आसनीं कळस ठेविलाहो । क० । भक्ति चांदवा दिघला हो । क० । ज्ञान गादी बसायाला हो । क० । वरि बैसली आदि माया हो । क० । प्रेम पुष्पें आणिलीं पुजायाहो । क० । काम क्रोध मदमत्सर, दंभ अहंकार, याचें बळ थोर, वेऊन सुख देई। सच्चिदा० ॥२॥ तेथें सनकादिक गोंधळी हो । क० । नाचवि आनंद कल्लोळीं हो । क० । उदो उदो शब्द आरोळी हो । क० । तेथें पुंडलीक दिवटाहो । क० । तेणें मार्ग दाविला निटाहो । क० । आई दाविली मूळपीठाहो । क० । बाप रुक्मादेवीवरू, सुखसागरू, केला नमस्कारू, सकळ सुखदाई । सच्चि० ॥ ३ ॥

## ३३

देव एक करी काय एक नव्हे । पाषाणाची नांव तारीयेली ॥१॥ फुटतील पाय चालतील भिंती । मेरु मत्स्य होती समतुक ॥२॥ सूर्य किरणावरी मुंगीयाच्या हारी । अग्नीच्या पाठारीं पीक होय ॥ ३ ॥ ज्ञानदेव म्हणे अघटित घडे । गुरु कृपे जोडे परब्रम्ह ॥ ४ ॥

## ३४

। मोतीयाचा ओगरू गुरु वाक्य सदनीं । वादला भाजनीं नभाचिया ॥ १ ॥ धारणेचे हाते जेव्हां दृष्टी मुख । गोडी-

याचे सुख आंगीं भरा ॥ २ ॥ चाखविता विरळा बहुता माजी एक । आहेत दांभिक घरोघरीं ॥३॥ ज्ञानदेव म्हणे जो दावील हेंचि खूण । त्याचे पायीं लीन होय सदां ॥ ४ ॥

३५

काय नेणुनिया आन । एक विठ्ठलचि जाण ॥ १ ॥ हेंचि भाक्ति हेंचि ज्ञान । एक० ॥ २ ॥ बहु भजसी निर्वाण । ए० ॥ ३ ॥ हेंचि गुरुगम्य खूण ॥ ए० ॥ ४ ॥ बापरुक्मादेवी वराची आण ॥ ए० ॥ ५ ॥

३६

नवाचे माझारी औटपीठाचे शेजारी । शून्याची ओवरी सुनीळ प्रभा ॥ १ ॥ जविदशामय अंगुष्ठ प्रमाण । त्यावरी आज्ञान प्रवर्धते ॥ २ ॥ मग तेंचि जाण मसुरे प्रमाण । गुरुमुखें खूण जाण बापा ॥ ३ ॥ चैतन्याची मूस त्या माजीं ओतिली । अव्यक्तानें केली वस्ती तेथें ॥ ४ ॥ ज्ञानदेव म्हणे या परते जाण । नाहीं नाहीं आन निवृत्तीची ॥ ५ ॥

३७

चित्तविहारे झालेंसे साजणी । अवचित म्यां आंगणीं देखियेला ॥ १ ॥ काय करूंग सये सावळ गोवित । आपे आप लपत मन तेथें ॥ २ ॥ बापरुक्मादेवीवरु सावळी प्रतिमा । मनें मना क्षमा एक झाली ॥ ३ ॥

३८

रुणुझुणुरुणुझुणे पांवा वाजे सुस्वर । गुणातीत गुण गात आहे ॥ १ ॥ आपुले मूर्ती पुढें आपण उभा राहे । आपुले गुण गात आपणची ॥ २ ॥ गाये बहुवदनीं ऐके बहु श्रवणीं । चाले बहु चरणीं अहर्निशीं ॥ ३ ॥ ज्ञानदेव ह्मणे अणू कीर्तनीं । उचित करुनि देत कान्हा ॥ ४ ॥

# भांडण. (श्रीगुरूचे संवाद.)

## संवाद १ ला.

३१

अरत्या येरे धाकट्या मुला । कशानें थोरपण आलें तुला ॥ १ ॥ उलीसे दिसते कींरे पोर । ब्रम्हीं नाहीं लहान थोर ॥ २ ॥ तुला ब्रम्हीं काय ठावें । सर्वां भूतीं तेंचि पाहे ॥३॥ ब्रम्हीं नाहीं भेदाभेद । ऐसें बोलती चारी वेद ॥ ४ ॥ तुझा भेद कशानें गळाला । सद्गुरुनें बोध केला ॥ ५ ॥ बोध ह्मणजे कायरे गड्या । आत्मस्वरूपीं पाहेरे वेड्या ॥ ६ ॥ लहान पोर भाट मोठें । थोर असुन चाड खोटें ॥ ७ ॥ माझें मन कां चाड झालें । अज्ञानामुळें गर्वास आलें ॥ ८ ॥ गर्व जाइल कैशापरी । सद्गुरूचें दास्यत्व करी ॥ ९ ॥ सद्गुरूची कृपा तुला जाहली । भूतमात्रीं भरून उरली ॥ १० ॥ तरि ते कां एक्या नेमें गेले । अविश्वासी बुडून ठेले ॥११॥ विश्वासी कां एकसार झाला । अविश्वासी बुडून मेला ॥ १२ ॥ सद्गुरुवीण तरेना प्राणी । सारे तरले आहेत कोणी ॥१३॥ आयुष्य काय माझा आज्ञाधारूं । उतरून न्यावें पैलपारू ॥ १४॥भजन करावें केव्हां । सोहंमंत्रीं नाहीं गोवा॥१५॥करावें कवणे दिवशीं । नेम नाहीं दिवसनिशी ॥ १६ ॥ बाळपणीं लय केलें । सद्गुरुचें संगें वडलें ॥ १७ ॥ सद्गुरुचे संगती कोण तरले । महापातकी उद्धरले ॥ १८ ॥ पैल तें कोळ्याचें पोर । अजामिळ चोखा महार ॥ १९ ॥ असे कितीक तरले पोरा । गणित नाहींरे गव्हारा ॥ २० ॥ म्हातारपणीं भक्ती करूं । तरी आयुष्य काय आज्ञाधारूं ॥२१॥ उगा राहे नाहीं तर देईन काठ्या । अहंकाराच्या होतील खोट्या ॥ २२ ॥ जाबासी जाब फार देतोस । बोलूं नये तें बोलतोस ॥ २३ ॥ तुझा माझा वाद झाला । पांचा पोरांनीं

घात केला ॥ २४ ॥ पाच पोरें कोणाचीं । आत्माराम गड्याची ॥ २५॥ हा खेळ त्याचाच कीरे । खेळ खेळोनि तो निराळा कीरे ॥ २६ ॥ हा खेळ तुजला कशियानें कळला। श्रीनिवृत्तीकृपें ज्ञानदेवा फळला ॥ २७ ॥

## संवाद २ रा.

### ३२

गुरुजी कांहीं सुखाचा मार्ग सांगा। घर सोडून रानांत वागा ॥१॥ रानांत जाऊन काय खावें। निःसंग संगातीत व्हावें ॥२॥ अतीतास देखून कुत्री भुंकती। भटकतोस म्हणून तोंडावर थुंकती ॥ ३ ॥ कुत्र्यास काय आहे विचार। धरले घर न सोडी दार ॥ ४ ॥ पोटभर भाकर न मिळे एक घरीं। ओली कोरडी हाका न मारी ॥ ५ ॥ हाकेवीण दुःखें कोण साहतो। अजगर फिरायास कोठें जातो ॥ ६ ॥ अजगरास नाहीं बावील धाके। त्याचें संतान कोठून पिके ॥७॥ भुला भटको हाये योग। ऐसें वाढलें अवघे जग ॥ ८ ॥ तरी रानांत जायाचा कां हट्ट। तुझें मन नाहीं झालें धीट ॥ ९ ॥ धीट झालें तर गांव बरा। दुःखाच्या ज्वाळा लागतील पोरा ॥ १० ॥ दुःख तर तिळभर सोसेना। जाय रानांत नको देऊं ये ना ॥ ११ ॥ रानांत जाऊन काय खावें। भक्षापुरतें गावांत यावें ॥ १२ ॥ गांवची करिती उपहास। रात्रंदिवस करावा ध्यास ॥ १३ ॥ हा तर झाला अद्वैतबोध। रात्रंदिवस करावा शोध ॥ १४ ॥ हा तर झाला अद्वैतभाव। धरा सद्गुरुचे पाव ॥ १५ ॥

### ३३

सांवळ्या वाणाचें मूल कोणाचें येत। मलपत चाले आंगणीं डोल देत ॥ धृ० ॥ गळां गाठलें शोभत जडावाचें।

श्रवणीं कुंडल झळकतें मोतियाचें ॥ १ ॥ चरणीं वाक्या वाळे रुणझुणती । कटीं कडदोरा बिंदलीं ढाळ देती ॥ २ ॥ माथां पिंपळपान टोपडे शोभत । बाप रखुमादेवीवर विठ्ठल भासत ॥ ३ ॥

३४

हें क्षीरसागरींचें रूपडें । पाहतां पारखिया त्रिभुवनीं न सांपडे । उभें असे वाडेंकोडें । पुंडलीकाचे आवडी ॥ १ ॥ मेघःशाम घेउनि बुंथी । जयातें श्रुति पैं वाखाणिती । कीं ते पुराणीं गर्जती । तें पंढरीसी उभें असे कानडेगे माये ॥ २ ॥ आवडीच्या वाल्लभें । गोजिरें गोजावलें । पाहतां साजिरें । त्रिभुवन तन्मय झालेंगे ॥ ३ ॥ जें सकळ मंगळदायकाचें । आथिलें कीं प्रेमरसाचें । ओतीलें घोंस कीं ब्रह्मविद्येचे । मथिलें साचें तें देखा ॥ ४ ॥ सकळ आगमाचे संचलें । बाप-रुक्मादेवीवर विठ्ठल नामें मंथिलें । निवृत्तीनें दिलें । प्रेम खुण त्या ॥ ५ ॥

३५ ॥ पद ॥

सद्गुरुचें फोडुनि घर । होउनिया चोर ॥ धृ० ॥ अचळ घर सद्गुरुचें त्रिकूटीं । कुलूप दरवाजे वन घटी । कैसी रीत्र होईल शेवटी । पांच जणाची झाली गटी । एक विचार ॥ स० ॥ १ ॥ विवेक पहार घेउनि हातीं । गुरुच्या घरास लाउन खणती । भक्तीची शिडी लावुनि युक्ती । ऐसें भासत माझें चित्तीं । द्वैत करुन दूर ॥ स० ॥ २ ॥ ज्ञानकिल्लीनें कुलूप काढूं । बहात्तर कोटड्या उघडूं । त्यांतून सार वस्तू काढूं । त्या वस्तुसि कदां न सोडूं । हाच करार ॥स०॥३॥ गुरुच्या घरांत चोरी केली । पाहतां निजवस्तू सापडली । पूर्ण कमाई फळास आली । ज्ञानदेव म्हणे धन्य झाली । भाग्य थोर ॥ स० ॥ ४ ॥

## ॥ निळोबा ॥

१७

उभारिला ध्वज तिहीं लोकांवरी । ऐसी चराचरीं कीर्ती ज्याची ॥ १ ॥ ते हे निवृत्तीनाथ ज्ञानेश्वर सोपान । मुक्ताबाई ज्ञानदीप्ति कळा ॥ २ ॥ धरूनि सगुणरूपें केली क्रीडा । बोलविला रेडा निगम वाक्यें ॥ ३ ॥ बैसुनीयां वरी चालविली भिंती । चांगदेवा प्रति दिधली भेटी ॥ ४ ॥ मग वास केला अलंकापुरासी । पिंपळ द्वारासी कनकाचा ॥५॥ निळा ह्मणे ज्याचे नामें करितां घोष । नातळती दोष कळिकाळाचे ॥ ६ ॥

१८

दंभ मान नका । देऊं वैकुंठ नायका ॥ १ ॥ तुमचें गाऊं द्या निश्चळ । गुण नाम सर्वकाळ ॥ २ ॥ शांती क्षमा दया । याही नका पंढरिराया ॥ ३ ॥ निळा म्हणे निरुपाधी । ठेवा माझी पायीं बुद्धी ॥ ४ ॥

१९

नाम सांडुनि मुक्ती घेणे । हें तो लक्षण अधमाचें ॥१॥ आम्हां विष्णुदासा धर्म । नित्य नेम कथेचा ॥ २ ॥ काय करूं त्या वित्पत्ति । वडिल हांसती पूर्वज ॥ ३ ॥ निळा म्हणे करावी सेवा । आवडी देवा ही माझी ॥ ४ ॥

२०

राहुनिया सत्संगति । गाईन कीर्ती तुमचीच ॥ १ ॥ हेंचि देई न लगे दुजे । अंतर माझें जाणोनि ॥ २ ॥ धनमान न लगे देवा । अवघा ठेवा गुंडोनी ॥ ३ ॥ निळा म्हणे जगदीशा । हेंचि आशा बहुकाळ ॥ ४ ॥

२१

नाहीं लौकिकासि काम । गाईन नाम सर्वदां ॥ १ ॥ हेंचि माझें भांडवल । विठ्ठल विठ्ठल खरें नाणें ॥ २ ॥ नेघों मुक्ती नेघों भुक्ती । प्रेम विरक्ती हरिनामीं ॥ ३ ॥ निळा म्हणे साधन सार । तुमचा उच्चार नामाचा ॥ ४ ॥

२२

काय काज कोणासवें । विठ्ठल देवे वांचूनी ॥ १ ॥ काय नाहीं चरणा पासी । पाहिजे ज्यासी तें तेथें ॥ २ ॥ ह्मणो नियां जीवें साटीं । करूनि नेहटीं बैसलों ॥ ३ ॥ निळा ह्मणे भाग्यधनी । पुरवील आयणी सकळही ॥ ४ ॥

२३

सुखें जन्मांतर घेऊं । नामें आठवूं श्रीहरिची ॥ १ ॥ नाहीं आम्हां त्याचें कोडें । संसार बापुडें तें काय ॥ २ ॥ कळिकाळाचें भय तें किती । पाया पडती यमधर्म ॥ ३ ॥ निळा म्हणे सर्व सिद्धी । रुळती पदीं हरिनामें ॥ ४ ॥

२४

नामेंचि तुमचि आळवितां । न पुरे धणी पंढरिनाथा ॥ १ ॥ याची सुखें कल्प कोडी । जातो विळ वाटे घडी ॥ २ ॥ जडतां नामीं निजध्यास । नाहीं काळ गणना त्यास ॥ ३ ॥ निळा म्हणे निश्चय माझा । जाणतां तुम्हीं पंढरी राजा ॥ ४ ॥

२५

कोटि जन्म घेइन देवा । करीन सेवा तुमचीच ॥ १ ॥ भुक्ति मुक्ति नका आड । घालूं सांकड मज वाटे ॥ २ ॥ काय करूं ते आत्मस्थिती । खंडण करिती भजनाचें ॥ ३ ॥ निळा ह्मणे राहो ठायीं । विश्वास पायीं तुमचीये ॥ ४ ॥

२६

करूं येईल अंगिकार । तरि करा फार काय बोलों ॥ १ ॥

नाहीं घोकिलें ऐकिलें कांहीं । सेवा घडली नाहीं वैष्णवाची ॥ २ ॥ स्वधर्म विधी नकळे आचार । कैसा तो प्रकार साधनाचा ॥ ३ ॥ निळा म्हणे ऐसे मूढ दगड । ठाईंचीच जड बुद्धि माझी ॥ ४ ॥

२७

अगाध महिमा तुमचा देवा । काय म्यां वाढावा मूढमती ॥ १ ॥ उगाचि ह्मणवी तुमचा दास । करुनिया आस पायांची ॥ २ ॥ शब्द चातुर्य कांहींच नेणे । बोबडें बोलणें घ्या कानीं ॥ ३ ॥ निळा म्हणे आपुला म्हणवा । भला तैसा ठेवा भलतेथें ॥ ४ ॥

२८

आतां माझा अंगिकार । करा थार पायां पें ॥ १ ॥ लाउनिया अपुल्या गुणीं । माझी वाणी रंजवा ॥ २ ॥ भाळी भोळी करीन सेवा । तुमची देवा ते घ्यावी ॥ ३ ॥ निळा-म्हणे विनवूं नेणे । तरी पोसणें मी तुमचें ॥ ४ ॥

२९

निवेदिलें पायापाशीं । जें जें मानसीं होतें तें ॥ १ ॥ आतां उचित तैसें करा । आम्हीं तों संसारा आंचवलों ॥ २ ॥ काय नाहीं तुमच्या हातीं । वचनें तिष्ठती महासिद्धी ॥ ३ ॥ निळा म्हणे तुमच्या संगें । पांडुरंगे वर्तिजे ॥ ४ ॥

३०

जाणतसां जरि अंतरींचें । तरी कांहो वाचें वदवीतां ॥ १ ॥ केविलवाणें तुमचें दास । देखतां उपहास होईल ॥ २ ॥ जगनिंद्य अधिकारा । मग तुम्ही धरा निजकरा ॥ ३ ॥ निळा म्हणे ऐसी रीत । नाहिंच शोभत संतासी ॥ ४ ॥

३१

भेटवाल पंढरिनाथ । तुम्हीच संत कृपाळू ॥ १ ॥ म्ह-

णोनि येतो काकुलती । पुढतो पुढतीं कींव भाकीं ॥ २ ॥
इतरांची मी न करी आस । जालों दास तुमचाची ॥ ३ ॥
निळा म्हणे ठेवा पायीं । यावरि काई विनवूं मी ॥ ४ ॥

३२

जाणोनिया मनोगत । ठेवा हात मस्तकीं ॥ १ ॥ करा माझें समाधान । देउन वचन अभयाचें ॥ २ ॥ आहे देवा तुम्हा हातीं । उगवा गुंती जाणता ॥ ३ ॥ निळा म्हणे वचनाधीन । नारायणा तुमचीया ॥ ४ ॥

३३

तुमच्या पायीं ठेविलें मन । एवढेंचि धन मजपाशीं ॥१॥ जरि हा देव दाखवाल । अभय द्याल वचनाचें ॥ २ ॥ तरि हा प्राण ओंवाळीन । जीवें चरण न सोडीं ॥ ३ ॥ निळा म्हणे कृपा करा । यावरि धरा मज हातीं ॥ ४ ॥

३४

एवढा मनींचा पुरवा हेत । पंढरीनाथ भेटवा ॥ १ ॥ मग मी तुमच्या न सोडी पाया । करीन काया कुरवंडी॥२॥ कृपासिंधू तुम्ही संत । पुरवा आर्त हे माझे ॥ ३ ॥ निळा म्हणे झालों दास । नका उदास धरूं आतां ॥ ४ ॥

३५

मस्तक माझा पायावरी । या वारकरी संताच्या ॥ १ ॥ प्रतिवर्षीं पंढरपुर । जाती महाद्वार हरिभेटी ॥ २ ॥ भेटी त्यांची इच्छी मन । करिती कीर्तन अनुदिनीं ॥ ३ ॥ निळा म्हणे लोटांगण । घालित जाईन सामोरा ॥ ४ ॥

३६

देवासी दासाचा कळवळा । माय बाळावरी जैसा ॥ १ ॥ नेदी मोडूं भूक तहान । करें कुरवाळून स्तन पाजी ॥ २ ॥ दिठावेल म्हणोन प्राण । निंबलोण उतरी त्या ॥ ३ ॥ निळा

म्हणे करुनि कोड । पाळा लाड प्रीतीनें ॥ ४ ॥

३७

पाई लीन होतां निळा । दिधली कळा प्रेमाची ॥ १ ॥ निववोनी केला सुखी । ठेवुनि मुखीं निजनाम ॥ २ ॥ माउलीची ऐशी जाति । बाळकाप्रती समजावी ॥ ३ ॥ निळा म्हणे कृपावंत । साक्षभूत अंतरींचें ॥ ४ ॥

३८

सर्वस्वें उदार । देतां न म्हणे सान थोर ॥ १ ॥ तें हें पंढरीयें घडे । उभें पुंडलीकापुढें ॥ २ ॥ अरि मित्रासम । देणें एक निजधाम ॥ ३ ॥ निळा म्हणे नाहीं । जया अपपर कांहीं ॥ ४ ॥

३९

हांके सवें उडी । वाळुनिया स्तंभ फोडी ॥ १ ॥ ऐशी कृपावंत कोण । माझे विठाईवांचुन ॥ २ ॥ करितां आठव । वाळुनिया धांवे कव ॥ ३ ॥ निळा म्हणे गातां । नामें द्यावी सायुज्यता ॥ ४ ॥

४०

भाविकाची उत्तम जाति । विश्वास धरिती संतवचनीं ॥ १ ॥ तया फळे त्याचा भाव । प्रगटे देव हृदयांत ॥ २ ॥ जाणिवेचा नाहीं फुंद । शुद्धबुद्ध होती ते ॥ ३ ॥ निळा म्हणे त्याची स्थिती । न ये ती गती जाणतिया ॥ ४ ॥

४१

अगाध महिमा पंढरीचा । काय तो वाचा कवळेल ॥ १ ॥ येती यात्रे मुक्त होती । जे या देखती विठ्ठला ॥ २ ॥ नलगे दुजें तप साधन । घडतां स्नान चंद्रभागे ॥ ३ ॥ निळा म्हणे भूमीवरी । क्षेत्र हे पंढरी वैकुंठ ॥ ४ ॥

४२

सांगतों हें मनीं धरा । हीत करा आपुलें ॥ १ ॥ जारे पंढरीस आधीं । कृपानिधी भेटेल ॥ २ ॥ अवघींच सुखें अलोलिकें । येईल एके दरुषणें ॥ ३ ॥ निळा म्हणे रिद्धि-सिद्धि । मुक्ति पदीं लागती ॥ ४ ॥

४३

बरवा ओढवला हा रंग । भक्ति प्रसंग तूमचा ॥ १ ॥ तेणें सुखें मातली वाचा । नित्य कीर्तनाचा नटनाव्य ॥ २ ॥ गाऊं वानूं आपुल्या छंदें । तुमचीं पदें आवडीं ॥ ३ ॥ निळा म्हणे गळती नयन । प्रेमे स्फुंदन सद्गद ॥ ४ ॥

४४

सांगितलें वर्म एवढेंच करीं । नित्य उच्चारीं हरिनाम॥१॥ न लगे कोठें जाणें येणें । कर्म बंधनें तुटतील ॥ २ ॥ योग-साधन पवनाभ्यास । न करीं सायास अडचणी ॥३॥ निळा म्हणे हरिच्या नामें । चुकलीं जन्में यमप्रहार ॥ ५ ॥

४५

नलगे जाणें वनाप्रती । अथवा एकांतीं बैसणें ॥ १ ॥ विठ्ठल विठ्ठल म्हण कां वाचे । सकळार्थांचें कारण हें ॥२॥ नलगे आसन मुद्रा माळा । साधनें कळा योग स्थिति ॥ ३ ॥ निळा म्हणे उघळण सार । न लगे निरहार व्रतचर्या ॥ ४ ॥

४६

उपदेशिलें एकचि सार । मजही उच्चार नामाचा ॥ १ ॥ म्हणती न पडे साधन फंदीं । होशिल दोंदी काळाचा ॥२॥ करी संत समागम । गाई हरिनाम कीर्तनीं ॥ ४ ॥ निळा म्हणे ऐसा संतीं । केला निजप्रीतीं उपदेश ॥ ४ ॥

४७

उदार संत उदार संत । जया तैसा हेत पुरविती ॥ १ ॥

अपार देणें अपार देणें । पावति पेणें वैकुंठीचें ॥ २ ॥ न सरे ऐसें न सरे ऐसें । देती सहवासें निजात्म सुख ॥ ३ ॥ निळा म्हणे यांचिये पायीं । निज वस्ती देईं देवा मज ॥ ४ ॥

४८

कीर्ती ऐकोनि आलों दारा । माझा करा सांभाळ ॥१॥ जतन करिन याचें नाम । धरुनि प्रेम निजकंठीं ॥ २ ॥ भाव माझा ओलीसि ठेवा । घ्याहो सेवा दिननिशी ॥३॥ निळा म्हणे संकल्पेसी । पायापाशीं कठीण ॥ ४ ॥

४९

ऐसा संताचा उपकार । काय मी पामर आठवूं ॥ १ ॥ करुनिया अनुमोदन । दिधलें वचन अभयाचें ॥ २ ॥ म्हणती करीं नाम पाठ । न करीं खटपट याविण ॥ ३ ॥ निळा म्हणे कृपावंत । करिल सनाथ श्रीहरी ॥ ४ ॥

५०

बरें झालों शरण गेलों । संतीं लाविलों निजसोई ॥१॥ म्हणती पंढरपुरीचा हाट । करीं बोभाट हरिनामें ॥ २ ॥ येईल तें बरावरी । धरिल श्रीहरी हृदयासी ॥ ३ ॥ निळा म्हणे एकचि खेपे । खंडती पापें सकळही ॥ ४ ॥

५१

कृपा केली संतजनीं । लाविलों भजनीं श्रीहरिच्या ॥१॥ नाहीं तरी जातो वांया । लक्ष भोगावया चौऱ्यांशी ॥ २ ॥ आणिक साधनी गुंताचि पडत । अभिमान वाढत नित्य नवा ॥ ३ ॥ निळा म्हणे धांवणें केलें । सुपंथें लाविलें निजवाटे ॥ ४ ॥

५२

विनवूं या विठ्ठल देवा । हाती धरवा मज आतां ॥ १ ॥ तुमचिया भिडा अंगिकार । करिल साचार तत्क्षणीं ॥ २ ॥

जरी मी अन्यायी अपराधी । तरी कृपानिधी तुम्ही संत ॥ ३ ॥ निळा म्हणे विनवूं काय । तूं बापमाय अपत्य मी ॥ ४ ॥

९३

दीन मी अनाथ तुमचें रंक । मागतों भीक मज द्यावी ॥ १ ॥ नेउनि घाला पायावरी । निरवा श्रीहरी कृपाघना ॥ २ ॥ नुपेक्षावें शरणांगता । जरि मी नेणता दास तुमचा ॥ ३ ॥ निळा म्हणे अवघे संत । मेळवोनि स्वहित करा माझें ॥ ४ ॥

९४

मस्तक माझा पायावरी । राहों निरंतरी संताच्या ॥ १ ॥ इतुलेनि कृतकृत्य । होइन निश्चित संसारीं ॥ २ ॥ धरिल्या जन्माचें सार्थक । भवभयमोचक साधन हें ॥ ३ ॥ निळा म्हणे न लगे फार । करणें विचार यावरी ॥ ४ ॥

९५

करा माझा अंगिकार । ब्रीद थोर पतितपावन ॥ १ ॥ उपेक्षितां हांसति लोक । ह्मणती सेवक जड झाले ॥ २ ॥ मग ते तुम्हां होइल लाज । अंतरेल काज पुढिल हें ॥ ३ ॥ निळा म्हणे अपकीर्ति आंगा । न ये पांडुरंगा करावें ॥ ४ ॥

९६

बैसला तो ध्यानीं मनीं । पाहतां लोचनीं विठ्ठल ॥ १ ॥ रूप गोजिरें सुंदर । वेधिलें अंतर मन बुद्धी ॥ २ ॥ नाठ-वेचि कांहीं आतां । त्याविण चित्ता दुसरें ॥ ३ ॥ निळा म्हणे लाविलें पिसें । मी मज नुमजे आठवितां ॥ ४ ॥

९७

शुक प्रल्हाद हरिच्या नामें । गातां सुख संभ्रमें निवाले ॥ १ ॥ त्यांनीं उघडोनि हे मार्गी । दाविली जगीं हरिभक्ती ॥ २ ॥ तैसाच नामा विष्णुदास । पावला सौरस परब्रह्म

॥ ३ ॥ निळा म्हणे दाउनि तुका । गेला एका जनार्दन ॥ ४ ॥

५८

कैवल्याचा गाभा । व्यापुनिया ठेला नभा ॥ १ ॥ तो हा सगुण वेषधारी । उभा चंद्रभागे तिरीं ॥ २ ॥ धुंडिती पुराणें। वेदश्रुती ज्या कारणें ॥ ३ ॥ निळा म्हणे अवघे देव । ह्मणविताति अवयव ॥ ४ ॥

५९

नेउनिया बळी । जेणें घातिला पाताळीं ॥ १ ॥ तो हा देवाचाही देव । विटे उभा ठेउनि पाव ॥ २ ॥ शेषाचे शयनीं । होतां निद्रिस्थ अनुदिनीं ॥ ३ ॥ निळा म्हणे करी । मंथन क्षीराचे सागरीं ॥ ४ ॥

६०

धरियेला गिरी । सात दिवस बोटावरी ॥ १ ॥ तो हा पुंडलीका वर । देउनिया उभा स्थीर ॥ २ ॥ नाथिला काळिया । यमुने बुडी देउनिया ॥ ३ ॥ निळा म्हणे झाला । वत्स गोवळ जो एकला ॥ ४ ॥

६१

उतरिला धराभार । जेणें घेउनि अवतार ॥ १ ॥ तो हा भक्त पुंडलीके । गोवियेला घेउनि भाके ॥ २ ॥ शिळीं बांधिला सागर । निर्दाळिला दशशिर ॥ ३ ॥ निळा ह्मणे नारी । सोडवोनि राज्य करी ॥ ४ ॥

६२

शोपिली पूतना । विष भरूनि आली स्तनां ॥ १ ॥ तो हा पुंडलीका द्वारीं । उभा परमात्मा श्रीहरी ॥ २ ॥ कंस आणि जरासंध । जेणें मर्दिले मागध ॥ ३ ॥ निळा म्हणे फरशधारी । केलीया क्षत्रिया बोहरि ॥ ४ ॥

६३

येउनिया कृपावंते । तुकया स्वामी सद्गुरुनाथें ॥ १ ॥ हात ठेविला मस्तकी । प्रसाद देउनि केलें सुखी ॥ २ ॥ माझी वाढविली मती । गुण वर्णावया कीर्ती ॥ ३ ॥ निळा ह्मणे मी बोलता । दिसे परि हे याची सत्ता ॥ ४ ॥

६४

यात्रे अळंकापुरा येती । ते ते आवडती विठ्ठला ॥ १ ॥ पांडुरंगें प्रसन्नपणें । केलें देणें हें ज्ञाना ॥ २ ॥ भूवैकुंठ पंढरपूर । त्याहुनि थोर महिमा या ॥ ३ ॥ निळा ह्मणे जाणोनि संत । येती धांवत प्रतिवर्षी ॥ ४ ॥

६५

सांगतां महिमा पंढरीचा । अपार महिमा वेदाचिये ॥१॥ सहजाचि क्षेत्रा जाईन ह्मणतां । धांवे सायुज्यता सामोरी ॥ २ ॥ विठ्ठलराज देखतां दिठीं । वास वैकुंठीं तेंचि क्षणीं ॥ ३ ॥ निळा म्हणे आलिंगन । देतां समाधान जीवशिवा ॥ ४ ॥

६६

नीच कामीं न धरी लाज । भक्तकाज कैवारी ॥ १ ॥ सेवकाचा हासिरू मनीं । म्हणवी करुनि दास्यत्व ॥ २ ॥ उगाळी गंध पुरवी माळा । वाहे जळा मस्तकीं ॥ ३ ॥ निळा म्हणे होऊनि वाण्या । आणी गोण्या भक्ताघरीं ॥ ४ ॥

६७

भक्ताचिया मनोभावा । सारिखे देवा तुम्ही वर्ता ॥ १ ॥ आवडीचा न करा भंग । अंतरंग म्हणोनिया ॥ २ ॥ धर्मांघरीं उच्छिष्ट काढा । अर्जुना पुढां सारथ्य ॥ ३ ॥ निळा म्हणे बळिच्या द्वारीं । होउनि भिकारी भीक मागा ॥ ४ ॥

६८

भक्ता आवडी ऐसें रूप । धरी हा बाप मदनाचा ॥ १ ॥ नेदी पडों अंतर कोठें । पाहिजे नेटें त्या ऐसा ॥ २ ॥ एका पुढें कटीं कर । श्यामसुंदर विटेवर ॥ ३ ॥ निळा ह्मणे नृसिंहरूपें । प्रगटे प्रतापी शुष्क काष्ठीं ॥ ४ ॥

# ॥ मुद्गलस्वामी ॥

१

नमन माझे आतां । चरणासी एकदंता ॥ १ ॥ रंगा येई गणपती । संगें घेउनि सरस्वती ॥ २ ॥ मूषक हंस वहनें दोन्हीं । यावें दंपत्य बैसोनी ॥ ३ ॥ उभे रहा पाठीमागें कीर्तनासि द्यावा रंग ॥ ४ ॥ मुद्गल ह्मणे धुंडीराजा । मनोरथ पुरवीं माझा ॥ ५ ॥

२

विठ्ठल वदनीं नाचति रंगणी । जाती लोटांगणीं पंढरीसी ॥ १ ॥ धन्य साधू अवतार देवाचे । पावन महीचें केलें तेणें ॥ २ ॥ जेथें जाती तेथें उद्धरती जीवा । लावोनियां गावा मोक्षाचीया ॥ ३ ॥ मुद्गल म्हणे यांचे वैकुंठीं निशाण । सखा नारायण त्यांणीं केला ॥ ४ ॥

३

जिव्हा शि** दोन्ही जो कोणी आकळी । तोचि एक बळी हरिचा दास ॥ १ ॥ मोह माया काम क्रोध आशा तृष्णा । जाळोनियां मना राख केली ॥ २ ॥ जाणीव नेणी लाभ दंभ जैसा । संसारीचा फांसा तोडीयेला ॥ ३ ॥ मुद्गल म्हणे तोच हरीचा निजदास । त्यांचे पायपोस माझे माथां ॥ ४ ॥

४

संताचीया मनीं भाव नाही दुजा । रंक आणि राजा सारिखा पैं ॥ १ ॥ चोर चहाड साव व्याघ्र आणि गाई । तृप्त करी तोय तान्हेलीया ॥ २ ॥ वाढवितां धणीं येती जाती लोक । सर्व छाया एक वृक्ष जैसा ॥ ३ ॥ ऐशीया संतासी भेटले परदेशी । घरीं पोटीं त्यासी पुत्र सम ॥ ४ ॥ मुद्गल म्हणे चित्त जैसें नवनीत । अखंड द्रवत हृदय त्यांचें ॥ ५ ॥

५

साधूचीया चित्ता दरिद्र संपत्ती । नेणे तो सर्वार्थी कांहीं मनीं ॥ १ ॥ प्रपंचाची आस्था नाहीं निरंतर । नारायणपर सदा मुखीं ॥ २ ॥ आसन घालोनी एकांती तो बैसे । सेवी ब्रम्हरस प्रेमयुक्त ॥ ३ ॥ अन्न आच्छादन प्रारब्धा आधीन । मिळवावया जाण प्रयत्न सांडी ॥ ४ ॥ अजगराचीया परी जयाची हे वृत्ती । तोचि धन्य क्षिती मुद्गल म्हणे ॥५॥

६

जातीहून नीच भक्तीं झाले उंच । मुख्य वैष्णवाचे शिरोमणी ॥ १ ॥ मर्कटाचे कुळीं हनुमंत जाहला । राक्षस योनीला बिभीषण ॥ २ ॥ कोळियाचा वाल्मीक ढीवरा गृहीं व्याला । जन्म नारदाला दासी पोटीं ॥ ३ ॥ दैत्याचा प्रल्हाद वाचेसि गोविंद । तयासि कोण निंद्य म्हणे पापी ॥ ४ ॥ निंद्य वंद्य झाले भक्तीनें तरले । वैकुंठासि गेले मुद्गल म्हणे ॥ ५ ॥

७

नाम हें चांगलें हृदयीं धरिलें । समाधान झालें सदाशीवा ॥ १ ॥ शीतळ शरीर झालें नामें करुनि । नेलें तें शमुनी हालाहल ॥ २ ॥ नारदासि श्राप दक्षाचा पैं होता । राम नाम घेतां उद्धरला ॥ ३ ॥ रामनाम घेतां गेली ब्रम्हहत्या । सुचित्त तत्वतां वाल्मीकासी ॥ ४ ॥ मुद्गल म्हणे नाम पवित्र पावन । मीही विश्वासून गेलों नामीं ॥ ५ ॥

८

यशोदा सुंदरी राधेसी पाचारी । नेई तो मुरारी मंदिरासी ॥ १ ॥ कडेसि बैसवोनी घेउन गेली राधा । म्हणे तूं मुकुंदा थोर होई ॥ २ ॥ शुद्ध भाव पाहोनि थोर झाला हरी । मनोरथ करी पूर्ण तीचा ॥ ३ ॥ राधेचे अंतर प-

डलें यादवराया । बैल दोहीं गाय ह्मणुनियां ॥ ४ ॥ एक क्षणभरी वियोग सोसेना । रिता डेरा ज्ञणीं घुसळिला ॥५॥ पूर्ण भक्ति राधा हरीसी मिळाली । मुद्गल म्हणे चळीं लवण जैसें ॥ ६ ॥

९

काय देवा बोलूं कर्म बळिवंत । लिहिलें संचित तुम्ही भाळीं ॥ १ ॥ पूर्ण सोळा कळीं निर्मळ हा शशी । कळंक आंगासी लागलासे ॥ २ ॥ जनकाची कन्या श्रीरामाची ते कांता । अशोकीं असतां दुःख भोगी ॥ ३ ॥ कौरव सभेंत द्रौपदी गांजिली । अहिल्या छळीली वज्रपाणीं ॥ ४ ॥ शिवाचे अवतार पांचही पांडव । विराटाचा गांव सेवीयेला ॥ ५ ॥ मर्कटाचा जन्म हनुमंत झाला । राक्षस योनीला बिभीषण ॥ ६ ॥ सवालक्ष गावें सरितेचा नाथ । तयामध्यें मूत अगस्तीचें ॥ ७ ॥ जन्मला सागरीं रमा, बंधु शंख । मागतसे भीक घरोघरीं ॥ ८ ॥ मुद्गल म्हणे ऐसें प्रारब्ध संचित । न सोडीच निश्चीत ब्रम्हादिकां ॥ ९ ॥

१०

भक्ताचीये घरीं देव कार्य करी । राहे त्याचे घरीं गुप्तरूपें ॥ १ ॥ धर्माचे आंगणीं काढी उच्छिष्ट पात्रें । कृष्ण राजीवनेत्र जगद्गुरु ॥ २ ॥ कबीर मोमीन त्याचे शेले विणी । वेचूं लागे शेणी जनी संगें ॥ ३ ॥ नरसी मेहत्याची भरियेली हुंडी । पाणी वाहे श्रीखंडी एकोबाचे ॥ ४ ॥ थोठे ताम्र कणसें बोधल्याचे धान्यीं । रक्षी वह्या पाणी तुकोबाच्या ॥ ५ ॥ दामाजी पंताचा झालासे महार । भिंत ज्ञानेश्वर याची ओढी ॥ ६ ॥ धना जाटा सेतीं पेरियेले गहूं । आंगें जाला नाहू सेना साठीं ॥ ७ ॥ मुद्गल ह्मणे तुज भक्ताचा कळवळा । ज्यांनीं हा अर्पिला जीव प्राण ॥ ८ ॥

११

उदापुरामध्यें राणीयाचे पोटीं । जन्मली गोरटी मिराबाई ॥ १ ॥ सर्वांगीं भूषण ल्याली हरिभक्ती । ध्यानीं मनीं चित्तीं केशवराज ॥ २ ॥ पिता हा कोपला विषवाटी दिल्ही । घटघटां प्याली ब्रह्मरस ॥ ३ ॥ विषाचें अमृत केलें भगवंतें । हरी नामें गर्जत राजकन्या ॥ ४ ॥ दासाचा सहाकारी भक्ताचा कैवारी । आलीं विघ्नें निवारी मुद्गल म्हणे ॥ ५ ॥

१२

राजियाचा घोडा तस्करानें नेला । झाला गलबला नगरांत ॥ १ ॥ धांवणें निघालें तयाचे पाठीं । घोडा चरे तटीं नदीचीये ॥ २ ॥ स्नान संध्या करुनि केलें देवतार्चन । लावोनि नयन जप करी ॥ ३ ॥ संकट पडलें तेव्हां भगवंता । घोडा शुभ्र होता बोर केला ॥ ४ ॥ सावध होउनि पाहे तस्कर भक्त । मुखीं गुज गात हरी नाम ॥ ५ ॥ मुद्गल ह्मणे देवा नामाची आवडी । लागतसे गोडी रमेहुनि ॥ ६ ॥

१३

विडा घ्यावा आतां तुम्ही पांडुरंगा । स्वामी अंतरंगा रखुमाईच्या ॥ १ ॥ फळ आशा फोडी फोडोनिया तीसी वासना शिरासि काढियेलें ॥ २ ॥ जाळोनि टाकिलें अहो कठिणपण । शुद्ध केला चुना विड्यामाजी ॥ ॥ ३ ॥ शांति पक्क होंचि नागवेली पान । विड्यासि करून देतों देवा ॥ ४ ॥ श्रद्धा जायपत्री दया लवंगा चूर । क्षमेचा कापूर वेळे तोडे ॥ ५ ॥ भाव हाचि कांथ विड्यांत घातला । तांबूल अर्पिला विड्यामाजी ॥ ६ ॥ प्रसाद देवोनि पवित्र पीकासि । तारीं मुद्गलासी देवराया ॥ ७ ॥

१४

रत्नाचीये तार्टी प्रेमाचें भोजन । जेवी नारायण भाव वळे ॥ १ ॥ बहु हाव जाला ळाळताचा शेवट । झाले तुझां कष्ट पांडुरंगा ॥ २ ॥ प्रसाद पाऊन जाये मी संतुष्ट । तुमचें उच्छिष्ट सेऊनीयां ॥ ३ ॥ निद्रा करा आतां रखु-माईसहीत । उभी वाट पहात मंचकावरी ॥ ४ ॥ रचियेली शेज पुष्पाची अरुवार । लाविले सुंदर रत्नदीप ॥ ५ ॥ पाय घड्या भूमीवरी त्या घालोनी । चाले चक्रपाणी तयावरी ॥ ६ ॥ उठले विठल बोबडिया बोला । जयजयकार केला भक्तजनीं ॥ ७ ॥ पहुडले देव माझे मंदिरात । मुद्गल करित चरण सेवा ॥ ८ ॥

१५

साधनाचें सार गुह्याचें भांडार । राम निरंतर गात जावा ॥ १ ॥ नामाविण थोर आणिक नसे कांहीं । त्रैलोक्य हें पाही धुंडाळितां ॥ २ ॥ जप तप कोण कावाड वाहे ओझें। रामनाम गुज धरा वेगीं ॥ ३ ॥ मुद्गल म्हणे करा आपुलें स्वहित । नामावीण मुक्त नाहीं नाहीं ॥ ४ ॥

१६

श्रावण सुपुत्र कावड घेउनी । हिंडत मेदिनी तीर्थाटणीं ॥ १ ॥ मातापिता दोघे चक्षुंवीण वृद्ध । झाले निशी मध्यें कष्ट फार ॥ २ ॥ तया दोघा जणा तृषा हो लागली । का-वड ठेविली वृक्षाखालीं ॥ ३ ॥ उदक आणाया गेलासे श्रावण । वाजे खणखण झारी तेथें ॥ ४ ॥ त्याहाळीं खेळाया दशरथ आला । ऐकोनि विंधिला बाण तेणें ॥ ५ ॥ आक-स्मात बाण लागला श्रावणा । सोडीतसे प्राणा तयेवेळीं ॥६॥ रामनाम स्मरण उत्तर ऐकुनि । भ्याला राजा मनीं दोषास्तव ॥ ७ ॥ माता पिता वृद्ध शापिती दशरथा । होईल शोक,

आतां आम्हां ऐसा ॥ ८ ॥ ऐकोनि वचन रायाचें सुख । कधीं पुत्रमुख पाहेन मी ॥ ९ ॥ तयाचिये श्रापें रायासी आनंद । झाला ब्रम्हानंद मुद्गल म्हणे ॥ १० ॥

१७

वाहती खळाळ यमुना जीवनीं । गोपाळ ऐकुनि धावित्र-ले ॥ १ ॥ मिळोनि गोपाळ नवलक्ष ते गडी । बळकाविली थडी यमुनेची ॥ २ ॥ हामामाची घाई करिती धुमाळी । मिळूनी सकळीं एकदांचि ॥ ३ ॥ घालितां हामामा जीव कासावीस । मुखीसी खरसी आली त्यांचे ॥ ४ ॥ कौतुक पाहुनि कृपाळुवा कृष्णा । यमुना जीवना स्थीर केलें ॥ ५ ॥ अगाध करणी तुझी वनमाळी । भक्तांस सांभाळी मुद्गल ह्मणे ॥ ६ ॥

१८

तीनशें योजन लांब रुंद लंका । घरें किती ऐका संख्या तेथें ॥ १ ॥ रत्नाचीं सुंदर पांच लक्ष घरें । सोन्याची मं-दिरें शतकोटी ॥ २ ॥ सवालक्ष घरें विटबंदी तेथें । काशाची शोभत साठि सहस्त्र ॥ ३ ॥ सातलक्ष घरें रुप्याची सुंदर । तांब्याची परिकर एक कोटी ॥ ४ ॥ गोमटीं रत्नाचीं शि-वालयें नव कोटी । होती धुर्जटी अभिषेक ॥ ५ ॥ चौऱ्यांशी योजन सिंहासन ज्याचें । सेवक साचे सहस्त्रावर ॥ ६ ॥ चौदा चौकड्या आयुष्य जयासी । नाहीं त्या राज्यासि परिमिती ॥ ७ ॥ ऐंशी सहस्त्र कांता एक लक्ष सुत । सवालक्ष नातू ज्यांचे पोटीं ॥ ८ ॥ संतति संपत्ती असोनि रावण । सोडी जिव्हा प्राण नाहीं कोणी ॥ ९ ॥ मासाभर सोनें मुखांत घालाया । मिळेना हो तया अंतकाळीं ॥ १० ॥ कोणाचें घरदार मृगजळ संसार । मुद्गल म्हणे खरें हरी एक ॥ ११ ॥

१९

संताची छळणा न करावी कोणी । हरीचें भजनीं लावा मन ॥ १ ॥ वर्म कर्म गुण बोलूं नये निंदा । पहावें गोविंदा सर्वांभूतीं ॥ २ ॥ काम क्रोध वैरी वालावें बाहेरी । धरूं नये भारी अभिमान ॥ ३ ॥ संसार क्षणिक टाकावे विषय । सावध पां होय मुद्गल म्हणे ॥ ४ ॥

२०

प्रल्हाद पितृ आज्ञा मोडी । बळी गुरूचा डोळा फोडी ॥ १ ॥ भक्ती कोणी अवरोधी । त्याचें वचन मोडा आधीं ॥ २ ॥ बंधु टाकुन बिभीषण । रघुवीरा गेला शरण ॥ ३ ॥ भरत माता आज्ञा अपमानी । पती उपेक्षा द्विजपत्नीं ॥ ४ ॥ मुद्गल म्हणे जोडे राम । आंगें करावा अधर्म ॥ ५ ॥

२१

नको पडूं मायाजाळीं । काळ नेइल अंतकाळीं ॥ १ ॥ माता पिता दारा कुमर । अवघे सुखाचे सोईरे ॥ २ ॥ सोडवीना काळा हातीं । आपुल्या स्वार्थासाठीं रडती ॥ ३ ॥ मुद्गल म्हणे सावध होई । निशिदिनीं विठल ध्याइ ॥ ४ ॥

२२

आयुष्य जातें क्षणक्षणां । आतां सावध होई मना ॥ १ ॥ न लाभे ऐसा देह । विचारूनि तूंचि पाहे ॥ २ ॥ नानापरी भोगुनि योनी । कष्टी झालासी निशिदिनीं ॥ ३ ॥ मुद्गल म्हणे माझ्या मना । नको सोडूं नारायणा ॥ ४ ॥

२३

पंच विषय मारक । गोड परी कडू विख ॥ १ ॥ शब्दें निमाला हारण । स्पर्शे धरिला हरण ॥ २ ॥ रूपें जाळिली पतंगा । मीन मेला रस विभागा ॥ ३ ॥ गंध सेउनि भ्रमर । गुंतोनीया जाला चूर ॥ ४ ॥ मुद्गल म्हणे जाणुनि ठेवा । पडे दुःख देईल जीवा ॥ ५ ॥

२४

नकळे देहाचा भरवसा । केव्हां काळ घालिल फांसा ॥ ॥ १ ॥ सात वार एके दिनीं । दिवस अथवा रजनी ॥ २ ॥ न्यावयासि काळ । कोणे घटके येइल मूळ ॥ ३ ॥ मुद्गल म्हणे होइल रक्षा । म्हणोनि भजा सर्व साक्षा ॥ ४ ॥

२५

काम तेथें कुवासना । क्रोध तेथें निंदा जाणा ॥ १ ॥ मदमत्सर असे जेथें । कुडी बुद्धी वसे तेथें ॥ २ ॥ अभिमानें द्वेष आहे । मन साद्दश तेथें राहे ॥ ३ ॥ मुद्गल म्हणे दंभवास । आशा तेथें येउनी बैसे ॥ ४ ॥

२६

हरी माझा कैसा आहे । दासा नुपेक्षितों पाहे ॥ १ ॥ जे ज़े शरण आले भावें । आपणा समान केलें देवें ॥ २ ॥ दास आवडे अंतरीं । लक्षुमीसी दूर करी ॥३॥ मुद्गल म्हणे नारायणा । कीर्ती गर्जती पुराणा ॥ ४ ॥

२७

देव पूजी भक्तमूर्ती । भाव धरोनिया चित्तीं ॥ १ ॥ भक्त प्रल्हाद नारद । व्यास वाल्मीक रुक्मांगद ॥ २ ॥ हरिश्चंद्र पाराशर । अंबऋषी सनत्कुमार ॥ ३ ॥ भीष्म दाल्भ्य शौनक । भरत विदूर गुहक ॥ ४ ॥ उपमन्यू बिभीषण । उद्धव अक्रूर हनुमान ॥ ५ ॥ नित्य नेम भक्त पुजा । मुद्गल म्हणे अधोक्षजा ॥ ६ ॥

२८

साधुमुखीं देतां अन्न । कोटि पूर्वज पावन ॥ १ ॥ शुक भक्षी एक शीत । घंटा वाजती अनंत ॥ २ ॥ एक एक घेतां ग्रास । कोटि यज्ञ फळ त्यास॥ ३ ॥मुद्गल म्हणे साधु ध्याय । नारायणा सुख होय ॥ ४ ॥

२९

जन्मोनीयां उत्तम कुळीं । केली आयुष्याची होळी ॥ १ ॥ पैका मेळउनी फार । पोषी दारा आणि कुमर ॥ २ ॥ निंदा करी साधुसंता । देव धर्म नेणे कथा ॥ ३ ॥ मुद्गल म्हणे भु** । अंतीं भोगी नर्क घोर ॥ ४ ॥

३०

काय घेउनिया जोठा । नट आणि जैसा नटा ॥ १ ॥ ब्रह्मज्ञान सागे जनीं । शि** उदर पोसी दोन्ही ॥ ९ ॥ नीचाचिये जाय घरा । द्रव्यालागीं येरझारा ॥ ३ ॥ निंद्य स्तवी जन लोका । मुद्गल म्हणे गाढव देखा ॥ ४ ॥

३१

गंगा तीरीं धुतला खर । नव्हे अश्व जैसा थोर ॥ १ ॥ तैसें चित्त नाहीं शुद्ध । तेथें करील काय बोध ॥ २ ॥ सर्पा पाजिलें क्षीर घृत । काय होईल अमृत ॥ ३ ॥ मुद्गल म्हणे रंभाफळ । उंट न सेवी केवळ ॥ ४ ॥

३२

एकलेंचि जावें अंतीं । म्हणुनि भजा रमापती ॥ १ ॥ स्त्री पुत्र धन वित्त । कोणी नाहीं संगें घेत ॥२॥ खायासाठीं होती जमा । अंतीं न ये कोणी कामा ॥ ३ ॥ मुद्गल म्हणे ऐक । भजे रुक्मिणीनायक ॥ ४ ॥

३३

उंच पडिकार उभविलें मनोहर । परि दीपकें विण मंदिर शोभा न पावे ॥ १ शामा अती तरुणी जरि होय रमणी । परि पुरुषाविण कामिनी शोभा न पावे ॥ २ ॥ दैवें आथिला नरू वरि झाला सुंदरू । परित्यागेवीण चातुरु शोभा न पवे ॥ ३ ॥ जरी झाली संपत्ति वरी भोग सकळ । तरि पुत्रें वीण तें कुळ शोभा न पवे ॥ ४ ॥ सर्वेश्वर सांडुनि त्यजिली हे माया । परि ज्ञानेवीण योगिया शोभा न पावे ॥ ९ ॥ मुद्गल म्हणे चतुरा रखुमादेवीवरा । तुजवीण दातारा शोभा न पावे ॥ ६ ॥

# ॥ श्रीनामदेवकृत भारुड ॥

१

## ॥ हामामा ॥

हामामा हुंवरी देई। कान्हो गोवळ्या हामामा हुंवरी देई रे ॥ ध्रु० ॥ समस्त मिळोनि गोपाळीं। तया यमुनेच्या पाळीं। कृष्णें मांडिली धुमाळी। कळंबातळीं ॥ हा० ॥ १ ॥ वळुनि कांवळ्या वेंठीं। त्याही बांधिल्या मणगटीं। विवाद मांडिला निकटीं। धूर्जटी कान्होसी ॥ हामामा० ॥ २ ॥ आतां कृष्णा कोणे ठाईं। जासी तुजवरी आली डाई। आमची हामामा हुंवरी देईं। उभा राही पळो नको ॥ हामा० ॥ ३ ॥ कृष्ण म्हणे मी एकवटू। तुम्हीं आम्हीं गडी वांटू। गोवळीं घेतला असे हाटू। आतां निकट कान्होसी ॥ हामामा० ॥ ४ ॥ म्हणे वळिराम पहा गा। बोल नव्हे तुम्हा जोगा। तुम्हीं समर्थ श्रीरंगा। आम्हां कांगा भेडविसी ॥ हामामा० ॥ ५ ॥ ऐसा सकळीं मान केला। तेव्हां कृष्ण संतोषला। आनंद चित्तासी पावला। म्हणे भला भला रे नाम्या ॥ हामामा० ॥ ६ ॥

२

## ॥ घुसळण ॥

डेरा मांडोनि आधारीं। अहं सोहं दोन्हीं मांजरीं। जाणत विभु आहे बेर भीतरी। मलपत घुसळी यशोदा सुंदरी ॥ ध्रु० ॥ १ ॥ कृष्ण गे बाई झालासे रांगणा। कांत्र वो बाई सारिली आंगणा। दंत दीप्ती कोंदली गगना। उंचावले पंकज लोचना ॥ २ ॥ विष्णुदास नामयाचा दातार। पंढरपुरीं घेतला अवतार। भक्तजन तारिले अपार। पुंडलीकासाठीं झालासे साकार ॥ ३ ॥

३

## ॥ कान्होबा ॥

भली भली तुझी गडी । कान्होबा भली० । आम्हां गाईनें केली ओढा ओढी ॥ धृ० ॥ महाबळभटासी पीडे दान दिलें । तें पुरपुर पादूं लागलें ॥ कान्होबा० ॥ १ ॥ कुबज्या म्हातारी बायको केली । ती पुढें गोरी दिसूं लागली । कान्हो० ॥ २ ॥ नामा म्हणेगा श्रीहरी । आम्हां धाडी वैकुंटपुरी ॥ कान्हो० ॥ ३ ॥

४

## ॥ गोपाळकाला ॥

हरीनाम गोड झाले, काय सांगूं हो माय । गोपाळ वाहताती वेणु अनीत्य पावे ॥ हरी० ॥ धृ० ॥ गेले होते वृंदावना, तेथें भेटला कान्हा । गोपाळामाजी जेवी छंद लागला या मना ॥ १ ॥ आणिक एक नवल चोज, गोपाळासी बोले गुज । अचोज चोजवेना, पहाता तेजःपुंज ॥ २ ॥ आणिक एक नवल कैसे, ब्रम्हादिका लागलें पीसे । उच्छिष्टा लागुनिया, देव जळी झाले मासे ॥ ३ ॥ आणिक एक नवलपरी हरी वेऊनि सीदोरी, गोपाळासी वाटीतसे, नामयाचा दाता हरी ॥ ५ ॥

५

## ॥ खेळया ॥ (१)

गोपाळासी खेळसी, आनंदें डुल्लसी । कृष्ण आमुचा गडी हो, हो हो हो हो ॥ १ ॥ पुतनेसी शोषिले, गणीकेसी तारिले । नारदासी कष्टविलें, अरे रे रे रे ॥ २ ॥ गवळीयाच्या घरा जासी, दही दुध लोणी चोरून खासी । त्याच्या सुनेसंगें जासी, छ छ छ छ छ ॥३॥ सोळा सहस्र भोगिसी, ब्रम्हचारी म्हणविसी । लटिकेची पढविसी, कुळु ळु ळु ळु ळु

॥ ४ ॥ सांडूनि मीपण, ब्रम्हा घाली लोटांगण । परब्रम्ह आपण, आयो यो यो यो यो ॥ ५ ॥ ऐसे तुझे पवाडे, वर्णिताती वाडे कोडे । विष्णुदास नामा एव्हडे, आसु सु सु सु सु ॥ ६ ॥

६

## ॥ खेळया ॥ (२)

नोहे ते कैसें जाहलें रे खेळया, नाहीं तेंच दिसूं लागलें रे । अरूप होतें रूपासी आलें, जीव शिव नांव पावलें रे । आपुली आवडी धरुन खेळया, आप आपणासी व्यालें रे । जीवना कारणें केली बायको, तिणें एवढें वाढविलें रे ॥ १ ॥ ऐकरे खेळया तुज सांगितलें ऐसें जाणुन खेळ खेळरे ॥धृ०॥ ब्राम्हणाचें पोर एक खेळायासी भ्यालें, तें बारा वर्षें लपालें रे । कांपत कांपत बाहेर आलें, नागवेंच पळून गेलें रे । सहा तोंडाचें एक शंभुचें बाळ, त्याणें बहुतच बळ आथिलें रे । खेळतां खेळतां चकचकलें तें, कपाट फोडून गेलें रे॥२॥ चौं तोंड्याचा पोर एक नाऱ्या जाणा, तो खेळयामाजी शहाणा रे । कुचाळी करोनी पोरें भांडवी आपण राही निराळा रे। गंगा गौरीचें भांडण लावुनि, शंभुसि धाडी राना रे । खेळ खेळे परि डाई ना सांपडे, तो एक खेळया शहाणा रे ॥३॥ खेळयामाजी हनुमंत शहाणा, न पडे काम वेसण रे । कामच नाहीं तेथें क्रोधच कैंचा, कैंचें तेथें भांडण रे । दहातोंड्याचीं पोरें मारलीं, रामराजा कारण रे । रामराजाची आवडी मोठी, म्हणोनि केलें पेणें रे ॥ ४ ॥ खेळियामाजी भीष्मचि जाणा, न पडे काम वेसणी रे । आपुला काम शंतनुसि ओपुनि, निराळा राहिला कैसा रे । सूर्याचा पुत्र एक यम्या जाणा, हाणुनि फोडितो डोई रे । खेळ खेळे परि डाई ना सांपडे, चुकवि काळाचा फांसा रे ॥ ५ ॥ यादवाचा पोर

एक गोप्या भला तो, बहुतच खेळ खेळला रे । लहान थोर अवघे मारुनि, खेळच मोडून गेला रे । ऐसे खेळहे कोठ्यान कोटी, गणीत नाहीं त्याला रे । विष्णुदास नामा म्हणे गडे हो, पहा विचारून देहीं रे ॥ ६ ॥

७

## ॥ वासुदेव ॥

नरहरी रामा गोविंदा वासुदेवा ॥ ध्रु० ॥ वात्रा अहंकार निशी घनदाट । गुरुवचनीं फुटली वाट । माता भक्ती भेटली बरवंट । तिणें मार्ग दाविला चोखटगा ॥ १ ॥ एक बोल स्पष्ट बोलावा । वाचें हरि हरि उच्चारावा । संत समागम धरावा । तेणें ब्रम्हानंद आघवा गा ॥ २ ॥ आला शीतळ शांतीचा वारा । तेणें सुख झाले या शरीरा । तुटला पातकाचा थारा । कळिकाळासि धाक दरारा गा ॥ ३ ॥ अनुहात वाजती टाळ । अनुस्वर गीत रसाळ । अनुभवें तन्मय सकळ । नामा म्हणे केशव कृपाळ ॥ ४ ॥

८

## ॥ काकडारती ॥

उठा उठा हो वेगेंसी चला जाऊं राउळासी । जळती पातकाच्या राशी काकड आरती देखिलीया ॥ १ ॥ उठा उठा साधुसंत साधा आपुलें स्वहित । जाइल नर देह मग कैंचा हा भगवंत ॥ २ ॥ देव आहे निदसुरा जागे करा रुक्मिणविरा । वेगीं लिंबलोण करा दृष्टी होईल तयासी ॥३॥ ढोल धमामे गर्जती पुढें वाजंत्रें वाजतीं । होती काकड आरती पांडुरंगरायाची ॥ ४ ॥ सिंहनाद शंख भेरी आनंद होतो महाद्वारीं । केशवराज विटेवरी नामा चरण वंदित ॥ ५ ॥

९

## ॥ भुपाळी ॥ (१)

उठीं उठीं पंढरीराया प्रभातसमयो झाला । वैष्णवाचा मेळा गरुडापारीं पातला ॥धृ०॥ सुरांची विमानें गगनीं दाटली सकळ । रुक्माबाई माते वेगीं उठा घननीळ ॥ १ ॥ शुक सनकादिक नारदतुंबर भक्तांच्या दाटी । कवाडा आडून डोळां पाहती जगजेठी ॥ २ ॥ रंभादिक नाचण्या सकळहा येथें नाचती । त्रिशूळ डमरु घेउनि गिरिजेचा पति ॥ ३ ॥ आली पुजे केशी घेउनि रत्नांच्या ज्योती । भावें ओंवाळिंती राही रुक्मिणीचा पती ॥ ४ ॥ वाळवंटापासून महाद्वारा पर्यंत । सुरवरांची मांदी उभी जोडुनिया हात ॥ ५ ॥ पंच प्राण आरत्या घेउन देवांच्या स्त्रीया । भावें ओंवाळीती माझ्या पंढरीराया ॥६॥ अनंत अवतार घेसी भक्तां सहाकारी । कनवाळू कृपाळू दीनालागीं उद्धरी ॥ ७ ॥ चहूं युगाचा भक्त नामा उभा कीर्तनी । पाठीमागें उभी टाळ घेउनीया जनी ॥ ८ ॥

१०

## ॥ भुपाळी ॥ (२)

उठा उठा प्रभात झाली चिंता विठ्ठल माउली । दीन जनाची साउली येई धांवोनी स्मरतांची ॥ १ ॥ पंढरपुर जे भीमातटी सुंदर मनोहर गोमटी । दोन्हीं कर ठेउनिया कटी भेटी साठीं तिष्ठत ॥ २ ॥ कीरीट कुंडलें मंडीत श्रीमुख सुंदर शोभत । गळा वैजयंती डुल्लत हार मिरवती तुळशीचे ॥३॥ सुरेख मूर्ती सगुण सावळी कंठीं कौस्तुभ खांद्या कांबळी । केशरी उटी परिमळ आगळी बुका भाळी विलसतसे ॥ ४ ॥ पित्त पितांबर कसला कटी अक्षई वीट चरणातळवटी । सकळ सौंदर्य सुखाची पेटी हृदय संपुटी आठवा तें ॥५॥ अति प्रिय आवडे तुळशी बुका तशी प्रीति करी भोळ्या भाविका । नामा पदपंकज पादुका शीर मस्तका वंदीतसे ॥ ६ ॥

# ॥ मीराबाई ॥

१६

मन माने जब तार, प्रभुजी ॥ धृ० ॥ नदियां घयेरी नांव पुराणी, कैशी उतरु पार ॥ १ ॥ पोथी पुराण सब कुच देखे, अंत न लागे पार ॥ २ ॥ मीरा कहे प्रभु गिरधरनागर, नाम निरंतर सार ॥ ३ ॥

१७

जमुनामो कैशी जाऊं मोरे सैया, बीच खडा तेरो लाल कन्हैया ॥ धृ० ॥ श्रींदाजीबनके मथुरा नगरी, पाणी भरण कैशी जाउ मोरे सैया ॥ १ ॥ हातमो मोरे चूडा भरा है, कंगण लेहेरा देत मोरे सैया ॥ २ ॥ दधी मेरा खाया मटकी फोरी । अब कैशी बुरी बात बोलु मोरे सैया ॥ ३ ॥ सीरपर घडा घडेपर झारी, पतली कमर लचकाय सैया ॥ ४ ॥ मीरा कहे प्रभु गिरधरनागर, चरण कमल बलजाउ मोरे सैया ॥ ५ ॥

१८

बासरी सुनुंगी, मैं तो बा०, वो बन्सीवालेकुं जाने न देउंगी ॥ धृ० ॥ वो बन्सीवाले मुजे एक कहेगा, एकके लाख सुनाउंगी ॥ १ ॥ श्रींदाजीबनके कुंजगलीनमे, भरभर फुल चुनोंगी ॥ २ ॥ ईत गोकुल उत मथुरानगरी, बीचमे जाय आडावंगी ॥ ३ ॥ मीरा कहे प्रभु गिरधरनागर, चरणकमल बलजाउंगी ॥ ४ ॥

१९

नामोकी बलहारी, गजगणिका तारी ॥ धृ० ॥ गणिका तारी अजामिळ उद्धारा, तारी गौतमकी नारी ॥ १ ॥ झुटे बेर भिल्लणीके खावे, कुबजा नार उद्धारी ॥ २ ॥ मीरा कहे प्रभु गिरधरनागर, चरणकमल बलिहारी ॥ ३ ॥

२०

प्रगट भये भगवान, गोकुलमो प्रगट० ॥ धृ० ॥ नंदके घर नौबद बाजन लागे, झांज मृदंग तान ॥ १ ॥ सबही राजे मीलने आवे, छांड दीयो अभिमान ॥ २ ॥ मीरा कहे प्रभु गिरधरनागर, नीशिदीनी धरो ध्यान ॥ ३ ॥

२१

जोगी मेरा रावळा कांहा गवोरी ॥ धृ० ॥ न जानु हार गवो न जानु पार गवो, न जानुं जमुनामे डुब गवोरी ॥ १ ॥ ईत गोकुल उत मथुरानगरी, बीच जमुनामो बही गवोरी ॥ २ ॥ मीरा कहे प्रभु गिरधरनागर, चरणकमल चित्त हार लीनोरी ॥३॥

२२

मोरी लग लगी गोपालसे ॥ धृ० ॥ मेरा क्याजी कोई क्या करेगा, मैं रत भई नंदलालसे ॥ १ ॥ ब्रींदाजीबनके कुंजगलीनमो, मै जप धर तुळसीमालसे ॥ २ ॥ मीरा कहे प्रभु गिरधरनागर, छुट पडी जंजालसे ॥ ३ ॥

२३

लक्ष्मण धीरे चलो, मैं हारी ॥ धृ० ॥ रामलक्ष्मण दोनो भीतर, बीचमे सिता प्यारी ॥ १ ॥ चलत चलत मोहे छाली पड गये, तुम जीते मैं हारी ॥ २ ॥ मीरा कहे०, चरणकमल बलिहारी ॥ ३ ॥

२४

प्रभु तुम कैसे दीनदयाळ ॥ धृ० ॥ मथुरा नगरीमो राज करत है, बैठे नंदके लाल ॥ १ ॥ भक्तनके दुःख जानत नहीं, खेले गोपीगवाल ॥ २ ॥ मीरा कहे प्रभु गिरधरनागर, भक्तनके प्रतिपाल ॥ ३ ॥

२५

मोहन डार दीनो गले फांसी ॥ धृ० ॥ ऐसा जो होता मेरे मनमे, करवत ले जाऊं कासी ॥ १ ॥ आंबाके बनमे

कोयल बोले, बोलत वचन उदासी ॥ २ ॥ मीरा दासी प्रभु छवी नीरखत, तूं मेरा ठाकोर में हुं तोरी दासी ॥ ३ ॥

२६

कुंजवनमो गोपाल, राधे० ॥ धृ० ॥ मोर मुगुट पितांबर शोभे, नीरखत शाम तमाल ॥ १ ॥ ग्वालबाल रुची चारु मंडळ, वाजत बनसी रसाळ ॥ २ ॥ मीरा कहे प्रभु गिरधर-नागर, चरणपर मन चिरकाळ ॥ ३ ॥

२७

ज्या संग मेरा न्याहा लगाया, वाकु मै धुंडने जाऊंगी ॥ धृ ॥ जोगन होके बनबन धुंडु, आंग बभुत रमायोरे ॥ १ ॥ गोकुल धुंडु मथुरा धुंडु, धुंड फीरुं कुच गलीयारे ॥ २ ॥ मीरा दासी शरण जो आई, शाम मीले ताहा जाऊंरे ॥ ३ ॥

२८

शाम बन्सीवाला कन्हैया, मै ना बोलूं तुजसेरे ॥ धृ० ॥ घर मेरा दूर घगरी मोरी भारी, पतली कमर लचकायरे ॥ १ ॥ सास ननंदके लाजसे मरतहुं, हामसे करत बलजोरी ॥ २ ॥ मीरा दासी तुमसो बीगरी, चरण कमलकी उपासीरे ॥ ३ ॥

२९

पतीया मैं कैशी लीखुं, लीखये न जातरे ॥ धृ० ॥ कलम धरत मेरा कर कांपत, नयननमो रड छांयो ॥ १ ॥ हमारी बीपत उद्धव देखी जात है, हरीसो कहुं वो जानत है ॥ २ ॥ मीरा कहे०, चरण कमल रहो छांये ॥ ३ ॥

३०

कीत गयो जादु करके, वो पीया ॥ धृ० ॥ नंद नंदन पीया कपट जो कीनो, नीकल गयो छल करके ॥ १ ॥ मोर मुगुट पितांबर शोभे, कबु ना मीले आंग भरके ॥ २ ॥ मीरा दासी शरण जो आई, चरणकमल चित्त धरके ॥३॥

३१

हरी तुम कायकु प्रीत लगाई ॥ धृ० ॥ प्रीत लगाई परम दुःख दीनो, कैशी लाज न आई ॥ १ ॥ गोकुल छांड मथुरेकु जाय, वामे कोण वराई ॥ २ ॥ मीरा कहे०, तुमकु नंद दुवाई ॥ ३ ॥

३२

ये ब्रीजराजकु अर्ज मेरी, जैसी राम हमारी ॥ धृ० ॥ मोर मुगुट श्रीछत्र बीराजे, कुंडलकी छब न्यारी ॥ १ ॥ हारी हारी पगया केशरी जामा, उपर फुल हाजारी ॥ २ ॥ मीरा कहे०, चरणकमल बलिहारी ॥ ३ ॥

३३

तै मेरी गेंद चुराई, ग्वालनारे ॥ धृ० ॥ आवहीं आणंपरे तोरे आंगणा, आंगया बीच छुपाई ॥ १ ॥ ग्वालबाल सब मीलकर जाये, जगरथ झोंका आई ॥ २ ॥ साच कन्हैया झुट मत बोले, घट रही चतुराई ॥ ३ ॥ मीरा कहे प्रभु गिरधरनागर, चरण कमल बलजाई ॥ ४ ॥

३४

कोई देखो रे भया, शामसुंदर मुरलीवाला ॥ धृ० ॥ जमुनाके तीर धेनु चरावत, दधी घट चोर चुरैया ॥ १ ॥ ब्रींदाजीवनके कुंजगलीनमो, हमकु देत झुकैया ॥ २ ॥ ईत गोकुल उत मथुरा नगरी, पकरत मोरी भया ॥ ३ ॥ मीरा कहे०, चरण कमल बजैया ॥ ४ ॥

३५

जल कैशी भरुं जमुना भयेरी ॥ धृ० ॥ खडी भरुं तो कृष्ण दिखत है, बैठ भरुं तो भीजे चुनडी ॥ १ ॥ मोर मुगुट पितांबर शोभे, छुम छुम बाजत मुरली ॥ २ ॥ मीरा कहे०, चरण कमलकी मैं जेरी ॥ ३ ॥

३६

राजी राजी, मेरा मन रामजी सो राजी ॥ धृ० ॥ पोथी पढत पंडत भुला, कुराण पढत भुला काजी ॥ १ ॥ सागर उपर सीला तारी, मारा रावण पाजी ॥ २ ॥ मीरा कहे०, वैकुंठ नोबद बाजी ॥ ३ ॥

३७

शाम भयो बेपीर, उद्धवजी शाम० ॥ धृ० ॥ कठण कठोर दर्द न जाणे, तुम तो जात आहीर ॥ १ ॥ हमकु छोड भोगीकु बजाको, कैसे धरुं धीर ॥ २ ॥ मीरा कहे०, जानत नहीं पर पीर ॥ ३ ॥

## ॥ नरहरी सोनार ॥

१

भस्म उटी रुंडमाळा । हातीं त्रिशूळ नेत्रीं ज्वाळा ॥१॥ गजचर्म व्याघ्रांबर । कंठीं शोभे वासुकी हार ॥ २ ॥ भूत वेताळ नाचती । हर्षयुक्त रमापती ॥ ३ ॥ सर्व सुखाचें आगर । ह्मणे नरहरी सोनार ॥ ४ ॥

॥ वासुदेव ॥ २

उठवा होय जागा, पहा वासुदेवाला । सुदिन उगवला दान आपुले घाला ॥ १ ॥ आणिक हिताग आला अवचित फेरा । हे घडी सांपडेना कांहीं दान पुण्य करा ॥२॥ ठेविल्या स्थिर नोहे घर सुकृते भर । भक्तासी भय नाहीं संत संगती धर ॥ ३ ॥ संसार सार नोहे माया मृगजळ भासे । क्षणांत भ्रांती याचा काय विश्वास ॥ ४ ॥ घे करीं टाळ दिंडी होय विठ्ठलाचा दास । सावधान नरहरी माळो चरणीं निजध्यास ॥ ६ ॥

॥ भुपाळी ॥ २

सत्य ज्योतिर्लिंग बारा प्रातःकाळीं स्मरण करा । कोटी कुळें उद्धारा भवतरा बापहो ॥ १ ॥ वाराणशी विश्वनाथ मोक्ष दाता तों समर्थ । पुरवील अंतरीचें आर्त्त सोमनाथ सोरटी ॥ २ ॥ ॐकार ममलेश्वर श्वेतबंध रामेश्वर । भीमा उगमी भीमाशंकर घृष्णेश्वर वेराळीं ॥ ३ ॥ नागनाथ अमृतोदकीं विश्वजन केलें सुखीं । परळी वैजनाथ म्हणती सुखी सुकृत साचें जन्माचें ॥ ४ ॥ त्र्यंबक हा तीर्थराज पुरवील अंतरीचें काज । त्याही तेजामाजी तेज महाकाळ उज्जनी॥५॥ दुजे कैलास भुवन श्री शैल्य मल्लकार्जुन । वाचे स्मरतां धन्य धन्य अनुपमें क्षेत्र तें ॥ ६ ॥ बद्रिकेदार उत्तरें ज्याचे स्मरणें भव हा तरे ध्यान धरितां वृत्ति नुरे नीज निश्चळ दासाची ॥ ७ ॥ नरहरी म्हणे जन्मा यावे शुद्ध सत्व प्रेम भावे । वाचे हरी गुण गावें मालो ल्पे सर्वदां ॥ ८ ॥

# ॥ श्रीज्ञानदेव ॥

३६

देखिला देखिला माई देवाचा देव । फिटला संदेह निमाले दुजेपण ॥ धृ० ॥ योगीयां दुर्लभ तो म्यां देखिला साजणी । पाहतां पाहतां डोळा न पुरे धणी ॥ १ ॥ अनंतरूपे अनंतवेशीं देखिलें म्यां त्यासी । बापरुक्मादेवींवर खूण बादली ऐसी ॥ २ ॥

३७ ॥ पद ॥

निजरूपीं सावळी । सहजे नंदाचे बाळी । स्वानंदाची पुतळी । कान्हाई माझी ॥ १ ॥ खांद्यावरी कांवळी । उभी आहे सांवळी । संताची साउली विठाई माझी ॥ २ ॥

पाता आहे रंगित । आंत गातां मंजुळ गीत । संताची संगत विठाई माजी ॥ ३ ॥ ज्ञानदेव ह्मणती । करूं याहो आरती । ओंवाळुनि श्रीपती । बैसविला ॥ ४ ॥

## ३८ ॥ पद ॥

गोड तुझे नाम विठोबा आवडते मज । दुर्जें उच्चारितां मनी वाटतसे लाज ॥ ध्रु० ॥ कर्म आणि धर्म आचरती जयालागीं । साधनें साधितां साधक शिणले अभागी ॥ १ ॥ गोड० । भक्ती आणि मुक्ती नामा पाहसी प्रत्यक्ष । चारी वेद साही शास्त्रें देताती साक्ष । गोड० ॥ २ ॥ काया वाचा मन चरणीं डुलले गहाण । बाप रखुमादेवीवर विठ्ठलाचि आण । गोड० ॥ ३ ॥

## ३९ ॥ पद ॥

सावध होउनि बाई आत्मा पाही आपुल्या डोळागे । 'प्रत्यक्ष गुरूची साक्षी चक्षू लक्षी घन सावळागे ॥ ध्रु० ॥ त्रिकूटगिरीच्या शिखरी क्रीडा करिती नानापरी गे । रसने विण रस चाखी अलक्ष नांदतो सर्वांतरीगे । चाळक चिन्मय आत्मा नांदे इंद्रीयाचे व्यापारीगे । सावध० ॥ १ ॥ कुंकुममय मंदिरी शुभ्र स्फटिकमय गिरीगे । झळके स्वरुप पाहे अंतरीचे अंतरीगे । संता जाई शरण ते तुज दाविती आपुल्या करीगे । सावध० ॥ २ ॥ होउनिया अनुभव विश्वा विश्वाकारगे । प्रत्यक्ष अनुभव ऐसा जैसा आमलक हास्यावंरीगे । गुरुविण जंव हा प्राणी गुरु पडला दूरचे दुरीगे । सावध० ॥ ३ ॥ गुरुविण जंव हा प्राणी शब्द संताचे गोफाटीगे । दिसतें तितुके नाशी ऐशा भ्रमिष्ट बोलती गोष्टीगे । आत्मा कळला नाहीं जपतप साधन तीर्थें कोटीगे । ज्ञानदेव म्हणे न सुटती संसाराच्या गांठीगे । सावध० ॥ ४ ॥

४०

झाला पायरत् साचार नवल । मांडिलें विंदान बोला विठ्ठल विठ्ठल ॥ १ ॥ पाहिली वेळाची वेळ उभी आंगणीं ठेविली । येतिया जातीया पुसे विठ्ठलीगे माय ॥ २ ॥ गेली तहान भूक नाहीं लाज अभिमान । वेधिलें जनार्दनें देवकीनंदनगे माय ॥ ३ ॥ ज्ञापरखुमादेवीवरु जीवीचें जीवनू । माझे मनीचे मनोरथ पुरवी कमलनयनु ॥ ४ ॥

४१

मिथ्या म्हणों परि सत्यचि भासे । सत्य म्हणो परि मिथ्याचि दिसे ॥ १ ॥ काय आहे तें काय कळेना । ऐशी खूण मज दावी नारायणा ॥ २ ॥ कोण प्रकृती कोण तो पुरुष । कोण ती माया कोण जगदीश ॥ ३ ॥ निवृत्ति प्रसादें ज्ञानदेव बोले । प्रकृती पुरुष विठ्ठलीं समावले ॥ ४ ॥

४२

एकाचें मीपणें नागविलें घर । नातरी संसार ब्रह्मरुप॥ १ ॥ प्रवृत्ती निवृत्ति मुळी दोन्हीं नाहीं । कल्पनेनें पाही भ्रमताती ॥ २ ॥ तें एक त्यागितां काय आहे वाणी । कैवल्य निदानीं तूंच होसी ॥ ३ ॥ म्हणे ज्ञानेश्वर मग होसी मुक्त । न होसि अशक्त कवण ठायीं ॥ ४ ॥

४३

संत भेटती आज मज । तेणें मी झालो चतुर्भुज । दोन भुजा स्थूळीं सहज । दोन सूक्ष्मी वाढिन्नल्या ॥ १ ॥ आलिंगनीं सुख वाटे । प्रेमें चिदानंद गोटे । हर्षे ब्रह्मांड उतटे । समूळ तुटे मी तूं पण ॥ २ ॥ या संतापरिस उदार । त्रिभुवनीं न दिसे थोर । मायबाप सहोदर । इष्ट मित्र सोयरे ॥ ३ ॥ संतासि भेटतां । हरे संसार व्यथा । पुढतो पुढती चरणावरी माथा । आखंडित ठेविन ॥ ४ ॥ या सं·

तांचें देणें । कल्पतरुहूनि दुणें । परिसा परीस अगाध देणें । चिंतामणि ठेंगणा ॥ ५ ॥ कृपा कटाक्ष न्याहाळिलें । आपुले पदीं बैसविलें । बापरुक्मादेवीवर विठ्ठलें भक्ता दिधलें वरदान ॥ ६ ॥

४४

शास्त्रीं सांगितलें पुराणीं अनुवादलें । आम्हां तें लाधलें निरुतें वर्म ॥ १ ॥ सांगितलें तें नव्हे बोलिजे तें नव्हे । गुरुमुखें पहावें परब्रह्म ॥ २ ॥ त्यासी नसे तरी बरवें दिसें । भीतरीं कैसें विनतसें ॥ ३ ॥ अनुभवी जे ते बोलिली लक्षणें । ज्ञानदेवें खूण सांगितली ॥ ४ ॥

४५

डोळ्याचा हा डोळा शून्याचा शेवट । नीळ बिंदु नीट लखलखित असे ॥ १ ॥ विसावो आलें चैतन्य तेथें । पहा निरुतें अनुभवेंसी ॥ २ ॥ पार्वतीलागीं आदिनाथें दाविलें । ज्ञानदेवा पावलें निवृत्तीकृपें ॥ ३ ॥

४६

अनुपम्य मनोहर कासे शोभे पितांबर । चरणीं ब्रीदाचा तोडर देखिला देव ॥ १ ॥ योगियासी कसवटी दावितसे नेत्रपुटीं । उभा भीवरेचे तटीं देखिला देव ॥ २ ॥ बापरुक्मादेवविरु पुंडलीका अभयकरूं । परब्रम्ह सहाकारू देखिला देव ॥ ३ ॥

४७

दिसतें परि न धरवें हातें । गुज हें संतातें पूस राया॥१॥ मनाचिया मार्गे आहे जें कां उगें । तेंचि संतासंगें बुझसी ना ॥२॥ मन जेथें मुर मग जे कां उरे । तेंचि तूं कां रे रमरसी ना ॥३॥ तेथील खूण विरळा कोणी जाणे । ज्ञानदेव म्हणे निवृत्तीचा ॥ ४ ॥

४८

दुजें द्वैत सांडी एकतत्वें मांडीं । अद्वैत ब्रम्हांडीं पैसूकीजे ॥ १ ॥ तें रूप पंढरीं पुंडलीका द्वारीं । मुक्ति मार्ग चारी ओस रया ॥ २ ॥ अनंत अनंत ओतिलें संचित । वैकुंठ जात भूत उभे असे ॥ ३ ॥ ज्ञानदेवीं ध्यान मन मौन चरण । आपणचि मग्न तेथें झालें ॥ ४ ॥

४९

मृत्तिकेची खेती काय करितोसी । कोण मी नेणसी काय आहे ॥ १ ॥ काय तूज झालें नाथिला संसार । कासयासी भार वाहतोसी ॥ २ ॥ शुद्ध बुद्ध रूप तूंचि तूं परिपूर्ण । जन्म आणिं मरण तुज नाहीं ॥ ३ ॥ अविद्येचें योगें तुज जाण भूली । अनुभवेनि किल्ली छेदी आतां ॥ ४ ॥ श्रीगुरू-च्या कृपें म्हणती ज्ञानेश्वर । तरसी संसार निश्चयेसी ॥ ४ ॥

५०

दृष्टीचें जें सुख अंतरीं तें देख । ओंकार अनेक ओळली या ॥ १ ॥ नादुलें ऐकसी बिंदुलें देखसी । कोंदलें चौफासीं सावरेना ॥ २ ॥ तळीं आणि उपरी आंत आणि बाहेरी । ब्रम्ह घराचारी नांदतसे ॥ ३ ॥ उफराटीया दृष्टी निवृत्ती शेवटीं । ज्ञानदेवा भेटी झाली असे ॥ ४ ॥

५१

निरंतर ध्याता हरी । सर्व कर्माची बोहरी । दोष जाती दिगंतरीं । रामकृष्ण उच्चारणें ॥ १ ॥ तप तीर्थ हेंचि नाम । जप व्रत हेचि नेम । ऐसा धरूनिया नेम । तोषि भक्त तरेल ॥ २ ॥ जीव शिव एक करी । शांति क्षमा जरी धरी । त्यासी नित्य श्रीहरी । प्रत्यक्ष आपण उभा असे ॥ ३ ॥ ज्ञानदेव म्हणे नित्य । त्याचें वचन तेंचि सत्य । त्याचेनि सर्व कृतकृत्य । सिद्धि पावेल सर्वथा ॥ ४ ॥

९२

दावी जैसें नोहे बोली जैसें नोहे। गुरुमुखें पहावें निर्धारोनी ॥ १ ॥ अनुभवी तो गोविंद अवघा परमानंद । करितो अनुवाद सरिता नव्हे ॥ २ ॥ रूप नसे परि तें नसेचि दिसे। भतिरू कैसे नीवतसे ॥ ३ ॥ अनुभविया प्रती बोलिजे लक्षण । ज्ञानदेव ह्मण सांगतसे ॥ ४ ॥

९३

पाहतां पाहणें पाहे पां निरुतें । पाहिल्या अवचित तूंचि होसी ॥ १ ॥ तूंचि तूं आपण तत्व तेंचि जाण । नलगे साधन आणिक कांहीं ॥ २ ॥ भानु बिंबेवीण निरसेल तम । ज्ञानदेव ह्मण अनुवादला ॥ ३ ॥

९४

साधूचें महिमान अपार अनंत । वर्णावया तेथ कोण पुरे ॥१॥ सहस्र तोंडाचा शेष तोही शिणला। तयाचीया बोला नाकळेचि ॥ २ ॥ चारी वाचा युक्त असुनि विवादती । ज कळे ते गती सज्जनाची ॥ ३ ॥ असे पूर्ण काम सद्गुरु निवृत्ति । झाले कृपामूर्ती ज्ञानदेव ॥ ४ ॥

९५

मळियानीळ सीतळु । करिता नये आळुमाळु । सुगंधाचा परिमळु । गुंफिता नये ॥ १ ॥ तैसा जाणा सर्वेश्वरु । ह्मणूं नये सानाथोरु । स्वरुपाचा निर्धारु । कोण जाणे ॥ २ ॥ मोतियाचे पाणी । भरिता नये रांजणी । गगनासी गवसणी । घालिता नये ॥ ३ ॥ कापुराचें कांडण । त्यातें कैचे कण । साखरेचें गोडपण । पाखडितां नये ॥ ४ ॥ डोळ्यांतील बाहुली । करितां नये वेगळी । सवी ह्मणोनी आंजुळी । धरितां नये ॥ ५ ॥ विठ्ठल रुक्मिणीचे भांडणीं । कोण करी बुझावणी । निवृत्तीचे चरणीं । ज्ञानदेव ॥ ६ ॥

## ॥ पद ॥

९६

उठिवा उठिवा गोपाळा उघडी स्वरुप लोचना । सरली अविद्या रात्री उदय झाला रवि किर्णा । इंद्रिय गोधनें नेई निर्गुण वना । सुटली मानस वासना तुजविण नाकळती कोणा ॥ धृ० ॥ प्रबोध पहा जाले सरले त्रिमिर तम रज । गुरु कृपेचा अरुण दिसतो सुरंग समतेज । पाठी आत्म दिन कर उगवे तत्काळ सहज । जीव चंद्राचें चांदणें सहजी सहज निस्तेज ॥ १ ॥ दृशाच्या चांदण्या लोपल्या ठाईच्या ठाया । लिंगदेह कमळीचे मधुकर सुटती आपसया । देह बुद्धीची जाय उर्मी देहे संकोचे विलया । मीनली बुद्धी बोधे चक्र वाके आपणीया ॥ २ ॥ वैराग्याच्या रश्मि ज्वाळा मन हे रविकांत । धरितां विषय वन्ही प्रळय वन जाळित । तृष्णेच्या श्वापदा प्रळय वर्ते अद्भुत । दृश मृगजळ मुढा मृगा भ्रमवित ॥ ३ ॥ योग विद्येच्या पंथें साधकत्वें चालिली । उपनिषधांच्या अर्थें शब्द करिती कोकिळी । वाग्विद्येच्या उलुका निवती मौन्याचे ढोली । कल्पनेचा ठाव साही चोरी सांडिली ॥ ४ ॥ सर्व व्यवसाय सांडोनी उदमी झालासे नर । वासने वेश्येचा जेणें खुंटला व्यापार । बोले ज्ञानेश्वर योगी जालासे स्थीर । निवृत्ती प्रसादे समाधी सर्वगत स्थीर ॥ ५ ॥

९७

आलवो हरी आलवो । संत संगे ब्रह्मानंदें जालवो ॥ १ ॥ येथे वो हरी तेथे वो । हरीविण कोठे स्थळ नसे रीते वो ॥ २ ॥ हरी आदि वो हरी आदि वो । मरी भला सर्वा भूतींवो ॥ ३ ॥ जाणा वो हरी जाणा वो । बापरुक्मादेवीवरु यानावो ॥ ४ ॥

५८ ॥ पद ॥

सौबी कच्या वे । कच्या वे । वोही गुरुका वच्या ॥ ध्रु० ॥ धुनी तजाकर खाक लगाई जाकर वैठा वनमो । खेचर मुद्रा भद्रासनपर ध्यान धरतहे मनमो ॥ १ ॥ गुप्त होकर प्रगट होवे जावे मथुरा काशी । सीस काट व-क्षीस करते हे हुवा सप्त लोकका वासी ॥ २ ॥ कुंडलनीकु खुब जगावे भ्रमर अंकुर पावे । जलताहे पानी उपर मुखसें बोले सो होय ॥ ३ ॥ शास्त्रमो तो कछु नही रह्या सारा ज्ञान कमाया । कर्म कर्ता है वेद विधिका तनका लकडा किया ॥ ४ ॥ हुकूम निवृत्तिका ज्ञानेश्वर कर्ताने उपर जाने। भुत दया भाव भक्ती सब घट आत्माकु पछाने ॥ ५ ॥

५९

सखी ह्मणे ग वीर तुह्मी ऐकागे साजनी । मोतियाचें पाणी भरुनी आणा ॥ १ ॥ चंपक निर्मळ त्याचागे परिमळ। पालवी आनीळ बांधोनी आणा ॥ २ ॥ आणा इंद्र नीळ त्याचे काढावो कीरळ । पद्मराज निर्मळ भुजु घाला ॥ ३ ॥ ज्ञानदेव ह्मणे जो जाणे याची खूण । येती यादव राणे उदरासी ॥ ४ ॥

६०

अकार उकार मकार तीसरा । अर्ध मात्रा खरा ओंकाराची ॥ १ ॥ रक्तश्वेत शाम निळा रंग शोभे । याज विरहित लाभे निज भक्ता ॥ २ ॥ निवृत्तीचें रूप वृत्तिसी लक्षण । मग बोलाचा उथान काय आहे ॥ ३ ॥

६१

अकारीं अर्ध मात्रा कवणे रीती दिसे । उकारीं हे वसे कवणे परी ॥ १ ॥ मकारी संयुक्त वसे कैशा परी । अर्ध मात्रा पैं ॥ २ ॥ अर्ध मात्रेवा अर्थ अवचट दिसे । गुरुगम्य

सोय जाणती पै ॥ ३ ॥ ज्ञानदेव अर्थ शोधुनि घेतला। माहा मुनी संचरला निवृत्तीराज ॥ ४ ॥

६२

चित्त विहारें झालेंसे साजनी। अवचित म्यां आंगणीं देखियेला ॥ १ ॥ काय करूं ग सये सांवळ गोवित। आपे आप लपत मन तेथें ॥ २ ॥ बापरुक्मादेवीवरु सांवळी प्रतिमा। मनें मना क्षमा एक झाली ॥ ३ ॥

६३

कुंचा पताका झळकती। टाळ मृदंग वाजती। आनंदें प्रेमें गर्जती। भद्र जाती विठ्ठलाचे ॥ १ ॥ आले हरीचे विनट। वीर विठ्ठलाचे सुभट। भेणे झाले दिग्पाट। पळती थाट दोषाचे ॥ २ ॥ तुळशीमाळा शोभते कंठीं। गोपीचंदनाची उटी। सहस्त्र विघ्नें लक्ष कोटी। बारा वाटे पळताती ॥ ३ ॥ सतत कृष्ण मूर्ति सांवळी। खेळे हृदय कमळीं। शांति दया तया जवळी। जीवें भावें अनुसरल्या ॥ ४ ॥ सहस्त्र नामाचें हत्त्यार। शंख चक्राचे शृंगार। अंगीं बळ वैराग्याचें थोर। केला मार षड्वर्गी ॥ ५ ॥ ऐसे ते एक अंगें वीर। विठ्ठलरायाचे डिंगर। बापरुक्मादेवीवर। जीहीं निर्धार जोडिला ॥ ६ ॥

६४

नव्हे नव्हे आजि काळीचे। असे युगें अठ्ठाविसाचे। मज निर्धारिता साचे। मृत्यु लोकीचें ते नव्हे ॥ १ ॥ हाच मानीवा विश्वास। येर सांडी तूं हव्यास। जरि तुज पाहिजे वैकुंठवास। तरी तूं जाय पंढरी ॥ २ ॥ पंढरी ह्मणजे भूवैकुंठ। परब्रह्म तंव दिसता हे नीट। त्या हरि दासासी वाळवंट। त्या जागरणा दिधली ॥ ३ ॥ ह्मणोनि करा क्षीरापती। नटा नटा कीर्तन वृत्ति। ते नर मोक्षाते

पावती । ऐसें बोलतीं सुरवर ॥ ४ ॥ महा तीर्थ हें पंढरी । भूवैकुंठ नगरी । भक्त पुंडलीकाचे द्वारीं । कर कटावरी उभा ॥ ५ ॥ काशी आणि अविद्या कांति । मथुरा माया ती गोमति । परी न पवती । पांडुरंगा ॥ ६ ॥ हाचि मानीपा निर्धार । येर सोपा विचार । जरी तुज व्हावा परात्पर । तरी तूं जाय पंढरीये ॥ ७ ॥ आडवी वाहतसे भीमा । तारावया देह आत्मा । पैल थडीं परमात्मा । मध्यभागीं पुंडलीकु ॥ ८ ॥ येतां यांच्या दरुषणें । प्राणियां नाहीं जन्म मरण । पुनरुपी अगमन । येथें बोलणेंच नाहीं ॥ ९ ॥ हे चोविसा मूर्तीचें उद्धरण । शिव सहस्र नामासी गहन । हेंचि हरिदासाचें चिंतन । विश्ववंदे मूर्ती हो ॥ १० ॥ तो हा देवाधिदेव बरवा । पांडुरंग सदाशिवाचा निज ठेवा । बापरुक्मादेवीवर पंचविसावा । चोविस मूर्ति वेगळा ॥ ११ ॥

६५

गुरु मुखें खुण ओळखून घ्यावी । देहींच पहावी मुक्तदशा ॥ १ ॥ मुक्तिचा सागर भरतां दाही दिशा । पहातां जीव दशा विरोनि जाय ॥ २ ॥ ते खुण दाविली माझिये नयनीं । चिद्रत्नांची खाणी उघडली ॥ ३ ॥ निवृत्ती प्रसादे ज्ञानदेवा लाधलें । येणें सुखी झाला तेणें सुखें ॥ ४ ॥

६६

सत्रावीचा खेळ लक्षवेना कथना । ब्रह्मादिक जाणा आगमे जो ॥ १ ॥ रात्रंदिवस चपळ ते धांवती । सत्रावी ती नपवती तिही कोन्हीं ॥ २ ॥ सत्रावीचे गमे वीवि हरिहर । चक्षु पाहती हीरा गोविंदुगा ॥ ३ ॥ ज्ञानदेव दर्पण सत्रावीचे घेतो । उन्मोनि सेवितो निवृत्तीराज ॥ ४ ॥

६७

आकाशी गुंफा अंत नाहीं जीचा । शोध करा तिचा

सर्व भावें ॥ १ ॥ अनंत ब्रह्मांड खेळ जिच्या योगें चाले। चांग्यास म्यां नेले तया ठाई ॥ २ ॥ गुंफेच्या आधारीं चंद्र सूर्य चालती । विश्रांतिसी येती तया ठाया ॥ ३ ॥ ज्ञानदेव नयनीं धरितो रम्य भावें । सौम्यरुप स्वभावें लाधलेसे ॥४॥

६८

आत्मज्ञान जया न देखे दृष्टीं । तया नरा या गोष्टी करूं नये ॥ १ ॥ तूर्या रूप जाण भावें निःसीम । तया परता राम असे बापा ॥ २ ॥ ज्ञानदेवा गुज दाविलें गुरूनें । मनें अन्य न कल्पिता ॥ ३ ॥

६९

नाहीं सन्यास मुद्रा ध्यानादि आसन । उवडीची निधान हरीनाम ॥ १ ॥ हरीनामाविण कासया जीविजे । त्याविण मरिजे तेचि भले ॥ २ ॥ धन्य तेचि जगीं एक हरीभक्त । नामासी गर्जत वेळोवेळा ॥ ३ ॥ नेणे क्रिया कर्म दान आणि धर्म । नाम परब्रम्ह ज्ञानदेवीं ॥ ४ ॥

७०

आदिचें अनादि मुळ पैं सर्वदा । परा दीया वाचा हरपली ॥ १ ॥ तेचि अव्यक्तरूप देवकीचें बाळ । वसुदेवा कुळ कृष्णसखा ॥ २ ॥ अनित्य अपार मुराली ब्रह्मांड । ढीर प्रचंड जया अंगीं ॥ ३ ॥ निवृत्तीचे धन माजी श्रीकृष्ण । सांगतसे प्रसन्न गैनीराज ॥ ४ ॥

७१

जगासी तारक विठ्ठलचि एक । केलासे विवेक सनकादिके ॥ १ ॥ तें रूप वळले पंढरीसी देखा । अद्वैताच्या शाखा । उगलें बीज अद्वैत स्वयंभ । नांव तें सुलभ विठ्ठलराज। ॥ ३ ॥ निवृत्तीचें गुज विठ्ठल सहज । गैनिराजें मज सांगितलें ॥ ४ ॥

# ॥ सोपान ॥

१

हरिविण दुजे नेणे चित्त माझें । ह्मणूनि सहजे विचरतु ॥ १ ॥ सर्व हरी हरी माझा तों कैवारी । दुजी भरोवरी नेघों आम्हीं ॥ २ ॥ राम हा सकळ आम्हां सर्व आहे । दुजें तें साहे परब्रम्हीं ॥ ३ ॥ सोपान सलगी विनवी तुम्हां। सर्व हा परमात्मा आम्हां दिसे ॥ ३ ॥

२

नाद रसीं लीन ब्रम्ह समावलें । त्यामाजी सानुलें मन चोख ॥ १ ॥ मन तें नीकट ब्रम्हरस चोख । ब्रम्हीं ब्रम्ह लेख एक पण ॥ २ ॥ शासंकित गवो झाला परीमान । घट मटी दीन हरपला ॥ ३ ॥ सोपान सोपारे निराळें निर्धारे । नंदाचें गोजिरें माजी खेळे ॥ ४ ॥

३

नाद ब्रम्ह ठसा निरालंबीं झाला । सगुण उदेला तेजाकार ॥ १ ॥ तेजरुपीं तेजी आपरुपीं कांजी । जीव शिव भोजी नांदताती ॥ २ ॥ सोपाना नलगे प्रपंच वियोगु । ब्रम्हार्पण भोगूं नुरे तोही ॥ ४ ॥

४

उघडीं दृष्टीं करी इंद्रियासकट । वैकुंठीची वाट पंढरी जाण ॥ १ ॥ दृष्टीभरी पाहे विठ्ठल आनंदें । पूर्ण मनोरथ विठ्ठल देख ॥ २ ॥ हाचि मार्ग सोपा जनासि उघडा । विषयाच्या जडा टाकी परता ॥ ३ ॥ सोपान म्हणे गुंतसी सर्वथा । मग नव्हे उलथा मुक्त पंथा ॥ ४ ॥

५

ज्याचें मुखीं हरी तोंचि धन्य या जगीं । तरला पैं वेगीं वेदु बोले ॥ १ ॥ हरी हाचि आम्हां जीवित पैं सोपें । हर-

तील पापें हरीनामें ॥ २ ॥ वैकुंठाचें सुख पैं नलगे चित्तीं । हरी हेचि मूर्त्ति विठ्ठल ध्यावें ॥ ३ ॥ याचेंनि स्मरणें कैवल्य साचार । सोपान विचार हरी जप ॥ ४ ॥

६

माझा मी पूर्णता गुरुनामी संपन्न । निवृत्ति निधान पूर्ण गंगा ॥ १ ॥ अमृताचा पाट वाहे इंद्रायणीं । नित्य त्या पर्वणी हरीच्या दासा ॥ २ ॥ ज्ञानदेव निधि पूर्ण माझें मन। मुक्ताईनें खूण सांगितली ॥३॥ सोपान बागडा सवे सौंगडा । नित्य तो पवाडा विठोबाचा ॥ ४ ॥

७

पंढरीचें सुख पाहतां एक घडी । वास कल्प कोडी वैकुंठीचा ॥ १ ॥ आणिता अनुमाना नपवे सम सरी । न वर्णवे थोरी ब्रम्हादिका ॥ २ ॥ तें सुख सुरवरां स्वप्नीं नाहीं दृष्टीं। तें हें वाळवंटीं आम्हां तुम्हां ॥ ३ ॥ सोपान डिंगर अनन्य नाचत । भावें ओंवाळीत हरीच्या दासा ॥ ४ ॥

८

हरीविण नाहीं वेदादिक कर्म । श्रुति त्या संपूर्ण नागा घरीं ॥ १ ॥ हरी हेचि सर्व उपनिषद भाव । रोहिणीचे माव जन दिसे ॥ २ ॥ सर्वांविटीं राम जीव शिव शम । सर्व रूप ब्रम्ह भरलें सदा ॥ ३ ॥ सोपान निकट परब्रम्ह सेवी । सर्व हर गोसावी विठ्ठल देव ॥ ४ ॥

९

अर्ध मात्रा ब्रह्म संयोगनि एक । उन्मनि निःशंक सर्वाठाईं ॥ १ ॥ पाहतां निजरुप ब्रह्म सर्वत्र दिसे । ज्ञानाचेंही पिसे अलिकडे ॥ २ ॥ सोपानदेव म्हणे बोल ओळखिजे । निरंजनी सहज चहुकडे ॥ ३ ॥

# ॥ चांगदेव ॥

६

सोहं साकार सर्व निरंतर । जननीले कैंची येरझार॥१॥ नेणों नेणों आम्हीं कांहींच नेणों । जाणितले तरी यासि काय म्हणों ॥ २ ॥ वटेश्वर म्हणे सोपान राउळ । बुझालासी तरसी उंची केवळ ॥ ३ ॥

७

शून्य तें मूळीं शून्य तें डोळीं । विस्तारिला वृक्ष गेलिया डाळी ॥ १ ॥ साउलिये बैसा साउलिये बैसा । साउलिये बैसा उन्मणी ॥ २ ॥ वटेश्वर चांगा साउली बैसला । आत्मा संतोषला आनंद थोर ॥ ३ ॥

८

वऱ्हाड आलें संसार नगरा । चांगा हा नवरा कवळला ॥ १ ॥ बधोनि कांकण बैसविला पाटीं । हळदुली वाटी मुक्ताबाई ॥ २ ॥ बांधोनियां कांकण उभा वीटेवरी । शांति हे नवरी पर्णाविया ॥ ३ ॥ सूटलें कांकण पर्णिली नवरी । चगा वटेश्वरी उजवला ॥ ४ ॥

९ ॥ घुसळण ॥

डेरा मांडिला आधारीं । ब्रम्हरस ओतिला भीतरीं । अर्ध्व उर्ध्वे मांजरीं मनीपुरी । ज्ञानतत्व रवी आहे भीतरीं॥१॥ मलपत घुसळी ते गवळणी । तिचा पल्लव रुळतो मेदिनी॥धृ० रवी शेषी धरूनी बारडी । मंथन पहा मांडिलें परवडी । निजतत्व सार हे निवडी । नवनीत घेतसे हे गोडी ॥ मल० ॥ २ ॥ येरा माया अवघे तजीलें । नवनीत मजची फावलें । वटेश्वरी चांगया लाधलें । मन गोविंदें रंगलें ॥ मल० ॥३॥

१०

प्राणीया होतासि गर्भवासी । नव मास मातेचिया कुसी । एवढीया संकटासी । आहारासी कोणें पूरविलें विचारीपा॥१॥

मना न करी कांहीं चिंता । अणु न धरीरे सर्वथा । शीरावरी आहे दाता । तो सर्वथा नुपेक्षी ॥ २ ॥ पाठीं जन्मा तूं रे आलासी । तें काय होतें तुजपाशीं । पान्हा लोटला मातेसी । तुझिया आहारा लागोनि ॥ ३ ॥ पाहेपा कीटकी कोमल्या भीतरीं । असे अंतरीक्ष तरुवरी । तें आहारालागोनि काय करी । हें अंतरीं विचारीपा ॥ ४ ॥ सर्प पिल्लीं सांडुनि गेला । तयासि आहार कोणें पूरविला । सकळां पोषितो एकला । हें निर्धारें जाणपा ॥ ५ ॥ पंचानना क्षुधा भारी । नित्य गरुड पडे आहारीं । तो आहारालागीं काय करी । हें अंतरीं विचारीपा ॥६॥ चारी वाणी चारी खाणी। लक्ष चौऱ्यांयसी जीव योनी । चराचरींची वनीं । करी निर्धारु भगवंतु ॥ ७ ॥ म्हणोनि सांडी अहंकार । आम्हांलागीं नलगे चिंत तुर । चांगा म्हणे वटेश्वर । निरंतर ध्याईन ॥ ८ ॥

१०

विचारु गेलिया विचारातें । तंव विचारु देखिला जेथिचा तेथें ॥ १ ॥ मन हरपलें सोहं चांगई । विवंचना करूं नये वा कांहीं ॥ २ ॥ वटेश्वराचा विनवितो चांगा । यावें गर्भवासा पैं गा ॥३॥

११

वळेना वर्षे वरवर पूर आला । तेथें जन बुडाला बाईयानो ॥ १ ॥ बुडाला बुडाला परी म्हणताती । बुडाल्याची वुद्धी कोणी न वेती ॥ २ ॥ ऐल उडाला पैल उडाला । कोरड्याच डोहीं जन बुडाला ॥ ३ ॥ ज्ञानदेव सांगडी मुक्ताबाई तारूं । चांगा पैलपारू पाववीला ॥ ४ ॥

१२

वासनेच्या संगे नको लागूं मना । पहा त्या रावणा काय झालें ॥ १ ॥ इंद्रा पडलें भग चंद्र झाला काळा । नारद चुकला चाळा गर्भवासी ॥ २ ॥ मोहनीच्या संगें भस्मासुर मेला । वाळेसि मारिला रामबाणे ॥ ३ ॥ चांगदेव म्हणे आणिक चाड नाहीं । लक्ष ठेवा पायीं सद्गुरूच्या ॥ ४ ॥

# ॥ बोधला, मुधोपंत, जोगापरमानंद, हैबती, मालोपंत ॥

## ॥ बोधला ॥

### ॥ भुपाळी ॥ १

उठाहो रखमाबाई सावध करा गोपाळा । फुटली पहाट झाली पक्ष्यांची वेळा ॥ धृ० ॥ नारद तुंबर दोघे द्वारीं गायन करिती । छपन कोटी यादव नित्य दर्शना येती ॥ १ ॥ संत सनकादिक आली ऋषी मंडळी । स्वर्गीचें सुरवर इच्छिताती रजधुळी ॥ २ ॥ बोधला म्हणे ठेवा मस्तकीं हात । जन्मोजन्मीं उभा द्वारीं मी गुण गात ॥ ३ ॥

२

भीमा भरली दोहीं थडी । चला टाकूं मध्यें उडी ॥१॥ बांधा नामाच्या सांगडीं । तेणें उतरूं पैल थडी ॥ २ ॥ बोधला म्हणे सत्य जाणा । तारूं पंढरीचा राणा ॥ ३ ॥

## ॥ मुधोपंत ॥

१

सद्गुरु वासुदेवा काय वर्णूं बा तुज । स्वर्ग मृत्यु पाताळ या वेगळें बा गुज । सप्तही सागराची चूळ भरी बाळा सहज ॥ धृ० ॥ हरिहर ब्रम्हादिका बा सोई लाविलें । राम कृष्ण अवतार गुरु शरण गेलें । अठ्यांयशी सहस्र ऋषी गुरु वंदिते झाले । राजेंद्र महासुर जयवंत केले ॥ १ ॥ वासुदेव मिषे बा संत घालिती विरटी । संचीत थोर त्याचें आले वासुदेव भेटी । तनुमन भक्तिभाव चरणीं घालिती मिठी । वासुदेव आलिंगोनी जेणें धरियेले कटीं ॥ २ ॥ उत्तम नरदेह

संचित लाधलें । जाणीव ओळखोनि कैसे नेणतें झाले । पापाचें भय नाहीं कर्म करूं लागले । आपणासि आपण हो कैसे पातकि झाले ॥ ३ ॥ प्रपंचीं जन हे गा गुंतले आवडी । अमंगळ मक्षिका गुंतल्या परवडी । तैशी या विषयाची जना लागली गोडी । अंतकाळ मांडला बा वेडावती बापुडी ॥४॥ मानव देह माझा कैसेनि होय जतन । शरीरें मैदावे हे तंव लागळे पूर्ण । आतां मी करु काई मांडलें निर्वाण । शेखमहमद बळी आला मुधा शरण ॥ ५ ॥

## ॥ जोगा परमानंद ॥

१

उठोनि प्रातःकाळीं येती कृष्णाजवळी । पाहती नेत्रकमळीं कृष्णमुख ॥ १ ॥ धन्य दिवस झाला श्रीकृष्ण भेटला । गोकुळीं उगवला बाळरूप ॥ २ ॥ दृष्टीचेंनि सुखें सुखाचि कोंदाटे । अंतरीं प्रगटे तरि काय उणें ॥ ३ ॥ जोगा म्हणे तेणें परमानंदे काज । गोकुळिं निज प्रगटलें ॥ ४ ॥

२

कृष्णाचेनि रुपें डोंगर झाले निळे । गोपाळ सांवळे दिसताती ॥ १ ॥ आनंदें मयूर करिताती किंकर । देखोनि सुंदर चक्रपाणि ॥ २ ॥ रुपोनिया रोक धरी या गोधनीं । कैवल्याचा दानी पाहताती ॥ ३ ॥ जोगयाचा स्वामी कृष्ण रूप देखोनि । श्वापदा लोचनीं प्रेम वाहे ॥ ४ ॥

३

सहाचे संगतीं चौथे अनुवादती । परी एकाचीये मती न कळे देखा ॥ १ ॥ तो गौळियाचे घरीं रांगणा वै झाला । बाल्हा दुल्हा म्हणोनि दाम देती ॥ २ ॥ सत्य लोकीं ब्रह्मा

कैलासीं शंकर । ध्याती मनोहर हरी देखा ॥ ३ ॥ जोगयाचा स्वामी नंदाचा खिल्लारी । हा बोल निरंतरी वाढिनला ॥ ४ ॥

## ॥ हैवती ॥

१

काया पंढरपुर शुद्ध सत्रावी भीमा वाहती । औटपीठावर वीट नीट विठ्ठल उभे संत पाहती ॥ धृ० ॥ त्रिकूट हे स्थूल लाल श्रीहाट शाम श्वेत वर्ण । कारण तें गोल्हाट शोभे प्रणवसहित चरण । नीळा औटपीठ महाकारण त्यावर दृष्टी कीर्ण । पाहे भ्रमर गुंफेचें ज्ञान सुंदर समचरण । अर्धनारी नटेश्वर बनुनी वेद वाणी वाहती ॥ १ ॥ विवेक आणि वैराग्य गरुड मारुती सेवाधारी । भाव पुंडलीक अनुतापें आत्मा नारद ब्रह्मचारी । अहं सोहं नामाचा जप होतो संता द्वारीं । ज्ञान लोट गंगेचा ती पद्मावती अवधारी । तेथें स्नानसंध्या करितां महापापें जाती ॥ २ ॥ चौं देहांवर नांदे आत्मा विठ्ठल जाणावा । तूर्या ती उन्मनी रुक्मिणी चिद्‌शक्ती माया । दश इंद्रियें मनासहित त्या एक्या ठाया । सहस्रदळीं तीं रती देखिली अद्भुत काया । अनुहात ध्वनी ऐकुनि प्राणी लुब्ध होउनि राहती ॥ ३ ॥ आत्मा हा विठ्ठल ओळखून मग पंढरीला जावें । त्यासी एक कारण सद्गुरु चरणीं लागावें । आत्मा हा विठ्ठल ओळखून देहीं ब्रह्म व्हावें । पंच तत्व एकत्र करुनि हरी चरणीं लागावें । म्हणे हैवती नाथ कृपेवीण कलम न ये हातीं ॥ ४ ॥

## ॥ मालोपंत ॥

१

अंगुळाचा भार वाहूं शके माशी । आकोडा आकाशीं लाविजेल ॥ १ ॥ कांतिणीचें तंतीं ओविजेल धरा । समुद्रज हे घरा आणिजेल ॥ २ सिद्धीचें गारुड खेळेल फार । स्वर्गी वारोवार जाइजेल ॥ ३ ॥ हटें तटें काळ करवेल अंकित । जिवेंवीण जीव राहिजेल ॥ ४ ॥ मालो म्हणे देहीं करवेल उपाय । संत संग पाहे दुर्लभ तो ॥ ४ ॥

२

पतितपावन नाम ऐकोनि आलों मी द्वारा । पतितपावन नव्हेसि म्हणुनि जातो माघारा ॥ १ ॥ द्यावें तैसें घ्यावें ऐसा आहेसी उदार । काय धरोनि देवा तुझें कृपणाचें द्वार ॥२॥ ब्रीद सांडिसी देवा ऐसा नव्हेसि अभिमानी । पतितपावन नाम तुझें ठेविलें कोणी ॥ ३ ॥ झेंगट घेउनि हातिं दवंडी पिटी तिहीं लोकीं । पतितपावन नाम परंतु मोठा घातकी ॥ ४ ॥ मालो म्हणे देवा तुझे नलगे मज कांहीं । प्रेम असोंदे देहीं म्हणुनि लागतसे पाईं ॥ ५ ॥

३

हरी जैसें ठेवी । जे काळीं जे ठायीं ॥ १ ॥ कोणे एक वेळे छत्रही छाई । कोणे एक वेळे चालती पायीं ॥ २ ॥ कोणे एक वेळे भोग विलास । कोणे एक वेळे अरण्यवास ॥ ३ ॥ कोणे एक वेळे संपत्ति साजिरी । कोणे एक वेळे झालेत भिकारी ॥ ४ ॥ कोणे एक वेळे मिष्टान्न भोजन । कोणे एक वेळे भाजीचें पान ॥ ५ ॥ कोणे एक वेळे सुमन सेजे । नरहरी मालो भूमीवर निजे ॥ ६ ॥

# ॥ मध्वमुनिश्वर ॥

## ॥ रामजन्माचा अभंग ॥

१

पाहुं चला सावळा राम डोळा । समारंभें वोलती बारा सोळा । रत्न ताटीं आरत्या दीपमाळा । वेवोनि बुंथी चालती चमकत बाळा ॥ १ ॥ कृष्णा वेण्णा चंद्रभागा भीमरथी । ताम्रपर्णी नर्मदा सरस्वती । गंगा यमुना शरयू भोगावती । ह्या हेलकरणी सुगंध पाणी वाहताती ॥ २ ॥ रामजन्म ऐकोनी रावण कष्टी । ब्रह्मानंदें कोंदली अवघी सृष्टी । देव विमानीं करिताती पुष्पवृष्टी । मध्वनाथा पाहिले कृपादृष्टी ॥ ३ ॥

## ॥ अभंग ॥

२

व्याघ्राचे जाळींत बांधोनिया गाय । पाहतोसि काय कृपावंता ॥ १ ॥ लांडग्यासि तान्हें वासरूं निरविलें । पारणें करविलें त्याचें हातीं ॥ २ ॥ हिंसकासि शेळी पोसणी त्वां दिली । त्यानें पुरतीं केली गती तीची ॥ ३ ॥ जीवना वेगळा तळमळी मीन । बगळ्या आधीन केला जैसा ॥ ४ ॥ माजराच्या पुढें टाकोनि मूषक । पाहसी कौतुक दुरोनिया ॥ ५ ॥ पहिल्यापासून तुझा स्वभाव निश्चळ । पर दुःख शीतळ कृपावंता ॥ ६ ॥ मध्वनाथ म्हणे न कळे तुझी माव । येउन खाती लांव लेंकुरासि ॥ ७ ॥

३

किती पाहसी माझा अंत । ह्मणविसी कृपावंत ॥ १ ॥ पांडुरंगे माझे माये । तुझे दाखविगे पाय ॥ २ ॥ कांहीं घालीना संकट । तुझें नामगे वैकुंठ ॥ ३ ॥ कृपादृष्टीनें पाहतां । कांहीं वेंचेना आतां ॥ ४ ॥ माझ्या पुर्वजाच्या स्थळीं । ठेवी

गुण निज निवळी ॥ ६ ॥ मध्वनाथ म्हणे हरी । न घालि पंढरी बोहरी ॥ ७ ॥

॥ गवळण ॥

४

अरे कृष्णा सांवळया, तारु पीसी बावळया । वेडेचार करिशी, कां रे इकडे धांवल्या ॥१॥ आम्हीं पोरी वरवंटा । कां धरसी आमचा पखाटा । सासु घेउनि तोंड फोडील, हातीं घेउनि वरवंटा ॥ २ ॥ आंत बाहेर हें विखार, कां दिससी त्रित बरवा रे । गोऱ्या भुरक्या पोरीभोंवता, भोंदु भेटलासी बरवा रे ॥ ३ ॥ बोले खजुर खारका, आह्मांसी ह्मणसी पारखा । मध्वमुनिश्वर ह्मणे, सेविजे वर नंदा सारखा ॥ ४ ॥

॥ पदें ॥

५

माझे अचडे बचडे छकडे ॥ धृ० ॥ विकसीत पंकज लोचन जयाचें, जननी ह्मणे हें चिपडे ॥ १ ॥ ब्रह्मा आदि वंदी पाय जयाचे, त्याला पांघरवी कुचुडे ॥ २ ॥ आंगणीं खेळे मंजुळ बोले, त्यासी ह्मणें सोन्याचें ठिकडे ॥ ३ ॥ मध्वमुनिश्वर खेळवी अंकीं, ब्रह्मसनातन उघडे ॥ ४ ॥

६

लोभ हरिचा लटका गे बाई, लाऊन गेला चटका ॥धृ०॥ निष्ठुर निर्दय कपटी मोठा, बोलुनि शब्द लटका गे ॥ १ ॥ गंगा तीरीं जाऊन रहावें, सेवोनि पंचवटिका गे ॥ २ ॥ ऐसें मजला कळतें तरी मी, धरीते त्याचा पटका गे ॥ ३ ॥ मुख्य दासी केली विलासी, ऐसे त्याला हटका गे ॥ ४ ॥ कुब्जे पासून आतां याची, कैसी होईल सुटका गे ॥ ५ ॥ उद्धव ह्मणा घेवोनि आला, कागदाचा कुटका गे ॥ ६ ॥ मथुरे

मध्यें मानीत होते, कंसाचिया कटका गे ॥ ७ ॥ मध्वमुनि-श्वर स्वामी रमापती, तोडोनि गेला तटका गे ॥ ८ ॥

७

शुक सनकादिक महिमा ज्याचा वर्णिती वेद पुराणीं रे । तो हरी गोकुळि गोवळा गाई चारी चक्रपाणी रे । तो या पांडवा घरीं हरी सारथी पाजि तुरंगा पाणी रे । तो हा सद्गुरु ज्ञानेश्वर धनि स्मरणीं तारी प्राणी रे ॥ धृ० ॥ जेणें केली भगवद्गीतेवरती केली टीका रे । सोदर परिसिती त्यासि होती संसाराहून सुटका रे । प्राकृत भाषा रुचिकर रुचली करुनि सुधारस टिका रे । भक्ती ज्ञान विरक्तिचा तो पोषितो रस निका रे ॥ १ ॥ दगडाची जे भिंती जयानें चालविली जड-माती रे । पैठणिं केली वेदपरिक्षा वेड्या रेड्या हाती रे । सुवर्णाचा पिंपळ ज्याचे द्वारीं वैष्णव पाहती रे । अजान-वृक्षाखालीं शांभव आसन घालुनि राहती रे ॥ २ ॥ मुक्तपु-रीहुनि श्रेष्ठ पुरातन पाहता क्षेत्र आळंदी रे । इंद्रायणीचें जळ जो सेवी इंद्रपदातें निंदी रे । जेथें दैवत सिद्धेश्वर हा सन्मुख शोभे नंदी रे । कार्तिक मासी पंढरपुरपती समाधि ज्याची वंदी रे ॥ ३ ॥ ज्ञानेश्वर या नामाचा जो जप करि अनुदिनीं वाचे रे । त्याचे हृदयीं नारायण तो लक्षुमी घेउनि नाचे रे । ज्याची टीका पडता श्रवणीं भव भय पर्वत काचे रे । अगणित गुण गण मध्वमुनिश्वर वर्णीतो निज वाचे रे ॥ ४ ॥

८

मनमोहन यादवरायारे ॥ मन० ॥ धृ० ॥ वामन होउनि दान तूं मागसी । ल्हान मानवी काया रे ॥ १ ॥ दंड कमं-डलु मंडितसे तनु । पूजितसे नृप जाया रे ॥ २ ॥ यमुना जळामाजी खेळ तूं खेळसी । चेटकी नाटकी माया रे ॥ ३ ॥ कीर्ति सदोदित मध्वमुनिश्वर । मागतसे गुण गाया ॥ ४ ॥

९

वाटती हरीची खंतीं ॥ ध्रु० ॥ चालगे चतुरे जाऊं गे मथुरे, वारोनि घरची गुंती ॥ १ ॥ वीझ पडो या लाजेवरती, कशास व्हावी गुंथी ॥ २ ॥ मध्वमुनिश्वर वर दे परात्पर, ऐसे दैवत चित्तीं ॥ ३ ॥

१०

तो नर गति चुकला, स्वानंदातें मुकला ॥ ध्रु० ॥ सद्गुरु वरदा वाणी । नाहीं नाहीं ज्याचें श्रवणीं ॥ १ ॥ शास्त्रें पढुनि वक्ता । बोलत फार अनुभव नसतां ॥ २ ॥ धर्मवासना कांहीं । ज्याचे मनासि् तीळभरी नाहीं ॥ ३ ॥ संतसंग हरि भक्ति । क्षणभरि नये मनांत विरक्ती ॥ ४ ॥ मध्वनाथ म्हणे भाव । सद्गुरुवांचुनि कैंचा देव ॥ ५ ॥

११

संतसंगें अंतरंगें नाम बोलावें । कीर्तनरंगीं देवासंनिध सुखें डोलावें ॥ ध्रु० ॥ सगुण चरित्रें परम पवित्रें सादर परिसावीं। निरभिमानें संतवृंदें आधीं वंदावीं ॥ १ ॥ भक्तिज्ञानाविरहित गोष्टी इतर न कराव्या । मनोभावे वैराग्याच्या युक्ति विवराव्या ॥ २ ॥ श्रवणें मननें नाम घोषें वाजवि करताळी । मध्वनाथ जीवन्मुक्त होय तत्काळीं ॥ ३ ॥

१२

याचे हातीचा वेणु कोणी घ्या गे ॥ ध्रु० ॥ गृहीं आपुल्या मी करीत होते धंदा । वेणु वाजविला नंदाचिया नंदा । तल्लीन झाले या मुरलीच्या नादा ॥१॥ याचा नवलाव सांगू मी कांई । चित्तवृत्ति वेधिली यानें बाई । संसृती ठाव उरला नाहीं ॥ २ ॥ गृहीं सासुरवास मला भारी । जावा नणंदा गांजिती परोपरीं । याच्या मुरलीनें ठकविल्या पोरी ॥ ३ ॥ तान्हें बाळक टाकुनि आले घरा । गृहीं सासू सासरा म्हा-

तारा । तेणें केला या जीविचा किं वारा ॥ ४ ॥ वेणु नोहे हें वीष मला वाटे । नाद ऐकूनि काम हृदयीं दाटे । मध्वनाथाचे मूर्ति हृदयीं भेटे ॥ ५ ॥

१३

मनमोहन वाजवि वेणू ॥ मन० ॥ धृ० ॥ कुंजवनीं ध्वनी ऐकुनि कानीं । मोहित झाल्या धेनूरे ॥ १ ॥ रंजविल्या व्रज सुंदरि सर्वहि । पार तयाचा नेणूरे ॥ २ ॥ कल्पद्रु मातळीं मध्वमुनेश्वर । वंदिपदां बुज रेणूरे ॥ ३ ॥

१४

गोविंदा रामा येरे, गोपाळा रामा येरे ॥ धृ० ॥ दुजन मारुनि अर्जुन सारथी होउनि धरिशी दोरे । तुरंग तेव्हां नाचति जेव्हां करिशी हो रे हो रे ॥ १ ॥ भक्तवत्सल म्हणविसी देवा शबरीचीं खाशी बोरें । गवळ्या घरीं वत्सें रक्षिसी भिळवुनि लहान पोरें ॥ २ ॥ अंबर्षिकार्यास्तव धरिशी दशावतार फेरे । जलचर वनचर रूप दाउनि उरले दर्शन देरे ॥ ३ ॥ दीनदयाळा वा परिपालक ऐसा असशील तूं रे । मध्वनाथ म्हणे तो चुकवी चौऱ्याशीयचे फेरे ॥४॥

१५

हरिकीर्तन ऐका । काय म्हणावें लोकां ॥ धृ० ॥ सगुण चरित्रें ऐकुनि साधु, गेले पर लोका ॥ १ ॥ व्यर्थ जना तुम्हीं कळिकाळाचा, मानितसा धोका ॥ २ ॥ मध्वनाथ भव सिंधु तराया, सांपडली नौका ॥ ३ ॥

१६

सद्गुरु माय बहिणी, माझे सासूचे विहिणी गे ॥ धृ० ॥ परिसा मंगळदायका, अभिनव एक काहाणी गे । कोठें नाहीं देखिली कोणीं, ऐसी हानी गे । तिहीं त्रिभुवनीं नाहीं तुज ऐशी शहाणी गे ॥ १ ॥ सद्गुरु कायापुरी देखिलें दोघें माउ

गे । दंडीं त्यांचे दाइत सोनियाचा डाउ गे । दळितां कांडितां त्याजवर ओंव्या गाऊं गे । टिपरी खेळ खेळतां पंढरीला जाऊं गे ॥ २ ॥ [illegible] विद्या विद्या म्हणती दोघींजणी जावा गे । धाकुटिसी नावडे वडील आपुला भाऊ गे । परस्परें आत्रोल्या चालविती दावा गे । जळो इचा स्वभाव बाई तुजही आहे ठावा गे ॥ ३ ॥ सद्गुरु वडील भाऊ म्हणविती उदास जोगी गे । धाकुटा देखिला तो कर्मफळें भोगी गे । कर्मफळें भोगितां झाला क्षयरोगी गे । याला कशा भाळतील राजकन्या चौघी गे ॥ ४ ॥ सद्गुरु जैसा नाच नाचवी तैसा मेळा नाचे गे । माझें माझें ह्मणतां घाव आंगीं लागे वेचे गे । वडिलांचें नांव कधीं येत नाहीं वाचे गे । आंगावरी ओझें पडतां आतां कैसा वांचे गे ॥ ५ ॥ वडिल भाऊ त्याचे कधीं वेईना हा नांव गे । याचा त्याचा सरकतीचा आहे एक गांव गे । त्याही गांवामध्यें बाई एक धरा ठाव गे । त्याही ठावामध्यें याचा पडतो उणा डाव गे ॥ ६ ॥ सद्गुरु वडिलांची समबुद्धि सांगो आतां कैशी गे । एका देतो गाई घोडे बैल आम्हां म्हैशी गे । संतति संपति सुंदर वनिता दासी गे । एक आपुल्या पोटासाठीं लोकां दांत वासी गे ॥७॥ सद्गुरुमहाद्वारीं गरुडपारीं घालूं ऐसा पार गे । पुंडलीकभाई माझा गौरविला फार गे । माझ्या गळयांत घालील बाई चीद्रत्नाचा हार गे । मध्वनाथ शरण आतां मागे चरणीं थार गे ॥ ८ ॥

१७

भज मन शंकर भोळानाथ ॥ धृ० ॥ एकहि लोटाभर जल चाही । चावल बेलकी पात ॥ १ ॥ अर्धांगीं गौरी जटामे गंगा । महिमा वर्णन जात ॥ २ ॥ बडे व्याघ्रांबर साहि विश्वंभर । त्रिशूल पेहरत हात ॥ ३ ॥ आंग भभूत स्मशानमें खेलत । मध्वमुनिश्वर साथ ॥ ४ ॥

# ॥ नरहरि सोनार ॥

३

नव्हे तें सगुण नव्हे तें निर्गुण । जाणती हे खुण तत्वज्ञानी ॥ १ ॥ आहे तें अंबर निःशब्द निराळ । अद्वय केवळ जैसें तैसें ॥ २ ॥ म्हणे नरहरि सोनार तें क्षर ना अक्षर । परेहुनि परात्पर ब्रम्ह जैसें ॥ ३ ॥

४

अनुहात ध्वनी करित निशिदिनीं । मन हें लुब्धुनी गेलें तया ॥ १ ॥ अखंड हे मनीं स्मरा चिंतामणी । हृदयीं हो ध्यानीं सर्वकाळ ॥ २ ॥ अखंड हे खेळे जपे सर्व काळीं । हृदयकमळीं आनंदला ॥ ३ ॥ प्रेम अखंडित निशिदिनीं ध्यात । नरहरीसी पंथ दाखविला ॥ ४ ॥

५

ऐरावती बहु थोर । त्याला अंकुशाचा मार ॥ १ ॥ व्याघ्र बहु भयंकर । त्याला सांपळा हो थोर ॥ २ ॥ सर्पविष हो विखार । मंत्रवल्ली केली थोर ॥ ३ ॥ देह जठराग्नी भारी । अन्नपाणी शांत करी ॥ ४ ॥ गुरु गैबीनाथ । नरहरी दास हा अंकित ॥ ५ ॥

६

काय तुझी थोरी वर्णूं मीं पामर । होसी दयाकर कृपानिधि ॥ १ ॥ तुजसरशी दया नाहीं आणिकासी । असे ऋषीकेशी नवल एक ॥ २ ॥ जन हो जोडा करा नाम कंठीं धरा । जाणें चुके फेरा गर्भवासीं ॥ ३ ॥ नरदेहीं साधन सद्गुरुमताभावभक्ती । निजध्यास नित्य संतसेवा ॥ ४ ॥ गुरुपदीं निश्चळ परब्रह्म पाहें । नरहरी राहें एकाचित्तें ॥ ५ ॥

७

काांहीं करीना उपाय । दिवसेंदिवस व्यर्थ जाय ॥ १ ॥ संसारीं नाहीं समाधान । न चुकती जन्ममरण ॥ २ ॥ शेण लोणी सोनें कांसें । एक मोलें विके कैसें ॥ ३ ॥ दुर्जनसंग त्यागावा । संतसंग तो धरावा ॥ ४ ॥ नरहरी जोडोनियां कर । उभा सेवे निरंतर ॥ ५ ॥

८

कृपा करीं पंढरिनाथा । दिनानाथा तूं समर्था ॥ १ ॥ अपराध करीं क्षमा । तुझा न कळे महिमा ॥२॥ करीं भक्ताचा सांभाळु । अनाथाचा तूं कृपाळु ॥ ३ ॥ आम्ही बहुत अन्यायी । क्षमा करीं विठाबाई ॥ ४ ॥ आलों पतित शरण । पावन करीं नारायण ॥ ५ ॥ पापी अमंगळ थोर । कृपा करीं दासावर ॥ ६ ॥ मी तरी अवगुणी बहुत । दया करीं पंढरिनाथ ॥ ७ ॥ दयासागरा अनंता । कृपा करीं पंढरिनाथा ॥ ८ ॥ तुझें नामामृत सार । नरहरी जपे निरंतर ॥ ९ ॥

९

कृपाळु समर्था सद्गुरु अनंता । गुरु कृपावंता दया करीं ॥ १ ॥ अनाथ अपराधी तारी हा भवाब्धीं । मृगजळ नदी तारीं देखा ॥ २ ॥ दीनाचा दयाळु भक्ताचा कनवाळु । करिता सांभाळु हरिभक्तांचा ॥ ३ ॥ हरिनाम उच्चारी देव कृपा करी । भक्तांचा कैवारी पांडुरंग ॥ ४ ॥ कृपाळु भगवंतें पुरविला हेत । मुखीं नामामृत नरहरी जपे ॥ ५ ॥

१०

चंद्रभागा तीर्थ पुरविला हेत । मनींचा मनोरथ अंतरीचा ॥ १ ॥ स्नान संध्या केली संध्यावळी झाली । गाई वळल्या केली गोपाळपुरी ॥ २ ॥ पांडुरंग न कळे आम्हां । नरहरी सप्रेमा सद्गदीत ॥ ३ ॥

११

चिताऱ्या चितरें काढी भिंतीवरी । तैसें जग सारें अवघें हें ॥ १ ॥ पोरें हो खेळती शेवटीं मोडीती ।टाकूनियां जाती आपुल्या घरा ॥ २ ॥ तैसे जन सारे करिती संसार । मोहगुणें फार खरें ह्मणती ॥ ३ ॥ कैसी जड माती चालविली युक्ती । नानापरी होती देह देवा ॥ ४ ॥ कांहीं साध्य करा साधुसंग धरा । नाम हें उच्चारा नरहरी ह्मणे ॥ ५ ॥

१२

चरणीं ठेवीलें पद्मतीर्थ झालें । गरुडपारीं केलें रामतीर्थ ॥ १ ॥ भागीरथीतीरीं राम धनुर्धारी । अहिल्या उद्धरी क्षणमात्रें ॥ २ ॥ पताकांचा भार नामाचा गजर । प्रेमाचा पाझर साधुसंतां ॥ ३ ॥ संतांचा हा दास नरहरी सेवेस । राही रात्रंदिवस नाम घेत ॥ ४ ॥

१३

जग हें अवघें सारें ब्रह्मरूप । सर्वांभूतीं एक पांडुरंग ॥ १ ॥ अणूरेणू पर्यंत ब्रह्म भरीयेलें । सर्वांघटीं राहिलें अखंडित ॥ २ ॥ विश्व हें व्यापीलें भरूनी उरलें । कवतुक दाविलें मायाजाळ ॥ ३ ॥ भ्रांति मायाजाळ काढतां तात्काळ । परब्रह्मीं खेळे अखंडित ॥ ४ ॥ अखंडित वस्तु हृदयीं बिंबली । गुरुकृपें पाहीं नरहरी ॥ ५ ॥

१४

देवा तुझा मी सोनार । तुझे नामाचा व्यवहार ॥ १ ॥ देह बागेसरी जाण । अंतरात्मा नाम सोनें ॥ २ ॥ त्रिगुणाची करुनी मूस । आंत ओतिला ब्रह्मरस ॥ ३ ॥ जीव शिव करुनी फुंकी । रात्रंदिवस ठोकाठोकी ॥ ४ ॥ विवेक हातवडा घेऊन । काम क्रोध केला चूर्ण ॥ ५ ॥ मनबुद्धीची कातरी । रामनाम सोनें चोरी ॥ ६ ॥ ज्ञान ताजवा घेउन हातीं । दोन्ही अक्षरें जोखिती ॥ ७ ॥ खांद्या

वाहोनी पोतडी । उतरला पैलथडी ॥ ८ ॥ नरहरि सोनार हरिचा दास । भजन करी रात्रंदिवस ॥ ९ ॥

१५

देह जन्मला व्यर्थ । झाले पापाचे पर्वत ॥ १ ॥ कांहीं नाहीं तीर्थ केलें । जन्मुनीयां व्यर्थ झालें ॥ २ ॥ दान धर्म नाहीं केला । देह मसणवटीं गेला ॥ ३ ॥ नरहरि सेवक सद्गुरुचा । दास हो साधु संतांचा ॥ ४ ॥

१६

देह जन्मला व्यर्थ । झाले पापाचे पर्वत ॥ १ ॥ दान धर्म नाहीं केला । शेवटीं जन्म व्यर्थ गेला ॥२॥ देह अवघा क्षणभंगुर । दिसे स्वप्नवत सार ॥ ३ ॥ नरहरि म्हणे शेवटीं । संगें न येई लंगोटी ॥ ४ ॥

१७

धन्य पुंडलीक भक्त निवडला । अक्षयीं राहिला चंद्रभागीं ॥ १ ॥ भक्त नामदेव अक्षयीं जडला । पायरी तो झाला महाद्वारीं ॥ २ ॥ तुकोबा तो भला देहासुद्धां गेला । वैकुठीं राहिला अक्षयी तो ॥ ३ ॥ ज्ञानोबा सोपान निवृत्ती हे भक्त । अक्षयीं राहत परब्रम्हीं ॥ ४ ॥ बोधराज भला वचनीं गोविला । कीर्तनीं राहिला पांडुरंग ॥ ५ ॥ साधुसंत फार येती थोर थोर । उभा निरंतर चोखामेळा ॥ ६ ॥ संत साधुजन वंदिती चरण । नरहरी निशिदिन सेवेलागीं ॥ ७ ॥

१८

सिक्का जयाचा आहे थोर । हातीं पताकांचा भार ॥१॥ भजन होय स्थळोस्थळीं । अवघी संत हे मंडळी ॥ २ ॥ वैकुंठींची खूण । रणखांब आहे जाण ॥ ३ ॥ खांबासी भेटती जन । शिळेवरी लोळे जाण ॥ ४ ॥ पापतापही जळाले । संतचरणीं नरहरि लोळे ॥ ५ ॥

१९

नाशिवंत देह मनाचा निश्चय । सद्गुरूचे पाय हृदयीं असो ॥ १ ॥ कलीमध्यें फार सद्गुरू हा थोर । नामाचा उच्चार मुखीं असो ॥ २ ॥ भजनाचा गजर नामाचा उच्चार । हृदयीं निरंतर नरहरीचे ॥ ३ ॥

२०

नाम हे नगरी वैकुंठ पंढरी । नांदतो श्रीहरी पांडुरंग ॥ १ ॥ नरदेहीं जन्मले पंढरीस गेले । दृष्टिभरि पाहिले पांडुरंग ॥ २ ॥ भींवरेचें स्नान देवाचें दर्शन । पाप हें जळोन जाय तेथें ॥ ३ ॥ चरणावरी माथा नरहरी ठेविला । हृदयीं बिंबला पांडुरंग ॥ ४ ॥

२१

कांहीं उपाय चालेना । कांहीं स्वहित घडेना ॥ १ ॥
कांहीं केलें नाहीं पुण्य । काय जन्मासी येऊन ॥ २ ॥
केली नाहीं कांहीं भक्ती । देहिं नाहीं हो विरक्ती ॥ ३ ॥
कांहिं केलें नाहीं तीर्थ । जन्म गेला अवघा व्यर्थ ॥ ४ ॥
व्यर्थ प्रपंच हा केला । अवघा शेवटीं वायां गेला ॥ ५ ॥
गुरुकृपा होय जरी । नरहरी क्षणांत उद्धरी ॥ ६ ॥

२२

पापाचे पर्वत मोठे मोठे झाले । शरीर नासलें अधोगती ॥ १ ॥ जन्मांतरीं केलें अवघें व्यर्थ गेलें । देह हो नासलें क्षणामाजीं ॥ २ ॥ जिणें अशाश्वत देह नाशिवंत । अवघें सारें व्यर्थ असे देखा ॥ ३ ॥ कांहीं नाहीं दान कांहीं नाहीं पुण्य । जन्मासी येऊन व्यर्थ जाय ॥ ४ ॥ परोपकार कांहीं नाहीं केला देवा । सद्गुरू केशवा हृदयीं ध्यावा ॥५॥ सारामध्यें सार नाम असे थोर । हृदयीं निरंतर नरहरिच्या ॥ ६ ॥

२३

पहा दिसतो पदार्थ । अवघा नाशिवंत व्यर्थ ॥ १ ॥ माया बहुरूपी नटली । नव खंडीं प्रगटली ॥ २ ॥ प्रपंच हें मायाजाळ । घातलें भ्रांतीचें पटळ ॥ ३ ॥ उमज प-डेना हो कांहीं । मस्तक सद्गुरूचें पायीं ॥ ४ ॥ सद्गुरु नाम हें अमृत । नरहरि जपे हृदयांत ॥ ५ ॥

२४

पंढरी नगरीं नांदतो श्रीहरी । गाई वळितो करीं गोपा-ळपुरीं ॥ १ ॥ गोपाळ मिळाले गोपाळपुर झालें । अक्षयीं राहिले देव तेथें ॥ २ ॥ संध्या जेथें केली संध्यावळी झाली । प्रतिमा ठेविली स्थळोस्थळीं ॥ ३ ॥ चरण ठेविले पद्मतीर्थ झालें । अक्षयीं राहिलें तेव्हां तेथें ॥ ४ ॥ वेणु वाजवीत चंद्रभागीं आले । वेणुनाथ झालें अखंडित ॥ ५ ॥ पंढरी हें स्थळ वैकुंठ सकळ । साधु हो निर्मळ आहे तेथें ॥ ६ ॥ कोटि लिंग आहे कोरटींत पाहें । पंचक्रोशीं राहे देव सर्व ॥ ७ ॥ व्रत एकादशी करिती नेमेसीं । पापी चंडाळांसी उद्धरती ॥ ८ ॥ पंढरी द्वारका भूमिका निर्मळ । साधु हो दयाळ आहे तेथें ॥ ९ ॥ राम लक्ष्मण सीता सती जाण । हवेलींत पूर्ण अक्षयीं तो ॥ १० ॥ अखंडित वाचा उच्चार नामाचा । सेवक संतांचा नरहरिदास ॥ ११ ॥

२५

पंढरपुरचा जाणा विठ्ठल हे धणी । राणी रुक्मिणी सत्यभामा ॥ १ ॥ भूमीमध्यें गुप्त कानोपात्रा झाली । उजवे बाजू ठेली लक्ष्मी ते ॥ २ ॥ पुढें हो प्रतीमा नाम-देव पायरी । उभा महाद्वारीं चोखामेळा ॥ ३ ॥ पुढें म-ल्लिकार्जुन महिमा असे फार । लिंग असे थोर महादेवाचें ॥ ४ ॥ पुढें भागीरथी मध्यें पुंडलीक । आणीकही तेथें वेणुनाद ॥ ५ ॥ आषाढी कार्तीकी साधुसंत येती । गो-पाळकाला करिती आनंदानें ॥ ६ ॥ देवाचे समोर नरहरि सोनार । हृदयीं निरंतर नांव घेतो ॥ ७ ॥

२६

पंढरी नगरीं दैवत श्रीहरी । जाती वारक... .. ..
आषाढी कार्तीकी महापर्वे थोर । भजनाचा गजर करिती
तेथें ॥ २ ॥ साधुसंत थोर पताकांचा भार । मुखीं तो उ-
च्चार नामामृत ॥ ३ ॥ आनंदाचा काला गोपाळकाला
केला । हृदयीं त्रिवला नरहरी ॥ ४ ॥

२७

प्रारब्धाची गती । कदाकाळीं न सोडिती ॥ १ ॥ हो-
णार सोडीना । आलें कपाळीं टळेना ॥ २ ॥ दैवयोगाची
गती । जी होणार ती होती ॥ ३॥ जें जें कर्माचें फळ।
ते तें भोगावें सकळ ॥ ४ ॥ ज्याचें बीज पेरीयेलें । त्याचें
त्यास फळ आलें ॥ ५ ॥ ज्याणें जैसें आचरीलें । तैसें
त्याच्या फळा आलें ॥ ६ ॥ मानवाचें कल्पना बळ । देव
करितो सकळ ॥ ७ ॥ किल्ली कैसी चालविली । घडमोडी
कैसी केली ॥ ८ ॥ सत्य सार बुडवीलें । अवघें असत्यची
झालें ॥ ९ ॥ नरहरि म्हणे नाम थोर । नाम साराहूनि
सार ॥ १० ॥

२८

प्रेम शांती दया शरण निर्धारेसी । बसले उदासी सर्व-
काळ ॥ १ ॥ काया वाचा मन निवडुनी प्राण । गुह्य ज्ञान
पूर्ण सर्व साक्षी ॥ २ ॥ सद्गुरूची कृपा होय जयावरी ।
तो हा श्रीहरीचा संत झाला ॥ ३ ॥ संत साधुजन वंदू-
नीयां पूर्ण । वाचे नारायण नाम घेतो ॥ ४ ॥ नरहरी
सोनार म्हणे हरिचा दास । भावें रात्रंदिवस नाम घेतो
॥ ५ ॥

२९

भोळा हा शंकर पुढें नंदीश्वर । तेथें मी पामर काय
वर्णू ॥ १ ॥ भूषण जयाचें भुवना वेगळें । रुंडमाळा खेळे
गळ्यामध्यें ॥ २ ॥ कर्पुरगौर भोळा सांब सदाशिव ।
भूषण धवल विभूतीचें ॥ ३ ॥ माथां जटाभार हातीं तो
त्रिशुळ । श्वेत शंख बळें फुंकीतसे ॥ ४ ॥ भांग जो सेवुनी
सदां नग्न वैसे । जटेंतूनि वाहे गंगाजळ ॥ ५ ॥ गोदडी

घालूनी स्मशानीं जो राहे । पंच वस्त्र होय श्रेष्ठ भाग ॥ ६ ॥ नाम घेतां ज्याचे पाप ताप जाती । पापी उद्धरती क्षणमात्रें ॥ ७ ॥ नरहरी सोनार भक्ति प्रियकर । पार्वती शंकर हृदयीं ध्यातों ॥ ८ ॥

३०

शरीराची होय माती । कोणी न येती सांगातीं ॥ १ ॥ सारीं अवघीं कार्मे खोटीं । अंतीं जाणें मसणवटीं ॥ २ ॥ गोत वरें टाकुन सारीं । शेवटीं गांवाचे बाहेरी ॥ ३ ॥ स्वजन आणि गणगोत । उपाय नाहीं हो चालत ॥ ४ ॥ ऐसें स्वप्नवत असार । नरहरी जोडीतसे कर ॥ ५ ॥

३१

सकळ धर्मांचें कारण । नामस्मरण हरिकीर्तन ॥ १ ॥ दया क्षमा समाधान । घ्यावें संतांचें दर्शन ॥ २ ॥ संतसंग धरा वेगीं । वृत्ति जडों पांडुरंगीं ॥ ३ ॥ नरतनु न येयाची बा कदां । भावें भजा संत पदा ॥ ४ ॥ भुलूं नका या संसारीं । हरी उच्चारीं उच्चारीं ॥ ५ ॥ सर्व जायाचें जायाचें । हरि नाम होंचि साचें ॥ ६ ॥ विठोबा रक्षिल शेवटीं । उभा कर दोन्ही कटीं ॥ ७ ॥ नरहरी जाणूनि शेवटीं । संत चरणा घाली मिठी ॥ ८ ॥

३२

सूर्य असे गगनीं । परी दीसतो जीवनीं ॥ १ ॥ मेघ असतो अंबरीं । पाणी पडे भूमीवरी ॥२॥ आकाशीं चंद्र तारांगण । बिंब दिसे पाण्यांतून ॥ ३ ॥ बिंब पाहतां दर्पणीं । बिंब दिसे हो त्यांतुनी ॥ ४ ॥ आत्मा अनुभवीं पाहतां । देह दिसे हो तत्वतां ॥ ५ ॥ गुरु कृपा होय पूर्ण । नरहरि लंपट निशिदिन ॥ ६ ॥

३३

नाम फुकाचें फुकाचें । देवा पंढरिरायाचें ॥ १ ॥ नाम अमृत हें सार । हृदयीं जपा निरंतर ॥ २ ॥ नाम मंतांचें माहेर । प्रेम सुखाचें आगर ॥ ३ ॥ नाम सर्वांमध्यें सार । नरहरी जपे निरंतर ॥ ४ ॥

# ॥ मुक्ताबाई ॥

९२

दु:खाचे शेवटीं सुख आले भेटी । भेटलीयां पाठीं तेंही गेलें ॥ १ ॥ सुख दु:ख दोन्ही नेणे तोचि योगी । तोचि एक जगीं पुण्यभरितु ॥ २ ॥ सुख तें कवण दु:ख तें कवण । दोहींचें आपण ज्ञानें कीजे ॥ ३ ॥ मुक्ताई ह्मणे चांगया आखंडित राहीं । सोहंभावें ध्याईं वटेश्वरा ॥ ४ ॥

९३

येथें परम सुखधाम जीवीं सरलें ध्यान । संगिया पळ मन पुढें केलें ॥ १ ॥ मग राउळीं आतुळीं वाडें चिदानंदाचें पाऊल पडे । तेथें धैर्यसिंधु सांपडे चिदानंद ॥ २ ॥ आतां सांभाळिलें स्वामी सामर्थ्यें आपुलें । किंवा गुह्य साधन केलें मननाचें ॥ ३ ॥ कामा निजध्यास आला स्वामीस दिला फार आश्रम । कीं जाणत्यापण जाण अजाण आम्हीं ॥ ४ ॥ म्हणे मुक्ताबाई सुखिया ऐसा जाहला । भेटीलागीं गेला अगम्याच्या ॥ ५ ॥

९४

रवी जळफळी तटवळे जैशीं आभासकंदाची दळें । टळटळीत सुतभाळे आरंगरूपें ॥ १ ॥ तेथें अनंत बळाची हातवटी सद्गुरु बांधियेली गांठी । सुकृत आपुलें तेंही निवटी ऐसें जाहलें ॥ २ ॥ विरक्तीयोगातें साधिलें दया तुमचे मनें बोधिलें । जाणो भाग्य आमुचें उरलें अति बापा ॥ ३ ॥ सोहं ब्रह्माची काठी करीं प्रळय जाळ निवळी सारी । तुमच्या वाचेसि दोरी बांधी वरती ॥ ४ ॥ ह्मणे मुक्ताबाई खचिला माजवट घातली पायें धाकुटा । वरी लागूं पाहती शाखा तुषाराच्या ॥ ५ ॥

९५

तेथें आवतापरी अनन्य कृपा कळीवरी । मग पहिली घालावी पायरी अगम्याची ॥ १ ॥ आतां जी तुम्ही अंजन पैल दाविलें निधान । तें गुह्य कीं अज्ञ म्हणों नये आतां ॥ २ ॥ तेव्हां वनांत राहिलें मनांत होतें पाहिलें । वरी वर्णन वहिलें काय करूं ॥ ३ ॥ दुजिया पायरीच्या पायावरी पाय ठेविला भक्ती ज्ञान धरी । पुढें स्थूळ गिरिवरी उडवूं जात ॥ ४ ॥ म्हणे मुक्ताबाई अग्रभागाचा दिवटा । नानूं पहुडला सुखवाटा येणें न्यायें ॥ ५ ॥

९६

जीवाचा हा शीव जाहला प्राणनाथ । हा विश्वाचा एकांत जाणावया ॥ १ ॥ मग शिवासि जीवाचें नाहीं पां स्मरण । तेथें जन्ममरण उरलें असें ॥ २ ॥ शिव माया तनु जाहली पां सवरी । केला उद्वेग आवरी पंचभूतें ॥ ३ ॥ मग आसनीचा विद्युल्लता जाय तया नाव क्षण । चुकलें स्मरण बळेंचि देई ॥ ४ ॥ गुरुपुत्रा लागिं सांपडला निवाडू । आत्मा गुह्य गूढू सोपा झाला ॥ ५ ॥ म्हणे मुक्ताबाई नारायण खूण । ज्याचें त्यानें मन आटोपिलें ॥ ६ ॥

९७

निवाताचे ठाई सद्गुरुकृपेचे छायीं । देहीचा विदेही सहज झालों ॥ १ ॥ कैवल्य सुखधाम देहीं झालें निकट । चढावया वाट सोपी झाली ॥ २ ॥ सद्गुरुसामर्थ्यें निजसुख आश्रम । सुनीळ भव्यरूप देखणें साम्य जाहलें ॥ ३ ॥ त्वां केलें निर्वाण सुईचें अग्रीं । दृष्टी त्याजवरी कांपूं लागे ॥ ४ ॥ तेथें देहशक्ती हरपली नवी ज्ञान शक्ती झाली । वरी विस्तारली श्रुति माया ॥ ५ ॥ म्हणे मुक्ताबाई जीव शिव आत्मा । समूळ पुसिल्या खुणा मागें सयाच्या ॥ ६ ॥

५८

कमळकंद चतुरानन आतुळी निजाचीं संकट साधन। सार स्वहिता मन गुंजावलें ॥ १ ॥ फळलीं आदित्याचीं चक्रें मावळलीया नानाविकारें। मग उरउरीत उरे निवळ तें ॥ २ ॥ कुंकुमाकार कुंडलनी दिसती बाई ठायीं। नेत्र संपुटीं संगम देहीं जडुनि गेली ॥ ३ ॥ स्वयें सुक्ताचें सारिलें आसन। निकटीं निवाड देखणें पुढें जाहलें ॥ ४ ॥ म्हणे मुक्ताबाई राहिला निपुण। साधनाची खूण निश्चळ आथी ॥ ५ ॥

५९

नामवळें देही असोनियां मुक्त। शांति क्षमा चित्त हरी-भजनीं ॥ १ ॥ दया धरावी ती सर्वाभूतीं करुणा। निरंतर वासना हरीरूपीं ॥ २ ॥ माधव मुकुंद हरिनाम चित्तीं। सर्वही पैं मुक्ती नामपाठ ॥ ३ ॥ मुक्ताईचें धन हरिनाम उच्चार। अवघाचि संसार मुक्त केला ॥ ४ ॥

६०

अवीट न विटे हरीचे हे गुण। सर्व सनातन ध्यातां रूप ॥ १ ॥ साध्य हें साधन हरि रूपें ध्यान। रामकृष्ण कीर्तन मुक्त आम्हीं ॥ २ ॥ असंगेंचि नटूं नटलों पैं साचे। नाहीं साऱ्या यमाचें भय आम्हां ॥ ३ ॥ मुक्तता पूर्णता मुक्ताई सा-धली। साधनें दीधली चांगयासी ॥ ४ ॥

६१

उणा पुरा कोठें सांगावया वाट। दिसतो प्रगट गुप्त कैसा ॥ १ ॥ गातो हा नाचतो ऐकाया बैसतो। व्याकरण करितो अनुभवासी ॥ २ ॥ जेवितां जेवितां पुरे पुरे ह्मणे। भरलें तें जाणें अनुभवासी ॥ ३ ॥ ह्मणे मुक्ताबाई ऐसें साक्षी व्हावें। तरीच रिघावें वैराग्य सी ॥ ४ ॥

६२

शनिताप सासरा बाईग मलाच गांजितो । अहंकार दीर बाईग मला शिव्या देतो ॥ १ ॥ उबगलें संसारा कोणी मज माहेरासी न्यांगे । तोडा एवढा पाश लागेन तुमच्या पाया गे ॥ २ ॥ कल्पना सासुबाई मलाच गांजिते । वासना नणंदुली बाईग मला शिव्या देते ॥ ३ ॥ क्रोध माझा दीर धाकटा भलतेंच बोलतो । काम माझा दादुला बाईगे भलतीकडे नेतो ॥ ४ ॥ त्रिगुणाचें लुगडें बाई मी उभेंच फाडीन । मीपणाचा मणी बाई मी तोडून टाकीन ॥ ५ ॥ माहेरासी नेईल त्याची मी सेवा करीन । म्हणे मुक्ताबाई ज्ञानेबानें सांगितली खूण ॥ ६ ॥

६३

धन्य धन्य सद्गुरुराव । माझे देहीं दाविला देव ॥ १ ॥ माझ्या देहाचें देउळ केलें । आत्मलिंग दाखविलें ॥ २ ॥ स्वानंदाचें जळ आणिलें । त्यांत देवाचें पूजन केलें ॥ ३ ॥ मन बेलपत्री केली । तुजलागीं समर्पिली ॥ ४ ॥ त्रिगुणांची वळून वाती । सत्रावीच्या लाविल्या ज्योती ॥ ५ ॥ पंच प्राणाची आरती । मुक्ताबाई ओंवाळिती ॥ ६ ॥

६४

सर्वीं सर्व सुख अहं तेंचि दुःख । मोह ममता विख त्यजियेलें ॥ १ ॥ साधक बाधक करूनि विवेक । भक्तिमार्ग तर्क शोधियेला ॥ २ ॥ सर्व तीर्थ हरी दुभाळु धेनुवा । बोळला कणवा चातकाचा ॥ ३ ॥ सूक्ष्म मार्ग त्याचा भक्त देहीं मायेचा । आकळावया सत्व धरी ॥ ४ ॥ देव जंव वाणि श्रुतितुपें काहाणी । ऐकों जाय कर्णीं तंव परता जाय ॥ ५ ॥ मुक्ताई सोहंभावें तन भरलें दिसे देवें । मूर्ता मूर्त सोहंवे हरीबोटीं ॥ ६ ॥

## ॥ उद्धवचिद्घन ॥

१

सज्जन या साठीं । अवतरले हे सृष्टीं ॥ ध्रु० ॥ न बोलणें बोलावें । न दिसे तेंचि दृष्टीं पहावें ॥ १ ॥ जगद्रूप जग माया । जैसे साधक जन समजाया ॥२॥ भेद ल्यामति नेला। उद्धवचिद्घन अक्षई केला ॥ ३ ॥

२

ज्याचे वंशीं कुळधर्म रामसेवा । त्याचे वंशीं मज जन्म दे गा देवा ॥ १ ॥ ज्याची वाणी रंगली रामनामीं । त्यासि मजसि संवाद घडो स्वामी ॥ २ ॥ वारंवार वीनंवी परीसावी । दया सिंधूची पूर्ण कृपा व्हावी ॥ ३ ॥ म्हणे उद्धवचिद्घन महाराजा । रामदासासि संग घडो माझा ॥ ४ ॥

३

चोरी चाल करुं गड्या हरी ॥ ध्रु० ॥ पाळतिलें वर गोरस पुष्कळ । सर्व मिळोनि हरुं ॥१॥ शिंक्यावरी दधिपात्रें तळीं भेदुनी । वदनीं धर धरुं ॥ २ ॥ उद्धवचिद्घन घेउनियां धणी । उरलें आंग भरुं ॥ ३ ॥

॥ सारवण ॥ ४

कर्म वर्णाश्रम वनीं । सत्व शोधुनि सद्गुरुवनीं ॥ १ ॥ गोये जीवन जीरविले । सबाह्य अंतरीं सारविलें ॥ २ ॥ सारविलें हे नांवें । सुरवीर भुतीता या नांवें ॥ ३ ॥ गळा माळ सुबाची । उद्धवचिद्घन वेधाची ॥ ४ ॥

॥ दोहन ॥ ५

गुह्यात्मता बुद्धी ते । चिन्मय गोरस सिद्धि ते ॥ १ ॥ दोहन कैसें अवधारा । अखंड खंडेना धारा ॥ २ ॥ प्रमाण प्राप्ती ते । देखोनि वत्स तृप्त ते ॥३॥ उद्धवचिद्घन आळविता गगन न पुरे सांठविता ॥ ४ ॥

## ॥ घारवणी ॥ ६

घारवणी हे अनुतापे । वैराग्या अगोवरी तापे ॥१॥ अनुभव गोरस साय ते । मग तैसें हरिखावे ते ॥ २ ॥ मध्यम आंळा निववोनि । सदैव शिक्या ठेऊंनि ॥ ३ ॥ उद्धवचिद्घन अव्यक्ती । भजनें विरजण दधि व्यक्ती ॥ ४ ॥

## ॥ दळण ॥ ७

मिश्र त्र्यैलोकेश्वर देवो । जातें झाडुनि नरदेहो ॥ १ ॥ दळिति गोपिका संसार । जाणुनि हरि अद्वय सार ॥ २ ॥ अनिश्चित निसिले इष्ट ते । घोळुनि भरलें पिष्ट ते ॥३॥ उद्धवचिद्घन सादाती । मंगळ वोवियां गाती ॥ ४ ॥

## ॥ कांडण ॥ ८

उखळ श्रवणाचें करुनि । मुसळ गुरुवचन धरुनि ॥ १ ॥ कांडुन सर्वं शास्त्राच्या साळी । असार कोंडा वर साळी ॥ ॥ २ ॥ अनुभव तांदुळ निवडीले । मनसूपीं पाखडिले ॥३॥ चिद्घन साक्षात्काराचें । उद्धव विधि अविकाराचें ॥ ४ ॥

## ॥ झाडण ॥ ९

आह्मीं ते दशाच्या राशी । निवडून अवघ्या केरासी॥१॥ विरक्त केरसुणीच्या ते । झाडुनी चौदा हातें ॥ २ ॥ पाटी भरूनिया वृत्ती । टाकुनियां तदावृत्ती ॥ ३ ॥ उद्धवचिद्घन संयोगें । निर्मळ हातां योगे ॥ ४ ॥

## १०

गुरुनें लिखदिया लिखदिया । अजरामर पद पाया ॥ध्रु०॥ त्रिकट हमारी जागा । अनुहात डंका वाजत बाजा ॥ १ ॥ त्रिकूट शिखरपर जाना । चैतन्यपूरका ठाणा लेना ॥ २ ॥ चौदा भुवन जीवें । एकवीसस्वर्गा उपर सोये ॥३॥ अजब समान किल्ली । दसवे दरवाजेकी खिडकी खुली ॥ ४ ॥ उन्मन प्रकाश बुझे । उद्धवचिद्घन अजित सहजें ॥ ५ ॥

११

येडाईचे यरमाळ तेथें होती राधाबाई । माझ्या पंढरी नाथें कैशी केली नवाई ॥ १ ॥ बरवीं संत चरित्रें हो । पावन परम पवित्रें हो ॥ धृ० ॥ सासू जाची राधाईसी जिगजिग करीत फार । मूल नेणतें टाकुन राधा पावे पंढरपुर ॥ २ ॥ राधाईचें स्वरूप धरिता झाला आत्माराम । घरीं जाउनि ऐकतसे तो सासुबाइचें काम ॥ ३ ॥ सासु म्हणे पोर आतां बरी काम करिती । राधाईचें मूल वेडानि पाजीतो श्रीपती ॥ ४ ॥ भक्तीसाठीं देव राधाईची धरित काया । तिच्या भ्रतारापाशीं नित्य जाय निजाया ॥ ५ ॥ शेजेवर त्या गुणगुण गोष्टी सांगतसे श्रीहरी । राधाईच्या भ्रताराचे आपण चरण चुरी ॥ ६ ॥ पुढती यात्रेसवें राधा आली आपुल्या गांवा । पुढें वृत्तांत कैसा झाला श्रोतेहो परिसावा ॥ ७ ॥ चुलीपुढें रांधण करित होति राधाबाई । तव हे राधा येउनि सासूचरणिं ठेविली डोई ॥ ८ ॥ अन्यायी अन्यायी सनाथ करा सासुबाई । येरी म्हणे वेडे पोरी कांहींच अन्याय नाहीं ॥ ९ ॥ चुलीपुढें राधा गुप्त झाली ऐकोनि शब्दा । तंव हे राधा म्हणे तुम्ही ऐका माझ्या शब्दा ॥ १० ॥ वृत्तांत सांगे सून गेलें होतें पंढरपुरा । बारा रोज झाले कैसें वांचविले या पुत्रा ॥ ११ ॥ कैचें पंढरपुर वेडे होतिस अपुले घरीं । तंव ते सांगूं आले पंढरपूरचे वारकरी ॥ १२ ॥ ही मूल आली आमच्या सवें केला देव देव । भावें यात्रा केली पाहुनि आलों पंढरीराव ॥ १३ ॥ धन्य राधा म्हणोनि सासु लागतसे चरणीं । तुझ्या प्रसादें येथें आला होता चक्रपाणी ॥ १४ ॥ अपार ऐसें संत वर्णितां संशय अवघा जातो । आठवलें तें भावें ऐका उद्धवचिद्‌घन गातो ॥ १५ ॥

१२

द्वादशीचे दिवशीं प्रातःकाळीं चोखामेळा । म्हणे उठेगे स्त्रिये वेगीं करीं भोजनाला ॥ १ ॥ बरवीं संत चरित्रें हो पावन परम पवित्रें हो ॥ धृ० ॥ जल्दी करीगे स्त्रिये वेगीं आटप स्वयंपाकासी । आतां येईल विठ्ठल माझा येथ पारण्यासी ॥ २ ॥ दिसे लागीं प्रातःकाळीं आला एक सत्ताधारी ब्राह्मण । त्यानें जाउनी राजद्वारीं सांगितलें गाऱ्हाणें ॥ ३ ॥ ब्राम्हणाचा देव पाहे बाटविला महारानें। पाठविले राजदूत पावले चोखाजीचें सदन ॥ ४ ॥ चक्रधारी भोजन करी दूत उभे दारीं । धक्काबुक्की करुनि चोखा आणिला राजद्वारीं ॥ ५ ॥ बैल जुंपिलें औताप्रमाणें चरणिं लाविला दोर । हाका बैल म्हणति चुरोनि टाका ह्याचें शीर ॥ ६ ॥ अवश्य म्हणोनी सेवक हाकों पाहती तंव बैलासी । कांहीं केल्या बैल न चले पुढें उभा ऋषीकेशी ॥ ७ ॥ महारिण आली धाउन तेथें म्हणे पंढरिनाथातें । * * *

॥ ८ ॥ खादलास जेवलास त्याचा फेडिलास उपकार । कैसा मारूं पाहसि दुर्बळ महारणीचा भ्रतार ॥ ९ ॥ कायगे रांडे चेटुक केलें म्हणती महारिणिसी । येरी म्हणे स्वामी कांहींच न कळे आम्हांसी ॥ १० ॥ माझेपुढें जो तुकडे खाये तो बैलापुढें उभा आहे । तुम्ही मारितां बैल तेथें चालतील काय ॥ ११ ॥ कैसा देव तुझा दावी म्हणती महारिणीसी । भक्तासाठीं प्रगट झाला तेथें ऋषीकेशी ॥१२॥ तेज दाविलें लपविलें सोडवीला चोखामेळा । भक्त काज करुनि विठो राउळासि गेला ॥ ३ ॥ अपार ऐसे संत वर्णितां संशय अवघा जातो । आटवलें तें भावें ऐका उद्धवचिद्घन गातो ॥ १४ ॥

## ॥ सुरदास ॥

१७

साचो कलजुग आयो, अब तो साचो कलजुग आयो। पुत्र पिताको कह्या न मान्यो, करे अपने मन भायो ॥धृ०॥ स्त्री पातिव्रत्य धर्म ना पाळ्यो, निरखत पुरुष परायो। सन्यासी धन सांचन लागे, हरी सुमरण विसरायो ॥ १ ॥ राजा कपटी रयत दुःख पावे, ब्राह्मण बहोत भटकायो। वासु वरखा अलप होत है, सब जुग पापसे छायो ॥ २ ॥ ब्रीज विंद्रावन मथुरानगरी, कालंद्री नीर सुकायो। सुरदास प्रभु तुमारे भजनविना, मोहेकु क्यूं जीवायो ॥ ३ ॥

१८

कृष्ण केहतां शुं बेसे नाणुं, मुर्ख तने कृष्ण केहतां० ॥ ॥धृ०॥मिथ्या लेहेर मनगमती करे छे, तेमां नहीं ठाम ठेकाणुं ॥१॥ खातो ना होय तो मांदो कहिये, जोइए बशेरनुं भाणुं ॥२॥ दाम न बेसे ने हाड न भागे, गातां गोविंदजीनुं गाणुं ॥ ३ ॥ कहे सुरदास तमे हरिने भजी ल्यो, ओंचितु आवशे ओणुं ॥ ४ ॥

१९

आवत कुंवर कन्हया, वनथकी आवत कुंवर कन्हया ॥ ॥ धृ० ॥ मोर मुगुट मकराकृत कुंडल, मधुरीसी बेणु बजैया ॥ १ ॥ सभा मंडळमध्ये बिराजत, हरी हलदर दो भइया ॥ २ ॥ सुरदास प्रभु गौ गोवाल संग, नाचत थ-थ-थैया ॥ ३ ॥

२०

मंदीर देख डरे, सुदामजी मंदीर० ॥ धृ० ॥ पहेले द्वार गजराज बिराजत, दुसरे अश्व खडेरे। तिसरे द्वार वि-

श्वकर्मा बैठे, रतन जडाव जडेरे ॥ १ ॥ यहां तिमेरी राम मढैया, इतके भुप उतरेरे । सुरदास प्रभु आपणे जनके, दुःख दरिद्र हारेरे ॥ २ ॥

२१

नहीं कंसन घर जाये, कीसनजी॥धृ०॥उनके घरकी रसोइ न लिये, अपने हात पकाये ॥१॥ काज तिहारो दधी माखन सब, हम इह भोग लगाये ॥ २ ॥ तुमबिन हमकुं कोई नहीं पुछे, हम गरीब समजैये ॥ ३ ॥ सुरदास प्रभु येही वखत है, ब्रीजकी लाज निभैये ॥ ४ ॥

२२

राधे तोरे नयन नहीं के बान ॥ धृ० ॥ शशीपर कदली कदलीपर कमल, तापर रहे हार ठान ॥ १ ॥ हारपर कनक कनकपर कलसी, मुख शशी कीर भान ॥ २ ॥ सुरदास प्रभु ऐसा छबीका हय, मीलये शाम सुजान ॥ ३ ॥

२३

उद्धवजी चलो बीदुर घर जाये ॥ धृ० ॥ शबीरीके बेर सुदामजीके चावल, रुचि रुचि भोग लगावे ॥ १ ॥ बडे बडे मंदिर कोन कामके, भाव आदर नहीं पावे ॥ २ ॥ सुरदास प्रभु तुम्हारे दर्शनकु । कायकूं बैर लगावे ॥ ३ ॥

२४

बाजे बाजे रे शाम तोरे पैंजनया ॥ धृ० ॥ पित्त छगोल्या लसत आंगोपर, हाथ कुटील लसतनया ॥ १ ॥ जसोमती सुतकु चलन शिकावे, लावे आंगोल्या दोन्ननया ॥ २ ॥ ब्रींदाजीबनके कुंजगलीनमो, तोह नचावत ग्वालनया ॥ ३ ॥ सुरदास प्रभु तुमारे दरशनकु । नीशिदिनि धरत ध्यानया ॥ ४ ॥

२५

को पत राखे मेरी, शामविना को पत राखे मेरी ॥ध्रु०।
अंधको अंध दुष्ट दुःशाषण, आणी सभा मध्य घेरी ॥ १ ।
महा मती हीन भया ए राजा, पकर लाई जुवेरी ॥ २ ।
भीष्म द्रोण कर्ण दुर्योधन, कीनहु न पाछी फेरी ॥ ३ ।
जो विश्वास आस मेरे मनमे, कहु करुणा मै तेरी ॥ ४ ॥
आई साहाय करो करुणा, तुटत राखे आवेरी ॥ ५ ॥
तजी खगराज आतुर उठ धाये, जेसे गजकी बेरी ॥ ६ ॥
सुरदास प्रभु भक्तके काज, करी अबरकी ढेरी ॥ ७ ॥

२६

राम भरोसा तेरा, अब मोरे राम भरोसा तेरा ॥ ध्रु० ॥
सुन कर साखी शरण तदी आयो, कर तजीय मन मेरा॥१॥
वाघ आजामिळ गुणका उधारी, शरण आये बहु तेरा ॥२॥
सुआसु तपसु नाम लेत है, उनका किया निवेडा ॥ ३ ॥
ग्राह ग्रहो गज डुबन लाग्यो, ग्रहो नामका भेरा ॥ ४ ॥
सुनत पोकार बार नही लागी, चक्र सु किया निवेरा ॥५॥
जन प्रल्हाद बांधे हिरणाक्ष, काढी खड्ग गयो तेरा ॥ ६ ॥
ऐसी साखी कहा लग कहीए, ब्रीद बडा हरी तेरा ॥ ७ ॥
मनशा वांछा और करमका, सुरदास चरणका चेरा ॥ ८ ॥

२७

देखोरे एक बाला, जोगी द्वारे हमारे आया हये ॥ध्रु०॥
व्याघ्रांबर दीगांबर वोढे, गला नाग लपटायो हये । माथे वाकु तीलक चंद्रमा जोगी, जटा बडाया हये ॥ १ ॥ ले बीछा नीकसी नंदराणी, मोतिया न याल भराया हये । लेवो बीछा जाय आसन पर बालक, मेरा ड ता हय ॥२॥
ना मै चाहुं तेरी दुनया दौलत, ना मैं चाहुं तेरी मायारे । आज आमेदिका वो बालक, मैं दर्शनकु आयो हये ॥ ३ ॥

ले बालक नीकसी नंदराणी, शंभु दर्शन पायो हये । पांच बेर पर कंपा कानो सींगी नाद बजायो हये ॥ ४ ॥ धन्य नंद धन्य धन नगरी, धन्य जशोमती मैया हये । सुरदास प्रभु त्रिभुवनके ठाकुर, बालक रुप दिखायो हये ॥ ५ ॥

२८

दीन वेदीनसो भाईरे, बोलो राम ही राम ॥ धृ० ॥ कृम लापत ले जायो तुजे वैकुंठ धाम । बहोर होयगा फेर, कर रहो मुक्काम ॥ १ ॥ धुरु प्रल्हाद बीभिषण नारद हनुमान । उनकी कीरत गावे सुन आपने कान ॥ २ ॥ ब्यास रु-क्मागंद अंबर्षी ओ तो हरीके प्राण । उनके उनके पाछे फिरत हये भगवान ॥ ३ ॥ ये नरदेह पाक अपनेकु सु-दार । मत कर औरतकी निंदा हित जाण गव्हार ॥ ४ ॥ सुरदास शिकलावे तुजे बारोबार । कर सेवा सद्गुरुकी भव जल उतरेगा पार ॥ ५ ॥

२९

बीगरी कौने बनाई, नाथ मोरे बीगरी कौने बनाई ॥ धृ० ॥ रामही बीगरा लछमण बीगरा, बीगरी सिता माई । अंजनीका सुत यंवकर वीगरा, क्षणमो लंका जलाई ॥ १ ॥ रावण मारा बीभिषण थापा, अहिल्येकु उद्धारीरे । इंद्रजीतका शीर उडाया, फीर गई राम दुहाईरे ॥ २ ॥ बनी बनीका सब कोई साथी दीन बनीका कोई नहींरे । भरी सभामो लज्या राखे, दीनानाथ सवाईरे ॥ ३ ॥ लाखा द्वारमो पांडव बैठे, गुप्त आग लगाई रे । चक्र मारके धरणी फोडी, अगमनकी राह बताई रे ॥ ४ ॥ मीरा बीगरी कर्मा बीगरी, बीगरा सज्जन कसाइरे । सुरदास प्रभु यंव कर बीगरा, हरीचरण धुम मचाईरे ॥ ५ ॥